श्रीसयाजी–साहित्यमाला

पुष्प २८८ वें

ऐतिहासिक पोवाडे

अथवा

मराठ्यांचा काव्यमय इतिहास

खंड २ रा

य. न. केळकर

श्री. [illegible]

यांस [illegible]

भेट

[illegible] केळकर

२८।१।४८

श्रीसयाजी–साहित्यमाला

पुष्प २८८ वें

ऐतिहासिक पोवाडे

अथवा

मराठ्यांचा काव्यमय इतिहास

खंड २ रा

यशवंत नरसिंह केळकर

सन १९४५

किंमत रु. १–६–६

प्रकाशक :
यशवंत नरसिंह केळकर,
पुष्करिणी, डेक्कन जिमखाना,
पुणें ४.

मुद्रक :
आ. रा. भट, एम. कॉम.
केसरी मुद्रणालय, पुणें.

श्री

विज्ञापना

आपल्या देशी भाषेंतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूने विद्याभिलाषी कै. श्रीमंत सरकार महाराज साहेब सर सयाजीराव गायकवाड (तिसरे) सेनाखासखेल, समशेर बहादूर, जी. सी. आय. ई., एलएल. डी. यांनी कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "श्रीसयाजी साहित्य मालें"त विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येतात.

तदनुसार "ऐतिहासिक पोवाडे अथवा मराठ्यांचा काव्यमय इतिहास खंड २ रा" या नांवाचा ग्रंथ श्री. यशवंत नरसिंह केळकर, पुणें यांजकडून तयार करविला, तो उक्त मालेंतून २८८ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर शाखा, प्राच्य-
विद्यामंदिर, बडोदें.
ता. १७ माहे नोव्हेंबर
१९४३.

भा. प्र. कोठारी,
भाषांतर मदतनीस

ज्यो. मा. मेहता,
विद्याधिकारी,
राज्य बडोदें.

हृद्गत

'ऐतिहासिक पोवाडे अथवा मराठ्यांचा काव्यमय इतिहास' या ग्रंथाचा पहिला भाग १९२८ साली प्रसिद्ध केला. त्यानंतर पंधरा वर्षांनी हा दुसरा भाग प्रसिद्ध होण्याचा योग येत आहे. या दिरंगाईचें कारण हेंच कीं, असलीं पुस्तकें भराभर खपतच नाहींत. पहिल्या भागाची प्रथमावृत्ति फक्त एक हजार प्रतींचीच काढली होती, पण ती संपूर्ण खपण्यास दहा बारा वर्षें लागलीं! अशा स्थितींत पुढील भागाचा सर्व मजकूर लिहून तयार असतांही दुसरा भाग छापण्याची कल्पना मनांत येणें शक्यच नव्हतें. शिवाय मध्यंतरींच्या काळांत 'वसईची मोहीम' हा ग्रंथहि लिहून छापून काढला. तोही अंगावरच. अर्थात् हा दुसरा भाग सध्या प्रसिद्ध होणें शक्य झालें याचें कारण बडोदे सरकारच्या सयाजी साहित्यमालेचा उदार आश्रय! पण तोहि मिळण्यास कै. वि. पां. नेने यांचेंच साहाय्य प्रथम कारणीभूत झालें हें नमूद करणें माझें कर्तव्य होय. पांचसात वर्षांपासून त्यांची व माझी ओळख, त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या दोन ग्रंथामुळे झाली होती. श्री. नेने हे मर्मज्ञ व वाङ्मयोपासक होते. त्यांनीं माझ्या या पुस्तकाचें हस्तलिखित पाहिल्यावर सयाजी साहित्यमालेची वाट मला दाखविली. हा ग्रंथ प्रसिद्ध झालेला पाहण्यास ते हयात नाहीत याचें दुःख होणें स्वाभाविक आहे.

चालू युद्धकाळांत कागद व छपाईचीं कामें यांचे दर कल्पनेबाहेर भरमसाट वाढलेले, अशा स्थितींत सयाजी साहित्यमालेने पुस्तक स्वीकृत करून आर्थिक साहाय्य देण्याचें कबूल केलें तरी फिरून एक फार मोठी अडचण उभी राहिली ती कागद मिळण्याची. पण तीहि अडचण पुण्याच्या डेक्कन पेपर मिलचे एक प्रमुख चालक डॉ. रामकृष्ण हरी भडकमकर, एम. ए. एम डी. यांनीं ताबडतोब दूर केली. त्या कामीं श्री. अनंत वासुदेव फडणीस यांनीं आपुलकीनें साहाय्य केलें. सबब वरील दोघा सद्गृहस्थांचा मी अत्यंत ऋणी आहे.

'केसरी'चे मॅनेजर, श्री. आ. रा. भट, यांनीहि आपुलकीने पुस्तक त्वरित व सुव्यवस्थित छापून दिलें याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

आता आंतील मुख्य विषयासंबंधीं. त्या बाबत ज्यांचें ज्यांचें साहाय्य मी घेतलें तें तेथें तेथें नमूद केलेंच आहे. शालिग्राम शितूतादि पहिले संग्राहक, सरस्वतीच्या दरबारांत शाहिरीवाङ्मयाला त्याच्या योग्य त्या स्थानीं स्थानापन्न करणारे कै. वि.ल.भाव्यांसारखे पहिले चिकित्सक आणि पुरस्कर्ते, आणि खरे–राजवाड्यांपासून तो श्री.शं.वि.आवळसकर, डॉ.मो.गं.दीक्षितादि उदयोन्मुख अभ्यासक इतिहास-संशोधकापर्यंत सर्वांच्याच साहाय्यामुळे पिपीलिका न्यायानें मी माहितीचे कण कण जोडले आहेत; तेव्हा या ग्रंथाचें श्रेय त्या सर्वांना आहेच. वऱ्हाडातील शारदाश्रमाचे श्री. य. खु. देशपांडे आणि नागपूर मध्यप्रांत इतिहास सं. मंडळाचे श्री. चक्रे यांच्या साहाय्याबद्दलहि त्यांचा ऋणनिर्देश करणे कर्तव्य होय. त्यांच्या प्रमाणेच इतर संशोधकांनी वा वाचकांनी अप्रसिद्ध पोवाडे मजकडे नकलून पाठविण्याची आस्था दाखविली तर पुढील तिसऱ्या भागांत त्या पोवाड्यांचा अवश्य समावेश करता येईल.

शक्यतों मजकुराखालींच त्याच्या खुलाशाच्या टीपा याव्या अशी योजना छपाईंत केली होती. तथापि पुष्कळ वेळां टीपा विस्तृत झाल्यामुळे त्या टीपांचा मजकूर पुढील पानावरहि गेला आहे. पण त्याला इलाज नाही.

राहिलेल्या पोवाड्यांचा एक तिसरा खंड काढून आपलें काम संपूर्ण शेवटास न्यावें अशी मनीषा मी बाळगिली आहे. शिलकी पोवाडे सुमारें शेसवाशें असून एकंदर ग्रंथ सहासातशें पृष्ठांचा खास होईल. त्याच ग्रंथांत एकंदर शाहीरांसंबंधीं मिळविलेली नवी विविध माहितीहि जोडावयाची आहे. पण तो तिसरा खंड छापण्याचा योग केव्हां येईल तेव्हां खरा !

य. न. केळकर

अनुक्रमणिका

ऐतिहासिक पोवाडे

अथवा

मराठ्यांचा काव्यमय इतिहास

खंड २ रा

ऐतिहासिक पोवाडे

अथवा

मराठ्यांचा काव्यमय इतिहास

खंड २ रा

दत्ताजी जाधवाचा पोवाडा

शिवकालांतील पोवाडे फारच थोडे म्हणजे अवघे तीनचारच उपलब्ध आहेत. (१) अज्ञानदासकृत अफझुलखानवधाचा, (२) तुळशीदासकृत तानाजी मालुसऱ्याचा, (३) यमाजीकृत बाजी पासलकराचा आणि आतां हा चवथा दत्ताजी जाधवाचा. शिवकालीन म्हणून या दत्ताजीच्या पोवाड्याचें महत्व आहेच. तथापि त्यांत प्रत्यक्ष शिवाजीचा संबंध आलेला आहे, म्हणून त्याची अपूर्वाई विशेष वाटते.

हा पोवाडा प्रथम शितूतांच्या संग्रहांत छापला गेला होता व ऐतिहासिक पोवाड्यांच्या आमच्या पहिल्या खंडांतच त्याला स्थान द्यावयाचें होतें. परंतु खरें बोलावयाचें म्हणजे त्यांतील वर्ण्य विषयाला अस्सल ऐतिहासिक साधनांचें प्रत्यंतर आम्हांस त्या वेळीं सांपडलें नव्हतें हें एक व पोवाडाहि अत्यंत अशुद्ध रीतीने शितूत प्रतींत छापल्यामुळे साध्या शब्दार्थाचीहि फोड करतां येईना.

शितूतांच्या पुस्तकानंतर म्हणजे १९०३ सालानंतर जवळ जवळ ३५ वर्षांनी शिवचरित्रकार्यालयाने फारशी साधनांची मराठी भाषांतरें प्रसिद्ध केलीं म्हणूनच आज तो पोवाडा आम्हाला टीपा देऊन सजवून व्यवस्थित मांडतां येत आहे. ३५ वर्षांपूर्वी शितूतांना ऐतिहासिक साधनांची कांहीच अनुकूलता नव्हती. आणि त्यांचें काम त्यावेळीं मिळेल तो पोवाडा

संग्रहित करून छापून त्याचा नाश टाळणें हेंच मुख्यतः होतें. खेरीज संशोधनाचा बारकावाही त्यांजपाशीं नव्हता. यामुळे पोवाडा छापतांना सुरवातीस त्यांनी जी वर्ण्य विषयाची माहिती दिलेली आहे ती पुष्कळदां चुकीची आहे. प्रस्तुत पोवाड्याबाबत त्यांनी असें लिहिलें आहे. "हा दिलेलखान मोंगलांचा सरदार शिवाजीवर जी फौज औरंगजेबानें पाठविली त्यावेळीं हा जाधवराव शिकारींत असतां त्याला कोंढून समरभूमीवर मरण पावला."

यांतील शिकारीचा त्यांनी केलेला उल्लेख सामान्यतः बरोबर असला तरी पोवाड्यांत त्या शिकारीचें बिलकूल वर्णन नाही. 'शिकार खेळुनी भार आमराईत उतरला' किंवा 'निःशंक भांडतो निर्वाणी वाग मोकळा सोडुनी' 'वाग धरुनी मार मारी राउताला' इत्यादी चरण सकृद्दर्शनीं पोवाडा वाघाच्या शिकारीबद्दल असावा असा भ्रम उत्पन्न करतील; पण वास्तविक तसें नाही. पण हा पोवाडा इतिहासाचें साधन या दृष्टीने बहुमोल आहे, हें पुढे दिलेल्या साधनादिकांतील निरनिराळ्या हकिगतीवरून स्पष्ट दिसेलच.

या पोवाड्याच्या भाषेबद्दल व रचनेबद्दल थोडासा प्रपंच करणें आवश्यक आहे. अफझलखान वध पोवाडा, तानाजीचा पोवाडा, बाजी पासलकराचा पोवाडा, त्रिंबकराव दाभाड्याचा पोवाडा, चंडीचा पौराणिक पोवाडा आणि हा दत्ताजी जाधवाचा पोवाडा यांच्या भाषेंत व रचनेंत फारच साम्य आढळतें. भाषा जवळ जवळ गद्यासारखीच आहे. पोवाड्याची भाषा तशीच असली पाहिजे हा सामान्य संकेतच आहे. तथापि या पांच पोवाड्यांतील गद्यप्राय रचना दुसऱ्या पोवाड्यांत तितकी कोठेंहि आढळणार नाही. या पोवाड्यांची भाषा गद्याला किती जवळ आहे व अडाणी शाहीर स्फूर्ति आली असतां आपल्या गद्यप्राय वाणीला न कळत पद्यरूप कसें सहज देऊं शकतों याचें एक फार सुंदर उदाहरण आम्हांस पेशवे दप्तराच्या २७ व्या खंडांत आढळलें. त्यांतील ११ वा लेखांक म्हणजे १७४५ च्या सुमारास कोणा अडाणी मराठा बातमीदारानें नानासाहेब पेशव्यास रघुजी भोसल्याच्या बंगाल स्वारीविषयीं बातमी दिलेलें पत्र होय. त्यांतील उताराच पुढे देतो. तो व वर उल्लेखिलेल्या पाच पोवाड्यांची भाषासरणी व रचना यांची वाचकांनीं बारकाईने तुलना करून पाहावी. आमचें म्हणणें स्पष्ट होण्यासाठी पत्रांत आम्ही पदरच्या चरणरेघा मुद्दाम घातल्या आहेत.

अनिक साहेबासी अरज । साहेबानी अज्ञा केली होती जी बंगाल्याच वरतमान कैसा झाला तो तकीक करूनी पाठवन । तरी साहेबाची आज्ञा घेऊनी निघाले । सोळावे दिवसीं नागपुरासीं अलों । दो दिसामधी कुल वरतमान तहाकिक केला । मग तिसरे दिवसी लेहूनी पाठविला । तो साहेबासी नाही पावला । ते जासूद जोत्याजी नाविकाचे होते । त्यांच्या मागुनी भिकाजी नाविकाची जोडी पाठविली । पंधरा दिवसामागूनि पाठविला । ते जोडी येऊनी दाखल झाली । पहेली जोडी मागून आली । मग नाविकानी बातमी मधीच ठेविली । साहेबांनीं आज्ञापत्र पाठविलें तें आपन्यास पावले । तेव्हा त्या जासूदांनी सांगितलें जी । पहिली बातमी मधिच ठेविली । म्हणवून बंगाल्याचा वरतमान थोडा मात्र आनिक लेहिला। तो काना मात्र सांभाळुनी साहेबानी वाचावा । रघोजी बाबा बंगाल्यामाजी गेला । जाऊनी कटकच्या ठाण्याला मोर्चे लाविले । आलाब्रिदीचा दिवान जानकीराम । त्याचा लेक दुलबराम । कटकच्या ठाण्यांत होता । ती महिन्यांत कटक घेतल । दुलबराम धरिला । ही खबर आलाब्रिदीस कळली । अनिक जानकी रामास । मग त्यानी येक पठाण पाठविला । अनिक यांचा निळोपंत गेला । सात लाख कबूल केले । वितकी रदबदल होती । पठाण यांच्या डेऱ्यांत होता तो यांनी दोनसे मानूस धरूनी आनिले । त्याचे नाक कान कापिले । ते त्या मोगलान देखिले । मग मोगल बोलला । मी रदबदल करितो मज देखता माणसाची नाक कापिली ही गोष्ट बरी नव्हें केली । बर असो । मी अलाब्रिदींला वरतमान सांगतो । फिरून अनीक येतो । मग तो मोगल गेला । अलाब्रिदीला भेटला । त्याना वरतमान सांगितला । सात लाख कबूल केले । परी मजदेखता दोशा मानसाची नाक कापिली । मग अलाब्रिदी बोलला हा बाह्मन मारूनी टाका । मग दिलीचा मोगल बोलिला म्या यासी इमान दिधला । हा सोडूनी देवा । मग निळोपंत सोडुनी दिधला । सला बिघडला । मग निळोपंत रघोजीबावाप आला । त्यान वरतमान सांगितला । जी । मोगल बधत नाही । मग मीर हबीब कटकच्या ठान्यांत ठेविला । मग तेथुनी कूच केला । बडदवनावर अला । तेथ सात लाख खजिना निघाला । मग तेथुनी कूच केला । गयावरूनी सोनभद्रावर अला । तो इकुनी अलाब्रिदी अला । पहिल जुध सोनभद्रावर झालं ।

तेथ गोळी जिवाळी लागली । येक दात पडला रघोजीबावाचा । मग सोनभद्रच्याकडून मोंगल पठन्यांत गेला । यांनी भवता येडा दिधला । परि तेथ लाग नाही चालला । मग सडे फउजेसी रघोजीबावा निघाला । बुनग टाकिल माग । रात दिवस चालून मग्सुजाबाजवर गेला । अरध्या रात्रीं पावले । बाहेरील पुरें लुटलें । तो हिकुनी भागीरथीच्या–कडन पाहाट मोगल दाखल झाला । मग दुसर जुध तेथ झाल । मग राघोजीबाबा तेथूनी निघाला । बडदवनावर अला । मग अलाब्रिदी किलसरमस्तखा फऊज घेऊनी अला । तिसर जुध जाल । रघोजीबावास पिटूनी काढिल । तेथ मस्तुभाखानाजीचा लोक भेटला । मग देसा येत होते । ज्या बारीत अपुन लुठल तेथे दाडग्यानी अरध बुनग लुठिल । मग नागपुरासी अले । हा वरतमाना मागच पहिल्यान पाठविला । परि साहेबासी नाही पावला । आनिकही कितीक मजकूर होता तो साहेबासी ना पावला । म्हनउनी थोडंबहुत अनिक लेहिला.

ऐतिहासिक माहिती

(१) या पोवाड्याला चांगला मुकाबला पाडणारी हकीकत आलमगीरनाम्यांत आलेली आहे. आलमगीरनाम्याचा लेखक औरंगजेबाच्या पदरचा व त्यानें खुद्द औरंगजेबाच्या सांगण्यावरून आलमगीरनामा लिहिला आहे. "त्यासाठीं दप्तरखान्यांतील आवश्यक ते सर्व कागद दाखविण्याबद्दल आज्ञा झाली आणि जरूर तेथें इतर अधिकाऱ्यांस व खुद्द बादशहासहि माहिती विचारण्याची परवानगी मिळाली; तसेंच लिहिलेली हकीकत बादशहास दाखवून तींत बादशहानें सुचविलेल्या दुरुस्त्या समाविष्ट करण्याचा हुकूम झाला."

जयसिंगानें पुरंदर व रुद्रमाळ घेण्याच्या इच्छेनें १५ मार्च १६६५ रोजीं कूच केलें. त्याच्या लोकांनीं १२ एप्रिल १६६५ रोजीं रुद्रमाळचा गड हल्ला करून जिंकला. पुरंदरचा वेढा त्याचबरोबर अतिशय सख्त झाला. तेव्हां शिवाजीने जयसिंगाकडे पंडित नांवाच्या एका ब्राह्मण वकिलामार्फत बोलणें सुरू केलें व जयसिंगाच्या म्हणण्याप्रमाणें त्याला भेटण्यासाठीं तो ११ जून १६६५ रोजीं राजगडाहून निघाला. पुढे जयसिंग-शिवाजीची भेट झाली व शिवाजीने आपला माणूस देऊन पुरंदर गडकऱ्यांस किल्ला खाली करून देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं किल्ल्यांतले चार

हजार लढाऊ माणूस बाहेर पडले. व मोंगलांनी किल्ल्यावर आपलें स्वतःचें ठाणें घातलें. नंतर तह वगैरे ठरून जयसिंग व शिवाजी यांची विजापूरवर मोहीम निघाली.

मोंगली लष्कर ५ डिसेंबर १६६५ रोजीं फलटणच्या कोटाहून दहा कोसांवर कूच करून गेल्यावर तें ठाणें जिंकण्यास नेताजी पालकरास पाठविण्यांत आलें.त्यानें तो कोट जिंकला. ९ डिसेंबर रोजीं मोंगली लष्कराचा तळ नीरेवर पडला. तेथें फलटणकर बजाजी निंबाळकर, जयसिंगास येऊन भेटला. नंतर शिवाजीच्या लोकांनी मंगळवेढें, ताथवडा व खटाव हीं ठाणीं जिंकलीं. १९ तारखेस मंगळवेढें जिंकल्याचें कळल्यावर जयसिंगानें त्या ठाण्यांत उदितसिंगास ठाणेदार केले व किल्ल्याबाहेरच्या प्रदेशाची फौजदारी सरफराजखानास सांगितली. यानंतर विजापूरकरांच्या सरदारांनी गनिमी काव्यानें मोंगलांच्या सैन्याची फारच धावाधाव उडवून देऊन त्यांची नुकसानी केली. मंगळवेढ्याचें ठाणें विजापूरकरांनी पुन्हा छापा घालून जिंकलें. राजा जयसिंगानें दूरदर्शीपणानें मंगळवेढ्याचा फौजदार सरफराजखान यास ताकीद दिली होती कीं, शत्रूची मोठी फौज त्या तर्फेस आली तर तुजपाशीं थोडी फौज असल्याने तूं तिजशीं न लढतां किल्ल्यांत शीर. पण त्याने हा सल्ला न ऐकतां आपल्या तोकड्या सैन्यासह शत्रूवर हल्ला चढविला. लढाई निकराची झाली पण शेवटीं तो स्वतः व त्याचे कांहीं लोक पडले आणि कांहीं जखमी झाले. हत्तींनाही जखमा लागल्या. ही चकमक झडल्यावर त्याचे मुलगे, बाकीचे शिपाई व हत्ती घेऊन किल्ल्यांत गेले. शत्रु किल्याच्या दरवाजापर्यंत आला. पण बुरूज व तट यांजवरून मारा सुरू झाला यामुळे त्याचे कांहीं लोक मेले व तो किल्ल्यापासून दूर निघून गेला. ता. १५ मार्च १६६६ रोजीं त्याने किल्ले नळदुर्गापासून तीन कोसांवर मुक्काम केला. दुसरे दिवशीं तेथून किल्ले गुंजोटीच्या बाजूस प्रयाण केलें. यापूर्वीच मिर्झाराजाने पतंगरावाला एका टोळीसह गुंजोटी घेण्यास पाठविले होते. त्याबाबत बातमी आली कीं तो तेथें पोंचला असतां किल्ला व कसबा यांत असलेल्या टोळीने पुढें येऊन लढाईस तोंड पाडिलें. तींत दोन्ही बाजूंचे कांही लोक जखमी होऊन पतंगरावाच्या हातास एक बाण लागला. पण रात्रीं शत्रू पसार झाला. आणि कसबा व किल्ला बादशाही ताब्यांत

आला. ता. १७ मार्च १६६६ रोजीं बादशाही लष्कर गुंजोटीस पोंचलें, तेव्हां मिर्झा राजानें हुकूम केला कीं, तो किल्ला जमीनदोस्त करावा. नंतर दुसरे दिवशीं जरीबी ७॥ कोस अंतर तोडून निलंग्यापासून एक कोसावर (येथें एक मातीची गढी होती व येथून कल्याणी साडेसहा कोस व अवसा दहा कोस होता) मुक्काम झाला. तेथून राजानें घालीबखान, दत्ताजी, खेलोजी, राघोजी व इतर कित्येक यांना आतिशखान व थोडा तोफखाना यांसह निलंग किल्ला घेण्यास पाठविलें. पण कांही दिवस लष्कराचा तेथेंच मुक्काम झाला. पाठविलेले लोक किल्ल्यापाशीं पोंचतांच तेथील लोकांना आपलें रक्षण होणें कठिण वाटून त्यांनीं अमान मागितलें, व किल्ला बादशाही लोकांच्या ताब्यांत दिला. राजानें सुलेमान विजापुरीला घोडा व पोषाक देऊन किल्ल्याच्या रक्षणावर नेमिलें.

जयसिंगानें आतांपर्यन्त नेताजीस बादशाही चाकर बनवून त्यास उत्साहित करण्यांत पुढाकार घेतला होता. आतां तो स्वतः शत्रूच्या स्वारांपासून वेगळा झाला व बादशाही लष्करांत येऊन राजास भेटला. शिवाजीची निष्ठा दाखविण्याची इच्छा असल्यामुळें राजानें त्या बाबतींत दरबारास लिहून कळविलें होतें. बादशहानें त्याची विनंति मान्य करून त्यास हुकूम पाठविला कीं, तूं सडा दर्शनास ये. तेव्हां या वेळीं तो आपला मुलगा संभाजी व आपले थोडे नोकर यांसह राजाचा निरोप घेऊन दरबाराकडे रवाना झाला. नंतर राजानें आघाडीवरील दत्ताजी व त्याचे साथीदार आणि इल्तमशपैकीं कांही लोक, इतर थोडे व तुर्कताजखान यांस रात्रीच्या पाहऱ्यासाठीं नेमिलें. पैकीं दत्ताजी निलंग्यापासून दोन कोस पुढें जाऊन कहीच्या रक्षणासाठीं उभा राहिला असतां शर्झा महदवीनें शत्रुसैन्यासह (हा जवळच होता) एक फौज तुर्कताझखानाच्या मुकाबल्यास पाठविली. खानानें त्या फौजेशीं सामना दिला. पण त्यांत त्याचे कांही लोक जखमी झाले. शर्झा तीन-चार हजार स्वारांसह दत्ताजीवर चालून आला. आणि त्याच्या लोकांनी चोहों बाजूंनीं त्यावर हल्ला करून लढण्यास सुरुवात केली. बादशाही वीर आपली कठिण अवस्था पाहून घोड्यावरून खाली उतरून लढूं लागले. दत्ताजी व त्याचे लोक यांनीं करतां येईल तितकें शौर्य प्रगट केलें. शेवटीं अतिशय जखमा होऊन दत्ताजी पडला. रुस्तुमराव जखमी झाला. तेव्हा शत्रूचे लोक त्यास घेऊन

गेले. सिदी रैहान स्वर्गास गेला. दत्ताजींचे मुलगे बसवंतराव व राघोजी यांस फार जखमा झाल्या होत्या. ते आपल्या थोड्या साथीदारांसह एका बाजूस झाले आणि परत मुख्य लष्करांत गेले. तेथे बसवंतराव झालेल्या जखमांमुळे मरण पावला. याच दिवशीं कुबादखानाचा मुलगा अबुल कासीम हरावलीच्या नात्याने तळापासून पुढे आला असता शत्रूची एक टोळी प्रकट झाली व त्यावर घसरली. त्याजपाशीं शत्रूस शिकस्त देण्याइतकें सैन्य नसल्याने गनिमी पद्धतीनें तो वागूं लागला. दिवसाच्या शेवटीं ही गोष्ट दिलेरखानास समजली तेव्हा तो हरावलीच्या फौजेसह त्या बाजूस रवाना झाला व लढाईच्या जागीं आला. त्यानें रात्र तेथेच काढली व लढाईत पडलेल्या जवळ जवळ दीडशे हिंदू मुसलमान वीरांच्या उत्तर कार्याची व्यवस्था लाविली. राजा रायसिंगही जयसिंगाच्या हुकुमावरून रात्रीच्या अखेरीस निघून त्याच्यापाशीं पोहोचला. दुसरे दिवशीं खान रणभूमीपासून तीन कोसांवर थांबलेल्या शत्रूस दफे करण्यासाठी रवाना झाला. पण ही खबर पोंचताच शत्रूचे लोक पळून गेले.

[आलमगीरनामा पृष्ठांक ५३, ५४, ५५ शिवचरित्रवृत्तसंग्रह ३ रा खंड, फार्सी विभाग.]

२ (शिवचरित्रवृत्तसंग्रह २ रा खंड फारसी विभाग) यांतील अलीनाम्यांत या विजापुरावरील मोहिमेसंबंधीं पुष्कळच तपशीलवार हकीकत दिलेली सांपडते. त्यापैकीं प्रस्तुत पोवाड्यास उपयुक्त तेवढी पुढीलप्रमाणे—

जयसिंगाने शिवाजीवर मोठी स्वारी केली. शेवटीं शिवाजीने त्याच्याशीं तह केला व दोघांनीं मिळून विजापुरकरांवर मोहीम काढली. तिकडे विजापूरच्या आदिलशहानेहि विजापूरच्या किल्ल्याचा पक्का बंदोबस्त करून महमदखान, एकलासखान, अबदुल महमदखान, सर्जाखान, अबदुल करीम, बहलोलखान या मुसलमान सरदारांस व व्यंकोजी भोसले, घाडगे, बांदल, घोरपडे, जगताप, खंडागळे, जाधव इत्यादि मराठे सरदारांस जमविले. मुख्य सेनापतीपद सर्जाखानास देण्यांत आले. मोंगल सैन्याने विजापुरकरांच्या सरहद्दीवरील मंगळवेढ्याचा कोट होता तो घेऊन तेथे त्या ठाण्यांत सरफराजखानाची नेमणूक केली. तेथून मोंगलांचें सैन्य कूच करून चार नाले उतरून येत आहे असें पाहून विजापुरी सेनापति सर्जाखानाने अचा-

नक दौड करून मंगळवेढ्यावरच चढाई केली. तेथे तुंबळ युद्ध झालें. खुद्द सर्जाखान व सरफराजखान यांचीच गांठ पडून सरफराजखान घायाळ होऊन घोड्याखालीं आला. तो मेला किंवा केवळ जखमी झाला हें निश्चित नाही. तथापि सरफराजखानाचा पुरा मोड होऊन सरजाखानाने फार लूट मिळविली. इतक्यांत जयसिंगाच्या सैन्याची एक मोठी टोळी विजापुराकडे सख्त हल्ला करण्याच्या इराद्याने निघाल्याची बातमी लागतांच सर्जाखान ताबडतोब विजापुराकडे परत फिरला. लवकरच मोठें तुंबळ युद्ध झालें व त्यांत मोंगलाचा पराभव झाला. पण पुनः यानंतरहि जयसिंगाने आणखी एकदां लढाई घेतली, पण त्यांतहि त्याचाच परभव झाला. फिरूनहि एकदां मोंगलांनी चढाई केली, त्यांतहि तोच प्रकार झाला. मात्र त्यांत सर्जाखान ठार झाला.

(३) कॉस्मे–द–गार्डा यानें लिहिलेल्या शिवाजीच्या चरित्रांत पुढीलप्रमाणे उपयुक्त माहिती आहे.

मोगलांचें लष्कर पुरंदराहून कूच करून विजापुराकडे गेल्यानंतर मोंगली सैन्याला दाणा, वैरण वगैरेंची अडचण भासूं लागली. जयसिंगाने यासाठी निरनिराळ्या ठाण्यांत फौजा ठेवून सैन्याला धान्य पुरविणाऱ्या वणजाऱ्यांचे पठारे ज्या त्या मुक्कामापर्यंत सुखरूप पोंचले जावे अशी तजवीज केली होती. मोंगली सैन्य याप्रमाणें बंदोबस्ताने कूच करीत असता विजापूरकरांच्या तीस हजार फौजेने अकस्मात् त्यांच्या पिछाडीवर येऊन हल्ले केले. आसपासचा मुलूख उध्वस्त केला व धान्याचा पठारा निभावून नेणारा १५०० मोंगली शिपायांचा बदरका असलेला असा ८००० वणजाऱ्यांचा हजारो बैलांचा पठारा त्यांनी लुटला. त्या वेळीं फार निकराची लढाई झाली. ती सकाळपासून तिसरे प्रहरपर्यंत होत होती. या लढाईत एकूण एक मोंगल शिपाई मारला गेला. अनेक वणजारीहि मारले गेले. नंतर लढाईच्या धुमाकुळाचा फायदा घेऊन सुमारें २००० वणजारी ३० लक्ष (?) बैलांचा पठारा घेऊन तो हांकून नेऊन मुख्य मोंगली सैन्यास मिळण्यास निघाले होते त्यावर विजापुरी सरदार निघाले. पण ते वणजारी त्या वेळीं त्यांच्या हातीं लागले नाहीत. पुढे गनिमी काव्यानें विजापुरी फौजेनें मोंगली सैन्यास अगदीं दमवून सोडलें.


(४) सर जदुनाथ सरकार यांच्या 'शिवाजी-चरित्रांत' पुढीलप्रमाणें हकीकत आहे–

पुरंदराला मोंगलांनी वेढा दिल्यावर प्रथम त्यांनी शेजारच्या रुद्रमाळ ऊर्फ वज्रगड किल्ल्यावर तोफा लाविल्या. मोंगलांच्या सरदारांचीं नांवें–जयसिंग, दिलेरखान, हरिभान व उदयभान गौर, तुर्कताजखान, किरतसिंग, राजा नरसिंग गौर, कर्ण राठोर, जगत्सिंग, सय्यद मकबुल अलम, दाऊदखान, राजा रायसिंग, महमद सलिहतखान, रामसिंग, शेरसिंग राठोड, राजसिंह गौर, रसूल बेग, चतुर्भुज चव्हाण, मित्रसेन, आणि इन्द्रमण बुंदेला. १३ एप्रिल १६६५ रोजीं मोंगलांनी रुद्रमाळेवर पहिला हल्ला चढविला व दुसरे दिवशीं किल्ला काबीज केला. नंतर मोंगली लष्करांनी निरनिराळ्या टोळ्या करून शिवाजीच्या सर्व मुलुखांत धामधूम आरंभिली. इकडे मोंगल एप्रिलच्या मध्यास पुरंदराच्या माचीपर्यंत जाऊन पोंचले. मे महिन्यांत मुरारबाजी पडला, मग निरुपाय जाणून शिवाजीनें जयसिंगाशीं तहाचें बोलणें लाविलें. १२ जून रोजीं पुरंदरावरून मराठे उतरले व मोंगली झेंडे वर चढले. ठरलेल्या तहाप्रमाणें अनेक किल्ले मोंगलास देऊन शिवाजी स्वतःला मोंगलांचा ताबेदार सरदार म्हणवूं लागला. नंतर मोंगलांनीं विजापुरकरांवर स्वारी काढली. त्यांतहि शिवाजी त्यांचेबरोबर होता. प्रथम मोंगलांनी ७ डिसेंबर १६६५ रोजीं फलटण जिंकलें. नंतर सुमारें एक आठवड्याने खटाव व १८ रोजीं मंगळवेढ्याचा कोट जिंकला. पुढे मोंगली सेना विजापुराकडे चाल करून जात असतां तिची २४-१२ रोजीं विजापुरी सरदार सर्जाखान, खवासखान, कल्याणीचा जाधवराव व व्यंकोजी भोसला यांच्या सैन्याशीं गांठ पडली. मोठी लढाई होऊन विजापुरकरांचा एक सेनापति हबशी याकूबखान व दुसरेहि कांही सरदार मारले गेले. नंतर लवकरच झालेल्या दुसऱ्या एका चकमकींत विजापुरकरांचा जाधवराव नांवाचा सरदार बंदूकीच्या गोळीने जखमी होऊन पांचसहा दिवसांनी मेला. तथापि मोंगलांना विजापूर जिंकतां आलें नाही; त्यांना स्वारी तहकूब करून जावें लागलें.

(५) दळवीकृत मराठा कुळांचा इतिहास भाग १ मध्यें जाधव घराण्याची जी शंभर–दीडशें पानांची अत्यंत विस्तृत कैफीयत छापिली

आहे तिच्यांत या पोवाड्यांतील नायक दत्ताजी जाधव यासबंधीं माहिती सांपडते. तीवरून हा दत्ताजी जाधव सुप्रसिद्ध लुकजी किंवा लखूजी जाधवरावाचा वंशज ठरतो. थोडक्यांत हकीकत अशी आहे.

निजामशहानें लुकजी व त्याचा मुलगा अचलोजी यांना दौलताबादेचे किल्ल्यांत दग्याने कैद करून ठार मारलें. (१६२९) त्यानंतर लुकजीची बायको म्हाळसाबाई ही आपला नातू संताजी व सून यांना घेऊन आपला दीर जगदेवराव याच्याकडे जाऊन राहिली. पुढे जगदेवरावानें दिल्लीकर मोंगलांना मिळून त्यांजकडून ५००० स्वारांची मनसब मिळविली. नंतर शहाजहानाने निजामशाहीवर स्वारी करून ती रसातळास नेली. त्या कामगिरींत या जगदेवरावाने फार मोठा वांटा उचलला होता. सबब त्याच्या बहादुरीबद्दल त्याला रुस्तुमखान हा किताब देण्यांत आला. जगदेवराव जाधवराव सन १६५० चे सुमारास वारला. त्याचा मुलगा बहादुरजी मनसबदार झाला. बहादुरजीचा मुलगा दत्ताजीराव. त्याला तिघे मुलगे. थोरला राघोजीराव नंतर यशवंतराव आणि जगदेवराव. राघोजीराव व यशवंतराव यांस संतती झाली नाही. फक्त जगदेवरावासच चार मुलगे झाले. ते अनुक्रमें—(१) मानसिंग (२) रघूजीराव (३) यशवंतराव (४) दत्ताजीराव.



या वंशवेलावरून पोवाड्याचा नायक दत्ताजीराव हा प्रसिद्ध लुकजी

जाधवरावाचा नातू होय. पोवाड्यांत रुस्तुमराव हा किताब आला आहे. तो या दत्ताजीचा थोरला मुलगा जो रघुजीराव त्याचा.

(६) पुणें भारत-इतिहाससंशोधक मंडळानें प्रसिद्ध केलेल्या शिवचरित्र वृत्तसंग्रह दुसरा खंड फारसी विभाग या पुस्तकांत तारीख-ई-अली या पर्शियन इतिहासांत जयसिंगाच्या विद्यापूर ऊर्फ विजापूरवरील स्वारीचें तपशीलवार वर्णन आलें आहे. त्यांतील माहिती प्रस्तुत पोवाड्यांतील तपशील उलगडण्यास बरीच उपयोगी आहे. सबब पोवाड्याच्या अनुरोधानें उपयुक्त तेवढी माहिती उतरून घेत आहों, ती अशी—

शिवाजीचा निरुपाय होऊन त्यानें आपले कित्येक किल्ले जयसिंगाच्या स्वाधीन केले, मग विजापूरही जिंकण्याची महत्त्वाकांक्षा जयसिंगास उत्पन्न झाली. तेव्हां विजापूरच्या बादशहानेंही उत्तम तयारी करून एकलासखान, सरजाखान, बहलोलखान, रुस्तुम जमान, सिद्दी मसऊद, सिद्दी अबदुल अजीझ व व्यंकोजी राजा इत्यादि सरदारांस तयार राहण्याचा हुकूम केला. लवकरच सरजाखानास अशी बातमी लागली कीं, जयसिंगाच्या एका टोळीनें विजापुरकरांचा मंगळवेढ्याचा किल्ला जिंकला असून तो राखण्याचें काम ५००० स्वारांच्या टोळीनिशीं सरफराजखानाकडे सोंपविण्यांत आलें आहे. सरफराज तिकडे जात असता सरजाखानानें त्यास गांठलें. तेव्हां एक लढाई होऊन त्यांत सरजाखानानें, सरफराजखान, त्याचा मुलगा व जांवई या सर्वांस ठार मारिलें. यानंतर विजापुरी सरदारांनी जयसिंगाचे अनेक ठिकाणीं पराभव केले. पुढे सलाबतखान हा ५००० स्वारांसह जयसिंगाच्या मदतीस येत आहे असें कळल्यावरून सरजाखानानें त्यासहि गांठून ठार मारलें. यानंतर जयसिंगानें पुनः मोठी तयारी करून १०,००० स्वार, पंचहजारी उमराव जाधवराव (दत्ताजी जाधवराव) व केसरीसिंग यांस रसद व लढाईचें सामान आणण्यासाठी रवाना केलें. पण विजापुरी सरदार खवासखान व सरजाखान यांना बातमी लागून त्यांनी जाधवरावादिकांवर तुटून पडून संपूर्ण पराभव करून त्यांची वाताहत केली.

(७) दत्ताजी जाधवासंबंधीं कै. श्री. यादव माधव काळे यांच्या वऱ्हाडच्या इतिहासांत कांहीं अधिक माहिती आली आहे ती त्यांनीं देऊळगांवकर

जाधवांच्या संग्रहीं असलेल्या एका जुनाट बखरीवरून घेतली असल्यामुळे महत्वाची आहे. आपल्या उपयोगापुरती त्यांतील माहिती पुढीलप्रमाणें—

लुखजी जाधवाचा चकमकींत काळ झाल्यानंतर त्याची बायको आपला दीर भेतोजी ऊर्फ जगदेवराव यांकडे गेली. जगदेवरावाला मोंगलांनी ५००० स्वारांची मनसब दिली. मुलगा बहादुरजी व नातू मानसिंग यासहि मनसबा दिल्या. तसेंच जगदेवरावास रुस्तुमराव हा किताब दिला. जगदेवराव १६३५ त दिल्लीस वारला. त्यानें लुखजीचा तिसरा मुलगा बहादुरजी यास दत्तक घेतलें होतें.

मूळ लुखजी जाधवाबरोबर त्याचा जो मुलगा अचलोजी मारला गेला होता त्याचा अज्ञान मुलगा संताजी यांस व अचलोजीचे बायकोस घेऊन सुप्रसिद्ध जिजाबाई भोसलेची आई म्हाळसाबाई ही पुणें प्रांतीं गेली.

लुखजीचा सर्वांत कनिष्ठ मुलगा राघोजी. त्याच्या शाखेंतील दुसरा पुरूष दत्ताजी तोच या पोवाड्याचा नायक. मोंगलातर्फे लढतांना तो कर्नाटकांत १६६४ त पडला असें काळे लिहितात. कर्नाटक म्हणजे विजापुराकडील भाग हाच अर्थ त्यांना अभिप्रेत असावा.

पोवाड्यांतील हकीकत

निव्वळ पोवाड्यावरून निघणारी माहिती पुढीलप्रमाणें आहे. औरंगजेबानें दक्षिणेवर स्वारी करण्याचा हुकूम देऊन शिवाजीचे किल्ले काबीज करण्यास सांगितलें. त्यानें पाठविलेल्या सैन्यांत पुढील सरदार होते. मुख्य सेनापती दिलेरखान नंतर दाऊदखान, सरफराजखान, कुरतुबखान, लोदी मुशाफिरखान, हे मोंगल, रोहिले व पठाण जातीचे. त्यांचे जोडीस दक्षिणी व रजपूत सरदार होते ते पुढीलप्रमाणें. रावरंभा निंबाळकर, बाबाजी भोसले, जगजीवन जाधवराव, माणकोबल्लाळ (ब्राम्हण), दस्वंतसिंग व भावसिंग, राजाकर्ण, मिर्झाराजा जयसिंग.

या लष्करानें येऊन पुरंदरास वेढा दिला व पुरंदराजवळील अगदी नजिकचा वज्रगड उर्फ रुद्रमाळ नांवाचा किल्ला होता. त्यावर तोफांचा मारा धरिला. बरेच दिवस किल्ला जोरानें भांडला. तथापि तो शत्रुसैन्यपुढें राखतां येणें यापुढे मुष्कील आहे असें समजून गडकऱ्यांनीं "यापुढें किल्ला लढविणें

शक्य नाही, काय करावें तें कळवा ? "असा तांतडीचा निरोप शिवाजीमहाराजांकडे पाठविला. जासुदानें गडाची सर्व खबर त्यांस कळवून सांगितलें कीं, "यापुढे सल्याचें बोलणें घातलें नाही तर मोंगल सैन्य हटकून किल्यावर चढल्याशिवाय राहात नाही. व मग त्या कत्तलींत आपलीं माणसें मात्र फुकट मारलीं जातील." जासुदाची मुखजबानी ऐकल्यावर महाराजांना प्रथम थोडे इशिम म्हणजे त्वेषच आला. ते उद्गारले "आजपर्यंत मी मोंगलाशीं दावा लाऊन त्यांची हड्डी नरम केली नाही काय ? शास्ताखानाची शास्ती केली आणि मागाहून जसवंतसिंग येऊन त्यानें सिंहगडास वेढा दिला; तेथेही त्याचा पराभव करून त्यांस परत पिटून लाविलें. असें असतां आता पुरंदर हातचा मोंगल छिनावून घेतात काय ?" परंतु पहिला आवेशाचा भर ओसरल्यानंतर विचारें पाहतां त्यांना खरी वस्तुस्थिति उमगली व मुलूखभर पसरलेल्या एवढ्या प्रचंड मोंगली फौजेशी या वेळीं आपणास सामना देतां येणार नाही हें ओळखून त्यांनी राजा जयसिंगामार्फत तहाचें बोलणें लाविलें. जयसिंगानेहि मी 'रजपूत, तूंहि मराठा, रजपूतच' असा दिलासा देऊन शपथप्रमाण दिल्यावर त्यांचा तह ठरला, "भिऊ नको मराठ्या, शिवाजी ! कौल राखण तुला" असें पक्कें अश्वासन मिळाल्यावर महाराज म्हणाले, "मिलकर जाना रजपुताला".

नंतर महाराजांनी किल्ला मोंगलांच्या हवालीं केला व त्यावर मोंगली निशाण चढलें. तहाप्रमाणे इतरहि किल्ले बादशहाच्या हवालीं करून महाराज पातशाही चाकर झाले.

ही शिवाजी महाराजावरील मोहीम उरकल्यानंतर पातशाही हुकमाप्रमाणें मोंगलांनी विजापुरावर मोहीम काढली. तींत ८०,००० घोडदळ होतें. आघाडीस दिलेरखान चालला तो करकमभोशाला गेला व तेथून मंगळवेढ्यास जाऊन तेथल्या कोटाला मोगलांनीं वेढा दिला. त्यांनी कोट जिंकला. परंतु आंतला विजापुरी सरदार सरफरासखान पळून गेला होता. मग मोंगली फौज निलंग येथे गेली व तेथे छावणी करून राहिली. उलट विजापुरीं लोकांनी गनिमी काव्याने मुलुखाची नासधूस करून तो उध्वस्त करून मोंगलांची रसद मारण्याचा सपाटा लाविला. त्यांनी त्यांच्या वणजाऱ्यांचे हजारों बैल लुटले. "लुटिल काबाड । वाणी

बहुत नागविला." नंतर मोंगलांनीं दत्ताजीराव जाधवाला छापे घालणाऱ्या विजापुरी फौजांवर जाण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे तो आपली फौज घेऊन निलंगाच्या रोखानेच निघाला. कूचमुक्कामांतच एक दिवस तो सहज शिकारीसहि गेला. होणारा सारखी बुद्धी माणसाला अकस्मात् होते तसें झालें. शिकार वगैरे झाली. व मग भर दोन प्रहरीं ती टोळी एका आंबराईंत विसाव्यास उतरली. लोकांनी आपली पागोटीं उतरली, कमरबंद सैल केलें, घोड्यावरचीं जिनें उतरलीं. दत्ताजीहि आराम करीत हुक्का ओढीत किंवा पान चघळीत बसला. असे ते बेसावध होते. तोंच दैवयोगाने विजापुरी सरदार सरजाखानाची टोळी तलाव्यास तिकडेच आली होती, तिने जाधवरावाचें निशाण ओळखलें व त्याची फौज येथे उतरली आहे ती सहजांत घ्यावी असें तिने ठरविलें. म्हणून सरजाखानानें हेजीब पाठवून दत्ताजीला असा निरोप पाठविला कीं आम्ही मोठ्या फौजेसह आलों आहोंत, आम्हाशीं सामना देणें तुम्हांस केवळ अशक्य आहे, "भांडतां पुरवेना तुम्हांला निघुन जावें ये वेळेला". पण या अपमानास्पद निरोपानें दत्ताजीची आग आग झाली व त्यानें आपला पेशवा रखमाजी नांवाचा होता त्यास बोलवून खलबत केलें. आणि सांगितलें कीं "आपण पायरव काढला म्हणजे पळून गेलों तर आपली दुष्कीर्ती होईल. काय वाटेल तें झालें तरी आपण शत्रूशीं लढाईला उभे राहाणार "भांडेन सर्तीनसी न आइके नेटले या बोला." अखेर दत्ताजीने सरजाखानाच्या हेजिबाला उलट अपमानास्पद निरोप देऊन पिटून लाविला. मग थोड्याच वेळांत सरजाखानाच्या फौजेनें येऊन दत्ताजीच्या तळाला घेरा घातला. आणि उभयपक्षीं निकराचें रण सुरू झालें. सरजाखानाच्या राउतांनी फळी फोडून दत्ताजीरावास जिवंत पकडण्याची शर्थ केली. त्या वेळीं यशवंतराव सरदार त्वेषाने तुटून पडला, तो मारीत मारीत सरजाखानाच्या निशाणापर्यंत गेला. त्याचें तें अचाट शौर्य पाहून खासा सरजाखानानेंहि "खूब किये समशेर" म्हणून मान डोलावली! यशवंतरावाला चांगला आंत येऊं देऊन "मारित पुढे येऊं दिला" आणि मग लगेच "साता पांचानी मेळाविला." त्या हाणाहाणींत यशवंतरावास अनेक जखमा होऊन तो ठार झाला. दत्ताजीचा दुसरा पुत्र रघोजी रुस्तुमराव यानेंहि अचाट पराक्रम केला. त्याला

एकवीस कहरी जखमा झाल्या. येसाजी पंचहत्यारी, संताजी, दावजी कमळजी, येसाजी सूर्याजी, आणि हंसाजी यांनीहि निकराचें झुंज दिलें. हंसाजीचें मनगट तुटून डोक्यावर जखम झाली. खासा दत्ताजी तर सारखा लढतच होता. त्याने हातांत बरची घेऊन अनेक मुडदे पाडले. इतक्यांत शत्रूच्या कोणा शिपायानें पाठीमागून अनवळता वार केला. त्यामुळे दत्ताजीच्या हातांतील बरची उडून गेली. तेव्हा तो कमरेचा गुर्दा घेऊन लढूं लागला, पण लवकरच तो गुर्दाही शत्रूच्या शिपायांनीं उडविला. अखेर नाइलाजानें दत्ताजी पायउतारा आला आणि लंगर घेऊन लढाई करूं लागला. त्याला अनेक जखमा चढल्या व अखेर डोळ्याला चक्री लागून तो घायाळ मरणोन्मुख होऊन रणांत पडला. त्या बरोबर शत्रूनें तेथें एकच गोलमाल करून त्याचा मुडदा त्याच्या लोकांना काढूं दिला नाही. खासा सरजाखान आला व दत्ताजीचें शीर तोडून घेऊन जयघोष करीत निघून गेला.

दत्ताजी पडल्यावर लढाई संपली. रात्र झाली होती. तरी वार्ता कळतांच खासा दिलेरखान चवरडोलांत बसून दिवट्यामशाली लाऊन जाधवरावाचा मुडदा शोधण्यास रणभूमीवर आलो. धड तेवढें मिळालें तें उचलून पालखींत घालून मोठ्या सन्मानानें तळावर आणलें. दत्ताजीचें प्रेत मोंगल छावणींत येतांच त्याची बायको बहिणाबाई हिनें आकांत केला, त्याला सीमाच नव्हती.

रघोजी रुस्तुमराव जखमी तेथेच होता, त्यालाहि दुःखाचा 'कळंब आला.' "बहिणाबाईने आकांत केला। कळंब राघोजीला आला। रोदनाकारितां दिन उदया पातला।" दुसरे दिवशीं प्रातःकाळींच बहिणाबाईने सती जाण्याचा निश्चय जाहीर केला. मुडदा होता पण शीर नव्हतें तें मिळवून "शिरारुंडाची" भेट केल्याखेरीज धर्माप्रमाणें अग्निसंस्कार होणें शक्य नसल्यामुळे बहिणाबाईनें सरजाखानाकडे माणूस पाठवून मोठ्या मिनतवारीने दत्ताजीच्या शिराची मागणी केली. सरजाखान मस्तींतच होता त्याला तें शीर विजापुरी बादशहाकडे पाठवून स्वतःचा मुजरा करून घ्यावयाचा होता. म्हणून तो शीर देईना व म्हणूं लागला कीं, "उमरावका शीर मैं भेजुंगा दरबारला" असा मोठा पेंच येऊन पडला. पण याच वेळीं स्वजातीचे

खानदान माणूस उपयोगी पडतें ! सरजाखानाच्या लष्करांत बाबाजी घाडगा हा एक मातबर मराठा सरदार होता. त्यानें सक्त रदबदल केल्यामुळे सरजाखानास अखेर शीर द्यावे लागलें. शाहीर म्हणतो. " घाडग्यांनी बोल (कीर्ति) केला । आपला स्वहितधर्म (स्वयातिधर्म) राखिला । " मग यथाविधी शीर व धड जोडून चिता रचण्यांत आली. सर्व सौभाग्यालंकार घालून चंदनाची उटी लावून हत्तीवर बसून बहिणाबाई वाजत गाजत चितेजवळ आली. तिने त्या वेळीं अपार दानधर्म केला. अखेर यथाविधी चितेचें पूजन करून " रुद्रा योगिणी " सारख्या सतीत्वाच्या उग्र तेजानें तळपणाऱ्या त्या साध्वीनें राम म्हणत चितेंत उडी घेतली !

दत्ताजी जाधवाचा पोवाडा

१

(शाहीर—अज्ञान यमाजी)

नमीन मंगलमूर्ती ॥ म्यां नमिली सरस्वती ॥ विनवी कर जोडुनी मात हुदा दे मजप्रती ॥ रणामध्यें रणशूर म्हणविती ॥ प्राण त्यजूनि त्याग करिती ॥ मरणा हाक जीवना आकरसें साराच्या गती ॥ १

जाहाली पादशाही हुकमती ॥ वजीर विजापुरावरी जाती ॥ झगडला दत्ताजी मर्द थोर केली ख्याती ॥ गाजीवली समशेर बावीस उमराव जाणती ॥ २

वजीर होते कोण कोण ॥ सरलष्कर दलीलखान ॥ दलीलखान दाउदखान सरफरास कुरतुबखान ॥ रोहिले जोरावार पठाण ॥ चालले वजीर ॥ संगाते लोदी मुशापीरखान ॥ ऐका दखनचे वजीर ॥ ३

राव रंभाजी निंबाळकर ॥ भोंसल्या बाबाजींचें संगें जाधवराव वजीर ॥ जाधवराव जगर्जीवन ॥ माको बल्लाळ बिरामण ॥ रजपुताचा भार ॥ दसवंतसिंग राजा कर्ण ॥ ऐका रजपुती वजीर ॥ जेसिंग राजा ज्याचा सर ॥ भावसिंग चाले बरोबर ॥ रजपुताचे भार ॥ ४

मात हुदा दे मजप्रती—माते ! हुदा दे मजप्रती; हुद्दा—काम, अधिकार.

मरणा हाक जीवना आकरसें साराच्या गती—मर (मरे) णाहाक (नाहक) जीव नाआक (नाहक) सेंसाराच्या (संसाराच्या) गती; असें असावे. पण अशी फोड केली तरी समाधान होण्यासारखा अर्थ जुळत नाही.

बावीस उमराव जाणती—बावीस हा शब्द ' सर्व ' या अर्थी वापरला आहे. सरलष्कर—सर्व लष्कराचा प्रमुख सेनापति. हुकमती—हुकूम. वजीर—सरदार. दलीलखान—दिलेरखान. जोरावार—गर्विष्ठ किंवा तम असणारे. माको—माणको असावें. बिरामण—ब्राह्मण. भार—समुदाय. दसवंतसिंग—यशवंतसिंग. जेसिंग राजा ज्याचा सर—सर-मुख्य अधिकारी. ज्याचा जयसिंग हा मुख्य अधिकारी होता असें रजपूत सरदारांचें सैन्य.

भीडतां दलीलका लष्कर ॥ गड घेरिला पुनेधर ॥ रुद्रम्हालावर मार होतो थोरथोर ॥ पुनधरी झगडा झाला थोर ॥ झगडतां मावळला दिनकर ॥ झाली असे रात्र ॥ फिरले उमरावाचा भार ॥ ५

गड भांडता झाला जेर ॥ गडकरी केलासे विचार ॥ शिवाजी सर्जा-प्रति ज्यांनी पाठविली खबर ॥ बंला आलास हुजीर ॥ सांगे गडाची खबर ॥ चढतील मोंगल माणूस ॥ जाया होईल फार ॥ ६

पुनेधर–पुरंदर. रुद्रम्हाल–रुद्रमाळ ऊर्फ वज्रगड. फिरले–फिरला. गडकरी केलासे विचार—पुरंदर गडकऱ्यांनी विचार केला.

सर्जा—सिंह. अफझलखान–वधाच्या पोवाड्यांतही शिवाजीचा सर्जा या पदवीनें उल्लेख केलेला आहे.

बंला—बंला आलासे हुजिर–'बंला' ही मोडी वाचनाची चूक असावी. मूळ शब्द बंक असा पाहिजे. बंक म्हणजे चौकी. येथे अर्थ "तो जासूद हुजूर चौकीपाशीं म्हणजे खास शिवाजीमहाराजांच्या देवडीपाशीं आला.' 'म्यान-बंक' असाहि शब्द जुन्या कागदपत्रांत येतो. म्यानमुलुख तसा म्यानबंक. म्यान म्हणजे स्वतःचा, खास दिमतीचा असा अर्थ. बंक किंवा बंका म्हणजे राजा-च्या किंवा सरदाराच्या देवडीजवळचे खास चौकीपहारे किंवा पहारेकरी.

पुरंदरे दप्तर भा. ३ मधील खेडेबारे देशपांड्यांच्या करीण्यांत हा शब्द आला आहे. "राजेश्री साहेबाकडे (शिवाजीमहाराजाकडे) वाडियांत गेलों. बंकी गोमाजी नाईक (पानसंबळ) व कृष्णाजी नाईक सोंगटी खेळत बसले होते, त्यापाशी उभयेता बैसलों. ओसरीवरी राजेश्री साहेब (शिवाजी) व पेशवे व बावाजी नाईक, रघुनाथपंत कोरडे व त्रिंबकपंत डबीर, आबई यैसी बैसले होंते. बंकांस व वोसरीस पांच–सहा हात अंतर होतें" या वर्णनावरून बंक किंवा म्यानबंक म्हणजे राजाचा किंवा सरदाराचा खास शरीरसंरक्षक म्हणजेच एडिकँप होय.

रामदास–रामदासी मासिकाने छापलेल्या चौल येथील अधिकारी संग्रहापैकीं ६३व्या लेखांकांत म्यानबंक शब्द आला आहे. "तदनंतर माहाराज छत्रपति निर्गमिलीयावर राजेश्री संभाजी राजे यांचा अंमल जाहाला. त्यांच्या अंमलांत पिलाजी तबीब याचा मूल; त्याचा मर्तबा रायेगडाहून परवाने

राजा बोले सर्दाराला ।। म्यां मोंगलासी दावा केला ।। लुटली सुरत शास्तीखाना केल्या हल्ला ।। मागून दसवंतसिंग आला ।। गड कोंडाणा भांडला ।। भिऊ नको म्हराठ्या शिवाजी कौल राखण तुला ।। राजेच बोलले मिलकर ।। ज्याणा रजपुताला ।। ७

राज मोंगल एक जाहाला ।। गड मोंगलाचे हातीं दिला ।। पातशायाच झेड तोफखाना चढविला ।। गड पातशाया खालसा केले ।। गडावर

येत, त्यांमध्ये राजश्री बजाजी माहाले म्यानबंक हुजरात, ते उन्मत्त होऊन माहाराजाजवल कबुलायत केली कीं हबसी याची उंदेरी घेऊन देतो."

तसेंच—"शके १७०७ सवंसरी हबसी येण्हे चेऊल मारिले. मारावयास कारण सिवाजीराजे यांचे नीरणास वेथा होती. ते समइ जागा जागाहून तबीब नेले. उपाये न चले. ते समई पिलाजी तबीब न्हाव्ही चेउलास होता त्यास नेऊन त्याचे हातोन गुण जाहाला म्हणौन त्याची नवाजीस करोन पालखी देऊन चेउलास पाठविला. तेण्हे मर्यादेनें वर्तणूक केली. त्या मागोन त्याचा पुत्र बजाजी माहाला रा संभाजी राजे याचे अमलात हुजरून पत्रें चेउलास येत. राजश्री बजाजी माहाले म्यानबंक हुजुरांत यांचे मालुमातीने अमलदार जमीदार न्याये मनसुबी करावी" (रामदासरामदासी मासिक. वर्ष २०, अंक २४०, चौल येथील अधिकारी दप्तर.)

शास्तीखाना केल्या हल्ला—शाहिस्तेखानावर हल्ले केले. हल्ला हा शब्द जुन्या काळीं स्त्रीलिंगी वापरीत असत. येथे :हल्ला हा अनेकवचनी शब्द आहे.

कौल राखण तुला—तुला कौल देतों, तुझें रक्षण करतों.

राजेच बोलले मिलकर ज्याणा रजपुताला—शिवाजीमहाराज म्हणाले कीं, "रजपुताला मिलकर जाना" म्हणजे रजपुताशीं (जयसिंगाशीं) सख्य किंवा तह करावा. (२) राजा जयसिंग म्हणाला "मी रजपूत आहे. माझा विश्वास धर व 'मिलकर जाना' म्हणजे माझ्याशीं तह कर. जयसिंगाला 'मिर्झाराजा' असा किताब होता. राजमोंगल—राजा आणि मोंगल म्हणजे शिवाजी व मोंगल. झेड—झेंड, झेंडे. गड पादशाया खालसा केले—निरनिराळे गड

चतुर सुभेदार ठेविले ॥ पातशाई चाकर झाले ॥ म्हणे शिवाजी राजा बोले ॥ बावीस उमराव मिळाले ॥ चवदा महाल वऱ्हाडांत दिले ॥ हुकूम पाच्छायाचा जोड दिली आगराच आला ॥ ८

बाजा नगारा बाजिले ॥ पातशाही हेजीब आले ॥ विजापुरावरी मोहीम ऐसी हजार घोडा चाले ॥ खान म्हणे चालला तेथुनी ॥ आवघा कटकबंद करूनी ॥ दिलीलखाना मोहोरे पठाण चाल केदारफणी ॥ ९

भारामागें भार खान कुरकुमभोशा गेला ॥ फौजेमोहोर फौज मोंगल मंगळवेढ्या गेला ॥ मंगळवेढ्या जाऊन सरफरासखान वेढिला ॥ मारिला कोट खासा नाहीं सांपडला ॥ तेथून कूच केलें कटकाला ॥ मोंगल निलग

पादशहाच्या हवालीं केलें. म्हणे—या पोवाड्यांत बऱ्याच ठिकाणीं 'म्हणे' असा शब्द आला आहे तो निरर्थक आहे. उदादरणार्थ, "म्हणे शिवाजी राजा बोले" "घोड्या घाला जीन म्हणे दत्ताजीराव बोले" किंवा "खान म्हणे चालला तेथुनि." आपण "तो म्हणे जाणार आहे" "काय म्हणे, त्यानें चोरीच केली" इत्यादि वाक्प्रचारांत जसा म्हणे या शब्दाचा निरर्थक उपयोग करतो तसाच येथें शाहीरानें केला आहे. शाहीर पोवाडा म्हणतांना गद्यासारखाच मध्यंतरीं पुष्कळदां म्हणतों व खुलाशादाखल गद्य वाक्येंहि, कीर्तनांत पद चालू असतांना कथेकरी बोलतो त्याप्रमाणें बोलतो. यापुढे याच पोवाड्याची राजवाडेप्रत छापली आहे ती पाहिली असतां सर्व खुलासा आहेच. जोड—जोडा, जासूदजोडा. दिली—आगराच—दिल्ली आग्र्याचा. दिल्ली–आग्र्याहून बादशहाचा जासूदजोडा हुकूम घेऊन आला. बाजिले—वाजविले. हेजीब—वकील, निरोप्या. कटक बंद करणें—सैन्याचा आळाबांधा करणें, स्वारिवर निघण्यासाठीं सैन्याची तयारी तरतूद करणें. कूच केले कटकाला—कटकाचें कूच करविलें. कटक-सैन्य. मोंगल रतुडेर दिला—मोडीवाचनाची चूक. "मोगलाच डेर दिला" असा मूळ पाठ असावा. राजवाडेप्रतींत 'रखतडेर' असे शब्द आहेत. त्यावरून कदाचित् 'रक्तडेरे' म्ह. लाल तंबू दिले, उभारले असेंहि म्हणतां येईल. निलंगावर मोंगलांनीं आपले डेरे दिले. निलंग हें ठाणें नळदुर्गाच्या

पावला ।। निलगे मैदानीं मोंगल रतुडेर दिला ।। लष्करांनी मव्हपाणी ।। वजीर करत्याती धांवणी ।। मोंगल आले बहु दुरूनी ।। विद्दलशाही केली खचणी ।। १०

उमराव पाठविले शिरपाव देउनी ।। दाउदखान दलेलखान बसले मजालस करूनी ।। ह्याबसी बलूलखान बसला मजालस करूनी ।। हेंदूराव केदारफणी ।। घाटगा झुंजारराव चालिला ।। ११

नाईकजी पांढरा कुल वजीराचा मेळा जाहाला ।। बोले सर्जाखान

उत्तरेस सुमारें २३ मैलांवर आहे. **मव्हपाणी**—मोडीवाचनाची चूक. 'फलटणी' असें पाहिजे. मोंगली सैन्यानें फलटणावर चाल केली.

विद्दलशाही—आदिलशाही मुलूख "विद्दलशाही केली खचणी" म्ह. आदिलशाही मुलूख मारण्यास सुरुवात केली. **शिरपाव**—शिरोलंकार. **मजालस करून बसणे**—दरबार भरविणें, मसलतीकरिता एकत्र बसणें. "जाऊलीच्या मैदानी बैसले शिपाई मजलशी । मिळून बारा शिपाई कधी न येती जाऊलीसी ।। (पासलकर पोवाडा.) **हेंदूराव केदारफणी**—हिंदूराव घोरपडे याचाच केदारफणी किताब कीं काय कळत नाही. शिवभारतांत घोरपडे याचें "घोरफटः" असें संस्कृतीकरण केलेलें आहे तशासारखें हें कांही आहे कीं काय कळत नाही. फणी म्ह. नागाची फटा किंवा फडा. परंतु केदार याचा अर्थ नाग किंवा साप असा कोठें आढळत नाही यामुळे संशय वाटतो. नवव्या चौकांत केदारफणी शब्द आला आहेच. केदारफणी म्हणजे घोरपडे नसेल आणि अर्थच बसावावयाचा तर, 'कंदारखानी' किंवा 'कंबरग्यानी' असे शब्द असावेत असें गृहीत धरलें पाहिजे. कमरगा म्हणजे सैन्याच्या आघाडी–पिछाडीमधील कमर किंवा मध्यभाग. तो शब्द घेतला तर दिलेरखान गोट आवळून त्यास सैन्याच्या मध्यभागीं घालून चालला असा अर्थ बसवितां येईल. (२) दिलेरखानाच्या पुढें खंदारखानी म्हणजे कंदहारी पठाणांची फौज निघाली. **कुल**—सर्व. **दवडा केला**—दौड केली, दौड करून छापा घातला. **वणजारी**—वणजारी लोक. हे लोक सैन्यांत

दवडा केला ॥ सातशें वणजारा लुटला ॥ लुटिले काबाडवाणी बहुत नागविला ॥ १२

हुल पडली कुल कटकाला ॥ गोट मारुनियां नेला ॥ मारिलास गोट सर्जाखान निघून गेला ॥ कागद दर्बारीच आला ॥ मर्द कबरबस्त केले ॥ घोड्या घाला जीन म्हणे ॥ दत्ताजीराव बोल ॥ १३

धान्य पुरविण्याची कामगिरी करीत असत. येथे ७०० वणजारा लुटला म्हणजे सातशें वणजाऱ्यांचे लादलेले हजारो बैल लुटले. कॉस्मे द गार्डा हा आपल्या शिवचरित्रांत लिहितो—'या वणजाऱ्यांना घरदार नाहीच. त्यांचे जन्ममृत्यु संसार सर्व कांही प्रवासांत व्हावयाचे. हे लोक शेंकडो हजारों बैल ठेवून त्यावर धान्याच्या गोण्या लादून सैन्याला धान्यपुरवठ्याचें काम करीत. लढाईच्या वेळीं सैन्यास धान्यपुरवठा करण्याचें काम असतें तेव्हा वणजारी लोक दहाबारा हजारपर्यंत जथून लक्षावधि बैलांचे कळप लादून नेतात. अर्थात् त्यांचें एक स्वतंत्र सैन्यच तयार होतें. संरक्षणासाठी हे लोक धनुष्य-बाण किंवा बंदूक घेऊन चांगले लढतातहि.' वणजाऱ्यांची, लढणाऱ्या उभय पक्षांना नेहमीच जरूर भासणारी असल्यामुळें त्यांना होतां होईल तों न मारण्याचा संकेत सार्वत्रिकच होता. ज्याप्रमाणें युद्धयमान राष्ट्रांच्या वकिलांना अभय असतें तीच स्थिति वणजाऱ्यांची; तथापि लढायांच्या हंगामांत हे संकेत पाळले जातच असें नाही. खुद्द याच पोवाड्यांत तसा प्रकार वर्णिला आहेच. वणजारी आणि त्यांचे बैलांचे तांडे म्हणजे एक फिरतें शहरच कसें असें व ते वणजारी मुक्कामाच्या जागीं कशी व्यवस्थित लढाऊ ठाण्यासारखी रचना करीत याचीं वर्णनें हेबरच्या "नॅरेटिव्ह ऑफ ए जर्नी थ्रू अप्पर प्रॉव्हिन्सेस ऑफ इंडिया" या ग्रंथांत किंवा मार्क्विस ऑफ हेस्टिंगज याच्या 'प्रायव्हेट जर्नल'-मध्यें आलेलीं आहेत. तूर्त जिज्ञासूंनी चिंतामणराव वैद्यांच्या कृष्णचरित्रांतील सुरुवातीचे फिरस्त्या यादव गोपालांच्या तळांचें वर्णन पाहावें. तें थेट वणजाऱ्यांसारखेंच असलेलें आढळून येईल.

काबाड—ओझें, लांकूड फाटा. हुल पडणें—आवाई होणें, बोंबाबोंब होणें. मारिलास—मारिलासे-मारिला असे. गोट मारणें—गोट लुटणें. दर्बारीच—ही मोडीवाचनाची चूक आहे.

हुजुराती म्हालदार आला ॥ मर्दतगटी यवकेल ॥ बाहीर निघतां जैसा सुबान प्रकाशला ॥ अग्निचा गलोला दत्ताजीराव जाधव चालिला ॥ बाजा नगारा बाजीला ॥ भार निलग दाविला ॥ १४

भारामध्ये धूर लक्षण शोभ दत्ताजीला ॥ शिकारीचा छंद ज्याला ॥ इसारत देतो शिपायाला ॥ रखमाजी पेशवा यशवंतराव मोहोर जाला ॥ रघोजी रुस्तुमराव भार कडाक्याने चालिला ॥ १५

शिकार खेळुनि भार आमराईंत उतरला ॥ दुनदारी मौजा त्याला हुका बारदार भरिला ॥ मुकमंडण विडा पानाचा घेतला ॥ दुनदारी मौजा

" खबरीचा " या मोडी शब्दाचें " दर्बारीच " हें अशुद्ध वाचन झालें. त्यामुळें हा गोंधळ. कागद खबरीचा आला म्हणजे गोट लुटून नेल्याचें पत्र आलें असा अर्थ. **मर्द**—मर्दें, मर्दानें. **कंबरबस्त केले**—कंबरा बांधल्या, तयार झाले. **बोल**—बोले. **हुजुराती म्हालदार आला**—हुजूरचा भालदार आला. **मर्द तगटी यवकेल**—येथे तर कहर झाला आहे. ही मूळ पोवाडा म्हणून दाखविणाऱ्या गोंधळयाच्या पाठांतराची चूक किंवा गोंधळयाचे शब्द मोडींत लिहून घेणाऱ्या लेखकाची चूक, कांही कळत नाही. तथापि मूळ शुद्ध पाठ "मदत करी ये येळेला" असाच असला पाहिजे हें अशुद्ध पाठाचें सूक्ष्म दृष्टीनें मनन केल्यानंतर लक्षांत येईल. हुजूरचा भालदार आला व त्यानें 'शत्रूनें गोट लुटून नेला आहे सबब मदतीस जा' असा हुकूम सांगितला. **सुबान**—सूर्य. **गलोला**—गोळा, बिंब. **भार निलग दाविला**—निलंगाच्या रोखानें भार म्हणजे भारानें म्हणजे सैन्यानें रोख दाखविला म्हणजे कूच केलें. **भारामध्ये धूर लक्षण शोभ दत्ताजीला**—धूर लक्षण म्हणजे 'दुर्लक्षण' तर नव्हे? दुर्लक्षण म्हणजे वाईट डोहाळे, अंतीं घातक ठरणारी इच्छा असाहि अर्थ घेतां येईल. सैन्यांत असतां या वेळीं दत्ताजीला शिकारीची इच्छा उत्पन्न झाली हें दुर्लक्षणच नव्हे तर काय? कारण शेवटीं त्यापायींच त्याला मृत्यु आलेला आहे. **ज्याला**—त्याला. **दुनदारी**—दुनदारी हा शब्द मुळांत दुनपारीं (म्ह. दोनप्रहरीं) असा असला पाहिजे. मोडीवाचनांत 'दा' व 'पा' चा घोटाळा होऊं शकतो. दुनपारी म्हणजे दुपारीं असा पाठ घेतला म्हणजेच आमराईशीं त्याचा उत्तम मेळ बसतो.

ज्याला ॥ हुका बारदार भरिला ॥ उडती पागार कटीतंग जीन भिडती त्यातें ज्याला ॥ १६

गमत करितां वेळ जाहला ॥ बाजा नगारा बाजिला ॥ पंधरा हजार घोडा सर्जाखान दौड आला ॥ जाधवराई निशाण भार आमराईत वळखिला ॥ सर्जाखानी हेजीब आला ॥ काय बोले दत्ताजीला ॥ १७

भांडतां पुरवेना निघून जावे हे वेळेला ॥ जाब जिव्हारीं लागला ॥ पेशव्या रखमाजीस बोलला ॥ काटखा काढितां नामवस जाईल आपुला ॥ भाडन सर्तीनसी नाईक नटले या बोला ॥ १८

मौजा त्याला—'पानौत्याला' असा मूळ पाठ असावा. पानौत्याला म्ह. पाणौठ्याला म्ह. पाणवठ्याला मोडीवाचनाची चूक. **दुनदारी–मौजा हुका बारदार भरिला**—दोनप्रहरीं बारदारानें भरून दिलेले हुक्के ओढीत मौजा करीत आराम घेत बसले असा भावार्थ. **मुकमंडण**—तोंड रंगविणारा, रंगदार, पानतंबाकू.

उडती पागार कटीतंग जीन भिडतें त्यातें ज्याला—"उडती पागा रकटतिंग जीन भिडविला" असाही एक पाठ शितूत देतात. तथापि त्याचाही अर्थ लावण्याची मुष्कील आहे. मूळ पाठ 'उडती किंवा झडती नगार कटितंग जीन भिडती त्यातें ज्याला' असा असावा. दत्ताजी वगैरे लोक विसावा घेत बसले आहेत तोंच शत्रूचे नगारे टंकारे ऐकू आले. त्या-बरोबर दत्ताजीच्या लोकांनी खडबडून जागे होऊन कमरा आवळून व घोड्यावर जिनें घालून सज्ज होण्यास लागले असा अर्थ दिसतो. **जाधवराई निशाण भार आमराईत वळखिला**—जाधवरावाच्या निशाणा-वरून त्याचें सैन्य आमराईत उतरलें आहे असें सर्जाखानानें ओळखलें. **सर्जाखानी**—सर्जाखानाचा. **हेजीब**—वकील, बोलणेकरी. **भांडतां पुरवेना इत्यादि**—तुम्हास आम्हाशीं टक्कर देणें अशक्य आहे. तुम्ही ताबड-तोब येथून निघून जावें. **काटखा काढितां**—काटखा ही मोडीवाचनाची चूक असावी. पायरवा असा शब्द मुळांत असेल. पायरव करणें म्हणजे पळून जाणें. पायरव काढतां आपला नामोश म्हणजे अब्रू जाईल. **नामवस**=नामोश, अब्रू. **भांडन सर्तीनसी**–भांडेन शर्तीनशीं. निकराने लढेन. शर्त–पराक्रम. **नाईक**—नाइके, न आइके. **नटले या बोला**—नेटले या बोला असें पाहिजे.

सर्जाखानी हेजीब फिरविला ॥ निश्चय झगड्याचा मांडिला ॥ बाणांनी बंदुका वर्षाव एक जाहाला ॥ दत्ताजी अवखंद्या सांपडला ॥ घेरां रावताचा पडला ॥ एक म्हणती जीत धरा दत्ताजीला ॥ १९

दत्ताजीराव बोले वचन ॥ आली निर्वाणीची वेळा ॥ हें इतुकें ऐकुनी यशवंतराव बोले राजाला ॥ राव रजा द्यावी मला ॥ वोढली समशेर मारीत भारावरी लोटला ॥ २०

भैरी हातचा सुटला ॥ मारीत भारावरी लोटला ॥ मारी कर्डा हात दुखंड करी रावताला ॥ राव निशाणीसी भांडला ॥ सर्जाखान मानावला खुब किये समशेर म्हणती हिंदुजान भला ॥ २१

मारीत पुढे येवू दिला ॥ सातापांचांनी मेळविला ॥ सन्मुख चढल्या जखमा ॥ यशवंतराव पुरा केला ॥ दत्ताजीराव बोले वचनीं ॥ यशवंतराव पडला रणीं ॥ निर्वाणीची वेळ बाजू राखाया नाही कोणी ॥ २२

म्हणजे नेटानें असें उत्तर दिलें. **अवखंद्या**—अवसांत (Poetry अवस्तु) Suddenly unawares (मोल्स) 'अवसुती' असा मराठींत त्याचाच अपभ्रंश सध्या रूढ आहे. जसें, ' त्याला अवसुती मार लागला', सारांश, मूळ शब्द अवसंद्या असा असावा. **दत्ताजी अवसंद्या सांपडला**— दत्ताजी अचानक अडचणींत सांपडला. **एक म्हणती**–कोणी ओरडले. **रजा द्यावी**—परवानगी द्यावी. रजा–परवानगी अर्थात् हल्ला करून जाण्यास. **वोढली**—उपसली. **भैरी हातचा सुटला**—बहिरीससाणा जसा शिकार दिसतांच मनगटावरून ताडकन उडून जातो, तसा यशवंतराव धावून गेला. **कर्डा हात मारणें**—उत्तम प्रकारें तलवार चालविणें. ' लहान पराई होऊन शुराने कर्डा हात केला ' (त्रिंबकराव दाभाडे पोवाडा) **निशाणीसी भांडला**–(१) सर्जेखानाच्या निशाणापर्यंत मारीत आंत शिरला, (२) नांव होण्यासारखें लढला. **सर्जाखान मानावला**–सर्जाखानानेंही मान डोलाविली कीं, "खुब किये समशेर". **म्हणती हिंदुजान भला**—हिंदु जन 'भला भला' म्हणजे शाबास शाबास अशी त्याच्या शौर्याची तारीफ करूं लागले. **सन्मुख**–छातीवर व तोंडावर. **पुरा केला**–ठार केला. **बोले वचनी**—उद्गारला. **करणी**—पराक्रम. **झगडा खेळे झोंट धरणी**—

रघुरायाची करणी ॥ झगडा खेळे झोट धरणी ॥ पुरबाणाची वर बर्च्यांची शिंपणी ॥ सारी सराईत मर्दाला ॥ मरणाचें भय नाही त्याला ॥ वाग धरूनि मारामारी रावुताला ॥ २३

निःशंक भांडतो निर्वाणी ॥ वाग मोकळा सोडुनि ॥ एकवीस जखमा आल्या रावराघोजी लागुनि ॥ राघोजीनें झगडा दिला ह्योतर जिवानिशी वाचला ॥ गळा घातली शिगण ॥ रुस्तुमराव पाडाव केला ॥ २४

येसाजी पंचहत्यारा निवडला ॥ मारीत भारावरी लोटला ॥ मारी कर्दा हात दाणादाणी रावताला ॥ कर्दा संताजीनें झगडा दिला ॥ दावजी कमळजी लोटला ॥ २५

येसाजी सूर्याजी आपले भांडतील बिन्निलां ॥ येक करतील पायस्वारी येक राखतील खाशाला ॥ मनगट तोडुनी शिरीं जखम हंसाजीला ॥ दत्ताजी चालला तेथुनी ॥ तेथ झाली खणाखणी ॥ २६

रघोजीनेंहि प्रत्यक्ष केशाकेशीसारखी शत्रूस भिडून लढाई चालविली. **झोटधरणी**—हातघाई, केशाकेशी. **पुर बाणाची वर बर्चाची शिंपणी**—बाणांचा पूर आणि बर्चीचा वर पाऊस. **सारी सराईत मर्दाला**—बाणांचा आणि बर्चीचा पाऊस पडत होता तरी तो अनेक लढाया लढलेला लढवय्या असल्यामुळें त्याला त्याचा सरावच होता. त्याला त्याचें कांहींच भय वाटलें नाही.

वाग धरुनी—वाट धरून, वाट रोखून, टिपण धरून. वाग-रस्ता किंवा वाट. **मारामारी**—मारमारी असें पाहिजे. **गळा घातली शिगण**—"गळा घातलीसे कमान" हाच पाठ बरोबर. कमान म्ह.—धनुष्य. शत्रूला पकडून नेतांना त्याच्या गळ्यांत धनुष्य अडकवून नेण्याची पद्धत पुराणांतरी प्रसिद्धच आहे. मात्र राघोजी रुस्तुमराव वरीलप्रमाणें शत्रूनें पाडाव करून नेला नव्हता हें सुरवातीची ऐतिहासिक माहिती पाहिली असतां कळून येईल शिवाय याच पोवाड्यांत बत्तिसाव्या चौकांत राघोजी रुस्तुमराव हा जखमी होऊन मोंगली तळावर परत आलेला होता असें सांगितलें आहे. **अनवळता**—अचानक न कळता. **नेमून**—नेम धरून, टिपट साधून. **गुर्दा**—रवीसारखे किंवा गदेसारखे हत्यार. **लंगर देउनियां बैसला**—लढायांत हत्ती सैरावैरा धावूं लागून त्यामुळें

मुंडामुंड पाडुनि येका चडीत येकं दारुण ॥ ठीक दावितो तेजाला ॥ भार भरितो बर्शाला ॥ मारी आनवळता हात बर्शा हातचा उडाला ॥ कमरेच्या गुर्द्या हात केला ॥ २७

नेमून उमराव पाडिला जाहला असे ठणका ॥ गुर्दा हातचा उडाला ॥ दत्ताजी पायउतारा आला ॥ लंगर देऊनिया बैसला ॥ २८

केला घनचक्कर हात दावितो खाशाला ॥ दत्ताजी होता भवदुश्चित ॥ मग रावतांनीं मेळविला ॥ सन्मुख चढल्या जखमा ॥ चक्री लागली डोळ्याला ॥ दत्ताजी पडलासें ऐकिला ॥ सर्जाखान चालून आला ॥ २९

कापलें शीरकमळ लंगर हातचा काढिला ॥ रण हुंबतसे धरणीला ॥ सर्जाखान निघून गेला ॥ दत्ताजी पडलासें ऐकिला ॥ मग लोधीनें भार केला ॥ खासा दलीलखान चवरडोलांत बैसला ॥ ३०

दिवटीच्या हिलालें खान रणामध्यें आला ॥ जाधवराई मुरदा उचलून पालखींत घातला ॥ वाजत मिरवत मुरदा डेऱ्यास आणिला ॥ आशुद्ध भरलें रुंड बहिणाई आळवी हृदयाला ॥ ३१

जाधवराया मागें नांव होतें दत्ताजीला ॥ बहिणाईनें आकांत केला ॥ कळंब राघोजीला आला ॥ रोदना करिता दीन उदया पातला ॥ तेव्हां बहिणाईनें शीर मागावयास बंदा पाठविला ॥ ३२

लढाई बिघडतेशी वाटली तर हत्तीचे चारी पाय साखळदंडाने बांधून घालीत त्या साखळदंडाला लंगर अशी संज्ञा आहे. आणि त्यावरूनच मारू किंवा मरू या निश्चयानें जागच्या जागीं गाडून लढणाऱ्या शिपायाला तो लंगर देऊन बसला असें म्हणतात. **भवदुश्चित**—मूळ भव दुःखित. पण येथे भावार्थ—बेभान, बेहोष, जखमांमुळे. **चक्री**—एक प्रकारचें फेकून मारण्याचें हत्यार असावें. **लंगर हातचा काढला**—An anchor. टिकावासारखें किंवा बोटीच्या नांगरासारखें हत्यार; पण येथे लंगर म्हणजे दत्ताजीच्या हातांतील सोन्याचें कडें किंवा तोडा. सर्जाखानानें दत्ताजीचें शीर कापून घेतलें व हातांतील तोडा काढून बरोबर नेला खूण पटाविण्यासाठी. **चवरडोल**—अंबारी. **दिवटीच्या हिलालें**—दिवट्या--हिलाल लावून.

बंदा आलासे हुजूर ॥ काय सांगे त्या खानाला ॥ घ्यावें शिरकमळ सर्जाखानास बोलला ॥ बंदा हुजुराती देखिला ॥ खान दापूनिया बोलला ॥ उमराव का शीर मैं भेजुंगा दरबाराला ॥ ३३

घाटका बाबाजी बोलला ॥ अशी वेळ घडती मर्दाला ॥ घ्यावें शिरकमळ सर्जाखानास बोलला ॥ घाटगा बाबाजीच बोलला ॥ जाब खानाच्या मना आला ॥ तेव्हां सर्जाखान बंदा नजिक बोलविला ॥ ३४

घाडग्यांनीं बोल केला ॥ आपला स्वहितधर्म राखला ॥ शीर घेतलें मागून बंदा वाटेसी लावला ॥ शिररुंडा भेट केली ॥ मग रचलें सरण बहिणाईचें आंगीं आलें सतीचें फुरण ॥ ३५

उटी घेऊन चंदनाची दिसे रुद्रा यौगिण ॥ हत्तीवर बैसुनी दिसतें स्वर्गाचें विमान ॥ फोडूनिया भांडार द्रव्य वांटती भाटाला ॥ वाजत मिरवत आली सरणाजवळी ॥ ३६

बहिणाबाईनें उडी टाकिली ॥ रामराम स्मरूनि ॥ खान माघारा फिरला ॥ आपल्या मुलखास चालिला ॥ पंधरा हजार घोडा सर्जाखान दुमाला केला ॥ काकरळ्या तळ्यापें मर्द कठक बंद केला ॥ ३७

जाधवराई मुर्दा—जाधवरावाचा मुर्दा. आशुद्ध—अशुद्धें, रक्तानें रुंड—मुंडके. कळंब—उभडा, हुंदका, कढ. रोदना करिता इ. शोक करतां करतां दिवस उजाडला. बंदा—नोकर. अशी वेळ घडती मर्दाला—असा प्रसंग मर्दालाच घडतो; म्हणजे रणांगणांत शिरकमळ जाण्याचा. बोल केला—बोलबाला केला, कीर्ति मिळविली. स्वहितधर्म—स्वयातिधर्म असा शब्द शाहिरास अभिप्रेत आहे. विजापुरी लष्करांतील मराठा सरदारानें शत्रुपक्षाच्या मराठा सरदाराचें शव व शिरकमल त्याच्या आतेष्टांच्या हवालीं करून त्याचें उत्तरकार्य संपादण्यास मदत करणें हा यातिधर्म किंवा जातिधर्म. भाऊसाहेब पेशवा व परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या दहनासंबंधींचीं पत्रें पाहा. शिरारुंडा भेट केली—वास्तविक शिरा धडा असें पाहिजे. कारण रुंड म्हणजेच शिर. सतीचें फुरण—सती जाण्याचें स्फुरण. हत्तीवर बैसुनी दिसतें स्वर्गाचें विमान—हत्तीवर बसून चितेकडे निघाली.

हत्तीवर जोडल्या हातनाळा ॥ उंटावर जोडिले जंबूर ॥ बाणाच्या सवें जूत्या राजा मिर्जा मोहोर झाला ॥ पंधरा हजार सर्जा एकांगी भांडला ॥ जंबुऱ्याच्या गोळ्या सर्जाखान पुरा केला ॥ ३८

सर्जाखान पडलासें ऐकिला ॥ दलेलखान चालून आला ॥ कापलें शीरकमळ लंगर हातचा काढिला ॥ रण हुंबतसें धरणीला ॥ दलीलखान निघून गेला ॥ ३९

झगडा झाला थोर दत्ताजी जाधवराव पडिला ॥ अज्ञान यमाजी भगवंताची सेवा त्याला ॥ हृदयीं लक्ष लावुनी ज्यांनी बिरमाल गाईला ॥ सव्वा शेर सोन्याचा तोडर घोडा बक्षीस केला ॥ ४०

भाटाला—ठाकराला. महाराष्ट्रीय भाटांना ठाकूर किंवा ठाकर म्हणत. "पूर्वी मराठ्यांच्या बायका सती जात. तेव्हां ठाकराचा हात धरून चितेला प्रदक्षिणा घालीत. नंतर अग्नि प्रवेश करीत." म्हणजे कुलगुरुत्व ठाकराकडे असे" (भारत इतिहाससंशोधक मंडळ त्रैमासिक अंक ४ वर्ष ९ पृष्ठ ८). ढुमाला केला—पाठलाग केला. ढुमाला घेणें असा शब्द बखरींत येतो.— तळ्यापें—तळ्यापाशीं मर्द कटक बंद केला—मर्दानें कटकाचा मुक्काम केला. किंवा गोट आवळून बसला. हातनाला—हस्तनाला, हत्तीवरच्या तोफा. जंबूर—उंटावरची तोफ. जूत्या—जुडगीं (आगीच्या बाणांचीं). सर्जा—सर्जाखान. एकांगी भांडणें—अप्रतिम पराक्रम करणें, अफझलखान वधाच्या पोवाड्यांत हा शब्द आला आहेच. गोळ्या—गोळ्यानें. बिरमाल–पोवाडा वीरकाव्य. तोडर–तोडा.

दत्ताजी जाधवाचा पोवाडा

२

(राजवाडेप्रत)

कै. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या संग्रहीं दत्ताजी जाधवाच्या पोवाड्याची एक नक्कल केलेली होती. राजवाड्यांच्या मृत्यूनंतर कऱ्हाडचे श्री. वा. दा. मुंडले यांनी आपल्या ब्राह्मण मासिकाचा खास राजवाडे-स्मृति अंक काढला होता. त्यांत धुळ्याचे श्री. भा. वा. भट यांनी दत्ताजीच्या पोवाड्याची ती नक्कल शोधून छापली. रा. भट यांनी जी नक्कल छापली तीवर राजवाड्यांनी पोवाडा कोणाच्या संग्रहांतील मोडी वा बाळबोध बाडावरून उतरून घेतला किंवा एखाद्या गोंधळ्यास तोंडी म्हणावयास सांगून लिहून घेतला हें कांहीएक लिहिलेलें नाही. तथापि राजवाड्यांच्या पोवाड्यांत ठिकठिकाणीं गोंधळी पोवाडा प्रत्यक्ष म्हणत असतां खुलाशादाखल किंवा पादपूरणार्थक म्हणून जीं गद्यवाक्यें उच्चारतो तीं कंसांत दिलेलीं आहेत. त्यावरून राजवाड्यांनीं पोवाडा कोणा गोंधळ्यास म्हणावयास सांगून उतरून घेतला असावा असाच तर्क होतो.

श्री. शितूत यांनीं आपल्या पुस्तकांत जो पोवाडा छापला तो हुपरी येथील गुंडू गोंधळ्याच्या लेखी बाडावरून. शितूत यांना या पोवाड्याच्या आणखीही दोन प्रति अनुक्रमें माणगांव येथील बाबाजी गोंधळ्याच्या व कोल्हापूर येथील पांडू गोंधळ्याच्या दप्तरांत आढळल्या. हुपरी येथील पोवाड्याची जी संहिता शितूत यांनीं मुख्य धरून छापली ती मोडींत लिहिलेली होती असें पान १६ वरील त्यांच्या ११ नंबरच्या टीपेवरून स्पष्ट होतें. बाकीच्या दोन प्रति कोणत्या लिपींत होत्या याचा त्यांनीं निर्देश केलेला नाहीं.

राजवाडेप्रतींत घनचक्करराव नांवाच्या शिपायाने हा पोवाडा केला असें म्हटलें आहे; पण तें बरोबर दिसत नाही. शितूत प्रतींतील पोवाडा शाहिराने शेवटीं स्वतःचें नांव गोऊन पुरा केला आहे. त्या अर्थी अज्ञान यमाजी हाच त्या पोवाड्याचा शाहीर होय.

असो. शितूतप्रत व राजवाडेप्रत ताडून पाहतां त्यांत बरीच तफावत आढळली. दोनही प्रति अशुद्धच आहेत. मात्र एका प्रतींत जी चूक केली

आहे ती दुसरींत नाही. उलट दुसरींत जी चूक आढळते, ती पहिलींत नाहीं. प्रथम पाठभेदांचा सविस्तर तक्ताच तयार केला होता; परंतु त्यायोगें वाचकाचा अधिक गोंधळच होईल असें पाहून तसा तक्ता देण्याऐवजीं राजवाड्यांचा पोवाडाच स्वतंत्रपणें सगळा निराळा दिला आहे तो असा—

१

माझें मन नमन मंगलमूर्ति म्यां नामिली सारसती ।
इनवी कर जोडुनी भवानी हुर्द द्यावी मती ।
रणामधि रणसुर म्हणविती प्रांत जिल्या करिती ।
मरणाखर उद्राखर संसाराच्या गती ।
झाल्या बादशाही हुकमती वजिर बिजापुरास जाती ।
झगडला दत्ताजी, मर्दा, थोर केली ख्याती ।
ख्याद मी गाईनरे जाधवरायाची करणी । (चाल)
झगडला न्याहाळिवला त्या निलंगे मैदानीं ।
तमाम उमरावाच्या भाल्याच्या शिंपणीं ।
यशवंतरायानें, मारिली पहिली बिनी ॥

२

सरलष्कर दल्लेलखान वजिर होते कोण कोण ।
दाउदखान उल्लेलखान शेख फरासी कुत्तमखान ।
तर लिहिले जोरावर पठाण संगत लोदी मुशाफरखान ।
चालले वजिर याबर बिनी दल्लेलखान॥

३

आयका दख्खनचे वाजिर राव रंभाजी निंबाळकर ।
भोसल्या बोवाजी संगत जाधवराव वजिर ।
जाधवराव जगजीवन, माणकु बऱ्हाळ ब्राम्हण ।
चालले वजिर यावर बिनी दल्लेलखान ॥
(घोडा ८०००० दिल्लीहून निघाला)

४

पुणंधरीं झगडा झाला थोर झगडतां मावळला दिनकर ।
झाली आसे रात्र फिरले उमरावाचे भार ।

उमराव आले बहु दुरूनी बिद्दलशाही केली ससनी ।
पाठविले वाजिरराव शिरपाव देऊनी ।
भांडतां गड जाला आसे जार, गडकऱ्यांनी केला विचार ।
शिवाजी महाराजाला हो त्यांनी पाठविली खबर ।
हेजीब गेलासे हुजूर ' सांगरे गडाची खबर ।
गड चढतील मोंगुल ।
माणुस जाया होईल फार । यावर शिवाजीचं बोलला (चाल) ।
म्यां मोंगलाशीं दावा केला ।
मारिले सुराईत शास्त्रखाना केली हल्ला ।
मागून दसवंसिंग आला ।
गड तो कोंडाणा भांडला ।
शिवाजी बोलला आता भेटूं रजपूताला (गड स्वाधीन केला) ।

५

आवघा कटबंध करून ।
मोगुल चालला तिथूनी ।
चालति बिर्न्हायेनी मोंगला पंढरपूरा गेले ।
घेतले मंगळवेढे, खासे नाही सांपडले (आहो) ।
निलंगे मैदानी मोंगली रखत डेरे दिले ॥

६

सर लष्कर सर्जाखान ।
वजिर होते कोन कोन ।
हिंदुळराव, केदारफणी, घाडगे झुंझारराव चालले (तर ते) ।
पांढरे नाईकजी कुळवंत्राचा मेळा झाला ।
बलुलखान पठाण बहार तो कडाक्याने चालला (तर तो) ।
पंधरा हजार घोडा सर्जाखान जोर आला ॥

७

सर्जाखानीं दवडा दिला ।
हुलरे पडली कुल कटकाला (आरे) ।

मारले कबाडे वाणी बहुत नागविला ।
सर्जाखानी दवडा दिला ।
सातशें वंजारा लुटला ।
कापलासे गोट सर्जाखान निघून गेला ॥

८

दत्ताजी बाहीरच निघाला सूर्य सुभान प्रकाशला ।
भारामधिं धूर रे रक्षण दत्ताजीला ठीक मंग दावितो तेजिला ।
मार तो भरीतो बर्शिला ।
शिकारीचा छंद विशारत देतो लष्कराला (तर तो) ।
खेळलासे शिकार जाऊन आमराईंत उतरला ।
पंधरा हजार घोडा सर्जाखान जोर आला ॥

९

(बडे मछिमे झाट झिंगा)

सर्जाखानी भालदार आला काय बोले दत्ताजीला ।
राव मग झगडता पूरवला निघून जावे या वेळेला ।
यावर शिवाजीच बोलला देश दुनया जाणे मला ।
झगडेन मी सल्येशीं नायकूं न टळे आपल्या बोला ॥

१०

सर्जाखानीं भालदार आला (नि) ।
निच्छय झगड्याचा मांडला ।
बाणा-बंदुकांचा रे वर्षाव एक झाला ।

(जाधवराव, त्याचे लेक रघुराव, यशवंतराव, रुस्तुमराव आणि सहाजण शिपाई गठच्या गठ बसला.)

११

यशवंतराय बोले रायाला राव रजा द्यावी मला ।
त्यानें वोढली समशेर जाऊन भारावर लोटला (तर तो) ।

मारी कर्डी हात दाणादाण राऊताला ।
(की) पंधरा हजार घोडा, फळी फोडून पल्याड गेला ॥

१२

(सर्जाखानाचा मेव्हणा काशिमखान मुंड्या हौद्यांत) ।
(उपटुं बाण बाबा जाऊं दे प्राण यशवंतराव मेला) ।
जाधवराव बोले वचनी, यशवंतराव पडले रणीं ।
आणि आज बाजु राखायला निर्वाणीं नाही कुणी ॥

१३

मग रघुरायाची करणी झगडा खेळे झोट धरणीं ।
भांडतो निर्वाणी वाघ मोकळे सोडूनी (तर ते) ।
बाणाचे पूर वर बर्चीच्या शिंपणी ।
की येका आगळ एकवीस जखमा रघूजीं लागूनी ।
रघूजीनें झगडा केला हा तर जिवानिशीं वांचला ।
गळा घातली कमान रुस्तुमराव पाडाव केला ॥

१४

जाधवराव रणामधीं निघाला (रे) ।
ढाल पट्टा पडताळिला ।
एक करतो पायिं स्वाऱ्या ।
एक राखितो खाशाला ।
हाशाजी सुराजी आवल भांडती बिनीला ।
करून घनचक्कर हात दाविती खाशाला ।
झगडा रणतुंबळ गाजला ।
दावजी कुंबळजी लोटला (आहो) ।
कर्ड्यां संभाजीनें निर्वाण झगडा दिला (आहो) ।
मनगट तुटून शिरीची जखम हासाजीला ॥

१५

(जाधवरावांचे तीन मुलगे व सहा शिपाई पडले)।
जाधवराव चालला निर्वाणीं तिथ झाली खणाखणी।
मुंडामुंड पाडिले एका चढी एक दारुणी॥

१६

जाधवराव आवखंदा सांपडला घेरा रावतांचा पडला।
(कीं) एक एक म्हणती जितच धरा दत्ताजीला।
(तर) पिळा आंगाचा मारिला।
हात रे त्यानें जोरानें टाकिला।
झाला असे ठणका हातचा गुर्दा उडून गेला॥

१७

(काशिमखान समोर आला) (त्याला जाधवानें मारला) जाधवरावाची जोड्याची अणी हत्तीच्या पायांत गेली. सन्मुख लागली जखम, चक्री लागली डोळ्याला, जाधवराव पुरा झाला.

१८

जाधवराव पडला म्हणून ऐकीला।
सर्जाखान धावून आला।
कापिलं शिरकंबळ लंगर (कडें सोन्याचें) हातचा काढिला (तर त्या)।
निलंगे मैदानीं सर्जाखान यशवंत झाला॥

१९

[जाधवरावाची बायको बहिणाबाई] (तिचा भाऊ झुंजारराव)।
बंदा शिर मागाया गेला।
सर्जाखाना सलाम केला (आहो)।
बंद्या द्याहो शिर, सर्जाखानाशीं बोलला।
सर्जाखाना क्रुध आला।
बंदा दाणून बोला।
उमरावका शिर मैं भेजुंगा दरबारला॥

२०

घाडग्यांनी बोल केला आपला सोयरेधर्म राखिला ।
शिर घेतलें मागून बंदा वाटेस लाविला ।
(तर ती) शिरा रोंडा भेट केली रचिलें सरण ।
बहिणाईच्या आंगीं जैसा चर्चरिला चंदन ।
(तर ती) लेवून बरवी कास दिसे रुद्रयवगीण ।
हत्तीवर बसून दिसे स्वर्गींचें इमान ।
(दल्लेलखान सतीच्या तेथे आला) ॥

दिल्लीच्या बादशहाने देणग्या दिल्या त्यांत घनचक्करराव शिपाई होता त्याने हा पोवाडा केला.

सेखोजी आंग्र्याचा पोवाडा

प्रस्तुत पोवाडा आम्हास आमचे स्नेही अलीबाग येथील शिक्षक रा. शां. वि. आवळसकर यांच्याकडून मिळाला. ते स्वतः इतिहासाभ्यासी असून अलीकडे त्यांनी प्रत्यक्ष संशोधनाचेही कार्य सुरू केलें आहे व गेल्या दीड वर्षांत त्यांनीं कांही दप्तरें तपासून त्यांतील महत्वाचे लेख भारत इतिहास संशोधक मंडळाच्या सभांतून प्रसिद्धहि केले आहेत. हा पोवाडा त्यांना कोंकणांतील एका नेने दप्तरांत सांपडला. तो त्यांनी मूळ वहींतून नकलून आमच्याकडे पाठविला. यद्यपि त्यांनी तो कांटेकोरपणे लाऊन जुळवून असा सुवाच्य लिहून पाठविला तरी मुळांतच ती वही अत्यंत जीर्ण झालेली व तींत पोवाडा उतरून ठेवणारा मूळ लेखकहि अडाणी असल्यामुळे त्यांच्या नकलेवरून पोवाड्याचा अर्थ लावतांना व खरा पाठ उन्नीत करतांना फारच कष्ट झाले.

या पोवाड्याचा कर्ता कोणी तरी चांगला संस्कृतविद्यासंपन्न ब्राह्मण गृहस्थ होता हें पोवाड्यांतील भाषेवरून व उपमांवरून सहजच दिसून येईल. राजश्री आवळसकर यांनी नेने दप्तरांतून संशोधून काढलेले 'नवरत्नमाला' नामक सेखोजी आंग्र्यांच्या स्तुतीपर असें एक काव्य भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष २२ अंक १ मध्ये छापलें आहे. त्याचा कर्ता मयूरेश शैव हा आहे. प्रस्तुत पोवाडाहि त्याच मयूरेश शैवाचा असावा असें वाटतें. शैव मयूरेशाचें घराणें आंग्र्यांच्या पदरचेंच होतें. सन १७९३ मध्ये राघोजी आंग्रे मरण पावला; आणि मानाजी आंग्रे गादीनशीन झाला. त्या वेळीं कुलाबा संस्थानचे व्यवस्थेसाठी पेशव्यांनी माधवराव हरी नांवाचा माणूस पाठविला होता. "मानाजी व माधवराव हरी या उभयतांत जी आंग्रे संस्थानाच्या व्यवस्थेविषयी ठरावांची यादी झाली त्या यादींत वे. रामभट शैव यांचे बंधू धोंडभट शैव तुम्ही अटकेंत ठेवले आहेत त्यांस पोथ्या पुस्तकें व वस्तभावसुद्धा सोडून द्यावे" असें एक कलम आहे. व ते पेशव्यांकडून म्हणजे माधवराव हरी यांजकडून संमत होऊन "करार" झाले आहे. त्या कलमांवरून आंग्रे यांच्या पदरीं शास्त्रीपंडित म्हणून हें शैव घराणें होतें अशी शोधपूर्वक माहिती त्रैमासिकांत दिली आहे. नवरत्नमालेचा कर्ता शैव मयूरेश यानेच "पंतप्रधानाख्यानम्" नांवाचें दुसरेहि एक काव्य केलें होतें तें भारत इतिहास संशोधन मंडळ द्वितीय संमेलन वृत्तांतांत प्रो. पोतदार यांनी छापलें

आहे. आमच्या मतें प्रस्तुत मराठी पोवाडा त्याच मयूरेश शैवाने लिहलेला असावा. या कवीच्या एका विशिष्ट लकबीचा मंडळत्रैमासिकांत उल्लेख केला आहे तो असा. "संकल्पित श्लोकसंख्या संपल्यावर आणखी श्लोक सुचावयाचे व तेहि त्यापुढेच जोडावयाचे असें नवरत्नमालेप्रमाणेंच पंतप्रधानाख्यानम् यांतहि घडलें आहे." प्रस्तुत मराठी पोवाड्यांतहि तसेंच घडलें आहे. उदाहरणार्थ, आठव्या चौकापर्यंत लढाईचें वर्णन संपूर्ण झालेलें आहे. किंबहुना इंग्रज आरमारी सेनापतीस कैद करून पकडून नेल्यापर्यंतहि हकीकत सांगितली आहे. परंतु पुन्हा नवव्या व दहाव्या चौकांत कांही लढाईचें वर्णन जोडलेंच आहे. या गोष्टीवरूनहि हा मराठी पोवाडा मयूरेश शैवानेच लिहिलेला असावा असें वाटतें.

प्रस्तुत पोवाड्यांत सेखोजी आंग्र्यांने चौलाजवळ इंग्रज आरमाराचा जो पराभव केला त्याचें वर्णन आहे. आवळसकर यांनी दीड वर्षांपूर्वी पोवाडा नकलून पाठविला तेव्हां त्यांनी त्याला घेरियाच्या लढाईचा पोवाडा असें नांव दिलें होतें. परंतु परवापर्यंत जी जी इंग्रजी वा मराठी साधनें आंग्र्यासंबंधीं उपलब्ध होती त्यांत कोठेहि या पोवाड्यांत वर्णन केलेली माहिती आढळली नाही. यामुळे पोवाड्यांतील वर्णन केलेली लढाई कोणची याचा कांहीच निर्णय करतां येईना. तेव्हा आवळसकरांनी तर्किल्याप्रमाणें ती घेरियाचीच लढाई असावी असेंच धरून चालून गोळाबेरीज कसे तरी अर्थ बसविण्याचा प्रयत्न चालविला. पण मनाचें समाधान होईना. अखेर पुस्तकाची प्रेस कॉपीहि तयार झाली तेव्हा हा पोवाडा शेवटीं द्यावयाचा व "याचा अर्थ आज चांगलासा उकलत नसला तरी पुढें मागें याला ऐतिहासिक कागदाचें प्रत्यंतर सांपडण्याचा संभव आहे" असें म्हणावयाचें असें मनाशीं ठरविलें. परंतु गेल्या ता. ७ जून १९४३ रोजीं कांही निमित्ताने संग्रह केलेले 'रामदास–रामदासी' मासिकाचे अंक चाळीत असतां सहज एके ठिकाणीं अंक उघडला आणि योगायोग असा कीं, त्याच पानाचे सुरुवातीस प्रस्तुत पोवाड्यांत वर्णन केलेल्या प्रसंगाचा तिथीमित्तीसुद्धा काळ मिळाला. एवढेंच नव्हे तर त्या लढाईचें पोवाड्याशीं पूर्ण जुळतें असें थोडें वर्णनहि आढळलें! एखादें उदाहरण पुष्कळ दिवसपर्यंत सुटू नये; परंतु तें सोडविण्याची रीत एकादे दिवशीं अकस्मात सुचून उदाहरण

सुटावें म्हणजे जसा अनिर्वचनीय आनंद होतो तसाच आनंद रामदास-रामदासी मासिकांतील ऐतिहासिक पत्राचें प्रत्यंतर मिळाल्याने झाला यांत शंका नाहीं.

आमच्या ऐतिहासिक पोवाड्यांच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत आम्ही असें म्हटलें होतें. "कोंकणपट्टींतल्या पोवाड्यासंबंधी तर अजून नीट शोधच झालेला नाही. कान्होजीराव आंग्र्यापासून कृष्णराव धुळपापर्यंत मराठ्यांचें आरमार शाबूत होतें. त्या शें-पाऊणशें वर्षांच्या काळांत आंग्र्यांनी व धुळपांनी पुष्कळ लढाया घेतल्या. 'धुळप यांच इंग्रज टोपी काढून करिती आदर' परंतु धुळपांपेक्षा आंग्र्यांनींच इंग्रजांवर काय किंवा परकी आ मारावर काय असा वचक बसविला होता व इतक्या वेळां त्यांचा भराभव केला होता कीं, आंग्र्यांचें नांव निघतांच 'जशी चित्याला पाहून हरणी दबकत हरली हिंमत' अशी त्यांची स्थिती होऊन जात असे. त्या आंग्र्यांच्या पराक्रमाचे किती तरी पोवाडे कोंकणपट्टींत झाले असतील व त्यापैकीं अजूनहि पुष्कळ हयात असतील; पण ते मिळविण्याचा प्रयत्न झालेला नाही. नागपूरच्या भोसल्यांच्या पोवाड्यासंबंधी हेंच म्हणतां येईल. धनाजी जाधवाचा एक पोवाडा कोंकणपट्टींत जिवंत आहे, कोळ्यांच्या पठणांत आहे अशी विश्वसनीय माहिती मिळते; परंतु त्याचा कोणी उतरून घेऊन अजून संग्रह केला नाही. ते असो; पण कोंकणपट्टींतील आरमारविषयक पोवाडे मिळतील तर मराठी भाषेच्या दृष्टीनें व इतिहासाच्या दृष्टीनें एक नवेंच दालन उघडल्यासारखें होणार आहे."

या खंडांत आंग्र्यांचा एक तरी चांगला विश्वसनीय पोवाडा, आज-पर्यंत अप्रसिद्ध असलेला असा छापण्यास मिळत आहे, ही फार आनंदाची गोष्ट वाटते. धुळपांचा सरदार डामाजी नाईक यानें इंग्रजांशीं घेतलेल्या आरमारी लढाईचाहि पोवाडा तसाच नवीन सांपडला, तोहि महत्त्वाचा आहे. यापूर्वी शितूत व दळवी यांनी आपापल्या पुस्तकांत धुळपांचे दोन-तीन अपूर्ण व अशुद्ध पोवाडे संग्रहित केले होते; परंतु सेखोजी आंग्र्याचा व डामाजी नाइकाचा पोवाडा हे निःसंशय अधिक चांगले व ऐतिहासिक माहितींत भर घालणारे असे आहेत.

हा पोवाडा कान्होजी आंग्र्याचा मुलगा सेखोजी आंग्रे याच्या पराक्रमाविषयीं आहे. कान्होजी आंग्रे १७२९ सालीं वारला. त्यानंतर थोरला मुलगा सेखोजी सरखेल झाला. त्याला सरखेलीचीं वस्त्रें ७ ऑगस्ट १७२९ रोजीं छत्रपतींकडून मिळालीं. कान्होजी व बाळाजी विश्वनाथ यांचा स्नेह सख्या भावासारखा आमरणांत होता. इतका कीं, बाजीराव व चिमाजी अप्पा हे कान्होजीला आपल्या पत्रांत कान्होजी काका म्हणून संबोधित असत. तसेंच कान्होजीचे मुलगेहि बाजीराव व चिमाजी अप्पा यांस वडील बंधू समजून पत्रांत त्यांस दाजी असें संबोधीत असत. सेखोजीच्या कारकीर्दीअखेर आंग्र्यांनी पेशव्याशी अकृत्रिम निष्ठा राखिली. १७३३ ते १७३६ या तीन सालांत जंजिऱ्याची जी मोहीम बाजीराव, चिमाजी अप्पांनी केली ती, सुरुवातीस सेखोजीच्या साहाय्यामुळे उत्तम तऱ्हेने चालली. सेखोजीने आरमारी बाजू चांगली सांभाळली; तसेच राजकोट, थळ, रेवास इत्यादि ठाणीं जिंकलीं. दुर्दैवाने मोहिमेच्या पहिल्याच वर्षांत सेखोजी आंग्रे अकस्मात् २८ आगस्ट १७३३ रोजीं (श्रावण बहुल ३० भौमवार) वारला आणि त्यानंतर संभाजी आंग्रे वगैरे लोक, आंग्ऱ्यांच्या घरांतील कलहामुळे, अगोदरच पेशव्यांनी सेखोजीची बाजू घेतलेली असल्यामुळे, बेदिल होते ते बहकले; किंबहुना आंतून शत्रूसहि सामील झाले. ते स्वतंत्र राजासारखेच स्वतःस मानू लागले. खुद्द छत्रपतीसहि ते विचारीनात मग पेशव्यास कोठून विचारणार? तथापि पेशव्यांनी मानाजीस लगामी लावून घेऊन मोहिमेचें कार्य पार पाडलें.

ऐतिहासिक माहिती

ऐतिहासिक साधनांचा प्रत्यंतर पुरावा देण्याआधी मूळ पोवाड्यावरून निघणारी माहिती संकलित करून सांगणें बरें. ती अशी—इंग्रज फार मोठें आरमार घेऊन चौलाजवळ आला व नांगरवाडा करून राहिला. त्यामुळे आंग्ऱ्यांच्या व इतर व्यापारी गलबतांची येजा थांबली. इंग्रज हा आंग्ऱ्यांशीं दोन हात करण्यासाठीच आला होता. नुकताच कान्होजी आंग्रे वारला होता. तेव्हा आता ही संधी बरी आहे असें इंग्रजांना वाटलें; पण कान्होजीचा मुलगा सेखोजी याने फार जवामर्दी करून इंग्रज आरमारावर आपलें आरमार घालून त्याचा दोन चार प्रहरांच्या

निकराच्या लढाईंत पराभव केला. इंग्रजांचे दोन चारशें आरमारी लोक मारले. जहाजें व त्यावरील कप्तानहि कैद करून नेला. यावेळीं स्वतः जातीनें सेखोजीनें व त्याचे भाऊ मानाजी उदाजी व धोंडोजी यांनी फार पराक्रम केला. लढाई चालू असतांना किनाऱ्यावरील रेवदंडेकर, उंदेरीकर, व अष्टागरकर हे ते युद्ध पहात होते. तो समर-प्रसंग पाहून त्या सर्वांस सेखोजी आंग्र्यांच्या पराक्रमाबद्दल धन्य वाटली.

कान्होजी आंग्र्यांच्या कारकीर्दींत इंग्रजांशीं तीन लढाया झाल्या. पहिली खांदेरीवर, दुसरी विजयदुर्गावर, तिसरी हिराकोटावर आणि त्यानंतर सेखोजीच्या कारकीर्दींत ही चौलाजवळ. या चारी लढायांत इंग्रजांचाच संपूर्ण पराभव झाला.

रामदास-रामदासी मासिक वर्ष २० अंक २४० मध्यें चौल येथील अधिकारी यांच्या दप्तरांतील एक कागद ६६ व्या लेखांकांत छापला आहे. त्यांत या चौलजवळील लढाईचें वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

"सरखेल कान्होजी यांच्या मागोन राजश्री सेखोजी आंगरे राज्ये चालवीत असता इंगरेज जलमार्गें जोरावर छेडाछेडी करीत असता त्याची ग्याली रेवदडे थेरवडे याचे बारेयावर नागरवाडा होती त्याजवर सेकोजी आंगरे सेके ५२ कार्तिक वदे येकादसी संवत्सरी (ता. २४-११-१७३०) श्वतां आरमार घेऊन जाऊन त्याचा मोकाबला करून युध्ये अनिवार अग्नीचा कल्होळ जाहला. ते समयी रेवदडे नागावे बंदर किनारा लोक पहावयास गेले ते थकित होऊन राहिले! अशी गोस्टी टोपकराखेरीज मऱ्हास्टामध्ये जाहाल्या ऐसे आइकोन अथवा देखोन आल्या नाही! त्यास ते ग्याली सिकस्ता करोन पागेस बांधोन कुलाबेयास आणिली. येणे करून मुंबैस वाहात खचोन राहिली. हे सलाबत टोपकर व शामलास कलोन राहिली."

प्रस्तुत पोवाड्यांत सेखोजीच्या पोषाक पेहरावाचें जें शब्दचित्र काढलें आहे तें त्याची तत्कालीन तसबीर उपलब्ध नसल्यामुळे महत्त्वाचें वाटतें. त्यावरून सेखोजी हा शिवोपासक होता, कपाळीं भस्म चर्चित असे, चिरा म्हणजे मंदील बांधून त्यावर लाल बांधीत असे असें दिसतें. शैवमयूराच्या संस्कृत नवरत्नमालेंत सेखोजीचें स्वरूपवर्णन आहे. परंतु

तें संस्कृत धर्तीचे अतिशयोक्त म्हणून अविश्वसनीय वाटतें. 'प्रवालाधरो' म्हणजे पोवळ्यासारखे लाल ओठ असलेला, किंवा 'स्वरूपेण मारः' म्हणजे मदनासारखा सुंदर इत्यादि वर्णन विश्वसनीय वाटत नाही. प्रवालाधर हें विशेषण विडा खाल्ल्यामुळे रंगलेल्या ओठांना लावलें तर कदाचित् शोभेल इतकेंच. पोवाड्यांत पुढील चरण आहे "जवळ शामह सुंदर। डोबा वलयंधर (?) ॥ पांचसात कुंदर। तमासा हा दाविला ॥" यांतील शामसुंदर हें कदाचित् सेखोजीच्या आवडत्या बसावयाच्या घोड्याचें नांव असेल. 'पांचसात कुंदर' म्हणजे पांचसात हत्ती. नवरत्नमालेंत सेखोजीचें "कदा हस्तीयायी कदा वाजीयायी" असें वर्णन केलें आहे. हे त्याच्या स्वारींचे हत्ती घोडे असावेत.

सेखोजी आंग्र्याचा पोवाडा

३

आजि इंग्रजाचा गर्व । केला खर्व तो अखर्व ॥
पाहताही लोक सर्व । पर्व पर्वतास लाग × ॥
मोठें होतां घनचक्र । पाहूं निघे एकचक्र ॥
स्वर्गी कान्होजी व शक्र । मनांत उल्लासला ॥
इकडे रेवदंडेकर उंदेरी । व अष्टागर पृथ्वी आणि
हा सागर पाहाया विकास ...... (ह) र्ष माये
साधारण कर्म (न) हे असाधारण । रणीं रोउनि
चारण । सेखोजी विलासला ॥ १

आंगें घालुनिया कास । नमुनि जगन्निवास ।
भस्म लाउनि भाळास । बाळ काळसा ठसे ॥
चिरा बांधुनि शिरास । लाल लाउनि तयास ॥
हातीं घेउनि खर्गास । कोठें नसेसा नसे ॥

खर्व—ठेंगणा किंवा खुजा. गर्व खर्व करणें म्हणजे गर्वाचें घर खालीं करणें, नक्षा उतरणें. इंग्रजांना आपल्या आरमारी शक्तीचा फार गर्व चढला होता तो त्यांचा आरमारी युद्धांत पराभव करून उतरवून टाकिला. **पाहताही**—'पाहती हे' असा मूळ पाठ असावा. **घनचक्र**—घनचक्कर युद्ध. **एकचक्र**—? **स्वर्गी कान्होजी**—आदल्याच वर्षी कान्होजी स्वर्गवासी झाला होता. **शक्र**—इंद्र. **रणीं रोउनि चारण**—रणीं रोउनि चरण असें तर नसेल ? २ किंवा कदाचित् रणीं होउनि वारण असेहि असेल. हत्ती ज्याप्रमाणें शत्रूसैन्याची दाणादाण उडवितो त्याप्रमाणें सेखोजीनें उडविली असा भावार्थ

बाळ काळसा—यमाच्या छोट्या आवृत्तीसारखा; **ठसे**—शोभे; **चिरा**—मंदिल, फेटा, रुमाल. **लाल**—माणकासारखें एक रत्न; राजे लोक पागोट्यावर हिऱ्याचा किंवा रत्नाचा अलंकार बांधतात तसा अलंकार; **खर्गास**—खड्गास. **कोठें नसेसा नसे**—कोठें नाही असा

लोटुनियां अर्मारास । हाके हाकित लोकास ।
फिरुनियां आसपास । आंत बहीरीसा धसे ॥
देव सारथी जयास । काय तयास आयास ।
केला इंग्रेजाचा नास । नेला काळाच्या भसे ॥ २

फार घेउनि जमाव । मोठा करुनि उठाव ।
घेत पुढें पुढें ठाव । बेटा पाहुनि घुरे ॥
बंद जाला येव जाव । पडे लोकांस दबाव ।
कोणा न सांगत भाव । राव मनांत झुरे ॥
आजि जाणुनिया दाव । भरुनि वीरांसि आव ।
देउनि मिशांस ताव । आपण मागे वघुरे ॥
बहुता दिसांचा हा डाव । घ्यावयाला घेत धाव ।
घेऊन ते ग्याली नांव । केलें इंग्रेज पुरे ॥ ३

नाहीं म्हणजे त्याचा संचार सर्वत्र आहे; हाके—मुळांत धाके असा शब्द असण्याचा संभव आहे. बहीरी—ससाणा. 'लोटुनिया' पासून 'धसे' येथपर्यंतचा भावार्थ असा कीं, सेखोजी आपलें आरमार घेऊन शत्रूभोंवतीं घिरट्या घालतो व एखादा बहिरी ससाणा ज्याप्रमाणे भक्ष्य नजरेंत येतांच एकदम त्यावर झडप घालतो त्याप्रमाणें सेखोजी शत्रूवर हल्ला चढवितो.

धसे—घुसे. धस या शब्दाचा अर्थ जोराची मुसंडी असाहि आहे. धस मारणें म्हणजे हल्ला चढविणे. आयास—श्रम, कष्ट.

भस—याचा अर्थ लागत नाही. महाराष्ट्र शब्दकोशांत भस नपुंसकालिंगी शब्दाचा अर्थ जेवण असा दिलेला आहे तो पाहतां भिशी शब्द आठवतो. भिशी–खाणावळ. तो लक्षांत घेऊन सेखोजीने इंग्रजांना मारून त्यांची काळाच्या ताटांत रवानगी केली असा अर्थ बसवितां येईल. बेटा—कान्होजीचा बेटा सेखोजी. येवजाव—येजा. दबाब—दरारा, भीति. कोणा न सांगत भाव—मनांतला विचार बाहेर दर्शविला नाही. राव—सेखोजीराव. दाव—दावा, वैर. दाव जाणून–वैर स्मरून. आव भरणें—ईर्षा आणणें. वघुरें—? घेत घाव—घाव घालतो, तडाखा हाणतो. डाव घेणें—वैर उगवणें. ग्याली—

नाळ नाळे मागें नाळ । शतें सोडींत जंजाळ ।
जाणों आगिया वेताळ । असा बेटा भांडला ॥
चहूंकडे आळमाळ । ज्वाळ माळां ये भंभाळ ।
मोठा धरुनि......साळ । साळ थेट (बेट ?) फार भांडला ॥
लोक बोलत हा काळ । परि त्याला महाकाळ ।
कान्होजीचा शेखू बाळ । खराउनि तांडला ।
स्मरुनियां चंद्रभाळ । घेउनियां करवाळ ।
पाहतां हे चौदा चाळ । इंगरेज खांडला ॥ ४

पाहिली नाळांची ते मार । मागें जंबू (बं ?) रे हजार ।
रेजगारी बेशुमार । त्या मागें कडाडली ।

गलबताचा एक प्रकार. **नाळ**—गलबताचा पुढचा भाग, तोंड. पण येथे नाळ म्हणजे तोफ हाच अर्थ जुळतो. **नाळ नाळे मागें नाळ**–तोफामागून तोफा सुटू लागल्या. **जंजाळ**—हा जेजाल या अर्थी वापरला आहे. जेजाल–एक तऱ्हेची तोफ. **आगिया वेताळ**—आग्यावेताळ. म्हणजे एक भयंकर पिशाच्च. त्याच्या नांवानें मंत्र म्हटला कीं, ज्यावर तो मंत्र घातला तो जळू लागतो. **बेटा**—सेखोजी. **आळमाळ**—अळमाळ–अल्प. परंतु तो अर्थ येथें जुळत नाही. **महाकाळ**—इंग्रज हा काळासारखा भयंकर आहे अशी त्याची लोकांत यथार्थ ख्याती; परंतु सेखोजी हा त्याला महाकाळच भेटला म्हणजे इंग्रज शेराला सेखोजी सव्वाशेर भेटला. **खराउनि तांडला**—खरडून काढला. **चंद्रभाळ**—भालचंद्र, शंकर. **करवाळ**—तलवार. **चाळ**—पट्टी. 'चौदा चाळ कोंकण।' (मुआदि २६-२८ महाराष्ट्र शब्दकोश भाग ३) यावरून येथे चवदा चाळ म्हणजे संपूर्ण कोंकण प्रांत असा अर्थ दिसतो. "चौदा चाळ कोंकणाचा धनी तो आहे देवली त्याचा भक्तराज शिरोमणी सहश्रायु चिरंजीव बाजीराव प्रधान तथा आपा व नाना यांसी आज्ञा केली यैसीजे." (ब्रह्मेंद्रस्वामींचें चिमाजीअप्पास पत्र. पेशवें दप्तर भाग ३) **पाहता हे**—पाहताहे–पाहत आहे. **जंबुरा**—एक प्रकारची तोफ. **रेजगारी**—रेजगि रेजगी–Fragments of stones or small stones

तेथे धरुनि करार । मोठा केलासे संहार ।
शंभरेक लोक ठार । धाडसी धडाडली ।
तिकडे जरार जरार । इकडे सर्दार सर्दार ।
अडावितां आर्मार । भवानि भडाडली ॥
चढुनियां येलगार । झडे आंतही हत्यार ।
भंगुनि इंग्रेज मार । (हत्या करुनियां फार !) झांगड गडाडली ॥ ५

धीर धरित धीरास । वार मारित...... ।
शिरास शिरीं सिंधु दाटला ॥
किती भावले नीरास । किति लागले तीरास ।
किति धाडले बहुतांची मीरास । जसा घाणा घाटला ।
शेखीं लागला करास । धरुनि आणिला घरास ॥
चौऱ्यासीही बंदरास । धाक मोठा वाटला ॥

बेशुमार—बेसुमार. **धाडसी धडाडली**—? **जरार**—हा जराल या शब्दाचा अपभ्रंश दिसतो. जराल–जनराल. जराल हा शब्द पोर्तुगीज आहे. पेशवे दप्तराच्या तिसऱ्या व तेहतिसाव्या खंडांतून हा शब्द आलेला आहे. भावार्थ, तिकडल्या जनरलाशीं इकडचे सरदार भिडले. पर्शियन भाषेतहि जरार शब्द आहे त्याचा अर्थ 'शूर'. (मुधोळकर घोरपडे घरण्याचा इतिहास. फारशी शब्दकोश.) **भवानि**—तोफेचें नांव. **येलगार**—एलगार–हल्ला. **झांगड**—किती एक वाद्यांचा सतत वाजत्येला शब्द (शास्त्रीकोश), एक प्रकारचें वाद्य, झंगट. "झांगड नौबत व जती धडाधड" ऐ. पो. ११८ महाराष्ट्र शब्दकोश. **शिरास शिरीं सिंधु दाटला**—लढाईंत इतकीं शिरें तुटलीं कीं, त्यांच्या दाटीनें समुद्राचा पृष्ठभाग झांकून गेला. **किती भावले नीरास**—किती एक लोक समुद्रांत बुडाले. नीर–पाणी. **मीरास**—? **घाणा घाटणें**—पिळून टाकणें, निःसत्व करणें. भावार्थ, सर्व इंग्रजांना रगडून काढलें. **शेखी**—शेवटीं, अखेरीस. **लागला करास**—हातीं सांपडला. **चौऱ्याशीं बंदरें**—हिंदुस्थानांतील सर्व बंदरें, लक्षणेनें समुद्र किनारा. चिमाजी

करणें ऐसें शंकरास । भयद भयंकरास ॥
शिखोजीच्या किंकरास । किंकर दुमाटला ॥ ६

काखे घेऊनि अंबर । नाहि बांधिली कंबर ।
नाही व रत्नराडंबर (?) । शेखोजीनें भाविला ॥
खालें केवळ बर । वरतें मोकळें अंबर ।
चित्तीं एक चिदंबर । भावेंचि संभाविला ॥
जवळ शामह सुंदर । डोबा वलयंधर (?)
पांच सात कुंदर । तमासा हा दाविला ।

अप्पाने वसई घेतल्यानंतर, शाहू महाराजांस त्यानी जें पत्र पाठविलें त्यांत हा शब्द आलेला आहे "फिरंगियांचा जागा वसई हस्तगत जाहलियामुळें समुद्रांत सर्वांस दहशत प्राप्त होऊन चौऱ्यांशी बंदरांतरीं महाराजांची सलाबत गालीब जाली" (वसईची मोहीम पृष्ठ २०६). **किंकर दुमाटला**— ? **अंबर**—वस्त्र. **काखे**—खाकेंत. **शामह सुंदर**—हत्तीचें नांव असावें. **डोबा**— ? **वलयंधर**— ? **कुंदर**—कुंजर, हत्ती. **तमासा**—तमाशा-पराक्रम. **मंदर**—मांदार. **कलंदर**—येथे पराक्रम असा अर्थ दिसतो. एरव्ही कोशांतून कलंदर-बंधनातीत, साधु किंवा बेपर्वा मनुष्य असा अर्थ दिलेला आहे. **नसुट-नश्रुड किंवा नसुड**— A term for a feeble puny yet forward fellow. (मोल्स.) नसुड हा शब्द तुच्छतादर्शक किंवा निंदाव्यंजक म्हणून शिद्दी किंवा इंग्रज किंवा फिरंगे यांसाठी वापरलेला जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांतून सांपडतो. शिद्द्यांना शामल, निशेंडा, कृष्णमुख इत्यादी पर्याय शब्द रूढ होते. तसा नसुड किंवा नश्रुड हा शब्द प्रस्तुत पोवाड्यांत इंग्रजांसाठी वापरलेला आहे. खुद्द सेखोजी आंग्र्याचें एक पत्र पेशवे दप्तर भाग ३३ मध्ये ६५ नंबराला छापलें आहे. त्यांत इंग्रजांस नश्रुड म्हटलें आहे. "परंतु हे गोष्टी तत्वता जाहाली तरी मोठासा शह आहे. श्रीचे सुदर्शन सव्य अपसव्ये फिरत आहे. मुबैकरास हें बुद्धी जाहाली असेल तरी त्याचेही अगाध आहे यैसे नाही. सामेकरून विचार जाहला तरी उत्तमच

राव सुमेरु मंदर । शोभे जसा पुरंदर ॥
करुनिया कलंदर । नस्ट बिच्छावला ॥ ७

मानाजी तो राजपूत । दुजा उदाजी सपूत ।
धोंडोजी तो भांबडभूत । जातीचे हे आंगरे ॥
गुराबा लडावणार लडुनि । अडावणार अडुनि ।
झगडणार भंगिले ते भांगरे ॥
किती गोळ्यांहि उडेत । किती सागरी बुडेत ।
किती घायीं आतुडेत । फुललेसे पांगरे ॥
गायल्या ग्यालीचा गीत । पालवाला फार भीत
(तो फजित मेला)
उरला खटारा ओढीत । दूर बेटा नांगरे ॥ ८

जाहाले. प्रसंगच प्राप्त जाहाला तरी नश्रुडास नतीजा धनियाचे पुण्यप्रतापें देतच आहो." बिछावला—जमीनदोस्त केला, खलास केला, चीत केला; मूळशब्द बिछावणी. त्याचा अर्थ जमीनीवर पसरणें, आंथरणें. मानाजी—कान्होजी आंग्रयांच्या दुसऱ्या स्त्रीचा मुलगा. लक्ष्मीबाईचा. म्हणजे सेखोजीचा सावत्र भाऊ राजपूत—राजपुत्र. उदाजी—? धोंडोजी—कान्होजीची तिसरी स्त्री गहिनाबाई तिचा मुलगा. सपूत—सुपुत्र. भांबडभूत—A term for a slovenly, disorderly, and idiotic-looking person (Molesworth.) भांबभूत, भांबरभूत, भांबर भुसका=वेडसर, मूर्ख, पिसाट, भ्रमिष्ट (मनुष्य) "सभेमध्ये साभिमाने । भाबडभूत दशानन । बैसलाहे।" मध्व ३७ (महाराष्ट्र शब्दकोश, विभाग पांचवा); पिशाचासारखा बेभान होऊन लढणारा. भांगरे—? उडेत बुडेत—उडाले, बुडाले. फुललेसे पांगरे—पांगाऱ्याचा वृक्ष फुलला म्हणजे त्याची तांबडीं लाल फुलें शोभतात त्याप्रमाणे हे वीर आपल्या रक्त वाहाणाऱ्या जखमामुळे शोभत होते. पालवाला—पाल-एक तऱ्हेचें लढाऊ जहाज. त्या पालाचा इंग्रज कप्तान. खटारा—एक तऱ्हेचें लढाईंत उपयोगांत आणलें जाणारें गलबत; यांतून सैन्य किंवा माल नेत असावेत. हा शब्द जंजिरा मोहीमेंतील पत्रांतून अनेक

... ...ळजे गर्जना ।
भडमारांची धं... ... ...घन जाळहि ॥
गोळांची गरनाळांची । गोळियांची झडी वर्षे ।
पडत पिंपरेसे वीर । विकराळही ॥
वायूपम शेखोजी । हा फिरत चौतर्फ तेथे ।
जालासे नीललोहित । सागर विशाळही ॥
जंगा तो उदंड होती । परि तासाची सुलतानी ।
हे दोनसे मेले वीर । उरले घायाळही ॥ ९

वेळेला आलेला आहे. उदाहरणार्थ पहा: १८-६-१७३३ चें सेखोजी आंग्रयाचें बाजीरावास पत्र " तसेंच दर्यावर्दींचा विचार उकलून लिहिला अथवा सांगितला तथापि चित्ती येणें नाहीं. कदाचित कलावयास अगाध काय म्हणून आपण म्हणतील तरी या मृग आरद्रांचे नक्षत्रांमध्ये समुद्राचे तारुण्यबल. नौका मार्ग कैचा चालेल ! हे पर्याय अनुभवावांचून प्रत्ययास येणेच नाही! आपले वचनावरून गलबतें रवाना करावी, खटारियांची आशा न धरावी हे उचित; परंतु गलबतें जाया जाली याचें सुख दुःख नाही; दोन तीनशे माणूस विनाकार्य आपले आपले हातीं हातपाय बांधोन बुडवावें आणि स्वामिकार्यही नाही. अन्यथा खटारियांचा हिसाब काय होता ? चार खटारे जाया होते तरी दाहा नवे केले जाते. अरमारी माणून गेल्यास तसें मिलतां सायास." (पेशवे दप्तर भाग ३३ पत्र नंबर २९१) गरनाळा—एक तऱ्हेची तोफ. कुलपी गोळ्यांची तोफ: हिचा आकार लाकडी उखळीसारखा असतो (महाराष्ट्र शब्द कोश). झडी—पर्जन्य. पडत पिंपरें—मोठ्या पावसाने ज्याप्रमाणें वड पिंपळादिकांचीं फळें पटापट गळून पडतात त्याप्रमाणें बंदुकांच्या वा तोफांच्या मारानें वीर लोक पटापट मरूं लागले. नीललोहित—गर्द तांबडा. लाल भडक. (१) सर्व समुद्र रक्तानें लालभडक झाला. (२) नील-लोहित याचा अर्थ शंकर असाही आहे. भावार्थ—समुद्रांत पडलेल्या शत्रूच्या मुंडक्यांमुळें तो समुद्र नररुंड माळधर शंकरासारखा दिसूं लागला. जंगा—जंग पाहिजे, जंग—लढाई. सुलतानी—राज्यक्रांतीसारखा संहार.

पांच सांत वर्षे श्री सरखेला पासुनि हा मुंबयींचा ॥
संसप्तक जेथे तेथे मोडिला ॥

भावार्थ, आजपर्यंत लढाया उदंड झाल्या परंतु इतक्या थोड्या वेळांत एवढा संहार झालेली हीच लढाई. **संसप्तक**—शत्रू ! **पहिले तो खांदेरिसी इत्यादी**—पोवाड्यांत म्हटल्याप्रमाणें चारी लढायांचे उल्लेख बरोबर आहेत. परंतु अनुक्रम थोडा चुकला आहे, कारण विजयदुर्गावरील १७१६ सालचा इंग्रजांचा हल्ला पहिला असून खांदेरीवरील हल्ला नंतरचा आहे. "त्यानंतर इ. स. १७१६ मध्यें इंग्रजांनीं कान्होजीच्या घेरिया किल्यावर स्वारी केली. पण त्यानें इंग्रजांचा हल्ला निकरानें परतविला. या हल्लयांत इंग्रजांनीं ३० ते ४० तोफा असलेलीं मोठी लढाऊ जहाजें आंग्र्यांविरुद्ध घेरियास नेली होती. परंतु इंग्रजांचा पराजय झाला व या सर्व लढाऊ जहाजांना निराश होऊन मुंबईस परत यावें लागले. याप्रमाणें समुद्रावरील अजिंक्य सत्ताधारी म्हणून कान्होजी चमकले" (कुलाबकर आंग्रे सरखेल पृ. २९).

सन १७१८ मध्यें इंग्रजांनीं खांदेरविर दुसऱ्यांदा हल्ला केला त्यांतहि कान्होजीनें इंग्रजांचा पराभव केला. त्याची नुकत्याच सन १९४१ सालीं प्रसिद्ध झालेल्या डॉ. सुरेन्द्रनाथ सेन यांच्या 'Early Career of Kanhoji Angria and Other papers' या पुस्तकांत अगदी नवीन व विश्वसनीय अशी हकिकत समकालीन इंग्लिश कागदपत्रांवरून दिली आहे. ती अशी—

१७१३ सालीं इंग्रजांनी कान्होजीशीं तह करून घेतला. पण पुन्हां लवकरच भांडण सुरू झाले. आणि तें खरोखर कायमचे थांबणे शक्यच नव्हते. कारण समुद्रावरील मुख्य सत्ता कोणाची हाच वादाचा प्रश्न होता. कान्होजीचे म्हणणें असें होते कीं, मुंबईकर इंग्रजांच्या ताब्यांतील देशी गलबतांनीं इंग्रजाप्रमाणें माझेही दस्तक घेतलेच पाहिजे. तसें नसेल तें गलबत मी जरूर पागेस लाऊन नेणार! हे कान्होजीचें वर्तन १७१३ च्या तहाला सोडून आहे असें इंग्रज म्हणत तर उलट कान्होजी म्हणे कीं, त्या तहांत अशी कांही एक अट नाही. कान्होजीनें इंग्रजी जहाजें

पहिलें तो खांदेरीसी । दुसऱ्याने विजयीदुर्गी ।
तिसऱ्याने हिराकोटीं । झोडुनियां तोडिला ॥

भराभर जिंकण्याचा सपाटा चालविला. त्याने सक्सेस, रॉबर्ट हीं गलबतें पकडलीं. नंतर ऑटर नांवाचेंही एक जहाज पकडलें. शेवटीं मुंबईस चार्लस बून नांवाचा नवा गव्हर्नर नेमून आलेला होता त्याने खांदेरी बेटावर स्वारी करण्याचें ठरविलें. खांदेरी बेट प्रथम सन १६७९ सालीं घेऊन शिवाजीने त्यावर किल्ला बांधिला. पुढे सन १७१३ सालीं शाहूमहाराजांनी तो कान्होजीच्या स्वाधीन केला. खांदेरी बेट मुंबईपासून अगदीं नजीक असल्यामुळे मराठ्यांनी मुद्दामच त्यावर किल्ला वसाविला. आणि ते ओळखूनच किल्ला बांधीत असतांच मुंबईकर इंग्रजांनी त्यावर तोफांचा भडिमार करून पाहिला होता. पण मराठ्यांनी दाद दिली नाही. आणि आता तर तो किल्ला कान्होजीसारख्या इंग्रजांच्या हाडवैऱ्याच्या ताब्यांत गेलेला. म्हणून तो जिंकून मुंबई निर्वेध करावी असें इंग्रजांनीं ठरविलें.

या वेळीं खासा गव्हर्नर सेनापति होऊन आला. त्याने बरोबर प्रचंड आरमार घेतलें होतें. त्यांत ॲडिसन, डार्टमाऊथ, व्हिक्टोरिया, रिव्हेंज आणि डिफायन्स अशा पांच गुराबा, 'फेम' नांवाची कच्छी, शिवाय दोन बॉम्बकच्छा आणि खेरीज ४८ गलबतें असा सरंजाम होता. ३ नोव्हेंबर १७१८ रोजीं त्या आरमाराने खांदेरीवर मार धरिला. दुपारीं दोन वाजल्यानंतर कान्होजी आपलें आरमार घेऊन बाहेर पडला. इंग्रजांचें कांही चालेना. शेवटीं त्यांनी खांदेरी बेटाच्या पूर्वकिनाऱ्यावर उतरण्याचा धाडसी प्रयत्न करून पाहिला. ज्या वेळीं पूर्वेकडे उतरण्याची हूल करावयाची त्याच वेळीं कॅप्टन माइल्सच्या ५५८ शिपायांच्या तुकडीनें पश्चिमकिनाऱ्यावर उतरावयाचें असा बेत ठरला होता. पण त्याचा कांहीहि उपयोग झाला नाही, उलट इंग्रजांचेच शेंकडो शिपाई मारले गेले. इंग्रजी आरमाराचें भयंकर नुकसान झालें व इंग्रजांना काढता पाय घेऊन निसटावें लागलें. इंग्रजांना खरडून काढल्यावर कान्होजीनें आपला विजयसूचक तांबडा झेंडा खांदेरीवर फडकावला! (या लढाईसंबंधीं आणखी तपशीलवार वर्णनें 'कुलाबकर आंग्रे सरखेल' ले.–दा. गो. ढबू. या ग्रंथांत पान २२–२३ वर आणि "A History of the Indian Wars by Clement Downing" या पुस्तकांत पाहावी.)

चौथ्याने चेउलाच्या चौबारां। शेखोजीने पाडाव केला।
आधा अधमेला सोडिला ॥

इंग्रजांचा तिसरा पराभव हिराकोटचा. तो १७२२ साली झाला. त्याची हकीकत सुप्रसिद्धच आहे. त्या वेळीं इंग्रज, पोर्तुगीज एक होऊन त्यांनीं हल्ला केला. त्याबाबत बरीच तपशीलवार माहिती डॉ. सेन यांच्या पुस्तकांत, पारसनिसांच्या इतिहाससंग्रहांत व 'कुलाबकर आंग्रे सरखेल' या ग्रंथांत मिळते. परंतु त्यांत दिलेली माहिती मुख्यतः इंग्रजी कागदपत्रांतून घेतलेली आहे. उलट आम्ही पुढें उतारा देत आहों त्यांतील माहिती पेशवाईतच आंग्र्यांच्या पदरच्या कोणा माहितगार माणसानें लिहून ठेवली आहे. ती फार बारीक व विश्वसनीय असा नवा तपशील देते.

"त्याजवर अन्तोन कडदीन मोकाम रेवदंडे व सरखेल यांचा दावा अतःसिये असतां, मोजे खानु सागरगडानजिक आहे, ते गांवीं सरखेल येहीं मोकासबाब पाहुणे कुमकी लोक येऊन गांव आबाद केला होता. खासगत समजोन अंतोन कडदिन रात्रसमई खासा लोक घेऊन गांव मारावयास आला. ते बातमी सरखेलास अगोदर रेवदंडाहून पावली. लोक पाठवून दबा दिधला होता. (फिरंगी) गांव मारावयास आला. त्याचा यांचा मोकाबला जाहाला. आगोट पाउसाला जाणोन त्यांचे बंदुकी त्यास प्रतिकूल होऊन फिरंगी ते ठिकाणांहून मारित मारित बाग सराई सोमेश्वराचे खिंडींत क्षिती केली ! सिराचे पार बांधिले आहेत ते अद्याप वर आहेत !! राहिले लोक पलत पलत राजकोटाचे आश्रये गेले (व) बच्याव होत नाही; तेव्हां मोंगलाने परकोटा दरवाजे उघडोन आंत घेतले. तेव्हां कुलाब्याची श्वारी हुजूर आली.

त्याजवर शके ४३ सन इसने इसरीन संवत्सरी अतोन कडदिन पूर्तकालास जाऊन तेथून राजे याची वीडदी गोवेयांस आज्ञा आणोन खासा विजुरले व आरमार व तोफखाना व चालता कोट व सिपाई लोक घेऊन प्रथम रेवदंडा उतरोन तेथून आरमार जलमार्गें वरसोली किनारा नेले. लोक पायमार्गें आले. त्यामध्ये इंगरेज होता त्याण्हे खुदस्ती अलीबागास येऊन हिराकोटास सिड्या लाविल्या. इतकयिांत

कान्होजी .... ॥ १०

ते प्रसगी रा पिलाजी जाधवराव व राजश्री मानाजी बाबा येही इगरेजाची क्षिती केली ! हे खबर महाराजा छत्रपतीस जाहीर झाली तेसमई राजश्री बाजीराव पेशवे व रा खंडोजी दाभाडे सेनापती व माण-कोजी वावसे वगैरा लस्कर फौज कुमकेस पाठविली. ते येऊन तो खाडाले तल देऊन राहिले. फिरगी येण्हे वरसवलीस तल देऊन भवतां लकडकोट लाऊन राहिला होता. त्याचे पूर्व दिसेस घाटावरील लोक त्यासवे वेढा देऊन सुरंगात माती खणोन पुढील जमीन काबीज करीत चालले. फिरगी लोकास कोंडवाड जाहाली. येजीज जाहाला. त्याजवर रावसाहेब व सरखेल येही समत केले कीं रात्रीं जाऊन छापा घालोन फिरगी मारावा. त्याजवर जाधवराव येही उत्तर केले कीं, 'रात्र समई त्याचे पाचसें पडतील तर तुमचे सेदोनसे पडतील या कारणास्तव शास्त्रार्थ आधी सिस्टाई करावी. मान्ये नाही तेव्हां युध्ये प्रसंग करावा.' हे गोस्ट सर्वांचे विचारास येऊन त्यास सांगो (न) पाठविले की तुम्ही भले माणुस मातबर आम्हा नजिक पाठवावे. तुमचा मतलब काये आहे तो दुतर्फा मनास आणिला जाईल. त्याजवर तेहीं अतोन कडदिन वगैरा भले माणूस लष्करांत पाठविले. सुल्याचा विचार होऊन उठोन जावे ऐसे मान्ये केले. त्याजवर विजुरेल कुलाबा गोलेयाने भरोन काढीन म्हणौन अभिमाने करून सर्व साहित्यानसी आला होता त्यास अपेश जाणून विष भक्षून मेला ! फिरगी लस्कर-समेत गोवेयास गेला. त्याजवर पंतप्रधान व सरखेल राजदर्शनास गेले."

(चौल अधिकारी दप्तर, ले. ६६.)

सेखोजी आंग्र्याचा पोवाडा

४

हाही पोवाडा अलीबागचे श्रीयुत आवळसकर यांजकडून आम्हांस मिळाला. तोहि अपूर्णच आहे. त्यांत वर्णन केलेल्या दाभोळच्या आरमारी लढाईला समकालीन लेखाचें प्रत्यंतर आम्हांला तूर्त मिळालेलें नाहीं, तथापि पुढेमागे मिळण्याचा नक्की संभव वाटतो. या पोवाड्याचा कवि पूर्वीच्या पोवाड्याचाच कवि शैवमयूरेश हा असला पाहिजे हे दोन्ही पोवाडे ताडून पाहिलें असतां तेव्हांच कळेल. किंबहुना असेही वाटतें कीं, हा त्रुटित पोवाडा म्हणजे मागच्या पोवाड्यांतील कांही भाग असावा. पण तसें म्हणण्यास तूर्त तर्काखेरीज दुसरें साधन नसल्यामुळे तो स्वतंत्र म्हणूनच छापला आहे.

सेखोजी सहोदरातें आला।
या (विजयी) दुर्गा गेला। मग विजयी।
जाले बंधु समजावुनि ॥ धृ. ॥

दोघे मग गुराब भारें निघतां।
इंगरेज आला साला। (आला ?) परि।
दस्त जाला विलयाला पाउनि।
स्वर्गा श्री (कान्ह) गेल्या जंजिरे दुचित्त होते सुचित्त
ते लोक केले देउनि बुझाउनि।
सवाई सरखेल गाजी किताब हा तुजला।
साजे प्रताप हा बंदर बंदर जातच बजाउनी ॥ १

घेउनि गुराब भार विजयदुर्गाचा मुबार।
टाकुनियां जो विस्तार दोभोळेचा पावला ॥

सहोदरातें आला—सख्खा भाऊ संभाजी आंग्रे यांजकडे गेला. समजावुनि—त्या दोघांत कलह होता तो मिटला, परस्परांची समजूत झाली. गुराब भारे—गुराबांचा भार म्हणजे समुदाय; म्हणजे आरमारें घेऊन. दस्त करणें—पकडणें. दुचित्त सुचित्त इ.—कान्होजी आंग्रे मेल्यानंतर जे कोणी आंग्र्यांचे सरदार किंवा गडकरी दुदील किंवा दुश्चित झाले

तेथें बेटा जोरावार इंगरेज बेशुमार ।
पाहिली जाणुनि शिकार सरखेल उठावला ॥
दोहीकडे मारामार दोहीकडे धुवांधार ।
दोघा बंधूचा करार एकमेकां फावला ॥
बार बारामागें बार होत हजारों हजार ।
अडाउनि आर्मार नसृड बिछावला ॥ २

मोठा करूनि करार बाप शेखोजी उदार ।
दुजा संभाजी झुंजार मिळूनि उठावले ॥
पहली बोहली (णी ?) उधार याचा करूनि निर्धार ।
आंगे (सांग) होउनि सर्दार मारीतच धावले ॥
जशी प... ... ...॥

होतें त्यांना देऊन, बुझावून म्ह. त्यांना पैका, वस्त्रपात्रें बहुमान इत्यादी देऊन आंग्रे बंधूंनी पुन्हा आपल्या लगामी लाऊन घेतले. मुबार—? वाचनाची चूक. 'सुमार' असें मुळांत असावे. सुमार म्ह. सुमारानें रोखानें. आंगे होउनि—आंगेजणीं करून, स्वतः जातीनिशी हत्यार धरून.

टिपूवरील स्वारीचा पोवाडा

ऐतिहासिक माहिती

ही स्वारी १७९० नंतर इंग्रज मराठे व निजाम या त्रिवर्गांनी टिपूवर केली.

मंगलोरच्या तहामुळें टिपूकडून आधीं आगळीक होईपर्यंत इंग्रजांना त्याशीं बिघाड करतां येत नव्हता. पण १७८९ च्या अखेरीस टिपूनें इंग्रजांचा दोस्त जो त्रावणकोरचा किरिटी रामराजा त्यावर चाल केली. तेव्हां इंग्रजांचा मार्ग खुला झाला. यापूर्वी १७८६-१७८७ साली मराठे मोंगलांनी टिपूवर स्वारी केली होती. पण ती यशस्वी झाली नव्हती. अर्थात् इंग्रजांच्या बरोबर मराठे व मोंगल यांचीं दरबारें पुनः टिपूवर मोहीम नेण्यास उत्सुक होतीं. शेवटीं इंग्रज मराठे व मोंगल यांच्यांत आपसांत जुटीचा एक तह ठरला. त्यांतील कलमें अशीं होतीं. (१) पावसाळ्यापूर्वी व त्यानंतर मराठे व मोंगल यांनीं टिपूच्या उत्तरसरहद्दीवर प्रत्येकीं २५००० फौजेनिशीं स्वारी करून साधेल तितका मुलूख ताब्यांत घ्यावा. (२) पावसाळ्यानंतरही मराठेमोंगलांनी मोहिमेचें काम नेटानें चालवावे. (३) कॉर्नवालीस मागेल त्या वेळीं एक महिन्याच्या मुदतींत मराठे–मोंगलांनीं प्रत्येकीं दहा हजार स्वार इंग्रजांच्या कुमकेस पाठवावे. (४) टिपूचा जितका मुलूख काबीज होईल तितका तिघांनीं सारखा वांटून घ्यावा. वरील तहावर पेशव्यांतर्फे १ जून १७९० रोजीं व निजामातर्फे ४ जुलै १७९० रोजीं सह्या झाल्या.

तहाप्रमाणें प्रथम मराठ्यांतर्फे कामगिरी झाली ती अशी–मराठ्यांचे सेनापति परशुरामभाऊ पटवर्धन व हरिपंत फडके हे होते. परशुरामपंत ऑगस्टांतच कूच करून पुढे गेला, व थोड्याच दिवसांत त्यानें टिपूच्या मुलुखांत हंगामा सुरू करून धारवाडच्या किल्ल्याला वेढा बसविला. तसेंच आसपासची हुबळी, जाडरहेबळी, दोडवाड, मिश्रीकोट, जडेअनवटी, लक्ष्मेश्वर, सोंधे गजेंद्रगड, हारपनहळ्ळी, उचंगीदुर्ग इत्यादि ठाणीं व किल्ले काबीज केले. हा सर्व प्रकार ऑक्टोबर १७९० पासून फेब्रुवारी १७९१ पर्यंत घडला. धारवाडास वेढा बसला होता तो सुमारें १४ सप्टेंबरपासून पक्का झाला. भाऊनें शत्रूची दाणावैरण बंद करून व तोफा चालवून किल्लेकऱ्यांस सताविलें.

१३ डिसेंबर १७९० रोजीं मराठी फौजेनें धारवाडच्या पेठेवर हल्ला करून ती जिंकली व मग खुद्द किल्ल्याच्या तटास पक्की मोर्चेबंदी केली. शेवटीं ता. ५ एप्रिल १७९१ रोजीं किल्लेदार बदरीजमालखान शरण आला. सारांश, तुंगभद्रेअलीकडील टिपूचा सर्व मुलूख काबीज झाला. दरम्यान तिकडे इंग्रज व हरिपंतानी पट्टणास वेढा घातला होता. अिंग्रजांचीं पत्रावर पत्रें येऊं लागल्यामुळें परशुरामभाऊ श्रीरंगपट्टणाकडे अिंग्रजांस सामील होण्याकरिता त्वरेनें निघाला.

इंग्रजांची कामगिरी अशी. टिपूवरील मोहीम ठरल्यावर १७९० च्या सप्टेंबरांत इंग्रजांनीं कोइमतूरकडे टिपूस चांगलाच ताण दिला.

नंतर कॉर्नवालीसनें बंगलोरचा किल्ला मोठ्या धाडसानें जिंकला. जो किल्ला घेण्यास वर्षसहा महिने सहज लागतील असा मराठे–मोंगलाचा अदमास होता पण तो अवघ्या १७ दिवसांत इंग्रजांनीं जिंकला ! किल्ल्याला दिल्ली दरवाजा व म्हैसूर दरवाजा अशा दोन वेशी असून, उत्तरेकडच्या म्हणजे दिल्ली दरवाजाच्या वेशीच्या बाजूस पेठ म्हणजे बंगलोर शहर वसलेलें होतें. पेठेलाहि अर्थात् बळकट तट होता; शिवाय भोंवतीं खंदक व निवडुंगाची दाट लागण होती. इंग्रजांनी हल्ला करून पेठ जिंकली व मग ते किल्ल्यास लागले. २१ तारखेस इंग्रजांनी किल्ल्याच्या बुरुजास खिंडार पाडलें पण तें लहान होतें म्हणून मोठें करण्यासाठीं गोळे टाकण्याकरितां त्यांनी मोर्चा उभा केला. तेव्हां टिपूनेंहि तटावर तोफा आणल्या. टिपूनें इंग्रज सैन्याभोंवतालचा मुलूख जाळूनपोळून बेचिराख केला होता. टिपूचे बेदडे इंग्रजी लष्कराचे रात्रीं बेरात्रीं लचके तोडीत असत. शिवाय या वेळेपर्यंत इंग्रजांस मराठे-मोंगलांची कुमकही आली नव्हती. म्हणून त्यानी ताबडतोब सोक्षमोक्ष करण्याचें ठरविलें. व रात्रीं १० वाजतां तटास शिड्या लावण्याचा हुकूम केला. किल्लेदार बहादूरखान फार शूर व एकनिष्ठ होता. त्यानें इंग्रजांचा हल्ला शर्थीनें मोडून काढला. पण दुर्दैवानें त्याला गोळी लागून तो ठार झाला आणि त्यांतच इंग्रजांना फितुरामुळें किल्ल्यांत शिरण्याची एक आडवाट सांपडली. तेव्हां दोन्हीं वाटांनीं इंग्रज आंत शिरले. किल्लेकरी म्हैसूर दरवाजानें पळूं लागले. त्या वेळीं झालेल्या कत्तलींत हजाराचे वर लोक इंग्रजांनी कापून काढले. टिपू मदत करण्यास आला होता. पण किल्ला

शत्रूनें घेतल्यावर आता तेथे राहण्यांत अर्थ नाही असें पाहून तो श्रीरंगपट्टणास गेला.

बंगलोर घेतल्यानंतर कॉर्नवालीस श्रीरंगपट्टणावर चालून जाऊं लागला. पण टिपूनें त्यास अत्यंत त्रास दिला. इंग्रजांच्या मार्गापासून दहापंधरा कोसांपर्यंतचा मुलूख त्यानें जाळून बेचिराख केला आणि त्या टापूंतील रयत व गुरेंढोरें दूरच्या प्रांतांत घालवून दिलीं! त्यानें धान्याचा व वैरणीचा नाश करून टाकला इतकेंच नाहीं, तर वैरणीऐवजीं झाडपाल्याचा शत्रूस उपयोग होईल म्हणून झाडेंसुद्धां तोडलीं!! रात्रंदिवस त्यानें इंग्रजांच्या लष्कराभोंवतीं घिरट्या घालीत बसावें, वारंवार हल्ला करण्याचा रोख दाखवावा, तोफा माराव्या, बाण सोडावे, दाणावैरण मिळविण्यासाठीं एखादी टोळी बाहेर पडलीच तर तिचा फन्ना पाडावा; ही त्याची मेहनत एकसारखी चालू होती व तिचा परिणाम इंग्रजांच्या लष्करास फारच अपायकारक झाला. तथापि इतक्याही संकटास न जुमानतां नेटानें चाल करून इंग्रज श्रीरंगपट्टणाजवळ आले, तेव्हां टिपूने ता. १५ मे रोजीं अरिकेरा येथें त्याशीं फारच निकराची लढाई केली, पण त्या लढाईत त्याचा पराजय झाला. मग तो श्रीरंगपट्टणास जाऊन आपल्या राजधानीचे संरक्षण करण्याच्या उद्योगास लागला. ता. १९ मे रोजीं कॉर्नवालीस श्रीरंगपट्टणाच्या पश्चिमेस कनियामबाडी येथें जाऊन उतरला.

पण सैन्याची विलक्षण उपासमार सुरू झाली. 'पांच रुपयांस शेर तांदूळ, नाचण्याचें पीठ ३ रु.स १ शेर, वैरण लांकूड अगदी नाही. तोफखान्याचे बैल झाडून मेले. गोटाबाहेर माणूस व गुरें गेलीं असतां त्यांस तोडावें लुटावें याप्रमाणें टिपूकडील बैदांनी केलें. तेव्हां धारणीचा मजकूर लिहावयाचा काय?' शिपाई व सोजीर यांस दोन-दोन दिवस फाके पडावे तेव्हां एखाद्या वेळीं अन्नाचा घास दृष्टीस पडावा! स्वारांच्या घोड्यांस तृणाचें दर्शन होत नसल्यामुळें घोडदळाचें आपोआप पायदळ बनत चाललें होतें! अशा स्थितीत टिपूची खोडकी जिरविण्याची गोष्ट तर दूरच राहू द्या; पण आपण जिवंत येथून परत कसे जातों अशी कॉर्नवालीस यास चिंता पडली व तो मोठ्या कष्टानें आपलें सैन्य घेऊन बेंगरूळाकडे परत निघाला. त्यानें आपल्या तोफा फोडून टाकल्या, दारुगोळ्याचा

नाश केला व सर्व अवजड सामान मोडूनतोडून टाकलें. कॉर्नवालीसनें २६ मे १७९१ रोजीं बंगलोरकडे कूच केलें. पण त्याच दिवशीं परशुरामभाऊ व हरिपंत यांचीं लष्करें निरनिराळ्या मार्गांनीं येऊन मेलकोट्यास एकत्र झालीं होतीं.

हरिपंत फडके पुण्याहून परशुराभाऊच्या मागून निघाला होता. प्रथम त्यानें पानगलानजीक निजामाची भेट घेतली. त्या भेटींत टिपूविरुद्ध इंग्रजांना प्रत्यक्ष लढाईत मदत केली, तरी टिपूला सपशेल बुडवावयाचा नाहीं हें धोरण निश्चित करण्यांत आलें. त्यानंतर पुढें सेलकोट्यानजीक ते पटवर्धनास मिळाले. मग मराठ्यांनीं इंग्रजांस दाणावैरण अन्नसामुग्री भरपूर पुरीवली व त्याचा पुनर्जन्म केला ! यानंतर पावसाळ्यासाठीं तीं तीनहि सैन्यें अलग अलग छावण्या करून राहिलीं. दसरा झाल्यावर परशुरामभाऊनें बिदनूर प्रांतांतील टिपूचीं ठाणीं घेतलीं. इकडे कार्नवालीस हरिपंत व निजाम यांनी श्रीरंगपट्टणावर चाल केली. त्रिवर्गांचे मिळून प्रत्यक्ष लढाऊ सैन्य ६०००० पर्यंत होतें.

" श्रीरंगपट्टणचा किल्ला कावेरी नदीच्या दोन फाट्यांनीं बनलेला एका खडकाळ बेटावर बांधलेला होता. त्याच्या उत्तरेस टिपूच्या सैन्याचा तळ पडला असून तळाचे तोंड आग्नेयीस होतें. दोस्तांची सैन्यें व टिपूचें सैन्य यामध्यें लुकणी नदी वहात होती. शिवाय एका जबरदस्त कांटेरी कुंपणाचा आश्रय आंतील सैन्यास होता. हें कुंपण बांबूंचीं दाट बेटें व निवडुंगाचीं लागवड यामुळे चांगलेच अभेद्य बनले होते. निदान साध्या घोडेस्वारांचा तरी त्यांतून शिरकाव होणें अशक्य होतें. अशा रीतीनें एका अंगानें हें कांटेरी कुंपण व दुसऱ्या अंगानें कावेरी नदी यांच्या दरम्यानच्या या पटांगणाची लांबी तीन मैल व रुंदी पाऊण मैल होती. पैकीं पूर्वेकडचा प्रदेश सखल असून त्यांत आसपासचे लोक आश्रयासाठी येऊन राहिले होते. आणि पटांगणाचा पश्चिम भाग खडकाळ व उंच असून तेथे टिपूनें सहा बुरूज बांधून तोफांची मांडणी केली होती. त्यांचा मारा दूरवर होण्याजोगा होता. या तोफांची संख्या शंभरापर्यंत असून या किल्ल्यावरील सर्व सैन्य व तोफा सय्यद हमीद व सय्यद गफूर नांवाच्या दोन विश्वासू सरदारांच्या हुकमतीखालीं देण्यांत आल्या होत्या. शिवाय व्हिजी नांवाच्या फ्रेंच अधिकाऱ्यानें तयार केलेली गोऱ्या लोकांची तुकडीदेखील याच ठिकाणीं होती.

पटांगणाच्या उजव्या म्हणजे पूर्वेकडील बाजूस देखील लुकणी नदी व एक कालवा यांचा आसराअसून त्यापलीकडे उंच टेकड्या होत्या व त्यावर तोफा असून शेख अनसर नांवाच्या अनुभविक योद्धयाची तेथे नेमणूक झाली होती. स्वतः टिपूनें मध्यभागाची व्यवस्था आपणाकडे घेतली असून, त्याचा तंबू सुलतान बुरुजाशेजारीं ठोकलेला होता."

७ फेब्रुवारी १७९२ रोजीं इंग्रजांनीं पट्टणाच्या गोटाबाहेर टिपूवर हल्ला केला. "इंग्रजांनी छ १३ जमादिलाखरी पट्टणाहून तीन कोसांवर मुक्काम होता तेथून पंधरा पलटणें सडीं घेऊन रात्रीस निघाले ते टिपूचा गोट पट्टणेचे उत्तरेस होता तेथे जाऊन पोंचले. एक शिलक केली. टिपू सावध झाला. त्याच्या तोफांच्या व बाणांच्या व गारद्यांच्या शिलका हाऊं लागल्या. इंग्रजांनी तोफा नेल्या नव्हत्या. फक्त पलटणांची शिलक करीत. टिपू तळावरून उधळला तो कावेरीपलीकडे दक्षिणतीरास गेला. उलटपक्षीं लढाई अवशीचे चौदा घटका रात्रीस सुरू झाली. ती दुसऱ्या दिवशीं प्रहर दिवसपर्यंत होत होती. लढाई भारी झाली. इंग्रजांनी करीघटाची टेकडी घेऊन लालबाग व शहरगंज येथे जाऊन पोंचून जागा कायम केली. इंग्रजांच्या जुवामर्दीची शर्त झाली!" वास्तविक इंग्रजांनीं मराठ्यांस मुद्दाम वगळून हा हल्ला केला. पण पुढें त्याचा त्यांस पश्चात्ताप झाला. इंग्रज फौज अगदीं दमून गेली होती पण शेवटीं हरिपंतांनी आपण होऊन त्यांच्या मदतीस जाऊन त्यांची कुमक केली, व म्हणूनच टिपूचे राऊत निघून गेले. त्याच सुमारास परशुभाऊहि बिदनुराकडून येऊन श्रीरंगपट्टणास दाखल झाला. व त्याने पराकाष्ठा करून टिपूची रसद तोडली. तेव्हा नाइलाज होऊन टिपूनें इंग्रजांशीं तह केला. तीन कोटि रुपये व अर्धे राज्य टिपूस देणें भाग पडले. त्याचे तीन सारखे हिस्से इंग्रज, मराठे व निजाम यांनीं घेतले.

टिपूवरील स्वारीचा पोवाडा

५

(शाहीर राजू सुलतान)

हा पोवाडा शेंदूर येथे न्हातू तोंदल्या याने म्हटला व शितूतांनी तो उतरून काढिला. याशिवाय आणखी एक प्रत टोप संभापूर येथे त्यांना मिळाली होती.

सर केला टिपू सुलतान फिरंगी बाण गवसली खाण सोन्याची ॥ सोडीना फिरंगी लालुज पटणाची ॥ ध्रु० ॥

थोर होऊन शान अभिमान होऊनी रावण होऊनी पाच्छाई द्वाही फिरविली परगण्यासी ॥ कैदेंत घातले कुंभार राजासी ॥ महाराठ लोक

फिरंगी बाण––बाण किंवा वाण या ऐवजीं मूळ शब्द " याण " असा असावा. याण म्हणजे याणें किंवा यानें–फिरंगी याण–फिरंग्यानें. येथें फिरंगी हा शब्द इंग्रज या अर्थी वापरला आहे. पोर्तुगीज या अर्थीनें नव्हे. इंग्रजांचा-हि फिरंगी या शब्दानें ऐतिहासिक वाङ्मयांत उल्लेख केलेला आढळतो. उदा. " फिरंगी अंमल आहे चहूंकडे " या ध्रुपदाच्या पोवाड्यांत सर्वत्र तो तसाच वापरला आहे. " लालफिरंगी गोरा जमावून सारा । शेर पुण्यावर दिली लढाई ।" " तलवार झाली बापडी फिरंगी छडी लागली दुनियावर फिराया " इ. **गवसली खाण सोन्याची**—टिपूचा म्हैसूर प्रांत अत्यंत संपन्न होता अशा अर्थानें त्याच्या मुलुखाला 'सोन्याची खाण' असें म्हटलें आहे. शिवाय त्या मुलुखांत सोन्याच्या प्रत्यक्ष खाणी आहेतच. याच पोवाड्याच्या शेवटच्या चौकांत शाहीर स्पष्टच म्हणतो "नांव हाय श्रीरंगपट्टण । त्या मुलुखामाधि राव जनमतो सोन ।" **लालुज**–लालुच, हांव, आशा, पट्टण जिंकण्याची इच्छा. **पट्टण**––श्रीरंगपट्टण **होऊन शान**––दोन्ही शब्द एक पाहिजेत, होऊनशान म्ह. होऊन **अभिमान**—गर्व **होऊनि रावण होऊनि**—यांपैकी एक होऊनि हा शब्द निष्कारण जास्त पडला आहे, **पाच्छाई**—पाच्छाय असें पाहिजे. पाच्छाय म्हणजे बादशहा. **कैदेंत घातलें कुंभार राजासी**—टिपूचा बाप हैदर याने

ब्राह्मण नेई धरून कापी चोमण मुसलमान केले राव तयासी ॥ बारा हजार चेला जमला पंक्तीसी ।। चौमुलुखी पडली धासत नाव कोण

मूळ म्हैसूरचे राजे जे कुंभार जातीचे समजले जातात त्यांना कैद करून स्वतःच म्हैसूरचें राज्य बळकावलें होतें. **चोमणें**—जननेन्द्रिय. 'महाराठ लोक ब्राह्मण नेई धरून कापि चोमणं मुसलमान केले राव तयासि।' टिपूनें केलेला धार्मिक जुलूम प्रसिद्धच आहे. उदाहरणार्थ (१) मलबारांतील पुढील प्रकार पहा. " नायर लोकांनी शहर सोडून जंगलाचा आश्रय केल्यामुळे त्यांना पकडण्यासासाठी टिपूला आपल्या सैन्याच्या टोळया करून निरनिराळ्या ठिकाणीं पाठवाव्या लागल्या. पैकी एका मोठ्या टोळीने गुत्तीपूर येथील नायर लोकांच्या एका बळकट किल्ल्यास वेढा दिला. तेथे बायकापोरासुद्धा दोन हजार नायर लोक होते. त्यांनी कांही दिवस किल्ला लढविला; पण शेवटीं निरुपाय होऊन त्यांची उपासमार होऊ लागली, तेव्हा ते शरण आले. त्या वेळीं " एकतर त्यांनी आपणहून मुसलमानी धर्म स्वीकारावा नाहीं तर त्यांना सक्तीने मुसलमानी धर्माची दीक्षा देण्यांत येईल व शिवाय सर्वांना हद्दपारीची शिक्षा मिळेल;व श्रीरंगपट्टणाकडे नेण्यांत येईल'असें त्या नायर लोकांना कळविण्यांत आलें. हें पाहून त्या लोकांनी मुसलमानी धर्म स्वीकारण्याचें कबूल केलें व दुसऱ्या दिवशीं सर्व पुरुषांची सुंता करण्याचा विधी झाला ! आणि नंतर स्त्री-पुरुषांनीं मिळून मांसभक्षण केल्यावर हा धर्मान्तराचा समारंभ संपला. हें उदाहरण पाहून अरण्यवासाच्या यातनेस कंटाळलेले कित्येक लोक टिपूच्या सैन्यांत दाखल होऊन मुसलमान बनले.

(२) "इ. स. १७८८ च्या जुलै १४ तारखेस तलचेरी येथील इंग्रजी कोठीवाल्यांच्या मनांतून टिपूच्या हालचालींसंबंधीं व इतर कांही बातमी मद्रास कलकत्ता येथें पोंचवावयाची होती. याकरिता प्रथम पत्रें अंजनगांवास पाठवून तेथून बोटीच्या मार्गें तीं पुढे रवाना करण्याचा नेहमीचा प्रघात होता. हें पत्र पोंचविण्याचें काम कोठीवाले इंग्रज ब्राह्मणांकडून करवीत; कारण ब्राह्मणांच्या अंगावर हात टाकण्याचें धाडस सहसा कोणी करीत नसल्यामुळे त्यांना एका ठिकाणाहून पत्रें दुसऱ्या ठिकाणीं पोंचविण्यास अडचण पडत नसे. व हें काम बिनबोभाट होई; पण मंगळूरच्या वेढ्याचें वेळीं कारवारांतील नेटिव्ह

घेतो थोर इभ्रत तोफेची कानडे लोक फलटान केलें त्यासी ॥ त्यानें दावा लाविला होता फिरंग्यासी ॥ चाल ॥ भौवताचा वैरी टिकल फार दिवशीं ॥ बोलावून आणले जाऊन पेशव्यासी ॥ परमुलुख परगाणा दिला मोंगलासी ॥ झाडून ठाणीं बसविलीं पेशव्याचीं ॥ तीन दल मिळाले गर्दी

ख्रिश्चन लोक इंग्रजांना गुप्तपणें साहाय्य करतात अशी खात्रीलायक बातमी कळल्यापासून टिपूनें परराज्यांतील मुसलमानेतर प्रजेविषयीं अतिशय सावधपणा ठेवण्याचें ठरविलें. या सावधपणाचाच अतिरेक होऊन त्यानें कारवारांतील हजारो नेटिव ख्रिश्चनांना मुसलमान बनवून त्यानें त्यांची कारवारांतून हकालपट्टी केली व याच सावधपणामुळें आतां त्यानें परराज्यांतील ब्राह्मणांवर हत्यार धरलें. "आजपर्यंत या ब्राह्मणांनीं शत्रूच्या हेराचें काम करण्यासाठी बिनहरकत माझ्या राज्यांतून जा ये केली असेल; पण इतउत्तर या गोष्टीकडे मला डोळेझाक करता येत नाही." असें ठरवून त्यानें असें हेरांचें काम करणाऱ्या ब्राह्मणांना पकडण्याचा सपाटा चालविला. तेव्हां तेथील ब्राह्मणांस दहशत बसून इंग्रजी कोठीवाल्यांचीं पत्रें पोंचविण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. प्रथम कंपनीच्या लोकांना या गोष्टी खऱ्या वाटेनात; पण कालिकोट येथील दोनशें ब्राह्मणांना टिपूनें बाटवून मुसलमान केले अशी खात्रीलायक बातमी कंपनीकडे २० जुलै रोजीं आल्यामुळें त्यांनीं पत्रें नेण्याबद्दल ब्राह्मणांना आग्रह करण्याचें सोडून दिलें."

(३) "टिपूने कोची प्रांताची व्यवस्था स्वतःच करण्याचें ठरविलें; आणि व्यवस्था करण्याच्या मिषानें त्यानें या मुलुखांत धुमाकूळ मांडला कोचीच्या राजाचें मन टिपूविषयीं विटून गेलें. तीस हजार पायदळ, पांच हजार घोडेस्वार व वीस तोफा एवढ्या सामुग्रीनिशी टिपूची स्वारी नोव्हेंबर महिन्यांत कोचीकरांच्या मुलुखांत जी एकदां शिरली ती त्या मुलुखाचा सत्यानाश केल्यानंतर बाहेर पडली. म्हातारे-कोतारे, बायका-पोरें यांनी देशत्याग केला व तरुणांना जंगलावांचून जागा राहिली नाही. धनिक लोकांनी कोचीकरांच्या मुलुखांतून पळ काढला व त्रावणकोरच्या राजाने बांधलेल्या तटामागें ते लपून बसले. याखेरीज जे लोक तेथेच राहिले होते त्यांची टिपूच्या सैन्यानें कत्तल केली व त्यांचीं घरेंदारें जाळून टाकलीं.

मुलकाची ॥ लाल सवाई उडती भगव्या बाणाची ॥ आपण पोंचला शार बेंगरूळासी ॥ मिळवणी ॥ पैले दिवशीं दिलें एक झूज उडविला धूर पळून मग गेला पटणासी ॥ खुब मार दिला देवबी लावून हबसी ॥ १

इतक्याहि उपर जे जिवंत राहिले होते त्यांना जबरदस्तीने मुसलमानी धर्माची दीक्षा देण्यांत आली."

[दोस्तांची श्रीरंगपट्टणवरील मोहीम–पृष्ठांक ४५; ४६; ४७; ५० ले.–द. वि. आपटे.]

बारा हजार चेला जमला पंक्तिसी—"लिंगाइताचे चांगले बायका धरिले. तमाम सुंदर बायका बारा वाटा पळून गेले. बायका धरावयास कारण टिपूने पालक मुलगे बाळगले आहेत. त्यास स्त्रिया करून देणेस नेतात." अशा पालक चेल्यांच्या पांच सहा पलटणीच टिपूने बनविल्या होत्या. विशेषतः सुंदर बायका व दांडगे जवान पुरुष बाटवून टिपूने आपल्या जनानखान्याची व फौजेची भरती केली. हा प्रकार अत्यंत जाचक झाला."

[मराठी रियासत उत्तर विभाग २ पृष्ठांक २७८]

आपल्या विश्वासाचे निवडक एकांड्यासारखे जिवाला जीव देणारे जे खास शिपाई किंवा लढवय्ये लोक, सरदार किंवा राजे लोक पाळीत त्यांची बडदास्त फारच उत्तम ठेवण्यांत येई. राजाने पंक्तीला घेणें हा मोठाच मान शिपायांच्या दृष्टीने समजला जाई. 'जो संगतीला तो पंगतीला' ही मराठी म्हण त्याचीच द्योतक आहे. मोरोबा दादांच्या बंडाचे वेळीं शेवटीं मोरोबाने आपल्याबरोबर मरण्यास तयार असतील त्यांनीं भोजनास यावें असें सांगून भोजन दिल्याची हकिकत खरे यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत आलेली आहे. पाहिल्या शाहू महाराजांनीहि टिपूप्रमाणेच पदरीं 'चेले बारगीर' बाळगिले होते. मात्र हे चेले त्यांनी टिपूप्रमाणे जुलूम जबरदस्तीने बाटवून वगैरे केलें नव्हते. शाहू महाराज प्रथम लढाया घेत दक्षिणेंत आले तेव्हा 'त्यांना नऊ आसामी पोरें, देशमूख व पाटील यांची मार्गांत सांपडली. ती त्यांनी बरोबर धरून देशी आणली. पोरें लहान, त्यांचे इकडे कोणी नाही, तेव्हा त्यांनी त्यांचे 'चेले बारगीर' असें नांव ठेऊन त्यांचे पालन

घेतलें शार बेंगरूळ धरून किल्लेदार खबर पाठविली पटणाला ॥ टिपू म्हणे आज हैदर नाईक मेला ॥ सनयेस सनय भिडविली फिरंगी किल्ली

करून त्यांना तक्तापाशी कचेरीस कामगिरी सांगितली. ('भोसल्यांचे कुलाचार'–इतिहास संग्रह पृ. ७६, ७७) धासत—धास्ती. नांव कोण घेतो—नांव घेणें किंवा नांव काढणें म्हणजे खोडी किंवा कुरापत काढणें. भावार्थ-टिपूची खोडी काढण्याची कोणाचीही ताकद नव्हती. याच निमित्ताने टिपूच्या चेहेरेपट्टीचें वर्णन तत्कालीन पेशव्यांच्या एका कासीदाने केलें आहे तें असें "आदवानीस मोर्चे सोमवारीं एकादशीस लागले. पहिले दिवशीं बाहेरील पेठ लुटून शहरपन्ह्यास मोर्चे लागले. चार तोफा सुरू केल्या होत्या व वरील चार सुरू होत्या. खासा टिपू किल्याचे पश्चिमेकडील आंगे खासे निशाणसुद्धा मध्ये व डावे बाजूस सेदाची फौज व उजवे बाजूस पाईचे गाडदी वगैरे सरदार. मोर्चे एक बाजूनें पश्चिम व दक्षिण बसले आहेत. पूर्व-उत्तरेकडे घोड्याचे राऊत फौज पाचसात हजार उभी राहते कीं मराठी फौज तिकडून कुमकेस येईल; म्हणोन तोंडावर उभे राहतात. टिपू खासा फौजेंत आहे. मी आपले दृष्टीनें चाळीसपन्नास हाताचे तफावतीनें पाहिला. रंग गोरा मध्यम आहे. डेऱ्याहून मोर्चांत सोमवारीं आले. तेव्हां निळ्या घोड्यावर बसला होता. पागोटे चक्रीदार छिटी बैंदरी व आंगरखा पिवळा ताप्त्याचा व जुवा मोठ्या पटीचे मश्रूचा व पिवळी शालजोडी येणेंप्रमाणें पोषाख होता. मिशा मध्यम गालांवर कानाल्या केसांच्या येणेंप्रमाणें पाहिला."

"किल्ला कबजी उत्तर–दक्षिण पेठेस शहरपन्हा खंदका आहे. किल्ला पहाडी नहखाथ. पश्चिमदक्षिणेचे मध्ये. टिपूचे डेरे हिरवे जंगलाचे रंगाचे. डेऱ्यास बाड सराचे, नबाब निजामअल्ली याचे बाडासारखे आहेत. देवडीवर दोन डेरे व दोन तोफा आहेत. एक तोफ सायंकाळीं सुटते, मग गोटांत बंदोबस्ती होते. ढाल हिरव्या लाल व सफेत पट्टयाची. डेऱ्याचे खांबावर रुप्याचे कळस व ढालावर रुप्याचे कलस. सेंद्याची ढाल हिरवी व कळस रुप्याचे." [इतिहाससंग्रह–ऐतिहासिक टिपणें पान ५० व ५२.]

इभ्रत—दहशत. थोर इभ्रत तोफेची–टिपूनें कवायती पायदळ व तोफखाना फ्रेंच ऑफिसर्सकडून फारच जय्यत राखलेला असे. फलटान-

बोली किलबिली आतां उमजेना कवणाला ।। खुब मार दिला मुरयानें खंदक भरला ।। चाल ।। बसविलें आपलें ठाणे गेला चालून लावून दुर्बीन पाहिले

केले त्यासी–त्यांच्या फलटणी बनाविल्या. "कानडी, फिरंगी लोक आणि हबशी" असाहि एक पाठभेद "कानडे लोक फलटान केले त्यासी" याला शितूतानी दिला आहे. तथापि खरा मूळ पाठ " कानडी फिरंगी लोक आणि हबासि फलटान केले त्यासी" असा असावा अशी आमची समजूत आहे. टिपूच्या सैन्यांत कानडी, फिरंगी म्हणजे फ्रेंच व हबसी म्हणजे सिद्दी लोक चांगल्यापैकीं निवडक भरपूर होते. त्याने–टिपूने. दावा लावणें–वैर धरणें. भौवताचा–शेजारचा किंवा आपल्याभोवती ज्याचा मुलूख पसरला आहे असा. टिकल फार दिवशी—आपल्या मुलुखाला घेरा घालून बसलेला आपला वैरी जो टिपू त्याचा निर्वंश जर वेळींच केला नाहीं, तर तो दृढमूल होईल. म्हणून इंग्रजांनीं त्याला नाहींसा करण्याकारितां पेशव्यांस मदतीस आणिलें. परमुलूख— याचा बरोबर अर्थ लागत नाही. पेशव्यांना व मोंगलांना शत्रूच्या मुलुखांतले परगणे देण्याचें आमिष लावलें इत्यादि भावार्थ. झाडून ठाणीं बसविली पेशव्याची—मोहिमेस सुरुवात झाल्यानंतर परशुरामभाऊने प्रत्यक्ष श्रीरंगपट्टणास पोचेपर्यंत सात–आठ महिन्यांत जो टिपूचा मुलूख सोडविला त्यास उद्देशून. तीन दळ मिळाले गर्दी मुलकाची—तीन दळें म्हणजे इंग्रज, मराठे, व मोंगल यांच्या फौजा. मुलुखाची गर्दी म्हणजे मनस्वी मोठा जमाव. 'या मोहिमेंत इंग्रजी सैन्याजवळ ८६ तोफा होत्या. पैकीं ५८ पंचरशी व २८ लोखंडी होत्या. त्याचप्रमाणें घोडेस्वार ११००, तोफखान्यावरचे लोक ४२००, पायदळ १५॥ हजार व इतर इंजिनिअर व मजूर मिळून हजारबाराशें लोक होते. एकूण लढण्यासाठीं रणांगणावर निघालेल्या इंग्रजी सैनिकांची संख्या २२ हजार असून, त्यांत ६ हजार गोरे व १६ हजार काळे सैन्य होतें. मराठ्यांच्या सैन्यांत घोडेस्वारांचाच मुख्यतः भरणा होता. त्यांची संख्या अजमासें १२ हजार होती. निजामाच्या सैन्यांत १८ हजार घोडेस्वार असावेत असें इंग्रजी ग्रंथकार म्हणतात. एकूण दोस्तांचें प्रत्यक्ष लढाऊ सैन्य ५० पासून ६० हजारापर्यंत असावें; खेरीज पेंढारबिंढार निराळेंच." [दोस्तांची श्रीरंगपट्टणावर स्वारी पृष्ठांक २१२ ले.–द. वि. आपटे.]

मोती तळ्याला ॥ वर्मासी वर्म भेटला धाक पडला ॥ तो मेंढा फिरंगी झमईहून आला ॥ सुलतान बचेऱ्या जाऊन तुडविला ॥ सा हजार बार

लाल सवाइ उडति भगव्या बाणाची–सवाइ (F) सवाईची दोरी. The name of the rope (turned into two or four directions) which is fastened to the top of the tent-pole.—मोल्स. लाल हें सवाईचे विशेषण. बाणा–निशाण; उदा.—"सेवक सिताराम ज्याच्या दशनामी भगवा बाणा." मराठ्यांच्या भगव्या निशाणाची लाल दोरी वाऱ्यावर उडत होती. मोल्सवर्थनें दिलेल्या अर्थावरून पाहतां मराठ्यांच्या तळावरील डेरे-राहुट्यांवर उडणाऱ्या भगव्या झेंड्याला अनुलक्षूनच वरील चरणाचा अर्थ तर्कानें बसवावा लागतो. आपण—इंग्रज. शार—शहर. उडविला धूर—धूर उडविणें म्हणजे मार देंणें, पराभव करणें. पळून मग गेला—अर्थात् टिपू. देवडी किंवा देवडा मार–लागोपाठ उसंत न घेतां केलेली तोफांची किंवा बंदुकांची सरबत्ती. हबसी—टिपूजवळचें तोफखान्याचें हबश्यांचें पलटन होतें त्याकडून. धरून किल्लेदार—इतिहासदृष्ट्या चूक. बंगलोरचा किल्लेदार बहादूरखान लढत असतां ठार झाला होता. त्याच्या शौर्यावर खूष होऊन कॉर्नवालीसनेंही त्याचें प्रेत निराळें बाजूस काढवून टिपूस निरोप पाठविला कीं, तुमची इच्छा असेल तर प्रेत सन्मानानें पुरण्यासाठी तुमचेकडे पाठवून देऊं. पण टिपूनें उलट निरोप पाठविला कीं, 'शूर मनुष्य कर्तव्य बजावीत असतां ज्या ठिकाणीं देह ठेवतो, तीच जागा त्याच्या दफनास सर्वथैव योग्य.' यानंतर कॉर्नवालिसनें स्वतःच लष्करी थाटानें त्याचें दफन करविलें. टिपू म्हणे आज हैदर नाइक मेला—बहादूरखानाच्या मृत्यूची वार्ता ऐकून टिपूला आपला बापच (हैदरअली) मेल्याइतकें दुःख झालें. हैदरअली जरी अत्यंत नामांकित सत्ताधीश झालेला होता, तरी तो स्वतःस नाईक म्हणवून घेण्यांतच मोठें भूषण मानी. प्रथम तो सैन्यांत साधा नाईक होता. मराठ्यांकडील महादजी शिंदे हेही अखेरपर्यंत स्वतःस पाटीलबोवा म्हणवून घेत असत, हें प्रसिद्धच आहे. सनयेस सनय भिडविली—सैन्यास सैन्यें भिडविली किंवा सिना (फारशी)–छाती. तेव्हां छातीला छाती भिडविली असाही अर्थ होईल. फिरंगी किल्ली बोली किलबिली आता उमजेना कवणाला—

टिपूचा झडला ।। चार हजार फिरंगी गोरा तिथ मेला ।। त्या लालबागेचा धूर उडवून दिला ।। तोफा टाकून माघारा पळून गेला ।। होऊनी चाल दोन

या चरणाचा अर्थ नीट लागत नाही. फिरंगी किल्ली बोली म्हणजे फिरंग्यांशीं कांहीं तहाचें बोलणें लाविलें. किलबिली आतां उमजेना कवणाला—तें बोलणें किलबिलीसारखें अस्फुट म्हणजे गुप्त होतें. त्याचा उमज बाहेर कोणास पडला नाही. एकंदरींत अजमासानें या चरणाचा अर्थ बसवावयाचा तो असा—टिपूनें बेंगळूर गेल्यावर इंग्रजांशीं तहाचें सूत्र लावून पाहिलें, परंतु तें तसेंच जिरल्यावर त्यानें इंग्रजांशीं निकराचे दोन हात करण्याचे ठरविलें. मुर्दानें खंदक भरला—बंगलोरच्याभोंवतीं चांगला खंदक असून, आंत शिरण्याच्या वाटेवर निवडुंगाची लागवड केली होती. मोतीतळ्याला—हा मोतीतलाव म्हैसूरनजीक आहे. थोरल्या माधवराच्या कारकीर्दी-अखेर पेठे-पटवर्धनांनी जो हैदरअल्लीचा भयंकर पराभव केला त्यामुळें मोती तलाव अजरामर झाला आहे. वर्मासि वर्म भेटला—ठकाठकांची गांठ पडली किंवा तुल्य बलवानांचा सामना सुरू झाला. मेंढा फिरंगी—इंग्रजांचा जनरल मेडोज. हा अत्यंत शूर अनुभविक, परंतु दीर्घद्वेषी असा सेनापति होता. टिपूने याला इतर इंग्रजाप्रमाणें बरेच दिवस कैदेंत ठेवून त्याचा छळ केला होता व म्हणून टिपूवर स्वारी होईल तेव्हां त्याचा पुरा सूड घ्यावा, ही त्याची इच्छा. "अर्काटाकडे हैदरअल्ली इंग्रजांकडे गेले होते ते सालीं 'बेली व भंडोर धरून कैद केले. फार तसदी केली होती. भंडोर नांवें तोच मेड्स (तोच मेंढा) याचे मनांत की त्या समयींचा बदला टिपूस करावा हा आग्रह." मोहिमेच्या सुरुवातीस मेडोजकडे सेनापतिपद होतें, परंतु पुढें स्वतःच कॉर्नवालीसनें अधिपत्य स्वीकारल्यामुळें मेडोजचा नाइलाज झाला. बंगलोर वगैरे ठिकाणें घेतांना हा मेडोज शिडीवर आघाडीला असे. टिपूशीं बिलकुल तह करूं नये असें त्याचें म्हणणें होतें. पण गव्हर्नर-जनरलापुढें त्याला कोण विचारणार? शेवटीं तह पक्का ठरून टिपूचे मुलगे तहाचा खलिता घेऊन इंग्रजी सैन्यांत ओलीस दाखल होण्याचा समारंभ होत होता त्याच वेळीं त्यानें पिस्तूल पोटांत मारून घेतलें. पण त्यांतून कसाबसा वांचला. तो ६५ वर्षांचा असून, मुंबई-मद्रासची गव्हर्नरीही त्यानें केली होती. सुलतान—पुढील बुरूज हा शब्द गळाला असावा. सुलतान बुरूज नांवाचा एक बुरूज श्रीरंगपट्टणाजवळ होता, व तेथेंच खाशा टिपूचा डेरा होता. [द. वि. आपटे २१४.]

पारी खऱ्या दोपारी मध्याण रातरी गोरा फलटाण होऊन तयार लुटले शार गंजीपाला ॥ पटणांत वळखिना माय लेंकराला ॥ २

बचेऱ्या—बातेऱ्या. बातेरी हा शब्द बॅटरी शब्दाचा अपभ्रंश होय. कदाचित् टिपू सुलतानाने इंग्रजांच्या बातेऱ्या हल्ला करून मारल्या असाहि अर्थ बसेल. बार—टिपूच्या सैन्यांतील कवाईत शिकवलेल्या बंदुकी पलटणींतील शिपायांना बार अशी संज्ञा असे.

लालबाग—हैदरअल्लीची कबर जेथें आहे तो दर्यादौलत महाल म्हणजेच लालबाग होय.

" At the Eastern point of the island of the Shrirangapattan is situated a beautiful garden named Lalbag ornamented with several × × × and rendered sacred by......the Mausoleum of Hyder Ali. This Garden was taken possession of on the night of the sixth when the English troops crossed the river and it being found impossible to procure any other materials for making fascines or gabions Lord Cornwallis was under the necessity of permitting cypress and other beautiful trees to be cut down for that purpose. The palaces and cloisters were at the same time, converted into hospital for the weak and wounded. The Sultan's proud mind was much irritated at seeing this spot, to ornament which he had bestowed pains, thus led waste. The funeral of his father contaminated by those whom he considered as infidels, He vented his rage in a continual discharge of cannons from the fort, directed at the garden, and every other spot within the sight occupied by his enemies. " युद्ध संपल्यानंतर टिपूनें पुनः लाल-

फिरंगी मनसोबा निवळ, टिपूला खवळ, फिरंगी बळ, झाले भारी ॥ त्याने बुधले पुरले पलंगाशेजारीं ॥ मातेने घातले भरी ॥ वडलांची हाडें सोडून कुणाकडे एकदांच वांचवावी नगरी ॥ म्हालांत मेली खाशी अस्तुरी ॥ त्याची आईकतांच शुद्ध गेली सारी ॥ त्यानें पत्रें लिवली भोर्वात्या करीं ॥ पाठवून दिलीं तात्याच्या कचेरी ॥ वाचून पहातां माया आली उदरीं ॥ 'वडलानें तारलें होतें समय शिरीं ॥ आता तुम्ही वांचवा दौलत तुमची

बाग कशी शुद्ध करून घेतली तेंहि वाचण्यासारखें आहे. "The Garden called Lalbag which had proved so useful to allies during the siege and which had been injudiciously used as burying place for Europeans, was purified by digging up all the bodies and throwing them into the river, the Mausoleum of Hyder was thoroughly repaired and new painted and every possible measure taken to efface the vestiges of its late possessions. (Memoirs of Tipoo Sultan by Charles Stuart.)

गंजीपाला—शुद्ध पाठ 'लुटलें शहरगंजमाला', असा असला पाहिजे. "इंग्रज बंदुकांच्या सिलका मारीत करीघट्याचे टेकडीपर्यंत गेले. टेकडी घेतली. तेथून पुढें शहरगंजम लालबाग कावेरीच्या चिमट्यांत आहे. ती जागा कायम केली". [आपटे २२१,] "श्रीरंगपट्टण म्हैसुरापासून ९ मैलांवर कावेरी नदीचे कांठीं आहे. नदीच्या दोन शाखा होऊन निसर्गतःच तें बेट बनलें आहे. बेटाची पूर्व-पश्चिम लांबी सुमारें ३ मैल असून, रुंदी १ मैल आहे. या बेटाच्या पूर्वेस टिपूच्या वेळचे शहर होतें त्यास गंजम पेठ असें म्हणतात." ['इतिहास-संग्रह—ऐतिहासिक स्थळें' पृष्ठ १७].

पट्टणांत वळखीना मायलेकराला—पट्टणांत असा पळ सुटला की, त्या धांदलींत आयांना आपलीं लेकरें सम्भाळण्याचीहि शुद्ध राहिली नाही. **मनसोबा**—मनसुबा म्हणजे मसलत. **निवळ**—पक्का. **खवळ**—खवळवी. **त्याने**—इंग्रजानें. **बुदले**—तट

सारी ॥ देतों मोंगलाचा परगाणा काम लहरी ॥ लष्करांत महागाई पडली दो शेरी ॥ झाली चौकडून कुमका तारणारा हरी ॥ चाल ॥ गांवासी तीन तट किल्ला बळकट फिरंगी धीट भीत नाही आपल्या मरणासी ॥ राहुव्या नेहून भिडविल्या आरोब्यासी ॥ ३

उडाविण्यासाठी सुरुंगाच्या दारूचे बुदले. **पलंगाशेजारी**—वास्तविक पाठ 'अलंगाशेजारीं' असा पाहिजे. अलंग म्हणजे किल्ल्याचा तट. **मातेने**—टिपूच्या आईनें. **घातलें भरी**—भीड घातली. **वडिलांचीं हाडें इत्यादि**—या पाठापेक्षा शितूतांनी पादटीपांत जो दुसरा पाठ दिला आहे तोच अधिक बरा दिसतो. तो असा—"घातली भिड। नको जाऊं कोणीकड । वडिलांची हाड । अशामधिं वाचिव ही नगरी।" टिपूची आई त्याला म्हणाली, 'तुझ्या बापाची कबर या शहरांत आहे. म्हणून तूं श्रीरंगपट्टण शत्रूच्या ताब्यांत जाऊं देऊं नको, तह कर.' **महालांत मेली खाशी अस्तुरी**—पराभव झालेला; आईचा लकडा लागलेला; आणि तशांतच खाशी अस्तुरी म्हणजे पट्टराणी अकस्मात् मरण पावली. तेव्हां हताश होऊन टिपूनें कोणाकडून पत्र लिहवून हरिपंततात्यांकडे पत्रें पाठवून तहाची याचना केली. **वडिलांनी तारलें होतें इत्यादि**—टिपूनें हरिपंतांच्या पत्रांत असें लिहिलें होतें कीं, "तुम्ही वडिलांनीं मला पूर्वी संकटसमयीं वेळोवेळीं वांचविलें. आतां शिरीं तुम्ही आहां. मला वांचवा. ही सारी दौलत तुमचीच आहे. 'समय शिरीं' या शब्दांचा अर्थ 'माझ्यावर सध्या प्रसंग आहे', असाही करतां येईल. "इंग्रजांच्या मनांतून तह करावयाचा नव्हता. परंतु टिपूची दौलत गारद झाल्यास इंग्रज फार प्रबल होतील, याकरितां त्याचा समूळ उच्छेद होऊं द्यावयाचा नाही; ही मराठे व मोंगल यांची मसलत पूर्वीच ठरली असल्यामुळे हरिपंतांनी या प्रसंगीं नेट धरला कीं, टिपूकडून तहाचें बोलणें आलें आहे. हें तीनाहि सरकारांनी मान्य करावें. अशी त्यांची भीड पडली, तेव्हा लॉर्ड कॉर्नवालीस यांनी मोठ्या कष्टानें रुकार दिला."

[खरे ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ९ पृष्ठ ४४९७.]

देतो मोंगलांचा परगणा—मोंगल मागेल तो मुलूख त्याला देतो.

लागलें सल्याचें तोंड फिरंगी मोंड वेढा उठविना आपला ॥ पाहीन म्हणतो एकदा पटणाचा वाडा ॥ वर वाजवीन तंबूरा जरा धीर धरा बांधवीन घरें बाळगीन सवा लाख घोडा ॥ तो हरिपंत तयाचा मनसोबा गाढा ॥ हाय मुसलमान या उभी असू दे सुभी दावतो खुबी मुसलमान वेढा ॥ घरीं बसल्यानें पैशाचा करील झाडा ॥ चाल ॥ भ्रमाचा भोपळा नका तुम्ही फोडा ॥ मारला चंद्रपठाण बैजवाडा ॥ नऊ क्रोड रुपये खंडणी केली झाडा ॥ तुंगभद्रेकडे परगाणा दिला सारा ॥ दिला लेंक हातीं मारा कीं तारा ॥ चाल ॥ भाऊसाहेबासी आला राग खवळला वाघ काढला माग वलांडून गेला कावेरी ॥ परतून ढाला दिल्या त्यास लहरी ॥ ४

काम लहरी—? **कुमका**—? **आरोब्यासी**—तोफखान्याला किंवा तोफखान्यापर्यंत. **मोंड**—जनरल मेडोज. **तंबूरा**—टँबूरीन या इंग्लिश शब्दाचा अपभ्रंश. A kind of drum—नगारे. **या उभी असू दे सुभी**—याच्याकडे सुभी म्हणजे सुभेदारी राहूं दे म्हणजे त्याचा अर्थ सर्व मुलूख घेऊन त्यास निर्मूल करूं नये. **फोडा**—फोडू. **चंद्रपठाण बैजवाडा**—चंद्रपठाण हा चिनापट्टण या शब्दाचा शाहीरानें केलेला अपभ्रंश ! चिनापट्टण म्हणजे मद्रास. बैजवाडा म्हणजे बेझवाडा. टिपूनें मद्रासकरांचा संपूर्ण पराभव केलेला होता त्यास अनुलक्षून. **त्यास लहरी**—त्याच लहरी, त्याच क्षणाला. परशुरामभाऊ पटवर्धन याला टिपूशी लढण्याची खुमखुमी आली होती. परंतु तो पट्टणास पोंचतो न पोंचतो तोंच तिकडे तह ठरला होता. म्हणून त्याला लगेच परत फिरणें भाग पडलें. **परतून दिल्या ढाला**—ढाल म्हणजे निशाण म्हणजे निशाणें परत फिरविलीं. **टिपूच्या घरास वा रिझली**—'टिपूच्या घरा स्वारी झाली' असा मूळपाठ असावा. **वर मोंगलाचे घुमट**—शितूत यांनी याऐवजीं 'त्या हादऱ्याचा गौमुट खालता नीट' असा दुसरा पाठ दिला आहे तोच बरा वाटतो. हैदर याची कबर आहे. तेथून खाली पेठ म्हणजे शहरगंजम आहे व त्यापुढे लालबाग आहे. **रागीनें घेतलें घर**—रोगानें घेतलें घर असें पाहिजे. लष्करांत रोगराई सुरू झाली. **घोड्याला चालेना ओझें नवे जीण**—घोडीं उपासमारीनें व हालांनीं इतकीं अस्थिपंजर झालीं होतीं कीं, त्यांना बिलकूल ओझें उचलेना नुसत्या जिनाचेंही ओझें त्यांना होत होतें. **बय-**

पटण सारख्या शहरा निशाणा बरा टिपूच्या घरास वा रीझली ॥ उंच गांवांतून जागा गांवांतून होती नेमिली ॥ वर मोंगलाचे घुमट खाल जाय निट वसविली पेंठ दिली लालबाग लावून ॥ त्या करनाटकामधीं जागा पाहून ॥ सोन्याचा निघतो धूर नदीस आला पुर नाव हाय श्रीरंगपट्टण ॥ त्या मुलखामधि राव जनमतो सोन ॥ चाल ॥ झाले सला चालले लष्कर निघून रागीने घेतले घर जन म्हणती अशीं कैक मेलीं हगवण लागून । घोड्याला चालेना ओझें नवे जिण ॥ तसल्यांत गांठ घातली राव बयद्यान ॥ फत्तु नाम गैबीचें करतो स्मरण ॥ लाडू नेमज वस्तादाची दया पूर्ण ॥ राजू सुलतानाचें मंडवड ठिकाण ॥ असा छंद फंद केला पाहून ॥ ऐकून जळती दंडी दुसमान ॥ चाल ॥ आम्ही दालीबंद शिपाई वळखिली शाई त्या शहरांमधिं तुरेवाल्याची उपडली शेंडी ॥ ५

यान—बैदानी. हे बैद लोक म्हणजे टिपूचे छापा घालणारे गनिमी काव्यांत तरबेज असलेले घोडेस्वार त्यांना बैद अशी संज्ञा होती. "हरिपंततात्यांचें लष्कर परत येत असतांना महागाईमुळे व बैदांचा नित्य उपद्रव होत असल्यामुळें फार हैराण झालें. पण परशुरामभाऊंचें लष्कर परत फिरल्यामुळें तुंगभद्रेवर येई तेथपर्यंत त्याला ज्या विपत्ति भोगाव्या लागल्या त्यापुढें हरिपंतांच्या लष्कराची हलाखी कांहीच नव्हती. भाऊ देशीं येऊन पोंचतपर्यंत त्यांच्या लष्करांत एक रुपयास एक शेर याप्रमाणें धान्य विकलें जात होतें. वैरणीचा कडाड झाल्यामुळे शेंकडों गुरें व घोडीं दररोज मरत होतीं. बरोबरच्या अवजड तोफा ओढून नेणारे बैल गळाठले असल्यामुळें कधीं एक कोस कधीं अर्धा कोस फार झालें तर दोन कोस याप्रमाणें त्या लष्कराची मजल होत असे. टिपूशीं तह झाला होता तरी त्याचे बैद भाऊच्या लष्कराभोंवतीं रात्रंदिवस फिरतच होतें. टिपू व भाऊ यांचें वैमनस्य पूर्वी किती विकोपास गेलें होतें हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तह झाल्यामुळें भाऊंशीं उघड विरोध करतां येत नव्हता. म्हणून टिपूने त्यांच्या लष्करामागे हा बैदांचा ससेमिरा लावलेला होता. ते लोक हात फावेल तेव्हा प्रत्यहीं लष्करांत बेलाशक शिरून लुटालूट करीत असत. [खरे पान ४४९९.] 'मराठी'त गोंधळ किंवा दंगा उडविणें या अर्थी 'बैदा करणें' हा वाक्प्रचार रूढ आहेच.

नागपूरकर चिमणाबापू भोसल्याचा पोवाडा

ऐतिहासिक माहिती

पुढील पोवाड्यांत १७८० सालीं नागपूरकर भोसले यांनीं कटक ओरिसावर जी स्वारी नेली त्याचें वर्णन आहे.

सन १७८० च्या प्रारंभीं हैदर अल्लीनें पुणें दरबाराशीं तह केला. हा तह होतांच अनेक वर्षें महाराष्ट्र व म्हैसूर येथील सरकारांत जो युद्धप्रसंग सुरू होता तो बंद पडून एकोपा झाला. त्या एकोप्याच्या पायावरच एक प्रचंड कारस्थान नाना फडणविसाने रचून इंग्रजांना सगळी कडून एकाच वेळीं शह देऊन त्यांना उखडून टाकण्याचा घाट घातला. मसलत अशी ठरली होती कीं, पेशव्यांनीं मुंबई, गुजराथ व अंतर्वेद येथील इंग्रजांस पादाक्रांत करावें; निजामअल्लीनें सिकाकोल-राजमहिंद्रीकडे जाऊन तो प्रदेश ताब्यांत घ्यावा; हैदराने मद्रासेवर स्वारी करून इंग्रजांचें तिकडील राज्य घ्यावें आणि नागपूरकर भोसल्यांनी बंगाल्यावर स्वारी करून इंग्रजांस तंबी द्यावी. हा व्यूह फारच उत्तम होता. परंतु नागपूरकर भोसल्यांनी पहिल्यापासून फितुरी सुरू केल्यामुळें तो सिद्धीस गेला नाहीं. असा असा बनाव होत आहे हें भोसल्यांनीच इंग्रजांस आंतून कळवलें! त्यांना उघड उघड स्वारीवर जात नाहीं म्हणण्याची छाती नव्हती, म्हणून मुधोजी भोसल्यानें खंडोजी ऊर्फ चिमणाबापू भोसले याच्याबरोबर चाळीस हजार फौज देऊन त्याला स्वारीस रवाना केल्याचें सोंग केलें. परंतु स्वारीस निघतांनाच त्यानें चिमणाबापूस आंतून स्पष्ट सांगी दिली होती कीं, कोणीकडून तरी वेळ काढावा, बंगाल्यांत शिरूं नये व इंग्रजांशीं कलागत करूं नये. खुद्द वॉरन हेस्टिंग्ज़्च्या पत्रव्यवहारावरूनही ही गोष्ट सिद्ध झाली आहे.

११ ऑगस्ट १७७९ रोजीं चिमणाबापू नागपुराहुन चाळीस हजार फौज घेऊन निघाला. प्रथम त्यानें बिहार प्रांतांत शिरावें व तिकडून बंगाल्यांत जावें, असें सर्वानुमतें ठरलें होतें व तोच रस्ता सोयीचाही होता. तसें केलें असतें, तर अवघे दोन महिने बंगाल्यांत शिरण्यास लागले असते. परंतु चिमणाजीनें मुद्दाम रस्ता बदलला व तो प्रथम कटक प्रांताकडे गेला. रस्त्यानेंही मुक्काम लांबवीत १७८० च्या मे महिन्यांत म्हणजे आठ-नऊ महिन्यांनी

तो कटक प्रांतांत येऊन पोंचला. बरें, तेथून तरी बंगालकडे जावें तें न करतां अवांतर ठाणीं सोडवीत पावसाळा जवळ येण्याची तो वाट पाहत बसला; आणि पुढें पाऊस सुरू झाल्यावर उघडपणेंच आता स्वारी-शिकारी होणार नाहीं असें सांगूं लागला.

त्याच्या सैन्याचा सरंजामही अगदीं वाईट होता. शिपायांचे पगार तुंबले होते. सारांश, त्या लष्कराच्यानें इंग्रजांचें फारसें वांकडें होण्याचा संभव नव्हताच. इंग्रजांना, आंतून भोसल्यांनी फितुरी केलेली असली, तरीहि कांही भीति वाटतच होती. म्हणून त्यांनी ५० लक्ष रुपये लांच देऊन भोसल्यांना परतावलें! इंग्रजांना मद्रासेकडे सैन्य पाठविण्याची जरूर होती. पण ते सैन्य जाण्याचा रस्ता कटक प्रांतांतूनच असल्यामुळें व तेथेंच चिमणाजी येऊन बसल्यामुळे इंग्रजांना अडचण होती ती अशा रीतीनें दूर झाली.

या भोसल्यांच्या स्वारीविषयीं व त्यांच्या फितुरीमुळे झालेल्या राष्ट्राच्या घाताविषयीं भरपूर माहिती कै. यादवराव काळे यांच्या नागपूर प्रांताच्या इतिहासांत आणि सरदेसायांच्या मराठी रियासत उत्तर-विभाग खंड १ या पुस्तकांत सविस्तर आलेली आहे.

केवळ पोवाड्यावरून स्वारीचा आराखडा निघतो तो असा. भोसले नागपुराहून निघाल्यावर त्यांच्या सैन्यास जंगली प्रदेशांत अत्यंत त्रास झाला; व अनेक लोक हिंवताप लागून मेले. पुढें सैन्य सोमलवाड्याच्या किल्ल्यावर चालून गेलें. त्यानंतर पुनः परत फिरून वऱ्हाडांत आलें. कवड्याच्या तळ्यावर मुक्काम केला व कांही दिवसांनीं तें बंगालच्या रोखानें निघालें. चौकेबारी, नकटेबारी ओलांडून गेलें. मग कटकावर गेलें. तेथें बाराभाटी नांवाचा किल्ला होता. त्या किल्ल्यावर हल्ला केला. शेवटीं किल्ला जिंकून म्हणजे किल्लेदाराकडून खंडणी घेऊन त्यांचे सैन्य ढाक्या नाल्याच्या किल्ल्यावर गेलें. तेथेंही खूप लढाई झाली. अखेर किल्लेदार पळून गेला व किल्ला ताब्यांत आला. पुढें एक महिनाभर श्रावणमास जगन्नाथ पुरीजवळ काढला, मग तेथेंच बालेसरावर इंग्रज भेटीस आले, तह झाला व नागपूरकर भोसले परतले.

नागपूरकर चिमणाबापू भोसल्याचा पोवाडा

६

(शाहीर सुलतान)

शिपाई चाकरी गेले नागपुराला। तेली वाणी उदमी दाली बांधूं लागला ॥ ध्रुपद ॥

राजांनीं मनसुबा केला बंगाल्यावर। पाहिले मोहतुर दिले खासे डेर। बोलावुन मानकरी कचेरी भर। झाली चिमणाबापूची ताकिद जलदी फार ॥ राव माने मानकरी घाटगे पाटणकर। यादव निंबाळकर ज्यातक जाधव ढमढेर। ननवरे पठाण सार। झाली हुजुरात तयार। अगड धों धों बाजे चवघडा बाहेर निघाला। राव बांड निशाण हाय उजव्या बाजुला ॥ शिपाई० ॥ १

वनीं येळवाच्या जाळ्या वन दारुण। कइकांनी आबधाकें दिले प्राण सोडुन। कइकांसीं आलें हिवजाळ धास्तिन। गेली फौज सोमल

दाली बांधणें—दाली म्हणजे कमरबंद किंवा कमरपट्टा. ज्याला तलवार लटकवितात तो. दाली बांधणें म्हणजे चढाईस किंवा लढाईस सिद्ध होणें. **मनसुबा**—मसलत. **राजांनीं**—नागपूरकर राजे भोसल्यांनी. **मोहतुर**—मुहूर्त **ज्यातक**—जाचक असें पाहिजे. या आडनांवाचे मराठे सरदार भोसल्यांच्या पदरीं होते (पहा, नागपूर प्रांताचा इतिहास पान ५७१). ओरिसांतील बाराभाटीचा जो कटक जवळील प्रसिद्ध किल्ला भोसल्यांच्या ताब्यांत होता त्यावर दारकोजी जाचक हा सन १७७६ त किल्लेदार होता. **ननवरे**—रणनवरे (?) **बांड निशाण**—बांडा म्हणजे भूमिका एका रंगाची व वरचे पट्टे अन्य रंगाचे असा कपडा (आपटे) काळ्या पांढऱ्या अगर तांबडया व अन्य रंगाचा कपडा (मोल्स) यावरून भोसल्यांचे निशाण कसें होतें तें कळतें. प्रत्येक सरदाराचें निरनिराळ्या तऱ्हेचें निशाण असे. उदाहरणार्थ, बापू गोखल्याचें निशाणावर मारुतीचें चित्र काढलेलें असें; शिंद्यांच्या झेंडयावर नागाचें निशाण असे. **येळवाच्या**—वेळूच्या. **आबधाक**—भीति. **हिंवजाळ**—हिंव म्हणजे थंडी. जाळ म्हणजे ताप. म्हणजे हिंवताप वगैरे. **सोडिलीं निशाणें**—कामाखेरीज इतर वेळीं

वाड्यावर चालुन ॥ मग सोडलीं निशाणें। हल्ला उठला चहुंकडून। मग सुटती तोफा बाण। झाली लष्करांत सडघाण। भेसूर दिसे रण। जरीपटका गेला चालुन। राव मान्याची लगी हाय उजव्या बाजुला। गेले मारीत खंदकापाशीं मोरच्या दिला ॥ शिपाई० ॥ २

तेली वाणी उदमी नाइक पडले भरी। कर्जाची घेतली घोडी आले चाकरी। गेले वऱ्हाडा़त फिरून माहुरावरी। दरकूच आले कवडूच्या तळ्यावरी ॥ मनसुबी थोपली सारी। बोलावून मानकरी। सांगितले बरवेपरी। आली बंगाल्याची चाकरी। ओलांडून गेले बारी। गेले चवकेबारीवरी। अशी फौज मिळून गेले नकटेबारिला। एक म्हणती उगाच आलों पस्तावा झाला ॥ शिपाई० ॥ ३

गेले लष्कर झाडीमधीं पडेल जाऊन। मधिं पडली फट बुणगे

निशाणाचा कपडा निशाणाच्या खांबा भोंवतीं गुंडाळून ठेवीत असत. येथे भावार्थ सैन्य हल्यास सज्ज झालें. **बाण**—दारूचे बाण. हे सध्या दिवाळींत मुले सोडतात त्यासारखेच; परंतु अत्यंत मोठे असत. जवळ जवळ आठदहा फूट लांबीच्या बांबूला दीड दोन फूट लांबीचें दारू भरलेलें नळकांडें जोडलेलें असे. हे बाण शत्रू सैन्याची फार नुकसानी करीत. त्यांचा नेम जरी तोफेसारखा अचूक नसे तरी शत्रूच्या तळांत आगी लावण्यास व माराने माणसें मारण्यास ते फार उपयोगी असत. असल्या बाणांनी लढण्यांत नागपूरकर भोसल्यांची ख्याती होती. **सडघाण**—चुथडा. **भेसूर**—भयासूर, भयंकर, बीभत्स. **रण**—रणमैदान. **लगी**—झेंडा, निशाण. लक्षणेने मान्यांचें पथक. **नाइक**—न आइक. आइक म्ह. आइके म्हणजे ऐकलें नाही. **कर्जाची घेतली घोडी आले चाकरी**—कर्ज काढून घोडीपाडी विकत घेऊन सैन्यांत चाकरीला दाखल झाले होते. **फिरून**—परतुन. **मनसुबी थोपली सारी**—मनसुबी म्हणजे मनसुबा, मसलत. थोपली म्हणजे थांबली. **बरवेपरी**—बरवेपणाने, समजूत पडेल अशा तऱ्हेने, आर्जवून. **चवकेबारी**—बाडी असे असावे. नागपूरकर भोसले बखर पान १६८ वर चौकीगड व बाडी अशीं दोन स्थलवाचक नांवें आलीं आहेत. बहुधा तींच हीं असावींत. **फट**—अंतर **बुनगे**—

गेले चुकून । तीन रोज लष्कर गेलें गडबडून । धाडून सांडणी मिळाली फौज येऊन ॥ तेल्या वाण्या उदम्यान । घोडें आणलें अर्धलिन । गेलें एकाएकी मरून । दिलें जिन-खोगीर टाकून । काय जावें देशाकारण । कधीं तोंड दाविना म्हण । गेलें लष्कर कटकावर जागा पाहीला । तेथें जंबुमाळ्याचा लालबाग देखिला ॥ शिपाई० ॥ ४

सैन्याच्या सामग्रीचा तळ; सैन्यांतले उदमी वगैरे बिनलढाऊ लोक. धाडून सांडणी—सांडणीस्वार चौकशीला धाडून. दाविना—दावीन ना म्हणजे दाखविणार नाहीं. म्हण—म्हणें. ज्याचें घोडें मेलें तो शिलेदार म्हणूं लागला कीं, घोडें अर्धेलीने आणले होते तें घोडे मरून गेलें. आतां हें जीन खोगीर तरी कशासाठीं बरोबर बाळगावयाचें? आतां देशाला परत गेल्यावर सावकाराला काय सांगावे?

अर्धेलीच घोड इ.—"भोसल्यांची फौज बंगाल्याचे हद्देस गेली. तिकडे छावणी झाली. हवा वाईट सबब छावणींत तमाम घोडी मेली. लोकांत बळ राहिला नाही." हिंगणे यांचें नाना फडणिसास पत्र ता. १५।८।१७८१ चे. इतिहास संग्रह "दिल्ली येथील मराठ्यांची राजकारणें" लेखांक ५४ पृष्ठ ५२.

जंबुमाळ्याचा लालबाग—ही कांही तरी अडाणी शाहीराच्या अशुद्ध उच्चारामुळें निर्माण झालेली चूक असावी. 'जांभूळ मळ्याचा' लालबाग असें तर नसेल? (२) लंकेंत मारुतीने जंबूमाळ्याच्या बाग उद्ध्वस्त केल्याची कथा आहे. प्रस्तुत लालबागेंत किंवा जंगलांत वानरांचा अतिशय उपद्रव असावा आणि म्हणून त्या बागेला किंवा जंगलाला जंबूमाळ्याचें नांव पडलेलें असावें. (३) लाला सेवकराम याने आपल्या ३ जुलै १७८१ रोजीं पुण्यास लिहिलेल्या बातमीपत्रांत चिमणाजी भोसले नीलगिरी डोंगरांतून कूच करून पुढे आले असें म्हटलें आहे. नील किंवा नीळ ही एक वानराची जात आहे. ज्या गिरीवर म्हणजे डोंगरावर त्यांची फार वस्ती तो नीळगिरी. सारांश, जंबूमाळ्याचा लालबाग म्हणजे नीळगिरीचा डोंगर असें तर नसेल? लालबाग हें कटजूरी (Katjuri) नदीच्या कांठीं असून ती मराठा सुभेदारांची राहावयाची जागा होती असें कटक

एक आंबराइमधिं उतरलें लष्कर। किल्ल्याहून गोळ्यांचा मार निघेना धीर। शिंपी साळी पिंजारी पळती भिऊन माघार। तेली वाणी उदमी होती पाठमोर॥ एकजात शिपाई रणशूर। मारिवले खंदकावर। दाहा रोज सोसला मार। शिपायाचे ढालबखतर। गोळ्या फोडुन होती पार। गडबडले सोमलपुर। गडबडला किल्लेदार कवलासी आला। दिली खंडणी राजाला। तिथून शह उठविला॥ शिपाई०॥ ५

एक उडव्या मुलखामधिं गेलें लष्कर। सहा महिने छावणी झाली कटकावर। तिथें बाराभाटिचा किल्ला ऐका थोर। त्या खंदकामधिं सुसरी महाकुंजर॥ नादान मुलुख फार। नाही पैसा तांब्याची तार। कवड्यांची

गॅझेटिअरमध्ये लिहिलें आहे. **मारविले खंदकावर**—इरेस पाडून खंदकापाशी झालेल्या चकमकींत मारविले. अनेक शूर शिपाई तेथें कामास आले हा भावार्थ. **बखतर**—चिलखत. **सोमलपूर**—संबळपूर असावे. **उडव्या मुलूख**—ओरिसा. **बाराभाटीच्या किल्ला**—कटक हा प्रांत बंगालच्या दक्षिण भागास समुद्र किनाऱ्यावर असून, त्यांत कटक हें मुख्य शहर आहे. कटक शहराजवळ बाराभाटीचा मजबूत किल्ला होता. तसेंच बलसोर ऊर्फ बालेश्वर म्हणून महत्त्वाचें बंदर या प्रांतांत होतें. (नागपूर प्रांताचा इतिहास पृ. २१८) "The citadel of cuttak known as fort barabhati is situated on the south Bank of Katjuri river opposite the city. (Imperial gazetteer of india vol. 4 Page 75)

महाकुंजर—मोठ्या हत्तीएवढाल्या. **नादान**—गरीब, कंगाल. **नाही पैसा, तांब्याची तार कवड्यांची चाल फार**—मुलुख इतका गरीब कीं, सोन्याचांदीची नाणीं सोडाच पण ताब्याचींहि नाणीं दृष्टीस पडावयाचीं नाहीत. सर्व व्यवहार कवड्यांवरच चाले. सन १७९० सालीं कॉर्नवालीस यानें फार्स्टर व लेकी या दोघा इंग्रजांना वकील म्हणून नागपुरास पाठविले होते. त्यांपैकीं लेकीने लिहिलेल्या प्रवासवर्णनांतहि या गोष्टीचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. तो लिहितो, "कटक प्रांतांत सोनें व चांदीचा व्यवहार फार कमी असून सर्व देवघेव कवड्यांनीं होते.'

चाल फार । खायाशी भात-खापर । नेस लंगोटी वर धोतर । अंगीं कळकट बोतर । झाल्या खुशाल रांडा पाहुन भल्या लोकाला । अवघ्या लष्करामधि उडव्या मुलुख उठला ॥ शिपाई० ॥ ६

गेली फौज चालून ढाक्या नाल्यावर । तिथें सोडलीं निशाणें झाले तयार । झाली पहिली हल्ला लोक पडले फार । आली हल्ला फिरून माघारी जयजयकार ॥ भले मर्द शिपाई रणशूर । धावले खंदकावर । लोक जखमी झाले फार । कईकाचीं बुडालीं घर । रणकंदन अनिवार । लढण्याची हौस फार । गडबडला किल्लेदार लागले झाडी तोडायाला । देइना खंडणी तसाच पळून गेला ॥ शिपाई० ॥ ७

पुरीवर लष्कर गेलें महिनाभर । एक श्रावणमास महिनापवितर ।

कळकट—घामट, मळकट. **खायाशी भात खापर**—येऊन-जाऊन भातः तेवढा खायला मिळे; पण तोहि तिकडच्या पद्धतीप्रमाणें खापरावर !

बोतर—असा शब्द कोशांत सांपडत नाही. बोथरी, बोथारा असा शब्द सापडतो; पण येथे तो शब्द लागू पडत नाही. कारण त्याचा अर्थ तोंडावरचा पडदा, बुरखा' असा आहे. बोंदर असा शब्द आपटे देतात तो जुळतो .बोंदर (न.)-जीर्ण वस्त्र हाच शब्द बरोबर दिसतो. **भल्या लोकांना**—पेशवाईत शिलेदार लोकांनाच हा शब्द लावीत. **ढाक्या नाल्यावर**—" ढेकानाल नांवाचा डोंगरी किल्ला होता व त्याच्या आसपास जंगल होतें. हें ठिकाण कटकच्या रस्त्याच्या पश्चिमेस बऱ्याच अंतरावर डोंगरांत आहे. कटक प्रांतांतून जाणारा रस्ता व हें ठिकाण यांमध्यें सतरा कोस दाट अरण्य आहे व तें बंडखोर राजांनीं इतकें व्यापिलेलें आहे कीं, मराठी लष्कराकडे सामुग्री घेऊन जाणारे कांही स्वार तिकडे गेले त्यांना मधूनच परत यावे लागले. [नागपूर प्रांताचा इतिहास पृ. २६२] **आली हल्ला फिरून माघारी जयजयकार**—आंतून किल्लेदाराने हल्ला करून भोसल्यांचा मोहरा माघारी फिरविला तेव्हां अतित्वेषानें हरहर महादेव असा जयजयकार करीत मराठे पुन्हां खंदकावर घांवले. **कैकांची बुडालीं घरें**—कित्येक कुटुंबांतले एकूण एक कर्ते पुरुष या हल्ल्यांत मारले गेले असा भावार्थ **पुरी**—जगन्नाथ पुरी.—पुरीगांव सागरतीरापासून दोन मैलांवर आहे. येथे श्रीजगन्नाथजी (कृष्णा)चें देवालय मुख्य असून ह्याचे आजूबाजूस पुष्कळ

तिथें जगन्नाथ एक देव तीर्थ थोर। त्याचें दर्शन घेतां पापें होतीं दूर॥ देवाचें शिवालय थोर। लागेना अंत ना पार। राम लक्षुमण अवतार। रिद्धी-सिद्धींचें घर। एक मडकें विस्तवावर। दहा मडकें होतीं तयार। वार्णी कुणबी ब्राह्मण बसले जेवायला। एके जागीं जेविती, अवघा गोपाळकाला॥ शिपाई०॥ ८

देवतांचीं लहान मोठीं मंदिरें आहेत. श्रीचे मंदिराचा परिघ ६५२ फूट लांब आणि ६३० फूट रुंद असून भोंवताली २० फूट उंचीचा तट आहे. फार प्राचीन काळापासून हें देवालय पूज्य आहे. येथील नाथाच्या प्रसादास (भातास) सोंवळ्याचा मुळींच प्रतिबंध नाही. सर्व लोक तो एकाच ठिकाणीं सेवन करतात. आनंद बाजारांतहि तो विकत मिळतो. जगन्नाथाच्या मुख्य रथोत्सवाची यात्रा दरवर्षीं वैशाख मासीं भरते. त्या वेळीं सुमारें तीस लाखापर्यंत जमाव जमतो. रथोत्सवाच्या पूर्वी पंधरा दिवस देवाची स्नानयात्रा असते. हें दोन्हीहि समारंभ सुमारें महिनाभर चालतात व पाहण्यासारखे असतात. [सचित्र भारत प्रवास वर्णन पृ. ५६]

पवितर—पवतर, पर्यंत. कदाचित 'पवित्र' याचाहि पवितर हा अडाणी अपभ्रंश होऊं शकेल. पवित्र हें श्रावणाचें विशेषण. तीर्थ—तीर्थ क्षेत्र. पुरीजवळ भुवनेश्वर येथें प्रसिद्ध शिवालय आहे. तसेच कोनार्क नांवाचें सूर्याचें प्रसिद्ध देवालय आहे. हें प्रसिद्ध क्षेत्राचें गांव ओरिसा प्रांतांतील पुरी जिल्ह्यांत बी. एन्. रेल्वेच्या ईस्ट कोस्ट सेक्शनवर पुरीपासून उत्तरेस ३२ मैलांवर आहे. येथील बिंदु सरोवराच्या पश्चिमेस कांही अंतरावर अष्टमातृकांपैकीं कपालेश्वरी देवीचें भव्य असें दगडी देवालय आहे. ह्या देवळाचा आकार थेट जहाजाच्या आकाराप्रमाणें मोठा असून बांधणी वरील देवळाप्रमाणेंच शिल्पपद्धतीची आहे. भुवनेश्वरास मुख्य क्षेत्रदैवत लिंगराज महादेव असून त्या भव्य देवालयाभोंवताली आणखीहि बरींच देवळें आहेत. त्याचप्रमाणे मुक्तेश्वराचें स्थान आणि देवालयहि पहाण्यायोग्य आहे. लिंगराज महादेवाचे उत्सवा-प्रीत्यर्थ दरसालीं महाशिवरात्रीस या गांवी मोठी यात्रा भरते. इतर प्रांतां-तील लोक श्रीजगन्नाथाची यात्रा करून परत जातांना ह्या क्षेत्रीं जाऊन तेथील यात्राविधी करितात. (सचित्र भारत प्रवास वर्णन पृ. १२०)

एक बालेसरावर उतरले लष्कर। तेथे उत्तार पेठ आहे दरयाचे किनार। गजकर्ण दुःख रोग उठले अंगावर। चारी प्रहर वर्षतो काहार निघेना धिर॥ आला पाऊस सुटला वार। गारांनी बसविला मार। गेले उडून राव्हट्या डेर। उंट तट मेलीं फार। देवाची करणी फिरंगी आला। राजाची फत्ते तलवार यश पावला॥ शिपाई०॥ ९

भगवंत दिलें वरदान आले फिरून। एक बंगाल्याची चाकरी झाली कठीण। जो दानपुण्य करील तोचि निधान। रणशूरा दानशूराला देव प्रसन्न॥ कर दया धर्मनिधान। देव काढील विघ्नांतुन। कवि सुलतान म्हण त्याच वेळापूर ठिकाण। भानु हयबती सांगेल खुण। बाळा अवध्यामधी अज्ञान। नागपुरी पवाडा केला बसुन गायाला। चार साहेबजादे बसले ऐकायाला॥ शिपाई०॥ १०

बालेसर—बालासोर. दरयाचे किनार—दर्याच्या किनाऱ्याला. वर्षतो कहार—१ कहर—भयंकर प्रसंग, आपत्ती, २ काहूर—मेघ समुदाय. भयंकर पाऊस पडतो. फिरंगी—इंग्रज. राजाची—चिमणाराजाची. “चिमणाबापू हा निवळ लढाऊ वीर आहे. तो फार धीट व शूर आहे. मुधोजीचा भाऊ बिंबाजी यास पुत्र नसल्यामुळे त्याने चिमणाबापूसच आपला पुत्र म्हणून मानिलें होतें व आपलें ठाणें जें रतनपूर तेथील कारभार आपले मागे चिमणाबापूनेच करावा असें बिंबाजीने ठरविलें होतें. बिंबाजी मेल्यावर त्याचे बायकोनेहि हीच तजवीज मान्य केली. मुधोजीची या गोष्टीस हरकत नाही. परंतु रघुजीरावास धाक वाटतो कीं, चिमणाबापू रतनपूरचें राज्य बळकावून बसेल व तो शूर असल्यामुळे प्रबळ होऊन आपल्या राज्यासहि त्यापासून धोका होईल. म्हणून तो मुधोजीस ही गोष्ट मान्य करू देत नाही.” (नागपूर प्रांताचा इतिहास पृ. २८५) “ता. १६-८-१७८९ रोजीं नागपुरास खंडोजी ऊर्फ चिमणाबापू हा एकाएकीं निवर्तला. त्यास पुत्रसंतती नव्हती. चिमणाबापू हा शरीराने धिप्पाड असून त्या वेळीं त्याच्याइतका सशक्त मनुष्य क्वचितच असेल. तो अत्यंत शूर व धाडसी होता. चिमणाबापू हा सशक्त व ऐनपंचविशीच्या वयांत असल्यामुळे व आजारी नसतांना एकदम मरण पावल्यामुळे रघूजीने त्यास जादूने मारिलें असा लोकप्रवाद त्या वेळीं उठला होता.” (नागपूर प्रांताचा इतिहास पृ. २१५.) साहेबजादा—उमराव.

नाना फडणविसांचा पोवाडा

हा पोवाडा रा. शं. ना. जोशी यांनी भा. इ. सं. मंडळाच्या तेविसाव्या वर्षाच्या चौथ्या अंकांत छापला आहे. तेथे ते लिहितात "हा पोवाडा ज्या वहींत आहे ती वही पुणें येथील एका शाईवाल्याजवळ सांपडली. पोवाडा अपुरा आहे. लिहिणारा अडाणी मराठा असावा असें लिखाणावरून वाटतें."

ऐतिहासिक माहिती

सवाई माधवराव वारल्यावर नाइलाजानें नानांनीं बाजीरावास गादीवर बसविण्याचें ठरविलें, व परशुरामभाऊस जुन्नरास पाठवून त्यास पुण्यास आणविलें. खडकीच्या मुक्कामीं नाना बाजीरावास भेटले.

नानांनीं बाजीरावास वश करून पेशवाईवर बसविण्यांत यश मिळविलें हें शिंद्याला आवडलें नाही. शिंद्यांच्या मनांत स्वतः बाजीरावाची स्थापना करून राज्यकारभार स्वतःच्या हाती दाबावयाचा होता. व शिंदे हे सर्वांत बलिष्ठ फौजबंद सरदार म्हणून ते त्यास शक्यहि होतें. पण मध्यंतरी शिंद्यांच्या घरांत कांही आकस्मिक गृहकलह उभा राहिला त्यामुळें त्यांना नानांच्या आधी बाजीराव हाताखाली घालतां आला नाही.

नानांनी मात केल्यामुळें शिंदा रागावला व त्यानें नानांवर कुरघोडी करण्याचें ठरविलें. जुन्नरास असतांच बाजीरावानें शिंद्यांशीं गुप्त करार केला होता कीं, मला गादीवर बसविलेंत तर तुम्हांस सव्वा कोटी रुपये रोख व पंचवीस लाखांची जहागीर देईन ! तो बाजीरावानें केलेला करार आता नानांनीं पुरा करून द्यावा असें त्यानें मागणें सुरू केलें व आपल्या फौजेच्या बळावर तो नानांना कारभारांतून काढून काशीस पाठविण्याच्या वल्गना करूं लागला. यामुळें नानांना साहजिकच भय उत्पन्न झालें व ते कारभारांत फारसें लक्ष न घालतां सावधपणें राहूं लागले, व दगा दिसतांच २१ मार्च १७९६ रोजीं ते अचानक पुणें सोडून पळून गेले.

दरम्यान परशुरामभाऊंना बाजीरावाचा हलकट व घातकी स्वभाव पुरा कळून चुकला. शिंद्याचा दिवाण बाळोबा तात्या पागनीस यालाहि बाजीराव आवडत नव्हताच. तेव्हा त्या दोघांनीं असें ठरविलें कीं, बाजीरावास कैद करावे, व त्याचा धाकटा भाऊ चिमाजी अप्पा याला

पेशवाई द्यावी आणि त्याचा कारभार नानाफडणिसासारखा परशुराम भाऊने करावा व शिंद्यानें त्याचें साहाय्य करावें.

याप्रमाणे मसलत ठरून त्यांनी थेऊरच्या तळावर एक दिवस बाजीरावास कैद केलें व चिमाजी अप्पास जबरदस्तीनें पुण्यास नेऊन सवाई माधवरावाची बायको यशोदाबाई हिच्या मांडीवर त्यास दत्तक दिलें! वास्तविक यशोदाबाई ही चिमाजी अप्पाची सून लागत होती; परंतु जबरदस्तीने त्यांनीं तिला सासऱ्यास दत्तक घ्यावयास लाविलें!!

मग नानांना पकडण्याकरिता फौजा पाठविल्या व राज्यांत नानाचे पक्षपाती मोठे मोठे लोक होते त्या सर्वांस पकडून कैद केलें. पण पुढे नाना महाडास जाऊन बंदोबस्ताने राहिले होते, त्यांनी तेथून गुप्तपणें इंग्रज, निजाम व खुद्द बाजीराव व दौलतराव शिंदे यांच्याशींहि सूत्र जोडून अखेर बाळोबा पागनीस व परशुरामभाऊ यांनाच कैद करून सर्व फितूर मोडून काढला, व पुन्हा बाजीरावास गादीवर बसविण्यांत यश मिळविलें. केवळ एकाकी असतां व कोठलाहि आधार राहिला नसतां नानांनी आपल्या बुद्धीबळावर जें प्रचंड कारस्थान रचिलें व सिद्धीस नेलें तें महाडचें कारस्थान म्हणून इतिहासांत सुप्रसिद्ध आहे.

या कारस्थानांत नानांच्या बुद्धिसामर्थ्याची जी चमक दिसली त्याचे वर्णन पुढील पोवाड्यात तुलनात्मक रीतीने सुंदर केलेलें आहे. अगदी तसेंच वर्णन प्रभाकर शाहीराने दुसऱ्या बाजीरावावरील "यशस्वी झाले श्रीमंत पहिले सर्व लढायाला" या पोवाड्यांतहि केलें आहे. तो म्हणतो—

"आपण (परशुरामभाऊ) बाळोबा होऊन एक केली खचित मसलत। चिमाप्पास धनी करुन राखिली जुनाट दौलत॥ करारांत दोघांच्या कांही किंचितं झाली गफलत। म्हणून फिरुन नानांनी उलटी मारून केलि गल्लत॥ सूत्रधारी जो पुरुष तयाच्या गुणास जग भुलत। हातांत सगळे दोर पतंगापरि फौजा हालत॥ (चाल)॥ परशुराम रामचंद्र आणि बाळोबास ठाउक रण। राज्यकारणी नव्हेत. एक केसरी एक वारण॥ कठीण गांठ नानाशीं न चाले तेथे जारण मारण॥ (चाल) महाडास बसुनि नानांनी बेत ठरविले॥ बाळोबास शिंद्याकडून कैद करविलें। शिवनेरी गडावर पटवर्धन धरविले॥" इ.

पोवाड्याचें वैशिष्ट्य

हा पोवाडा समकालीन व पूर्णपणें विश्वसनीय असा आहे. कांही कांही समकालीन पोवाडे उपलब्ध कागद पत्रांच्या पुराव्यानें पूर्ण विश्वसनीय ठरतात इतकेंच नव्हें तर उपलब्ध कागद पत्रांतून न सांपडणारी अशीही अधिक माहिती त्यांतून सापडते. उदाहरणार्थ याच पोवाड्यांत शिंद्यांनीं व परशुराम भाऊनीं नानाफडणविसाच्या पक्षपाती लोकांना कैद केलें त्यांची फारच तपशीलवार नांवनिशी दिली आहे. तसा तपशील उपलब्ध कागद पत्रांतूनहि सांपडत नाही.

पकडलेल्या लोकांची एकूण संख्या ५२ असें सांगून शाहिरानें याद दिली आहे ती अशी. १ बाळोबा पागनीस, १ धोंडीबा, १ बाजिबा मोधी, १ बाजिबा मोधीचा पुत्र, ७ वगैरे असाम्या.

पुण्यांत पकडले ते

१ वासुदेव कोतवाल	१ बहिरो रघुनाथ
१ रमी कळवंतीण	१ कोंडी कळवंतीण
१ अन्याबा मेहेंदळे	१ चिंतोपंत लिमये
१ शिवपंत मोडक	१ राघोपंत थत्ते
१ जयराम जोशी	१ जुगी राख जयरामपंतांची
१ केसो शामजी	१ भान्या
१ बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे	१ लक्ष्मी राख सहस्रबुद्ध्याची
१ माहादाजी काळे	१ विठ्ठलराव गोळे
१ रामचंद्र परांजपे	१ भिकाजीपंत
१ चिंतो मोरेश्वर शिवनेरवाला	१ बाजी मोरेश्वर देवरुख्या
१ गणपतराव करमरकर	१ सदाशिवपंत थत्ते
१ सदाशिवपंत जोशी	१ पानसे १ जनोबा सुभेदार

(४) वाड्यांतील चार नाईक

१ श्रीपतराव पटवर्धनं	१ आलमखान
१ सटवाजी लाड	१ येसाजी घाडगे

१ हरी विष्णु सहस्त्रबुद्धे	१ विसाजीपंत वाडदेकर
१ आप्पाजी बल्लाळ सहस्त्रबुद्धे	
१ हरबाजी धायगुडे	१ हिरोजी पाटणकर
१ बाबाजी अभ्यंकर	१ मोरो बापू
१ अन्याबा अभ्यंकर	
२ हुजरे फडक्यांचे	२ खिजमतगार

या नांवांपैकीं बरींच नांवें नवीन आहेत व तीं सर्व विश्वसनीय वाटतात.

इतिहासदृष्ट्याही पोवाड्यातील सर्व हकीगत सुसंगत व पौर्वापर्य संभाळून सांगितलेली आहे हें पूर्वी दिलेल्या ऐतिहासिक माहितीवरून दिसून येईलच.

नाना फडणविसांचा पोवाडा

७

भले नाना फडनीस केली कीर्त सवाई । चव मुलखी धास्त त्रीलोक जानती शाही ॥ धृ ॥ संपन्न सर्वगुनी ब्रहस्पति-प्रमान । कोमळ हृदई जैसे भोळे सीव जाने । पाहाता थोरपन मेरु दीस्तो लहान । आर्जुन कर्न त्या तुले पराक्रम जान । चेतुरता पाहाता विशेस गुन सुज्ञान । कुठवर कीर्त वरनावी तऱ्ही मुखान । आदभुत ज्ञान उपमा किती मुन द्यावी । प्रीथ्वीचे वजेन कीती म्हुन कोनी जोखावी । कीती खोल सप्त पाताळे मुन सांगावी । संभुच्या तपाची गनना कैसी करावी । आद सेक्तीचा जप किती म्हुन की वदावी । कीती वर्णू पराक्रम म्हु×स्तुत बोलावी । नाना फडनीसच प्रमान तुमची पदवी । सत्वधीर कीर्त हारीचेंद्रातुले जाली ठावी । श्रीयाळ त्याहुनीया महिमा आघवी । आंतरी शांत कोमळ कठुरपन नाही । येसस्वी सदा कल्पना सर्वा ठावी ॥ १

नारायन आवतार संपले पाहा जैपासुन । तैपासून सांगतो व्रत ते घ्या आयेकुन । गरभी असता श्रीमंत शेर्त (शत्रू) मर्दी (र्दू) न । चालविल राज नानानी हीमत धरून । कैवरी छेत्रू ठेविले

भले—भले शाबास या अर्थी. सवाई—विशेष. धास्त—दरारा. त्रीलोक जानती शाही—शाही म्हणजे राज्य किंवा सैन्य. राज्यांत व त्रैलोक्यांत नानांची दहशत महशूर आहे. प्रमान—प्रमाण बृहस्पातितुल्य. जाने—जाण असें पाहिजे. त्या तुले—त्या तुल्य. मुन—म्हणून. नाना फडनीसच प्रमान तुमची पदवी—तुमचीच उपमा तुम्हांस शोभेल. गगनंगगनाकारं सागरः सागरोपमः याप्रमाणे. हारीचेंद्रा तुले—हरिश्चंद्रा तुल्य. जाली ठावी—जगाला ठाऊक झाली. आघवी—अधिक. कठुरपना—कठोरपण. येशस्वी सदा कल्पना सर्वा ठावी—तुमची प्रत्येक कल्पना म्हणजे योजना किंवा मसलत दरवेळीं यशस्वी व्हावयाची हें ठरून गेलेलें अशी जगाची खात्रीच झाली आहे. जैपासुन—जेव्हापासून, जेधवा. तैपासून तेव्हापासून, तेधवा. व्रत—वृत्त. शेर्तमर्दीनं—शर्तमर्दीनें. शौर्य-पराकाष्ठेनें. हीमत—हिंमत. कैवरी छेत्रू ठेविले आपनाधन

आपनाधन करून। तीळतुले कोठे पडु दिल्हे नाही नुन। धर्यैवत नव खंडांत गाजती कीत। नादती रहीत (राहात) खुसवतु सहेर पुन्यांत। बसल्याच ठाई प्रताप करून आदभुत । मोंगल हापसी फिरगी हेदऱ्यासहित । खडन्या देती ठेविले आनुन जर्बत । बसल्येच ठाई बाछाव आले चालत। केला मुलुख काबीज सागरवलयाकित। येकछेत्री राज भगवा केली झेडा सेर्त। कुठवर वरनावी माहिमा विष्णु-भगत। श्रीमत्

करून—मूळपाठ 'कैक वैरी छेत्रु ठेविले आपनाधन करून' असा असावा. अपना धन म्हणजे आपल्या स्वाधीन किंवा ताब्यांत. स्वाधीनबद्दल 'स्वाध्यान' असें अडाणी लोक पूर्वी बोलत व लेखीतहि तसा शब्द येत असे. स्वबद्दल 'आपना' वापरला आहे. आपना + आध्यान–आपनाध्यान–आपनाधन. **तळितुले**–तीळतुल्य. **नुन**—न्यून. **धर्यैवत**—धैर्यवंत. **कीत**–कीर्त. **रहीत**—रईत–रयत–प्रजा. शंकरराव जोश्यांनीं रहित हा शब्द 'राहात' याबद्दल वापरला असें सुचविलें आहे पण तें चूक आहे. **खुसवतु**—खुषवक्त पाहिजे.खुषवक्त म्हणजे समाधानांत. **हेदऱ्या**—हैदऱ्या–हैदरअल्ली.त्या वेळचे मराठे हैदरचा 'हैदऱ्या' असा उल्लेख करीत. उ. "शिपाई रोहिले जाट गाठ न पडली हैदऱ्याची" (बदामीचा पोवाडा.) **जर्बत**—जबैंत–धाकांत. **बसल्येच ठाई बाछाव आले चालत**—तिसैन मया व अलफ ११९०. अल्ली गौर याचा नातू आपणास पादशायत व्हावी म्हणोन कलकत्त्यास गेला. अलीकडे भागानगरास गेले. तेथें सरबरा न झाली. पुण्यास आले. त्याजला श्रीमंत स्वतः पुढे जाऊन नजर करून भेटी झाल्या. या प्रसंगीं शिंद्यांकडील पत्रें अल्लीगौर यास गादीवर कायम केलें म्हणून याजवरून त्याजला गारदौंडास दरमहा खर्चास देऊन ठेविलें. (भारतवर्ष पंतप्रधान यांची दुसरी शकावली पृ. ८०)

राज—राज्य. **भगवा केली झेडा सेर्त**—मुळांत 'भगवा झेंडा केली सेर्त' असें असावें. नाही तर झेंडा स्त्रीलिंगी शब्द धरावा लागेल. अद्याप तसा झेंडा शब्द स्त्रीलिंगी आढळल्याचें स्मरत नाही. ती हल्ला, तो जागा असे वाक्प्रचार मात्र दृष्टीस पडतात. **सेर्त** म्हणजे शर्थ पराक्रम. **विष्णुभगत**—विष्णुभक्त. नानांची विष्णुभक्ती प्रसिद्धच

रावसाहेबाची फिरवीली द्वाही। छेपन देशामध्ये म्हासुर पडली आ (वा) ई ॥ २

श्रीमंत लाहानाचे थोर केले नानानी। सेवेसी सादर उभे कर जोडोनी। सद्भावे लक्ष लावुनी धन्याचे चेरनी। येकनीष्टचे सेवा केली चितापासुनी। धरयेला नाही द्वैतभाव आंतकर्नी। चालविले राज पाहा नाव धन्याच करूनी। चोविस वर्षे नानांनी कारभार केला। नंतर माधव आवतार निजधामा गेला। कसे रा (ज) पुढे चालेल मुन विचार पडला। अनावे सवाई बाजीराव बे (त) ठरवीला। तव घडी रवाना केले परसरामभावुला। भंडारक्रीया भावुन दिल्ही श्रीमंताला। पुन्याशी आनीले बाजीरावसाहेबाला।. खड्डुखड्डुचे मुकामी नाना गेले भेटीला। कूच दरकूच करून माधुन सिंदा आला। मसलद केली नानानी मग ते समई। आज्ञा घेऊन सातान्यास गेले लवलाही ॥ ३

नाना कावा करून गेले महाडाला। बरे पाहु कोन चालवील या राज्याला। नानाचे मागे व्रतांत कैसा जाला। सांगेतो स्वत चेतुर आना ध्यानाला। बाळोबा पागनीस भावुसंग मिळाला॥ मसलत करून राजाचा फितवा केला। जरीपटका मागु लागले बाबा फडक्यासी। परचुन्यापसुन घेतली हीरुन मुकलसी। नानाचे लोक होत लचे ? तस्ती केली त्यासी।

आहे. बेलबाग नानानी स्थापली. ‘नानानी बेलबाग बांधुनी स्थापियले लक्ष्मीकांत’ (मनोहरकृत पोवाडा). **म्हासुर**—महाशूर, महशूर, प्रसिद्ध. **पडली आ (वा) ई**—आवाई झाली म्हणजे लौकीक झाला. **नांव धन्याच करुनी**—धन्याच्या नांवाने कारभार हाकला. **तव घडी**—तद्‌घडी, त्याच वेळीं. **भंडारक्रीया**—शपथ, बेलभंडार. **खड्डुखड्डुचे**—खडकीचे पाहिजे. **बरे पाहु कोन चालवील या राज्याला**—नाना म्हणाले ठीक आहे तुम्ही आतां कारभार कसा करतां तेच पाहातो. **स्वत चेतुर**—स्वत हा शब्द मुळांत स्वस्थ म्ह. स्वस्थपणें असा असावा. हे चतुर श्रोत्यानो स्वस्थपणे लक्ष देऊन ऐका. **राजाचा फितवा केला**—राज्याचा फितवा केला म्हणजे राज्यांत फितूर उत्पन्न केला. **हीरून घेतली मकलसी**—सरकारी पत्रावर मखलाशीं करण्याचा नारोपंत चक्रेदवाचा अधिकार काढून घेतला. सरकारी पत्र किंवा कागद तयार झाल्या-

जुने कारभारी होते केले दुर साऱ्या (सी)। स्व आगे करु लागले भावु चवकसी। पुढे आसता आवलंबीले थोर कार्यासी। याचे न व दा न व जाचे सेवटासी। व्याघ्राची सर काये येती जंबुकासी। पंडीताची सर काये न ये मुरखासी। न कळे मुढासी पुढे होईल कैस काई। आपलेच ठकानी बसले होवून बाछआई॥ ४

सीद्याचे भेटीला बाजीराव धनी गेले। मग मागे बाराभाईनी कैसे केले।

नंतर किंवा हिशेबाचा तक्ता तयार झाल्यानंतर जो मान्यतादर्शक शेरा होत असे त्याला मखलाशी असा शब्द असे. "राजश्री बाबा फडके, 'देवावे' करीत होते त्यांणी, 'देवावे' करूं नये, हुजुरातेंच्या फौजेचा कारभार अगदी करूं नये. तैनांत घेऊन घरीं स्वस्थ बसावें. नारोपंत चक्रदेव यांनी कांही मखलाशी करूं नये हे बोलणे पडले असे, हेंहि ऐकतो. येणे प्रमाणे शियांची भारी झाली." (ऐ. ले. सं.भाग ९ पृ. ४९६९.) **नानाचे लोक होत लचे तस्ती केली त्यासी**—होत लचे ही मोडी वाचनाची चूक आहे. मुळांत बेतलेब म्हणजेच बेतलब असा शब्द असावा. 'नानाचे लोक बेतलब तस्ती केली त्यासी'–नानाच्या पक्षाचे जे लोक होते त्यास तस्ती लाऊन त्यांस बेतलब केलें म्हणजे सर्वस्व हरण केलें. कांही बाकी उरून दिली नाही. तलब म्हणजे बाकी. **होते**—हो! ते असे पाहिजे. **साऱ्या**—साऱ्यासी **स्व आगे**—स्व आंगे–जातीने, स्वतः **चवकसी**—कारभार, व्यवस्था. **पुढ आसता**—आसता–आस्था–आशा पुढच्या आशेवर कार्यावर कारस्थानावर लक्ष ठेऊन. **थोर कार्यासी**—थोर कार्य म्हणजे बाजीरावाला पदच्युत करून चिमाजी अप्पाला गादीवर बसविण्याचें कारस्थान. **याचे न व दा न व जाचे**–(?) **ठकानी**—ठिकाणीं. **बाछआई**–बाच्छाई. बाच्छाय–बाछयासारखे नुसते सिंहासनावर बसल्यासारखे स्वस्थ बसले. कारभारावर किंवा इतरत्र फितुरीवर लक्ष ठेवावें तें ठेवलें नाहीं. बादशाहा स्वस्थ बसावयाचा आणि कारभाऱ्यानें सर्व उरकावयाचें ही कल्पना. **बाराभाईनी**—हा शब्द निंदात्मक वापरला आहे. ज्यांत कोणाचा कोणास मेळ नाहीं अशा कारभारी मंडळास हा लावतात. मूळ हा शब्द आनंदीबाईनें सखारामबापू नाना इत्यादिकांच्या कारभारी मंडळासाठीं तुच्छतेनें उपयोजिला होता.

बाबाकडे जाऊ म्हून आपासी सांगितलं । घालून पालखीत तदं घडी पुन्यासी आणले । पाहा करू नये ते विप्रीत कर्म केलें । दोल्ही वस्त्रें जबरदस्तीने तख्ती बसाविले । घरोघर करु लागले कारभारासी ॥ चवगदी बैसवील्या चौक्या सेहेर पुन्यासी॥ ठेवीले कारकोन ठाई नाक्यासी ॥ झाडा घेती बाहीरुनसे हेरुन आल्या-गेल्यासी ॥ फोडुन पाहाती कुलतमाम लाखोट्यासी । हे आल्पबुधीन आखेर पडतील का× ॥ कसी होईल बरोबरी रवीची खद्योतासी । मोराची प्रीतिमा नये लाढोरासी ॥ च्यार दीवस मौजा केल्यां होवुन सुक नासी । कुल कार-भारी भावुचे ठाईठाई । पुन्यात कारभार करती बाराभाई ॥ ५

पागनीस परसरामभावु सीद्यासहीत । कुल तमाम पाहा नानावर फिरले होत । अच्याट बुध नानाची न कळे आत । कळसूत्री कावा केला बसुन माहाडात । सीद्याला पत्र पाठवीले लेहुन गुप्त । का परबुधीन घालीता कलप स्नेह्यात ॥ पुर्वीचे वचन चितात

बाबाकडे—बाजीरावाला बाबासाहेब म्हणत. तदं घडी—तत्‌घडी – त्याच क्षणीं, लगेच, लगोलग. करू नये ते विप्रीत कर्म केलें— विप्रीत. विपरीत. सुनेच्या मांडीवर सासरा दत्तक दिला हें! चिमाजी अप्पाला सवाई माधवरावाच्या बायकोच्या मांडीवर दत्तक दिला. चवगदी—चवगर्दा–चौफेर. ठायी—ठायीं–ठायीं. बाहीरुनसे हेरुन आल्यागेल्यासी—बाहेरून सेहेरून आल्यागेल्यासी असा मूळ पाठ असावा. सेहेरून–शहरांतून. पुणें शहरांतून. शहराबाहेर चौक्या बसविल्या व बाहेरून आंत येणारे आणि शहरांतून बाहेर जाणारे अशांचा झाडा घेऊं लागले. कुल तमाम—झाडून सर्व. का—मूळपाठ फासी–पाशांत असा पाहिजे. प्रीतीमा—प्रतिमा सर. च्यार दिवस मौजा केल्या होवुन सुकनासी—‘बेमुनसफानिशीं’ या शब्दाचें अडाणी लेखकाने किंवा गोंधळ्यानें ‘होवुन सुकनासी’ असें रूप बनविलें. बे मुनासफ् म्ह. गैर-कायदा, अन्यायाचें. चार दिवस बेकायदा वाटेल तसें वागून कारभारीपणाचें सुख भोगलें. नानावर फिरले होत—नानाशीं बिघडलें होतें. परबुद्धीनें—दुसऱ्याच्या शिकवणीनें. कलप—कल्प, विक्षेप, बिघाड. दुसऱ्याच्या शिकवणीनें तुमच्या आमच्या चालत आलेल्या एकींत कां बिघाड करतां? पूर्वीचे वचन—महादजी नाना यांच्या आणा शपथा होऊन एक-

करावे स्मरन । तुमचा आमचा येकलास पहील्यापसुन । मातले फीतोनी यासी बंधन ।। समजले दवलतराव पत्र आसे पाहुन । तदघडी बाळोबा पागनीसाला धरुन । ठेवले आटकत त्याहासी जत्ती करुन । तैसच आर्षेन धोंडीबाला करून । बाजीबा मोधी पुत्रासहीत जान । वगैरे सात आसाम्या थोर लाहान । पुन्यातील धरले किती ईचे सीवाई । सागतो नावनीसीच ऐकुन ध्या सर्वही ।। ६

प्रथम वासुदेव कोतवाल केला जप्त । त्यामागे यकासरसे येकाला धरींत । प (ब) हीरो रघुनाथ धरीला ऐका त्वरित । रमी कोंडी दोघी कळवावातींनी सहीत । आन्याबा मेदळे नीमये चीतोपंत । सीवपंत मोडके राघोपंत थत्ते । जयराम जोसी जुगी राखी सहीत धरला । केसो शामजी भान्या चेतुरभुज केला । आनीक बाळाजी वीष्णु सहश्रबुद्धयाला । त्याची राख लक्ष्मी ठेविली कैयदला ।। माहादाजी काळे विठ्ठलराव गोळ्याला । रामचेंद्र पराजपे भिकाजीपंत आटकवला । मग धरला चीतो मोरेश्वर सीवनेरवाला । बाजी मोरेस्वर देवरुख्या पळून गेला । गणपतराव करमरकर आना ध्यानाला । सदाशिव थत्ते सदाशिवपंत जोशी वहीला । पानशा तोफखान्याचा धरून ते समई । जनोबा सुभेदार दस्त केला लवलाही ।। ७

श्रीपतराव पटवर्धन आल्मखान । सटवाजी लाड येसाजी घाडगे पुर्न ।

मेकांनी एकमेकांस अंतर देऊ नये. फडणिसी नानाची आणि सरदारी शिंद्याची असे समजून दोघांनी परस्परांस अकृत्रिम साहाय्य करावें असें ठरलें होते. येकलास—येख्लास—मैत्री, स्नेह. मातले—माजले. फितोनी—फितोरी म्ह. फितुरी असे पाहिजे. फितुरी माजले आहेत त्यांना बंधन करावें म्हणजे त्यास कैद करावें. त्याहासी—त्यांसी. आर्षेन—आकर्षण पाहिजे. त्याच रीतीनें धोंडीबालाही आकर्षण केलें म्हणजे कैद केलें. वगैरे—इतर, किरकोळ. ईचे सीवाई—याच्याशिवाय. नावनिसीच—यादीच. यकासरसे—एका पाठोपाठ. नीमये—लिमये. जुगीराखी सहित—त्याच्या ठेवलेल्या जुगी नांवाच्या राखेसहित. कैयदला—कैदेत. वहीला—वायला निराळा, आणिक. आल्मखान—आलमखान. पूर्न—पूर्ण. आभ्याआकर—अभ्यंकर.

वाड्यातील चार नाईक ध्या ऐकुन । हरी विष्णु सहस्त्रबुधे पाहा निरखून ॥ वीसाजीपंत वाडदेकराला धरून । आबाजी बलाळ सहस्त्रबुधे जान । हारबाजी धायगुडे हीरोजी पाटणकर मोरो बापु बाबाजी ? आभ्याआकर । अन्याबा आभ्याकर आनीक दोन हुजरे । निसबत फडक्याची दोन खीज (म) तगार । धरील्या आसाम्या बावन यकतर । आनीक लहान थोराचा नाही सुमार । जे ना (ना) कडे गेले ते ऐका सरदार । मानाजी फाकडे मल्हारराव पोवार । नीलकंठराव दीनकरपंत भडभडे चेतुर । बळवंतराव गोडबोले समजुन हृदई । गोपाळराव राजपागे असाम्या साही ॥ ८

राहिला थोडा मजकूर कथा मागली । ... ...

मोडी लिपीत अभयंकर असेही रूप लिहीत असत. **निसबत**—पदरचे किंवा तर्फेचे. **रमी कोंडी दोघी कळवातिणी सहित**—पुणें नगर संशोधन वृत्त खंड २ रा. यांतील ८७ नंबरचा लेखांक इंग्रजी आमदानी सुरू झाल्या बरोबर केलेल्या पुणे शहरांतील पेठांच्या पट्टयांच्या उगवणी बाबत आहे. त्यांत पुणे शहरांत कोणाकोणास सरकार नोकर म्हणून किंवा वशिल्याचे म्हणून घरपट्टी माफ होती त्याचा याद आहे. त्यांत रमी कोंडीचा उल्लेख आहे तो असा "तीन (घरें) कलवंतीण रमी कोंडीची आहेत बहिरोंत मेहन्दळे याजपासी चाकरीस होती सबब तिची घरे पेठ वसाहतीपासून माफ" परंतु या नोंदींत रमी कोंडी हे एकाच स्त्रीचे नांव असें म्हटले आहे पण पोवाड्यांत "रमी कोंडी दोघी कळवांतीणीसहित" असें स्पष्ट म्हटलें आहे.

अकीवाटच्या वेढ्याचा पोवाडा

ऐतिहासिक माहिती

त्या पोवाड्याच्या तीन प्रती रा. शितूत यांस मिळाल्या होत्या पण त्यापैकी वाळवे येथील जीवाप्पा मुदाळे यांजकडून मिळालेली प्रतच शितू-तांनी ग्राह्य ठरवून तीच छापली.

करवीरकरांनी स.१७७८ च्या एप्रिल अखेरीस महादजी शिंद्याशीं जो तह केला, त्या तहातल्या शर्ती शिंद्यानी करवीरकरांकडून जबरदस्तीने कबूल करविल्या होत्या. त्यामुळे त्या पाळण्याचें त्यांच्या मनांत मुळीच नव्हतें. अर्थात तह होऊन दोन महिने लोटले नाहीत तोंच करवीरकरांनी पुनः धाम-धुम सुरू केली. शिंदे व पटवर्धन वगैरे सरदार किंबहुना सारें पुणें दरबार या वेळीं मोरोबादादांचें खूळ मोडण्यांत गुंतले असल्यामुळे आपणास तूर्त प्रतिबंध करणारे कोणी नाही हे करवीरकरांस पूर्ण माहीत होतें. त्यांनीं खलबत करा-वयाच्या मिषानें बावडेकर अमात्य व त्यांचे कारभारी, विशाळगडकर प्रतिनिधी आपाजी शामजी, बाबूराव गडनीस, राघोबा पाथऱ्या, सौंदत्तीकर गोसावी वगैरे अकरा आसामी बोलावून आणून विश्वासघाताने कैद केले. शिंद्याशीं केलेल्या तहांत अकरा लक्ष रुपये द्यावयाचें कलम होतें त्या रकमेस शिंद्यांनीं अमात्य व प्रतिनिधी वगैरे असामी उगवणीदार घेतले होते असें दिसतें. कारण कीं या अकरा मंडळीस करवीरकरांनीं कैद करून तीन दिवस उपाशी कोंडून ठेवल्यावर चवथे दिवशीं प्रतिनिधी व अमात्य यांस मात्र सोडून दिलें. पण सोडतांना शिंद्यास देऊं केलेल्या खंडणीपैकीं पांच लक्ष रुपये पोच-ल्याची पावती त्याजपासून लिहून घेतली! बाकी बावडेकरांच्या कारभाऱ्या-सुद्धां नऊ असामी अटकेत राहिले त्याजपासून निघेल तो पैसा उकळण्याचा उद्योग चालूच होता. आपाजी शामजीच्या ताब्यांत ठाणी होती त्यांच्या सोड-चिठ्ठया लिहून देण्याविषयी त्यांस सक्तीचा तगादा लाविला, तेव्हा त्यानें त्या लिहून दिल्या. त्याप्रमाणें वडगांव व आणखी एकाद दुसरें ठाणें स्वाधीन झालें. परंतु कोगनोळी, निपाणी व चिकोडी येथील ठाणेदारांनीं या चिठ्या मान्य करण्याचें साफ नाकारलें. त्यावरून महाराजांनीं आपाजी शामजीवर क्रुद्ध होऊन त्याचे डोळे काढविले. शिंद्याशीं केलेल्या तहांत चिकोडी व मनोळी हे दोन्ही तालुके पेशव्यास देऊन टाकल्याचें व कागलकर घाटग्यां-

कडे कागलचें ठाणें कायमचें ठेवण्याबद्दलचें कलम लिहिलेलें आहे; परंतु आता चिकोडी मनोळी व कागल जबरदस्तीनें घ्यावयाची मसलत करवीर दरबारांत ठरली. त्याप्रमाणे चिकोडी घेण्याकरितां सात आठशें स्वार व दोन हजार पायदळ इतक्या सरंजामानिशी सटवोजी भोसल्याची स्वारी निघाली. ता. १८ रोजीं राणी दुर्गाबाई मरण पावली. तथापि तिच्या मत्यु-मुळे वर सांगितलेल्या मसलतींत कांही फेरफार झाला नाही. इकडे अप्पाजी शामजींचे बंधु विरूपाक्ष शामजी व अंताजी शामजी यांनींहि करवीरकरांशीं टक्कर देण्यास कमर बांधिली. त्यांच्या कुमकेस पुणें दरबारकडून बचाजी विश्वनाथ खांडेकर यांजबरोबर थोडीशी फौज आली. मागून व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर याची याच कामा-वर नेमणूक झाली. नोवेंबर महिन्यांत महाराज व येसाजी शिंदे कागलास वेढा देऊन बसले तों चिकोडीकरांनी येऊन घाडग्यांची कुमक केली व महाराजांस वेढा उठविणें भाग पडलें. सटवोजी भोसला येळगुडच्या ठाण्यास वेढा देऊन बसला होता त्यावरहि चिकोडीकरांनी छापा घालून त्यास लुटून पिटाळून लाविलें. चिकोडीकरांची याप्रमाणें सरशी झाली तरी पुढच्याच महिन्यांत महाराज व येसाजी शिंदे यांनी पुनः कागलवर चाल केली. यावेळीं घाडग्यांनी मर्दुमकीने लढून महाराजांचे एकामागून एक तीन हल्ले परतविले. परंतु वेळेवर कोणाकडून कुमक न पोंचल्यामुळें शेवटीं त्यांस कागलचें ठाणें महाराजांच्या हवालीं करावें लागलें. येळगुडचें ठाणेंहि शिंद्यांनी संधी साधून घेऊन पाडून टाकलें. पेशव्यांची बहुतेक फौज इंग्रज पुण्यावर चालून येत होते त्याशीं लढण्यांत गुंतली होती. कांही सुरापुरच्या मोहिमेवर परशुरामभाऊंबरोबर होती. याप्रमाणे त्यावेळी रान मोकळे सांपडल्यामुळे करवीरकरांस चांगलेंच फावलें, पण चिकोडीकरांनी त्यांस तात्पुरतें आटोक्यांत ठेऊन त्यांचा अधिक फैलाव होऊं दिला नाही. पुढे इंग्रज व दादासाहेब पराजित होऊन इंग्रज तळेगांवाहून मुंबईस परत गेल्या-वर करवीरकरांची धडपड अर्थातच कमी झाली. चिकोडी, मनोळी तर त्यांच्या हातीं लागली नाहीच; पण घाडगे प्रतिनिधी व अमात्य यांस उपद्रव दिल्याबद्दल व प्रांतांत धामधूम केल्याबद्दल पेशवे सरकारकडून तंबी मिळ-ण्याचें भय नवीन उत्पन्न झालें.

हैदरअल्लीवर स्वारी करण्याकरिता उभयतां कारभाऱ्यांनी मोठी फौज घेऊन कर्नाटकांत जावें अशी मसलत पुणें दरबारीं बरेच दिवस घाटत होती. त्याप्रमाणे इंग्रजांशी चालू असलेली लढाई संपल्यावर कर्नाटकचे स्वारीस निघावयाचे नाना फडणीस व सखारामबापू यांनी कबूलहि केलें होतें. तसें झालें असतें तर त्या उभयतांनी कर्नाटकांत जाता जाता करवीरकरांचें पारिपत्य सहजासहजीं केलें असतें; परंतु सखारामबापूस शिंदे व नाना यांनी कैद केल्यामुळे मोहिमेचा बेत तितकाच राहिला; आणि परशुरामभाऊ सुरापूरचे मोहिमेवर गुंतले होते त्यास नानाफडणीस यांनी लिहिलें कीं, सुरापूरच्या खंडणीचा उलगडा झाल्यावर तुम्ही करवीरकर महाराज व कित्तूरकर देसाई यांच्या तालुक्यांत जाऊन त्या उभयतांचा बंदोबस्त करावा. त्याप्रमाणे आता परशुरामभाऊ करवीरकरांच्या दंग्याचा बंदोबस्त करण्यासाठीं त्यांच्या कटकोळ महालांत येऊन पोंचलें. त्या महालांत भाऊंचें लष्कर येतांच लक्ष्मणराव शिंदे तोंगलकर यांनी खंडणीचा जाबसाल सामोपचारानें संपविण्याची खटपट राजाबा पानसे यांच्या दिद्यमानें केली; परंतु ती सिद्धीस गेली नाही. भाऊंनी बन्नूर व कटकोळ या गांवास जरब देऊन त्यापासून अनुक्रमें तीस व दहा हजार रुपये खंडणी घेतली व दोन्ही गांवांत आपलीं ठाणीं घातलीं. नंतर तोंगलकरांपासून थोडीबहुत खंडणी घेऊन ते मनोळी तालुक्यांतील सतीगिरें वगैरे ठाण्यावरून गोकाककडे आले.

इतके होईं तों जून महिन्यास सुरुवात झाली. त्यामुळें आठ पंधरा दिवसांत मोहिमेचें काम बंद ठेवणें प्राप्त झालें. तितक्या अवकाशांत साधेल अशी मसलत भाऊस पत्करावयाची होती. गोकाकचें ठाणें कित्तूरकर बळकावून बसला होता; व त्या ठाण्याच्या आसऱ्याने राहून तेरदाळ परगण्यास उपद्रव देत होता. याकारितां त्यापासून गोकाकचें ठाणें घ्यावें ही एक मसलत होती. दुसरी मसलत करवीरकरांची अकीवाट व शिरोळ हीं ठाणीं काबीज करण्याची होती. पहिलीपेक्षां दुसरी मसलत परशुरामभाऊंस फारच अगत्याची होती. अकीवाटकरांचा कुरुंदवाडास व शिरोळकरांचा मिरजेस फारच उपद्रवकारक शेजार झाला होता. अकीवाटपेक्षां शिरोळचें ठाणें फार बळकट असल्यामुळे तें यंदांच्या मोहिमेंत घ्यावें असें दोन महिने भाऊंच्या

मनांत घोळत होतें. त्याकामापुरती एकहाती मुबलक फौज व चांगल्या थोर तोफा यंदा त्यांच्या स्वारींत होत्या. पंचवीस तीस खंडी दारू, पांच सात थोर तोफा व शेंपन्नास कामाठी व गोलंदाज गुप्तपणें तयार ठेवण्याविषयी त्यांनी मिरजेस गंगाधरराव यांस लिहून तितकी तयारी करविली होती. पण आतां अखेरचे दिवस आल्यामुळे शिरोळचें ठाणें घेण्याची मसलत झेंपणार नाहीसे समजून भाऊंनी अकीवाटास वेढा घातला.

तेंहि ठाणें फार मजबूत असून आंत शिबंदीचे लोक निवडक व भरपूर होते. त्यानीं तें ठाणें तीन आठवडे फारच शिताफीने झुंजाविलें. भाऊंनीं मोर्चेबंदी करून तोफांच्या मारागिरीनें तटाच्या भिंतीस खिंडारें पाडून हल्ला केला तेव्हा आंतले लोक जिवावर उदार होऊन मोठ्या आवेशानें लढले. त्यांनी कौल मागितला नाही व बाहेरच्या लोकांनीं दिला नाही. आंतल्यापैकीं शेवटला शिपाई मारला जाईपर्यंत उभयपक्षीं हत्यार थांबलें नाही. त्यामुळें हें ठाणें काबीज होईपर्यंत भाऊंची हानी फार झाली. नुसत्या हल्ल्यांतच त्यांचे नामीनामी दोनतीनशें माणूस ठार पडलें आणि तलवारीच्या व दगडाच्या जखमा लागलेल्यांची संख्या सातशेंपासून आठशें पर्यंत होती. गोविंद हरीचे चुलत बंधु अंताजीपंत पटवर्धन यांच्या घराण्यांतील बळवंतराव दीक्षित यांस उजवे हाताचे कोपरास भाल्याची जखम झाली. (खरे ३०५६)

(२) शालिवाहन शके १७०० राज्याभिषेक शक १०५ सालीं (सन १७७७) महादजी शिंदे गेल्यावर परशराम रामचंद्र पटवर्धन याणीं फौज घेऊन महाराज सरकारच्या अकीवाट ठाण्यास वेढा घातला. ठाण्यांत जे सनदी वगैरे लोक होते, त्यांत दोघे भाऊ मोठे शूर शिपाई होते. ते मोठ्या धैर्यानें व पराकाष्ठेनें लढले. त्यांनीं पटवर्धन यांची फौज जेरीस आणली व ठाण्यांत शिरकाव होऊं दिला नाहीं. परंतु आंतील लोकांस करवीराहून कुमक येईना. ठाण्यांत दाण्याचा तोटा पडला, आणि इतक्यांत दोघां शूर भावांपैकीं एक अकस्मात् गोळी लागून पडला दुसरा मोठ्या पराकाष्ठेनें लढला. परंतु त्यासाहि गोळी लागून तो पडला तेव्हां पटवर्धनांनी ठाणें जबरीनें ताब्यांत घेतलें.

(कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील राज्यें व संस्थानें यांचा इतिहास ले. बा. प्र. मोडक)

अकीवाटच्या वेढ्याचा पोवाडा

८

(शाहीर–मानसिंग भोवाना रजपूत)

सोमवाराचे दिवशीं निघाले परशरामभाऊ ॥ अकीवाटावर हल्ला नेमिली सैन चला जाऊं ॥|धृ ॥

मिळूनियां उमराव अवघ्यांनी मनसोबा केला ॥ जासूदाच्या जोड्या पत्र पाठविलें मिरजेला ।। सवाई माधवराव नाना फडणीस बोलला ॥ मिळवा सारी शाही आज्ञा केली भाऊला ॥ राजासंगे खरा दावा लावला ।। मुलखाची वसाडी दिवा लागेनासा जाहला ॥ महाराजांची दया आम्हांवर परसन्न शाहू॥ १

भोवानराव भगवंत दोघे बंधू अष्टप्रधान ॥ हरीपंत फडक्याचें त्याजवरी लिहिलें सैन ॥ बावड्याची बंदोबस्ती खबर ऐकून ॥ करवीराला वेढा घातला माहादजी शिंद्याने ॥ खासा' सेनापती सखाराम पाठविला त्याने ॥ पेंढाऱ्याच्या धुमा अवघें लोटलें सैन ॥ कुलक्षेत्राची जागा अवघे देव चला उठवूं ॥ २

सवाई माधवराव जन्मले खानदान । गोकाकच्या नदीवर जाऊं दे सैन । मनोळीची बारी लुटली सव्या रावताने । सिरोट्टीला वेढा हादऱ्या आला राव चालून ॥ सामानगडची खंडणी घेतली रगाडलें सैन ॥ आदी घेऊन आकीवाट मग काय शिरोळास जाऊं ॥ ३

अष्टकारकून अष्टउमराव उभा देवडीला ॥ चिटणीस फडणीस पोतनीस विचार त्यांनी केला ।. बारा हजार घोडा त्यामधि खासा निवडीला ।। जरि-

---

हल्ला नेमिली––हल्ला शब्द मुळांत स्त्रीलिंगी आहे. सैन—सैन्य. शाही—सैन्य. राजा संगे—कोल्हापूरकर छत्रपतीशीं. मुलखाची वसाडी—परशुरामभाऊंच्या सैन्याने कोल्हापुरकरांचा मुलूख जाळून पोळून ओसाड करून टाकला. भोवानराव भगवंत दोघे बंधु अष्टप्रधान––भवानराव व भगवंतराव प्रतिनिधी अष्टप्रधानां-पैकी. त्यावरी लिहिले सैन—हरिपंत फडक्यांचे पथक त्याजकडे चाकरीस दिले (?) पेंढाऱ्यांच्या धुमा—पेंढाऱ्याच्या धाडी. हादऱ्या—हैदऱ्या. हैदरअल्लीचा उल्लेख तत्कालीन कागदपत्रांत व

पटका चौघडा नौबत वाजे ब्रिन्नीला ॥ गारद्याचा बाजा भार रोहिल्याचा चालला ॥ सिदरायाचा माळ तयाने जागा नेमिला ॥ करुनिया मतलब मोर्चे दिले राव गांवाला ॥ सिदरायानें कौल दिल्ला आहे प्रसन्न तुजला । आज पंधरावे रोजीं किल्ला येईल हाताला । नका करूं अनमान किल्ला घटकेमाधिं घेऊं ॥ ४

आकीवाटाला वेढा गांव लढविला शरतीन । तेव्हां येल्यापा जेटयापा किल्यामाधि बंधू दोघेजण । लिहूनियां कागदपत्र पाठविले भाऊन । बेगी सोडा किल्ला तुम्हांला देतो जीवदान । ह्मणे आपाजीपंत सल्ला करावा जलदीन । विचार नाही बरा जी अवघें सरलें सामान । सुभेदाराची कुमक कोठें दिसत नाहीं आझून । मायापा बाळापा त्यानी आणले बलावून ॥ म्हणे बच्याजीपंत तुम्ही भीम अर्जुन ॥ महाराजांचें अन्न खाल्लें भोंदून ॥ इतकें वचन आईकतां धांवले समशेर उपसून ॥ आम्ही यातीचे लव्हार दोघे झुजुं शरतीन ॥ वकत पडल्यावर अवघे मरून खरे होऊं ॥ पर किल्ला ना देऊं ॥ ५

आईतवाराचे दिशीं ताकीद होती सैनेला ॥ सोमवाराचे दिवशीं तयानें हल्ला नेमीला ॥ पहिले प्रहररात्रा हल्ला तिनदां मोडला ॥ बरकंदासाचे

प्रचारांत हैदऱ्या असा पुष्कळ वेळां करीत असत. **गारद्याचा बाजा भार रोहिल्याचा चालला**—पुढे बँड वाजवीत गाडदी चालले व मागून रोहिल्यांचा जमाव निघाला. युरोपियन पद्धतीने कवाईत शिकलेल्या गारद्यांच्या पथकांत बँड असे. **शरतीन**—शौर्याने. **बेगी**—ताबडतोब, जलदीनें. **आपाजीपंत**—किल्ल्यांतील कोल्हापूरकरांचा कोणी अधिकारी. **मायाप्पा बाळाप्पा**—वर येल्लाप्पा जेठाप्पा अशीं नांवें दिलीं आहेत. मग खरी नांवें कोणती? **सुभेदार**—यशवंतराव शिंदे सेनासाहेब सुभेदार. **बच्चाजीपंत**—आप्पाजीपंत असे पाहिजे. **महाराजांचे अन्न खाल्लें भोंदून**—भोंदणें म्हणजे फसवणें. भावार्थ असा कीं, इतके दिवस कोल्हापुरकर छत्रपतींचें अन्न खाल्लेत; पण आता किल्ला चांगला लढवीत नाही ही आपल्या धन्याशीं तुमची प्रतारणाच आहे. **यातीचे**—जातीचे. भावार्थ आम्ही जातीचे लोहार आहोत, धोतरे ब्राह्मण नव्हे मरून खरे होऊं पण किल्ला शत्रूचे हातीं देणार नाही. बर-

बार झडती गणंता नाही त्याला ॥ दारू आणि गोळ्यांनें सूर्या झाकुळला ॥ भांड्याच्या माराला कोण वळखिना कवणाला ॥ दोन कोतवाल हत्ती नीट चालविला वेशीला ॥ विक्रमाची उज्जनी तिते रणखांब गाडला ॥ तीनशे साठ मुडदे तयानें कागद वाचिला ॥ आम्ही धाक माहाराठी फौज हिचा दर्प सकळाला ॥ श्रीमंत महाराज पेशवा याला तोंड कसें दावूं ॥ ६

इतके वचन ऐकतां भाऊला क्रोध फार येऊन ॥ रघुनाथ दादा जवळ घेतले बलावून । खेड्याखेड्यासी ताकीद शिड्या येवूं दे जलदीनं । खोरें आणि कुदळी बिगारी काढा सामान । लव्हार आणि सुतार अवघे मिळविले सैन । असे अठराहि कारखाने गोळया झडती खणाखण । कामाठे बेलदार लाविले मोर्चा कारण । गंगाधर फडणीस गेला बिन्नी धरून । त्यासी लागल्या जखमा ठार पडला दिवाण । तेव्हां येल्यापा जेठ्यापा किल्यांत बंधू दोघेजण । शिंग आणि हलग्याचा बाजा होतो कडाक्यान । चवरी अबदागिरी रुमाल काय उडती मौजेन। टकमका पाहती शाही झळकती रुप्याचें म्यान ॥ भला होता सरदार त्यासी चला कीहो पाहूं ॥ ७

इतकें वचन ऐकितां भाऊला ईर चढली फार ॥ चंदी चंदावर दिल्ली ओरंगाबाद शाहर। उदंड घेतले किल्ले काय या खेड्याचा पाडीबार ॥ आकीवाटच्यासाठीं बुडालीं कैकांची घर ॥ मारून चकाचूर गांव करुं बरोबर ॥ चहूं वेशीला च्यार शिड्या लावा लौकर ॥ आंतल्यांनी मारा केला आगीचा फार ॥ वहिल्या वेशीनें हल्ला चढली हर बोला सार ॥ खायले वेशीने लव्हार दोघे जाहले तयार ॥ ढाल पट्टा

कंदास—बरकंदाज–बंदुकवाले. भांडे—तोफ. दोन कोतवाल हत्ती इ.—दरवाजा फोडण्यासाठी. तीनशे साठ मुडदे इत्यादी—आपले तीनशे साठ शिपाई या असल्या भिकार ठाण्याच्या हल्ल्यांत पडले याचे भाऊसाहेबांना वैषम्य वाटलें. आम्ही धाक–मूळ शब्द आबधाक असा असावा. आबधाक म्हणजे दहशत किंवा भीति. भावार्थ ज्या माझ्या फौजेचा सकळाला दर्प वाटे ती माझी फौज आबधाकली, माझे तीनशे लोक मेले. आतां मी पेशव्यास तोंड कसें दाखवूं असा भाऊसाहेबांस त्वेष आला.

चढवून आला हणमंता झोर ॥ बलभीमाचें नांव घेतां लगी आहे समशेर ॥ समशेरीनें लोक कापलें अवघे लहान थोर ॥ अशुद्धाचे पाट चालिले वेशी बाहेर ॥ कौरव पांडव झुंजले जाहला संव्हार ॥ जाळी मधि व्याघ्र कोंडून केला की हो जेर ॥ दोघे लव्हार ठार पडले हणमंता झोर ॥ भले होते लव्हार त्यासी चला कीं हो पाहूं ॥ ८

आकीवाट घेऊन भाऊ यशवंत झाला ॥ चौघडा वाजवीत शहर पुण्याशी गेला ॥ सवाई माधवराव नाना फडणीस बोलला ॥ महाराजाचा कळस तुम्ही कैसा पाडिला ॥ नऊलाखाचा खर्च जाहला सांगी पेशव्याला ॥ शिरोळा मधि ठाणें फौजा गेल्या देशाला । करूनिया वस्त्रें भाऊला परगणा दिला । येथून जाहला पोवाडा आईका सांगेन तुम्हाला । धीनगीरी गोसावी शिव प्रसन्न त्याला ॥ म्हणे मानशिंग भोवान। रजपूत गातो सभेला ॥ किती गासी नागीशा आतां किंमत तुझी पाहूं ।। आकींवाटावर हल्ला नेमिली सैन चला जाऊं ॥ ९

गंगाधर फडणीस इत्यादी—“ गंगाधरपंत यांस गोळी लागल्याचा मजकूर लिहिला तो कळला. कुरुंदवाडास गेले. देहावसान झालें. स्त्रीने सहगमन संपादिलें हेंहि वर्तमान कळलें. मोठी वाईट गोष्ट जाहली. गंगाधरपंतासारखे मनुष्य होणें नाही. ” वासुदेव सदाशिवाचे मिरजकर गंगाधर गोविंदरावास पत्र [खरे पान ३४८४]. पडिबार—प्रतिष्ठा. गांव करू बरोबर—जमिनीबरोबर, जमीनदोस्त. वयली खायली—वरची व खालची. करूनिया वस्त्रें—वस्त्रें देऊन.

महादजी शिंद्यांचा पोवाडा

१

(शाहीर काशीराम)

मानवी तनू अवतार धरूनी केली चौदेशी सीमा ॥ माहाक्षेत्री जन्मले केवळ विषकंठ प्रतिमा ॥ मारूनि आरते जेर जेर केले नसे कुणाची तमा ॥ मारवाड गुजराथ आटकवर रिपुशी आणिले दमा ॥ महाराज श्रीमंताशी मान्य ॥ शिंदे माहादजी क्षेत्री जन्मले केला वंश धन्य ॥ धृ० ॥ १

हरिभजनी निशीदिनी ज्याचे शुर प्रतापीमहा ॥ हे वारण झुलती सदोदित प्रत्यक्ष नयनीं पाहा ॥ हुट अंबीर जयाचा सर्वांवरता शाहा ॥ हाल धराया कवण न दिसे करी पावन तृण दाहा ॥ साहेब पट्टं देईना न्यून ॥ २

मानवी तनू अवतार धरूनी—ईश्वर ज्याप्रमाणें मनुष्यदेह धारण करून अवतारकृत्य करतो त्याप्रमाणें जणूं कांही महादजीच्या रुपानें ईश्वरानें असामान्य कृती केली. महादजी अवतारी पुरुष होता. **चौदेशीं**—चारी दिशांस म्हणजे सर्वत्र. **सीमा**—मर्यादा. भावार्थ—दशदिशांत पराक्रम किंवा ख्याति गाजविली. सीमा करणें म्हणजे शर्थ करणें, पराक्रम करणें. हा शब्दप्रयोग ऐतिहासिक पत्रव्यवहारांत नेहमी आढळतो. **क्षेत्री**—क्षत्रिय. महाक्षेत्री म्हणजे क्षत्रियोत्तम किंवा वीरपुंगव. **विषकंठ**—Huge, Vast, disproportionataly large (मोल्सवर्थ). **प्रतिमा**—ठाणमान, शरीरयष्टि. महादजी शिंदे अंगानें स्थूल, वर्णानें काळा, विष प्राशन केलेल्या शंकरासारखा मुद्रेनें उग्र होता. त्याला अनुलक्षून 'केवळ विषकंठ प्रतिमा' असें शाहीरानें वर्णन केलें आहे. केवळ म्हणजे मूर्तिमंत. **आरते**—अरि ते असें पाहिजे. अरि—शत्रू. **जेर-जेर केले**—मूळांत जर्जर केलें असें असलें पाहिजे बाकी जेर करणें आणि जर्जर करणें दोहोंचा अर्थ एकच. **तमा**—भीति, पर्वा. **दमा आणणें**—दमास आणणें म्ह. दमविणें, निर्बल करणें. **आटकवर**—अटकेपर्यंत. **हरिभजनि निशिदिनी**—महादजी मोठा भगवद्भक्त होता व साधुसंताच्या मागें पुष्कळ वेळां असे. तो पायांत चाळ घालून केव्हा केव्हां भजनहि करी. त्यानें कांही भक्तिपर पदेंहि रचलेलीं आहेत.

दया शांती गुरुभक्तीचा अखंड आनंद ॥ दर्पे रिपु कांपती स्थापिले बाच्छाई पद ॥ दर्शन होतां माहावीराचें उतरती मद ॥ दखण नवखंडांत बादली शूरत्वाची बीरद ॥ पूर्वी आचरले बहु पुण्य ॥ ३

हरिभजनि इत्यादि—या दुसऱ्या सबंध चौकाचा अन्वयार्थ नीटसा लागत नाही. वारण व हुट म्ह. उंट हे शब्द लक्षणेनें महादजीच्या पराक्रमी सरदाराविषयीं, असें समजावयाचें कीं काय ? पण पुढें अंबीर म्ह. हंबीर शूर सरदार असा शब्द आलाच आहे. "महादजी निशिदिनि हरिभजनि (निमग्न आहे) त्याचे महाप्रतापी शूर अंबिर कीं जयाचा सर्वांवर शह आहे, ते अंबिर व महादजीच्या लष्करांतले झुलणारे वारण म्ह. हत्ती व उंट प्रत्यक्षच नयनी म्ह. डोळ्यांनीं पहा" असा कांहीतरी ओढून ताणून अर्थ बसवावा लागतो. हाल धराया—मूळांत हाल शब्द नसून बल असा असावा. मोडी वाचनाची चूक असावी असें वाटतें. एखाद्याविरुद्ध बळ धरणें म्ह. त्याला विरोध करणें. महादजी विरुद्ध बळ धराया कवण न दिसें म्ह. महादजीला विरोध करील असा कोणीहि वरचढ समर्थ पुरुष दिसत नाही आणि जर कोणी विरोध केला तर महादजी, पावन म्हणजे अग्नि जसा तृणाचा दाह करून टाकतो म्ह. गवत जाळून टाकतो त्याप्रमाणें त्याचा नाश करतो. साहेब—साहेबा असें मूळांत असावें. मोडी लिपींत ब व बा हीं अखरें सारखींच दिसतात. साहेबा म्ह. पेशव्यास. गुरुभक्तीचा अखंड आनंद—मन्सूरशहा या फकीरास महादजीनें आपला गुरू करून त्याचें केवढें प्रस्थ माजविलें होतें तें सुप्रसिद्धच आहे. स्थापिलें बादशाही पद—स्वतःचें स्वतंत्र बादशाही पद निर्माण केलें असा अर्थ नव्हे, तर निराधार झालेल्या दिल्लीकर बादशहाला मदत करून त्याला तेथें निष्कंटक व सुप्रतिष्ठित केलें. दर्शन होतां इत्यादि—महादजीबाबास प्रत्यक्ष पाहिल्यावर मी मी म्हणणाऱ्या प्रतापी बाकेरावांचाहि गर्व परिहार होतो. दखण नवखंडांत बादली शूरत्वाची बीरद—दक्षिणेंत आणि नवखंड पृथ्वींत आपल्या शूरत्वाचीं म्हणजे पराक्रमाचीं बिरदें म्हणजे ध्वजा लाविल्या. बादली म्हणजे बांधली. बिरदें बांधलीं–ध्वजा लावल्या. बादली या शब्दाचा एक अर्थ भरजरी वस्त्र

जितेंद्रिय बुद्धीवंत उपमा साजेना दुजी ।। जिकडे जावें तिकडे फत्ते भले मर्द गाजी ।। जिलीब चाले घनघोर सदा तत्पर स्वामीकाजी ।। जितक्या तितक्या कळा प्रगटल्या दावी जगामाजी ।। वीर पाहुनी होती मौन ।। ४

सिंह प्रतापी आगळा तद्वत शिंद्यांचे वंशीं ।। सिंदे महादजी

असाही आहे व त्यावरूनच बादली निशाण म्हणजे जरीपटका. म्हणून महादजीनें नवखंड पृथ्वीत मराठ्यांचा जरीपटका फडकावला असाहि अर्थ घेतां येईल. बिरद–बिरीद या शब्दाचा अर्थ मोलस्वर्थ पुढीलप्रमाणे देतो. A thread etc. worn (around the arm etc.) as a badge or token महादजीनें दक्षिणेंत व नवखंड पृथ्वींत आपल्या पराक्रमाच्या निशाण्या ठेवल्या; तथापि दहावें खंड जें काशी तेथें मात्र त्याचीं निशाणी नाही. पेशव्यांनीं हिंदूचें पवित्र काशी क्षेत्र सोडविण्याविषयीं महादजीच्यामागें सतत भुंगा लावला असतांही त्याच्याकडून तें काम सिद्धीस गेलें नाही या दृष्टीने शाहीर दक्षिण व नवखंड पृथ्वी यांचाच उल्लेख फक्त करतो तें योग्यच होय. पण अर्थात् हा अभिप्राय मूळ शाहीराच्या मनांत असणें शक्यच नाही. **पूर्वी आचरिले बहुपुण्य**—पूर्वजन्मीं पुण्य केलें म्हणून या जन्मीं महादजीला अशी लोकोत्तर पराक्रमाचीं कृत्यें करतां आली असा भावार्थ. **गाजी**—विजयी, शूर. **जिलीब चाले घणघोर**—जिलीब—परिवार; बरोबरचा सैन्याचा जमाव वगैरे. घणघोर—अफाट, प्रचंड. **जितुक्या तितुक्या कळा प्रकटल्या दावि जगामाजिं**—जो जो यांत्रिक शोध नवा नवा सापडला त्याचा महादजीनें आपल्या लष्करासाठीं पूर्ण उपयोग करून घेतला. हें वर्णन महादजीच्या युरोपियन देखरेखीखालीं सुसज्ज झालेल्या तोफखान्याबद्दल व कवायती कंपूबद्दल आहे. **मौन**—मौन होणें म्हणजे चकित होऊन तोंडांतून शब्द न निघणें.

सिंहासन—वास्तविक बादशहांकडून सिंहासन मिळालें नव्हतें. महादजीस ज्या वस्ता वकील मुतलखीच्या मिळाल्या त्यांत सिंहासन नव्हतें. फक्त ढाल तलवार कलमदान, हत्ती, नालकी रोगणाची, सोनेरी कामाची

क्षेत्रीं जन्मले जाहीर पृथ्वीसी ॥ सिंव्हासन नालखी बाच्छायानें दिली श्रीमंतासी ॥ सीमा देह ठेविला स्वामी चरणापासी ॥ जाली त्रिभुवनी शुन्य ५

देश मुलूख संपदा आटकवर रयत ज्याची नांदे ॥ देऊनी आभय सदा निर्भय क्रिडतसे छंदे ॥ देखनाख समज षडाक्षरें महादजी शिंदे ॥ काशीराम शरण शरण आनंद ६

सायवानदार, भरजरी झालरीची पालखी इ. वस्तू होत्या. **सीमा**—अखेर. शिंद्याने पेशव्यांसाठी बादशहाकडून सन्मान आणवून जन्मभर केलेल्या एकनिष्ठ स्वामिसेवेचा कळस केला. पण एवढ्यानेंच संपलें नाहीं. त्यानें अखेर आपला देहहि धन्याच्या पायाजवळच ठेवला ! महादजी शिंदे पुणें मुक्कामींच वानवडी येथें वकील मुतलखीच्या समारंभानंतर लवकरच वारला, या गोष्टीस अनुलक्षून असें म्हटलें आहे. **त्रिभुवनीं**—त्रिभुवनें असें पाहिजे. **देखनाख समज षडाक्षरें महादजी शिंदे**—देखनाख या शब्दाचा अर्थ कळत नाही.' तर्कानें पुढील अर्थ बसवितां येईल. महादजी शिंदे या सहा अक्षरी शब्दाचा उपयोग 'देखनाख समजे'-सारखा म्हणजे द्वाहीसारखा होत असे. जुन्या काळीं कोठलेंहि काम तहकूब करावयाचें असलें म्हणजे राजाच्या नांवाने द्वाही देण्याची पद्धत असे. ती दिली कीं प्रत्यक्ष राजानें केलेल्या हुकुमासारखीच त्याची ताबडतोब अंमलबजावणी होई.

महादजी शिंद्यांचा दुसरा पोवाडा

या पोवाड्याचा शाहीर मल्हारी नावाचा आहे. पोवाड्याचें शेवटीं तो आपली माहिती अशी देतो. " गोविंदराव गुरुराज धन्य होऊन गेले मोतीदाणा । सुर मर्दांचे गाति पवाडे शेहर जुन्नर ठिकाणा । बाळमती अज्ञान गातसे मल्हारी कवि राजवरा । बहेरू करतो रंग सवाई चंग वाजवी तऱ्हा तऱ्हा ॥" या तुकावरून हा मल्हारी शाहीर जुन्नरच्या गोविंदराव साळी नामक अति सुप्रसिद्ध शाहीराचा शिष्य होता व बहिरू नांवाचा त्याचा एक साथीदार होता ही माहिती कळते.

गोविंदरावी लावण्या पोवाड्यांचें एक अगदी जीर्ण हस्तलिखित बाड आमच्यापाशीं आहे. त्यांत शेंदीडशें लावण्या, गण व पोवाडे आहेत. मात्र त्यांतील लावण्या एकट्या गोविंदरावाच्याच नसून मल्हारी, राणू वगैरेंच्याही आहेत. येवढी गोष्ट खरी कीं त्या सर्व गोविंदरावाच्या सांप्रदायिकांच्या आहेत. या अशा जुन्या बाडांतून कर्त्यांची वर्गवारी केलेली कधींच नसते. प्रत्येक लावणीचा शेवट वाचून आपणासच ती करावी लागते. पण तरी सुद्धां ती वर्गवारी बरोबरच होईल अशी आशा नको. कारण हे शाहीर आपल्या कवनाच्या शेवटीं कर्त्यांचे, साथीदारांचें, नाच्याचें, नायकिणींचें, गुरूचें अशीं अनेक नांवें घालितात. व शेकडा पाउणशें उदाहरणांत नक्की कविता कुणाची हें सांगतां येत नाही. पुष्कळांनी, प्रभाकराच्या लावण्या पोवाड्यांचें छापलेलें पुस्तक वाचलें असेल. त्यांतल्या कांही कविता गंगु हैबतीच्या, महादूच्या, गंगाधरांच्या वगैरे निरनिराळ्या लोकांच्या आहेत. पण त्या सर्व प्रभाकराच्या म्हणूनच छापल्या गेल्या आहेत. पण यापैकी सूक्ष्म परीक्षणाच्या अभावामुळें संपादकाकडे जेवढा दोष येतो तेवढा वगळल्यास बाकी सर्व दोष शाहीराकडेच जातो. आमच्या जवळ असलेल्या बाडाची हीच स्थिती आहे. त्यांतील सर्व कवनें आम्ही बहुधा बारकाईनें वाचलीं आहेत व त्यावरून आम्ही असें म्हणतो कीं, त्यांत मुख्यतः गोविंदराव साळी व त्याचा शिष्य मल्हारी यांचींच कवनें आहेत क्वचित राणू न्हाव्यासारख्याचींही कांहीं आहेत.

सदर बाडांतील कवनांचें बऱ्याच बारकाईनें परीक्षण करून त्यावरून गोविंदराव साळी व प्रस्तुत पोवाड्याचा कर्ता मल्हारी याच्याबद्दल जी

माहिती मिळते तिला सारस्वतकार भाव्यांच्या माहितीची जोड देऊन ती थोडक्यांत पुढें मांडतो.—

गोविंदराव शाहीराचा आजा व बाप हे दोघेहि फार प्रख्यात होते. त्यांची चांगल्या विद्वानांत व वरदी पुरुषांत गणना होई. आजाचें नांव गणोजी व बापाचे नांव भिवाजी, आडनांव भागवत. गोविंदराव स्वतःला गोविंदराव साळी असें अनेक वेळा म्हणवितो. हा गोविंदराव जुन्नरचा राहणारा. "गोविंदराव साळी जुन्नरचा कवि तो भारी" किंवा "गोविंदराव करि शाहिरी। शेहर जुन्नरी गड शिवनेरी" किंवा "गोविंदराव कवि वास्ति शेहर जुन्नरी" असे अनेक स्पष्ट उल्लेख त्यानें केलेले आहेत. तो तुरेवाला होता. त्याच्या शिष्यांचीं व फडकऱ्यांचीं नांवे शेल्याबा, मल्हारी, बहिरू, बापू, राणु, देवजी, विठू, आबा, संतु, रामा, शिवराम भिमा, भवानी, राघु, यमाजी, गंगाराम, रावजी, हरी, पांडु, राधा यांपैकीं हरी, पांडु, शिवराम वगैरे आदा करीत राधा कोकिळेसारखी गोड गाई व बाकीचे सर्व स्वतः कवनें करणारे, साथ करणारे गायक असत.

बाडांतील एका लावणींत गोविंदरावाने आपल्या समकालीन शाहीरांचें नांवनिशीवार स्मरण करून त्यांना नमन केलें आहे. त्यांत त्याने साताप्पाचा व बाळा बहिरूचा उल्लेख केला आहे. होनाजीचा नाही, त्याअर्थी सवाई माधवरावाच्या कारकीर्दीच्या आधी गोविंदराव होऊन गेला. खुद्द या महादजीच्या पोवाड्याच्या शेवटीं मल्हारी म्हणतो त्यावरूनहि १७९४ सालीं तरी गोविंदराव हयात नसावासें वाटतें.

महादजी शिंद्यांचा दुसरा पोवाडा

१०

(शाहीर–मल्हारी)

सोडुन सारा राज्यपसारा निघून गेले शीवपुरा । पाटिल–बावा येकनिष्ट म्हणून किरत वाढली दिगांतरा ॥ धृ ॥

रघुनाथाचे पूर्ण प्रतापी भक्त जसा काय हनुमंत । तसेंच श्रीमंताचे सेवक पाटिलबावा म्हणवींत ॥ ज्या पुरुषानें हिंदुस्थानी जाऊन केले आदभूत । महाल मुलुख गडपहाड घेतला गड्या करुनिया दिकत ॥ रांगडे न राठवडे

शीवपुरा—कैलासास. **किरत**—कीर्त, कीर्ति. **आदभूत**—अतर्क्य पराक्रम; **गडपहाड**—डोंगरी किल्ले. **गड्या**—गढया. **दिकत**—मोडी वाचनाची चूक. हिंमत असें असावें. **गवसुन आपल्यांत**—आपल्या ताब्यांत घेऊन किंवा रहस्यांत घेऊन. **गोज**—गोहद--गोहदचा किल्ला घेण्यास महादाजीस तीन वर्षें लागली ! आपाजी रामाचे नाना फडणिसास पत्र २६-२-१७८४ चें " इकडील वर्तमान तरी राजश्री पाटील बावानी गोहोद भोंवत्या फौजेच्या व पलटणांच्या चवक्या बसवून रस्त बंद केली याजमुळे लढाईखेरीज राणा जेर जाहला. नंतर फाल्गुन शु॥ पंचमीस किल्ला सोडून राणेखानभाई व बाळाजी अनंत पागेनीस यांचे विद्यमानें येऊन भेटला. श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून हें यश राजश्री पाटीलबाबास तीन वर्षें श्रम केल्याचें ईश्वरें दिल्हें येणेकरून या प्रांतीं तमाम संस्थानिकांवर दबाव बसला ". (Historical Papers relating to Gwalior State Vol. III P. 73) केसो भिकाजी व विठ्ठल शामराव यांचें नाना फडणविसास पत्र—ता. ४ मार्च इ. स. १७८४ "सांप्रत चंद्रमजकुरीं दोन घटका रात्रीं गोहज फत्तेचीं पत्रें राजश्री माधवराव गंगाधर यांचीं साता दिवसांचीं बाईस आलीं. तीं तीन घटका रात्रीं राजश्री वासुदेव चिमणाजी यांनी नेऊन बाईस वाचून दाखविलीं. त्यांत मजकूर कीं, " किल्यास फौजेचा वेढा होता. मोरचे लागू जाले व दोन सुरुंगही तयार झाले. एका दो दिवसां दारू भरून उडवावे. तें वर्तमान आंत

राजरजवाडे गवसुन आपल्यांत पानपताच्या पल्याड फवजा गेल्या अटकेपर्यंत ॥ गोजसारखा किल्ला घेतला लवकिक साऱ्या मुलखांत । गुलाम कादर बाच्छा मारून भोगित होता दवलत ॥ महाराजानें सूड घेतला धरुन आणिला जीवन्त । पुरता वळखुन हुकूम केला सत्वर कीजे पारिपत ॥ तीरमार करुन मारिले निमकहारामी चाकरा । वाच्छा-

---

राण्यांस कळलें व अडीच शेर धान्य वगैरे गिरानी फारच जाली. तेव्हा फाल्गुन शुद्ध चतुर्थीस गोहजवाल्याने बाहेरील कारभारी यांसी भानगड भेटीची लावली. कारभारी यांनी पाटीलबाबांस श्रुत केलें. पाटीलबाबांचा आग्रह कीं सुरुंग उडवून गडी घ्यावी. परंतु गोहजवाल्याने आग्रह फारच केला. अशी घालमील जाब सालाची लागलीच होती तों शुद्ध पंचमीस पन्नास स्वार व कांही पायदळ इतक्यानिशीं बाहेर येऊन भेटीस येतों म्हणून सांगून पाठविलें. यांनीहि, कारभारी यांनी पाटीलबाबांस सांगून भेटीस आणिला. भेटी जाल्या. डावे बाजूस उतरावयास जागा दिली. षष्ठीस कबिले बाहेर काढून ठाणें संध्याकाळीं सरकारचें जाणार. श्रीमंतांच्या पुण्यप्रतापें करून किल्ला फत्ते जाला पाटीलबाबांस महत् यश आलें.' (महेश्वर दरबारचीं पत्रें इतिहाससंग्रह लेखांक १२५ पृ. २४१-२४२.) **बाच्छा मारून**—बादशहाला गुलाम कादरानें अत्यंत छळलें परंतु ठार मारिलें नव्हतें. ९ सप्टेंबर १७८८ चे जोधपूरचे नानांस सरकारी बातमीपत्र. त्यांतही "चवथे दिवशीं रोहिल्यास उरावर बसवून खंजिरानें पोट चिरिलें. मारला. याप्रमाणें सार्वभौमाची गत केली" असा मजकूर आहे मग शेंकडो कोस दूर पुणें प्रांतांत राहणाऱ्या अडाणी शाहीरानें 'बादशा मारून भोगीत होता जुनाट दौलत' असें म्हटलें तर तें स्वाभाविकच आहे. (इतिहाससंग्रह पु. ६ अंक १–२–३) **महाराजानें**—महाराज ही महादजीची पदवी. **कीजे**—करावे. **पारिपत**—पारिपत्य.

तीरमार करून मारिले निमकहरामी चाकरा—५ मार्च १७८९ चें पत्र. दिल्लीहून नाना फडणिसास विठ्ठल हरी व गंगाजी आव्हाड या बातमीदारांचें. "इकडील मजकूर तरी गुलाम कादर याजला इतके दिवस ठेऊन द्रव्यांश पाहिला तो कांहीं साधला नाहीं. नंतर फाल्गुन शु. ४ स त्याचे

यजादि खुशाल झालि म्हणे मी फेडिन उपकारा ॥ बाच्छायजादी खुशाल झाली मेला गुलाम कादर । माझ्या पित्याचा सूड घेतला धन्य मराठा सरदार । रूमचे बाच्छास गेले फर्मान हे घेऊन हलकार । ऐकुनया खुशवंत

पांच पाट काढून उंटावर बसवून लष्करांत फिरविला. दुसरे दिवशीं नासिक हीन केलें. मागती फिरविला. तिसरे दिवशीं सर्व अंग हीन करून डोळे काढून पादशहाकडे पाठविले. व त्यास बाहीर काढून मारुन टाकिला " (इ. सं. दिल्ली येथील मराठ्यांची राजकारणें भाग १ पत्र ३७८).

७ मार्च १७८९ चें गोविंदराव पुरुषोत्तम यांचें नाना स्वामीस पत्र इ. सं. दि. म. रा. भा. १, पत्र नं. ३८०.

" हल्लीं वर्तमान तरी गुलाम कादर याचे डोळे, नाक, कान काहाडून दिल्लीस पातशहाकडे राजश्री पाटील बावांनी पाठवून दिलें व मशार निल्हेचे बंद बंद वेगळे करून जीवें मारिला ".

गुलाम कादराशीं लढाई, त्याचा मोड, पळ, धरपकड वगैरेसंबंधीं अस्सल माहिती पत्र नं. ३७ पृ. ३६६. Historical papers relating to Gwalior State Vol. III पत्र नं. ८२-८३-८४ व मराठी दप्तर रुमाल ३ रा यांत पहावीं.

बाछयाजादी खुशाल झाली—कोणती तें नक्की लक्षांत येत नाही. " बादशहाचे डोळे काढल्यावर गुलाम कादराने अदमासे १९ शहाजादे कैद करून बरोबर नेले. आंधळया बादशहाजवळ फक्त एक बेगम मात्र सोडून गेला आहे. " (इतिहास संग्रह दिल्ली येथील मराठ्यांची राजकारणें भाग १, पा. २७३) तीच ही बादशहजादी काय? **रूमचे बाच्छास गेले फर्मान**—" शहाकडील वकील काबूल खंदाराहून राजश्री पाटीलबाबाकडेस आला आहे. त्याणें वस्त्रें बहुमान भारी मरातबाचा आणून दिल्हा आणि पुढें बोलणें सल्लखाचे आहे कीं लाहोरपर्यंत श्रीमंतांचा अंमल बसवावा. आणि लाहोरापलीकडे अटकपर्यंत आमचा अंमल असेल. याजप्रमाणें तहनामा श्रीमंतांचा व्हावा. ज्यासमयीं श्रीमंतांचे सरकारांत फौजेचे कुमकेस प्रयोजन पडेल ते समयीं आम्हास हुकूम करावा म्हणजे दोन चार दस्ते पाहिजेत तेव्हां पाठवून देत जाऊं. अथवा

मानला मनास आणिला वीच्यार ।। दस्तक वंदुन शिरी फिरून बंदगी लेहिले हाजूर । दिधले ते श्रीमन्ता अर्पण मी हुकुमाचा चाकर ॥ शिंद्यांचा भावार्थ पाहुनी बाच्छा म्हणती फार बर । त्याचे नांवे दुसरा सरंजाम धाडला सत्वर ॥ बाच्छाची वजिरात तुम्ही कारभार आपला सर्व करा। म्हणउन बाच्छा तक्ति स्थापिला दुष्मन मोड्डुन केले चुरा ॥

बुद्धीचे सागर करीती दिल्लीचा बंदोबस्त । बाच्छायाची दोही फिरली महाराजाची सलाबत ।। जयपुरवाला लढाई घेऊन तोहि आणिला कवलात । श्रीमन्ताचि कुमक गेली अलीबहादर खाजगत ॥ सामोरे भेटाया आले सडी स्वारिची गणीत । लक्ष स्वार शिवाय पायदळ गज अंबाऱ्या बहूत ॥ देशोदेशिचे राजे चाकर जिवबादादा संगात । खाशाच्या अंबाऱ्या दिडशें

आम्हांस इकडे मसलतीचे कामकाज पडेल ते समयीं आपण आमची कुमक करावी. स्वामी म्हणतील कीं दस्ता किती फौजेचा? त्यास १०००० स्वारांचा असतो. याप्रमाणें त्याची चाल आहे. व बोलणेही खचित आहे. इतकी गोष्ट व्हावयाचें कारण तरी, गुलामकादराचे पारिपत्य कोणाच्यानें जाहलें नव्हतें आणि ती गोष्ट यांचे हातून जाहली ! याजमुळे शाहानें खुसी बहुत मानिली. हल्ली शहाकडील खिलत वकील येऊन आला आहे." (Historical papers relating to Gwalior State vol. III पत्र नं. ८६, पा. १३५, १३ मार्च १७८९ चें पत्र.)

हलकार—जासूद, हलकारा.हलकारा आणि हरकारा एकच. खुश-वंत मानला–खुशवक्त मानला,समाधान झाले,आनंद झाला. दस्तक—पर-वाना,राजपत्र. बंदगी—सलाम, प्रणाम. हाजूर–हुजूर. दोही—द्वाही. सलाबत—जोरा,अंमल, धाक, वचक,दरारा. कवलात आणणे—ताब्यांत आणणें, पराभव करणें. खाजगत—कुटुंबापैकीं, कुटुंबीयांपैकीं. खुद्द पेशव्याचा प्रतिनिधी म्हणून अलीबहादुरास सैन्य देऊन पाठविला. वास्तविक आलीबहाद्दराच्या लोकानींच गुलाम कादरास पकडला होता. अर्थात गुलामकादर प्रकरणानंतर अलीबहाद्दरास पाटिलबावाकडे पाठविले हा कालविपर्यास आहे. सकळिक—मूळ शब्द संकालित असा आहे. संकलित म्हणजे संक्षेपानें. गोसाव्यावरुनी पडले

म्या सांगितल्या सकाळिक ॥ श्रीमन्ताची माया जाणुन येउन भेटले खुष-वक्त । किती येक दिवसावर गोसाव्यावरुनी पडले द्वैत ॥ होळकरांनी त्या गोष्टीची करून दिधली समजूत । पाटलाचि मर्जी फिरली आम्हास जाणें दखनेंत ॥ दिवाणजीसि आज्ञा केली मुलुख आपला जतन करा । आम्ही जातो स्वामिदर्शना दिला कुचाचा नगारा ॥

द्वैत—भांडण, वैर. महादजीस फार मोठा आजार झाला कशा-नेहि गुण पडेना तेव्हा तत्कालीन समजुतीप्रमाणे जयपुरकराने अनुष्ठानास ब्राह्मण घालून महादजीवर प्रयोग केला असें ठरलें. त्याचप्रमाणें खुद्द महादजीच्या लष्करांत हिम्मत-बहाद्दर नांवाचा गोसावी सरदार होता. त्यानेंहि अनुष्ठान घातल्याचें उमगलें. तेव्हा त्यास पकडून ठार मारावा म्हणून शिंद्याच्या लोकांनी त्याच्यावर छापा घातला. पण तो मारामार करीत शिंद्याच्या तळाजवळ अलीबहाद्दराचा तळ होता तेथे जाऊन जरीपटक्याखाली उभा राहिला. अलीबहाद्दर हा पेशव्यांच्या प्रतिनिधी म्हणून आलेला होता. अर्थात खास पेशव्यांच्या निशाणाखाली आश्रयास गेलेल्या इसमाला महादजीस बलात्कारानें काढून नेणे अशक्य झालें. व त्यामुळे महादजी व अली-बहाद्दर यांच्यांत फार मोठा कलह लागला. त्यासंबंधीची खुलासेवार समकालीन पत्रें Historical papers relating to Mahadji Shindia, Edited by Sardesai 1937. या ग्रंथांत व मराठी दप्तर रुमाल ३ यांत पुष्कळ छापलीं आहेत.

गोस्वामी राजेंद्रगिरी हे काशी येथील सुप्रसिद्ध अटल आखाड्याचे महंत. या आखाड्यानें पूर्वी औरंगजेबाचे सैन्याचा पराभव करून विश्वेश्वरा-जवळील अटल आखाड्याची जागा काबीज केली होती. पेशव्यांसही या आखाड्यानें नेहमीं मदत केली. राजेंद्रगीर हा अयोध्येचा नबाब सफदरजंग याचा सेनापतीही होता. तो १७५४ सालीं दिल्लीच्या लढाईत ठार झाला. राजेंद्रगिरीस उमरावगीर व अनुपगीर असे दोन मुलगे होते. त्यांचे जन्म अनुक्रमें सन १७३० व १७३४ मध्यें झाले. त्यांनाही लखनौच्या नबाबानें ‘ राजा ’ किताब अर्पण केला. पानपतच्या युद्धांत हे

निज कार्यावर लक्ष्य ठेविलें चालुन आले दखणेंत। मोगलाच्या मुलखात खंडण्या घेऊन पाडली धाशत ॥ तुळजापुर करून लग्न लाविले येवोनिया खरड्यांत। सत्त्वर गच्चि (?) कुच्चे केला भेट घ्यावया उद्युक्त ॥ आले पुण्यासी पुल्लापासी राहत राव जे समयेत। शेहरामध्ये आवइ पडलि होति घरोघरि खलबत ॥ नाना फडणिस श्रीमन्ताप येउन दावीयेले वाड्यांत। केलि तयारी फऊज सारी सडी स्वारी शोभीवन्त ॥ सुयेळ सुमोहोर्त पाहाति जोतिसि ज्ञानीवन्त। परशराम आवतार बैसले अंबारीमधे श्रीमन्त ॥ वाजे धवशा केला तमाशा पहाया मिळती समस्त। राव आले म्हणून आयेकुन पाटिल हात बांधुन मोहोरे येत ॥ पायउतारा होऊन स्वामिचे चरणी

दोघे बंधू आपल्या धन्याच्या बाजूने पेशव्यांशीं लढले. यांच्याच चकमकींत होळकरास जखमा लागल्या परंतु पुढें याच उमरावगिरानें विश्वासराव, तुकोजी शिंदे, संताजी वाघ व यशवंतराव पवार या चौघांचे मुडदे तीन लक्ष रुपयांस सोडवून घेऊन त्यांस विधियुक्त संस्कार करविला. १७६३ सालीं झालेल्या बकसारच्या लढाईत अनुपगिरानें फार पराक्रम केला. १७६६ सालीं हे दोघे बंधू पेशव्यांविरुद्ध जाटाच्या बाजूने लढले. १७८१मध्ये दिल्लीचा मुख्य वजीर नजबखान यानें जयनगरावर स्वारी करून त्या प्रांताचा बंदोबस्त अनुपगिराकडे सोपविला. त्यानंतर १७८४ सालीं त्याचे पोवाड्यांत वर्णन केल्याप्रमाणे महादजीशीं वितुष्ट आलें. पण तो त्यांतून बचला एवढेंच नव्हे, तर अलीबहाद्दराचा कायमचा मित्र बनला. पुढे १८०४ सालीं अनुपगिरानें इंग्रजांशीं तह केला व थोड्याच दिवसांत तो मरण पावला. (गोसावी व त्यांचा संप्रदाय भाग १ पृ. २३६ ते २५५. ले. गोस्वामी पृथ्वीगीर हरीगीर, यवतमाळ.)

सत्वर गच्चि कुच्चे केला—सत्वर मगची कूच केला असें मूळांत असावें. **जे समयेत**—जावत्कालपर्यंत. **दावियेले**—राहियेले असें मूळांत असलें पाहिजे. **परशराम अवतार इ.**—(खरे ऐ.ले.सं.भा.९ पत्र नं. ३४८१ व ३४८२) सवाई माधवरावाला परशुरामाचा अवतार समजत असत.

हात बांधुनी—राजाची दरबारांत किंवा इतरत्र गांठ घ्यावयाची त्या वेळीं रुमालाने हात बांधून भेट घेण्याची दरबारी पद्धत असे. ही पद्धत

मस्तक ठेवीत । मर्यादा पाहताच आवघे लोक जाहले विस्मीत ।। निरअभिमाने मिठी घातलि म्हणे स्वामि करुणा करा । पूर्व जन्मिचे सुकृत म्हणुनि पाय लाधले परमपरा ।।

माळ घातलि गळ्यांत उचलुन मस्तक दिधलें आलिंगन । पाटिल म्हणाति दर्शन होता विच्छा झाली परिपोर्ण ।। नाना भेटुन लोक भेटले विडे वाटले मौजेन । तोफा सुटती वाद्ये वाजाति आनंद पाहति सर्व जन ।। चतुराइ नानाचि लवकर रावसाहेबासि उठऊन । भेटी नंतर उठाउठि आले माघारा परतून ।। कितेक दिवसाउपर पाटिल तळ ढाळति ते तेथून । दुसऱ्या जागा उतरूनि तेथुन पुन्यामंदि येणे जाणें ।। पाटिलबावा श्रीमन्ताप विचार करिती बसून । बाच्छायाने नालकि दिधली ते सेवावी आपण ।। माझ्या नावे दुसरि जें तुह्मि द्याल तेंच मी घेईन । मान्ये केले रावसाहेबाने उदइक आहे शुभदीन ।। दुसऱ्या जागा डेरे द्यावया

तुर्कस्तानांतील ऑटोमन राजवटींत प्रथम पडली. कारण तेथल्या एका राजाला एका शत्रूच्या वकिलाने दरबारांत बोलणें करीत असता अचानक तरवार उपसून दग्याने ठार मारिले. यासंबंधी माहिती श्रीमंत राजे तात्यासाहेब मिरजकर यांनी नुकत्याच लिहिलेल्या ऑटोमन घराण्याचा इतिहास या पुस्तकांत आली आहे. आपणाकडेहि ही पद्धत रूढ होती. पुढे तिला दरबारी स्वरूप आलें. म्हणजे मनुष्य ज्या हुद्दयाचा असेल त्याप्रमाणें रुमालानें नाहीतर हारानें हात बांधून राजास भेटण्याची प्रथा पडली. सवाई माधवरावाच्या लग्नांत पुण्यास सवाई माधवरावानें छत्रपतीची भेट हार हातास बांधूनच घेतल्याचें वर्णन पेशवे बखरींत आहे. रणजितासिंगाच्या दरबाराचें एक चित्र प्रसिद्ध आहे त्यांत त्याचेभोवती बसलेल्या सर्व सरदारांच्या कमरेस नुसतीच तरवारींची मेणें आहेत तीं देखील वरील कारणांसाठीच. (European adventurers of North India 1785-1849 by C. Gray.) **परमपरा**—पामरा असा शब्द मुळांत असावा. **माळ घातली गळ्यात इ.**—इ. सं. पु. १ ऐ. टि. "पाटील बोवांनीं श्रीमंतांच्या पायावर डोई ठेवली आणि भेटले. श्रीमंतांनी आपले गळयांतील मोत्याची माळ पाटीलबोवांचे गळ्यांत घातली." **उठाउठि**—ताबड-

दूर लष्करापासून। आज्ञेवरूनि अरास केली बंदोबस्तिनें चहूकुन ॥ साहेब येऊन बसुन नालकित ल्यालवि बाच्छावि थेट बरा। माहे मोर्तबा पुढे चालले लोक स्वारिचा हाकारा ॥ घर बसल्या ही द्यावी दवलत धन्य महादजी पाटील। भावार्थानें सेवा केली नांव धन्याचं वाढविलं ॥ नालकीत बैसून राव मिरवीत पुन्यामधि चाललं। आनन्द झाला जन लोकाला सर्व मानिती नवल ॥ शिंदे फडके अप्पा बळवंत दोहि बाजूला शोभल। आटोकाट सरदारासुद्धा वाड्यामधि दाखल झाल ॥ मानकरी मुत्सद्दी नाना फडणिस सदरे बईसले। तुम्हि अपले नालकींत बैसा प्रसन्न वदने सांगितलें ॥ बैसुनया नालकींत पाटिल मिरवत लेशकरा आल। असा आनन्द शहर पुन्यामधि राहुनया कौतुक केल ॥ नित्य धन्याच्या स्वारि-संगे रमण्यामाजि शोभले। झालि छावणि श्रीमंतानि खर्चीयासि पाठिवले ॥ उपरांन्तिक मग बसन्त आला होळि पुन्यामधि खेळले। कृष्ण गोकुळि खेळ खेळले

तोब, जलदीनें. उपर—नंतर. तळ ढाळणें—तळ बदलणें. श्रीमंताप—श्रीमंतापाशीं. ल्यालवि बाच्छावि थेट बरा—(?) 'चालती बाच्छाई थेट तऱ्हा' असें तर नसेल? भावार्थानें—भक्तीनें, एकनिष्ठेनें उपरांतिक मग बसंत आला इ. सालमजकुरी रंगाचा चत्म (चमत्कार) वाड्यांत फार चांगला झाला असल्या + + + त मंडप तयार करून मधील कारंजाच्या हौदांत रंग भरून तोटीवाटें रंग उडत होता. संध्याकाळच्या दीड प्रहर दिवसापासून दोन बोटा-एवढी धार रंगाची उडत होती. त्यांतील रंग घेऊन सर्वांच्या अंगावर टाकावा तो कोणी माणसा माणसांनीं मजलसीस रंग मोठे मोठें चार गुंड तीस तीस घागरीचे भरून ठेविले होते. पाटील बाबा आले सर्व मंडळी पुण्यांतील जमा झाली होती कोणी राहिला नाही दहा पांच वर्षांत असा रंगाचा खेळ कधी जाला नाही. बंब आणोन कारंजाच्या हौदांत मांडोन बावाने लोकांच्या अंगावर टाकला गुलाल व रंग उत्कर्ष (उत्कृष्ट) जाला. माणसास माणूस ओळखूं येईना याप्रमाणें खेळ झाला असे.

[बाळाजी माणकेश्वराचें पत्र रंगाचे समारंभासंबंधी]

पत्र १० मार्च १७९३ चें "उद्या शिंद्यांचे घरी मेजवानी

ऐसें कौतुक दाखविलें ॥ सचीव पन्तप्रधान त्याला महासंकटीं तारीले । गायकवाडाचि संचाणि करुनी साहेबास दिधल्या नजरा ॥ धन्याजवळ नानाच्या मत्ते गोष्टि केल्या दुर्धारा ॥

मरयादा रक्षुन धन्याचे कार्ये करिती तीं जपुन ॥ मर्जीकरितां बसुन राहिल आज्ञाधारक निपूण । आरोग्यकाया महाराजाचि सदा पुष्ट शक्तीवान ॥ सहजा सहजि जेवर आला म्हणून राहिले निजून । उपाय करिता अपाय होति कळले पुरे त्याचे चिन्ह ॥ प्राश्चित घेती शास्त्रयुक्त ती महामहा देती दान । घडिघाडि येति श्रमिन्त नाना खबर घ्यावया जलदीनं ॥ नाडि पाहतां कठिण अवस्था डोळा उरलासे प्राण । व्याकुळ झाले शब्द न चाले वाचेसि पडले मौन ॥

आहे. वाटेने रंग खेळत जावें असें ठरलें आहे" श्रीपतराव मोरेश्वर यांचें बाळासा पटवर्धनास पत्र.

सचीव पंतप्रधान इ.—रघुनाथ चिमणाजी सचीव वारल्यावर त्याचा मुलगा शंकराजी यास वस्त्रें मिळालीं. त्याचें व त्याच्या सावत्र आईचें भांडण लागलें. तो अगदीं नालायक होता; सबब पेशव्यांकडून बाजी मोरेश्वर कारभारी नेमून देण्यांत आला. पण त्यामुळे साचिव अधिकच श्रमिष्टासारखा वागू लागला. बाजी मोरेश्वर आणि आपली सावत्र आई यांचें सूत आहे असें वाटून त्याचें पित्त खवळलें. शेवटीं बाजी मोरेश्वराने जबरदस्ती करून सचिव जेजुरीस पळून गेला होता तेथून त्यास पकडून आणलें. गायकवाडाच्या प्रकरणानंतर सचीव प्रकरण पुढें आलें, शाहीराचा अनुक्रम निराळा आहे.

४ सचीव प्रकरण	२ एप्रिल १७९३ सुमार	खरे
३ गायकवाड प्र.	२८ डिसेंबर १७९२ सुमार	
२ शिंद्यांचे हिशेब	२७ डिसेंबर १७९२ सुमार	
१ रंग (खरे प. नं. ३५०२)	१७९३ सुमार	

मर्यादा—आदब, नम्रता. निपूण—निष्णात. आरोग्यकाया—निरोगी प्रकृति. जेवर—ज्वर. उपाय करितां अपाय होती—"हकीमजी आपले चालीचे जुलाब देत गेले. परंतु गुणास कांहीं आलें नाहीं. मंगलवार द्वादशीस प्रायः सकालपासून कफ जाला तो

अन्तीसमायि स्वामीपायि लक्ष लाविले प्रेमानं ॥ श्रीमन्तांनी आपलीं वस्त्रें देऊन पाटिल गौरविल ॥ कष्टी होऊन श्रीमन्त म्हणति राज्यातिल हें नीधान । डोहोडेहो शब्द ऐकुनि पाटिलनेत्र ढाळिति जीवन ॥ ते हो नाना अन्तरयामि बहुत श्रमि झाले जाण । पाटिल जाति निजधामासि कळुन आलें दुश्चिन्ह ॥ माघ शुद्ध त्रयोदसि बुधवार रात्र पहिला पाहारा प्राण सोडिला अकांत झाला अस्मानि तुटला तारा ॥

शक १७१५ प्रमादि संवत्सर वर्जले प्राणा ॥ त्या वेळे लष्करचे लोका त्राहे त्राहे भगवाना ॥ आभय देऊन समजावीति बंदोबस्त करिती नाना । केली तयारि जाउन सारि भरूनिया बार तोफखाना ॥ भागीरथीच्या उदके न्हाणुन प्रेत जाळले ततक्षणा ॥ दौलतराव बाबा गेले होते आंब्याच्या दर्शना ॥ बाबा फडक्यासंगे ठेविल्या पागा नेमुन रक्षणा । राव नाना ते आले पुन्यामाधि खबरा कळल्या सर्व जना ॥ पाटीलांचे कठीण दुःख रावसाहेबासि साहेना । युक्ति युक्तिनें समजावीति राज्याचे अवले नाना ॥ त्याच्यामागे कृपा करुनिया मुलापासुनि सेवा ध्याना । पाटिल स्वर्गि खुशाल होति जन्माचे सार्थक जाणा ॥ गोविंदराव गुरुराज धन्य ते होऊन गेले मोतीदाणा । शुर मर्दाचे गाति पवाडे शेहर जुन्नर ठीकाणा ॥ बाळमति अज्ञान गातसे मल्हारि कविराज बरा । बहिरू करितो रंग सवाइ चंग वाजवि तऱ्हातऱ्हा ॥

शैत्य उपचारामुळें जाला. दुसरी औषधें द्यावी म्हणोन पाचसात वैद्य जमा केले. उपचार करावा हे योजना करून औषधें चालू केली. परंतु लागू होईनात. चढ होत चालला. बोलणें राहिलें. बुधवार त्रयोदसी सायंकाळीं श्रीमत रा. नाना फडणीस समाचारास आले. अगोधरीह एकदोन वेळ आले होते. तेव्हा बोलणें परस्परे जाले. या वेळेस कांही बोलणें झालें नाही. वगैरे" (रत्नाकर वर्ष ३, अंक ४, स. १९२८, जगन्नाथ विश्वनाथाची लालाजी बल्लाळ गुळगुळे, मु. कोटा, यांस पत्रे)

श्रीमंतांनी आपलीं वस्त्रें देऊन पाटिल गौरविले—स्वतः पांघरलेलें वस्त्र श्रीमंतांनी देणें हा मोठा बहुमान. ही मोगली पद्धत आहे. Robes of honour–There were five degrees of khilat those of three, five, six or seven pieces or they might as a special mark of favour consist of clothes that the emperor had actually worn.

(Army of the Indian Moghuls–Irvine, Page 29)

सोलापूरच्या लढाईचा पोवाडा

अष्टयाची लढाई झाल्यानंतर सुमारें तीन महिन्यांच्या अवधींत पेशव्यांचे सातारा वगैरे किल्ले इंग्रजांनीं जिंकले. नंतर जनरल मनरो हा भीमा व घटप्रभा या दोन नद्यांमधील पेशव्यांचा मुलूख जिंकण्याच्या उद्योगास लागला. तो ७ मे १८१८ रोजीं सिद्दापूरजवळ भीमा उतरून आला. यामुळें पेशव्यांच्या सैन्याला परत मागें हटून सोलापूरचा आश्रय घ्यावा लागला. दुसऱ्या दिवशीं पाथ्रीजवळ सीना नदी उतरून इंग्रज सैन्य आणखी पुढें आलें व ९ मे रोजीं मराठ्यांनीं त्यावर तोफा-बंदुकांचा मार धरला होता, तरीहि अगदीं दोन मैलांवर तें येऊन ठेपलें. इंग्रजांनीं आपल्या लष्करांतील चेनसिंग सुभेदार नांवाचा एक हिंदु अधिकारी किल्ला सलोख्यानें खालीं करून द्या, असा निरोप देऊन किल्लेदाराकडे पाठविला. या चेनसिंगानें आजपर्यंत अनेक वेळां इंग्रजांच्या असल्या कामगिऱ्या फार उत्तम तऱ्हेनें बजावून गोळी न वाजतां ठाणीं इंग्रजांच्या हातीं पाडवून देण्यांत यश मिळविलें होतें, पण या वेळीं मात्र किल्लेकऱ्यांनीं त्याचा खून केला ! बोलणें करणाऱ्या वकिलास युध्यमान पक्षांपैकीं कोणीही दगा करावयाचा नसतो, असा युद्धनीतींतला सर्वमान्य दंडक आहे. तो मराठ्यांनीं अशा रीतीनें मोडल्यामुळें चिडून जाऊन इंग्रजांनीं सोलापूरच्या किल्ल्यावर हल्लाच करावयाचें ठरविलें.

किल्ला फार भक्कम असून, आंत दुहेरी तट होते, व किल्ल्याभोंवतीं खोल खंदक होता. किल्ल्याबाहेर लागूनच उत्तर व पूर्व दिशांना शहर किंवा पेठ होती व तिलाही भक्कम कोट होता. या शहरपेठेचे दोन भाग झालेले असून, त्यांपैकीं एक किल्ल्यास लागून होता. दक्षिणेस खंदकाला लागूनच एक मोठा तलाव होता; व त्या तलावाच्या तीन बाजू चांगल्या लहानशा टेकाडासारख्या उंच होत्या. यामुळे किल्लेकऱ्यांना दुहेरी रक्षणासारखा उपयोग होई. मराठ्यांकडे दोन हजार आरब, पंधराशें रोहिले, हजार सिद्दी, सातशें गोसावी, पांच हजार पायदळ व पंधराशें घोडदळ होतें. त्यांचें पायदळ डी पिंटो नामक क्रिश्चन बाब्याकडे होतें, व तोफखाना गणतपराव पानशांच्या ताब्यांत होता.

जनरल मनरोनें प्रथम सोलापूर शहर म्हणजे पेठ जिंकण्याचें ठरविलें. कारण तसें केल्याखेरीज किल्ला हातीं येण्याचा संभव

नव्हता. शहरपन्ह्याच्या भिंती फार उंच नाहींत व खंदकही फारसा खोल नाहीं असें पाहून १० मे रोजीं पहांटे तीन वाजतां शिड्या लावून पेठ काबीज करण्याची मनरोनें सिद्धता केली व झुंजूमुंजू होतांच शिड्यासामान नेऊन हल्ला करणाऱ्या तुकडीनें शिड्या लावल्या. मराठ्यांनीं खूप आगीचा मार केला, तरी त्या तुकडीनें स्वतःच्या डाव्या-उजव्या हातचे बुरूज जिंकून कायम केले व वेस उघडून सर्व इंग्रज सैन्य आंत घेतले. आंत शिरलेल्या इंग्रज सैन्याच्या एका तुकडीनें उजव्या हातच्या शहरपन्ह्याच्या बाजूनें मारीत जाऊन किल्ल्यानजीकच्या पेठेंतल्या दोनतीन मोठ्या हवेल्या बळकावल्या. दुसऱ्या एका तुकडीनें शहरपन्ह्याच्या डाव्या हाताकडील बाजूनें चढाई केली व आणखी तिसऱ्या एका तुकडीनें मध्यावरून सरळ चाल केली व शहराच्या ज्या वेशीमुळें शहराचे दोन भाग पडले होते ती वेस खुली करून डाव्या-उजव्या हातच्या तुकड्यांचा मिलाफ केला. नंतर एक ग्रेनेडियर्सची टोळी पाठवून शहरालगत एका वाडींत मराठ्यांनीं चौकी ठेविली होती ती उधळून देण्यात आली. दरम्यान गणपतराव पानशे आपला तोफखाना घेऊन सोलापूर शहरपन्ह्याच्याबाहेर परंतु किल्ल्यासमीप मोक्याची जागा घेऊन उभा होता ती त्याने सोडली, व उजव्या बाजूला वळसा देऊन इंग्रज सैन्यानें बाहेर तळावर जी आपली शिलकी फौज ठेविली होती तीवर तोफांचा मारा सुरू केला. म्हणून जनरल मनरोनें ती शिलकी फौज शहरांत आश्रयास नेली. पण तेवढ्यांत मराठ्यांच्या तोफखान्यांतील दारुगोळा अकस्मात् गोळा पडून म्हणा किंवा कशानें तरी भडकला. त्याबरोबर तीच नामी संधि असें पाहून इंग्रज सैन्यास बागनेटांनीं हल्ला चढविण्याचा हुकूम देण्यांत आला. या वेळीं निकराची लढाई झाली. गणपतराव पानशाला जखमा चढल्या व त्याच्या हाताखालचा दुसरा एक अधिकारी गोळा लागून ठार झाला; व पानशांच्या तोफखान्याची व फौजेची दाणादाण झाली. याच सुमारास निजामाचा दुल्लेखान नांवाचा सरदार ८०० पायदळ व ३०० घोडेस्वार घेऊन इंग्रजांकडे दाखल झाला होता. या दिवशीं किल्लेकऱ्यांनीं शहरांतला कांहीं भाग शत्रूच्या हातीं पडूं नये म्हणून शिकस्त चालविली. पण तें साधेना. तेव्हां शहराबाहेर असलेली मराठ्यांची फौज डावाडोल होऊन आपली जागा बदलण्याच्या

उद्योगास लागली. तें पाहतांच इंग्रजांच्या घोडदळानें दोन हलक्या तोफा घेऊन मराठ्यांचा पाठलाग केला. दुल्लखानालाहि तेंच करण्यास सांगण्यांत आलें. तेव्हा मात्र मराठ्यांचा पळच सुटला व ते आपल्या तोफा तशाच जागेवर टाकून धावूं लागले. पण इंग्रज फौजांनी सात मैलांवर मराठ्यांना गांठून त्यावर गोळागोळी सुरू केली. मराठ्यांनीहि प्रतिकार केला; परंतु त्यांचा कांही इलाज चालला नाही व मराठ्यांचे जवळ जवळ एक हजार शिपाई कापले गेले. इंग्रजांनी रात्रीं अंधार होऊन दिसेनासें होईपर्यंत पाठलाग करून सीना नदीपावेतों मराठ्यांस पिटून घातलें.

इकडे शहर जिंकलेल्या इंग्रज सैन्याने किल्ल्यावर शिड्या लावून एलगार करण्याचें ठरविलें व त्यासाठीं दक्षिणेकडील तटास शिड्या लावण्याचें मुक्रर झालें त्या बाजूने शिड्या लावण्याचें कारण तिकडे हल्ला करणाऱ्यांना दबा घेत जाण्यासारख्या दडणी होत्या व तेथल्या बाजूच्या खंदकांत पाणीहि फारसें खोल नव्हतें. ता. ११ मे रोजीं तलावाच्या बांधाखाली आसऱ्याने तोफखाना ठेवून इंग्रजांनी किल्ल्यांत सतत गोळे टाकण्यास सुरुवात केली. हेतु हा कीं मराठे गुंतून पडावे. दुसराही एक हेतु असा कीं, त्या तोफांच्या माऱ्याच्या आश्रयानें हल्लेकऱ्यांना तटाजवळ सुखरूप पोंचतां यावें. ता. ११ व १२ या दोन तारखांस इंग्रजांनीं किल्ल्यावर देवडामार चालू ठेवला व १३ व्या तारखेस त्याच तोफांच्या आश्रयानें इंग्रजांनीं पुष्कळ पुढें सरकून किल्ल्यानजीक एक बातेरी उभी करून तेथून दिवाळतोडी म्हणजे तट पाडणाऱ्या तोफांचा भडिमार सुरू केला. त्या बातेरीनें आपलें काम उत्तम बजावलें. तटास भगदाड पडलें तेव्हा मराठे आंतून मेढा घालण्याच्या उद्योगास लागले. पण रात्रीपर्यंत, शिड्या लावून तटावर सहज चढतां येण्याइतका तट ढांसळला होता व म्हणून १४ तारखेस दुपारीं इंग्रजांनीं शिड्या सामान करून हल्ल्याची तयारीही केली. तें पाहून स्थळ राखणें अशक्य वाटून किल्लेकरी तहास आले. इंग्रजांनीं त्यास कौल दिला व किल्ल्यांतील सर्व मराठे लोक आपापली चीजवस्त घेऊन दुसरें दिवशीं सकाळीं ठाणें खाली करून वाट फुटेल तिकडे चालते झाले.

(२) या लढाईसंबंधी अलीकडे प्रसिद्ध झालेल्या पेशवे दप्तर भाग ४५-

मध्ये कांही मराठी पत्रें छापलेलीं आहेत. तीं अर्थात् इंग्रजांनी नेमलेल्या देशी फितुरी बातमीदारांनी रोजच्या रोज त्यांना लिहिलेलीं बातमीपत्रें होत. तीं खुद्द लढाईच्या वेळीं समक्ष पाहून किंवा रोजची बातमी आणवून अधिकृतपणें लिहिलेलीं असल्यामुळें साधन या दृष्टीने त्यांची किंमत अव्वल दर्जाचीच मानली पाहिजे. मात्र तीं इंग्रजांच्या पक्षाचीं आहेत येवढें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्या पत्रांवरून निघणारी सोलापूरच्या लढाईसंबंधीची पोवाड्याला उपयुक्त पडणारी माहिती अशी—

जनरल तामस मणरोल (मनरो) ९ मे रोजीं सोलापुरच्या जवळ दोन तीन कोसावर येऊन पोंचला. त्या आधी एक दिवस इंग्रजांचा तोफखाना दोनप्रहर रात्रीस सोलापुरास दाखल झाला होता. निजामाकडील इंग्रजांच्या मदतीस आलेला सरदार दुल्लेखान मौजे देवगांवच्या ओढ्यावर येऊन पोंचला. त्याच्या तुरुप स्वारांनीं लगेच तलावा केला. म्हणजे सोलापूर किल्ल्याच्या आसपास जाऊन टेहळणी केली. त्याबरोबर किल्लेकरांनी त्यांच्यावर तोफा डागल्या. किल्लेकऱ्यांनी देवगांवच्या पुढें एक कोसावर मौजे बाळी म्हणून गांव आहे. तेथे एक लढाऊ गढीहि होती, तींत तोफा वगैरे ठेवून त्यांनी ती किल्ल्याच्या आघाडीच्या मोर्चासारखी लढविण्याची तरतूद केली होती. तसेंच सोलापुरापासून बाळीपर्यंतची सर्व मधलीं झाडीं तोडून टाकून साफ मैदान करून शत्रूस आसरा घेतां येऊ नये अशीहि तजवीज करण्यांत आली होती.

इंग्रज सोलापुरास आल्यावर दुसरेच दिवशीं १० तारखेस मोठी लढाई झाली. तोफखान्याकडील म्हणजे गणपतराव पानशाकडील हजार पांचशें माणूस ठार झाले. विठ्ठल बच्चाजी व काकोपंत हे कामास आले. इंग्रज व निजाम यांजकडीलही खराबी फार झाली. किल्ल्याबाहेरील पानशाची फौज फुटली. पळ सुटला, तिचा पाठलाग करून इंग्रजांनी अनेक लोक ठार मारले. "मोठी सड्घाण केलीं." या लढाईत इंग्रजांनीं किल्याबाहेरील पेठ म्हणजे सोलापूर गांव काबीज केलें ही गोष्ट इंग्रजांच्या शौर्याइतकीच त्यांच्या फितुरीमुळे इतकी लौकर घडून आली. मराठ्यांकडील भाऊ गोडबोले, विठ्ठलपंत, गाडगीळ, गांवांतील शेटे महाजन हे इंग्रजांस फितूर झाले होते. भाऊ गोडबोले व विठ्ठलपंत गाडगीळ

यांना पानशांनी किल्लयांत फितूर होईल म्हणून बेड्या घालून कैदेंत ठेवल्याची एक बातमी उठली होती; तर दुसरी अशीही होती कीं, गोडबोले लढाईच्या दंगलींत इंग्रजास जाऊन मिळाला. शेख्याला मात्र तो सांपडला तेव्हां पानशे यांनीं तोफेच्या तोंडीं दिला! गणपतराव पानशे याच्या हातावर गोळ्याची जखम झाली म्हणून बळवंतराव बापूजी १२ मे रोजीं मंगळवेढ्याहून खुद्द जणरल तामस मणरोल याला कळवितो. त्या बातमीस खुद्द गणपतराव पानशाच्या मुलाच्या पत्रांचेंच उत्तम प्रत्यंतर सांपडतें. या सोलापूरच्या लढाईचें वर्णन खुद्द त्या लढाईंत बापाबरोबर असलेले दामोदरराव पानसे यांनी केलें आहे. त्यांत ते लिहितात. "जनरल मंदरोल हा कर्नाटकांतून सात पलटणें घेऊन नवाब पोलादजंग बहादूर (निजामाचा एक सरदार) सात पलटणें व पोलादजंग याजकडील फौज, दुल्लेखान (यांच्या हाताखालची फौज) मदतीस घेऊन (आमच्यावर चाल्लून आला तेव्हां त्याची व आमची) सोलापूर मुक्कामीं लढाई झाली. त्या लढाईचे पूर्वी "सीना व भीमा मध्य देश घेऊन, फौज व तोफखान्यासुद्धां खर्चाचा बंदोबस्त करून देतो" म्हणून इंग्रज बहादुर यांजकडील बोलणें आलें होतें. परंतु आपले खानदानीवर नजर देऊन लोभ न धरितां शके १७४० मध्यें (तारीख ६ माहे मे १८१८) लढाईच घेतली. त्या लढाईंत प्रथम बसते घोडीस गोळा लागून ठार पडली. तेव्हा सरदार पडले असें फौजेच्या मनांत येऊन बेहवा गर्दी झाली. परंतु खैर होऊन फौज पायदळ एकत्र करून इंग्रजावर चाल्लून घेतलें तों उजवे हातास गोळीची जखम लागून बहुत जेरीस येऊन दोन घटका आराम होण्याकरिता बाजूस बसले. इंग्रज बहादूर यांनी तळावर चाल्लून आल्यानंतर किल्लयांतून लढाईस सुरवात झाली. लढाई सरंजाम वरकड बंदोबस्ताप्रमाणें दोन्ही बाजूंचे समसमान. सबब तहाचे बोलणें उभयपक्षीं होऊन तहनामा ७।८ रजब सन सलासीन अशर ता. १४ मे सन १८१८ इसवींत जहाला."
[पानशे घराण्याचा इतिहास पृष्टांक ११४.]

अलीकडे पेशवे दप्तर भाग ४१ मध्ये २११, २०६, १९३, २०९, २१० लेखांकांत या लढाईसंबंधी नवी माहिती उपलब्ध झाली आहे ती पुढीलप्रमाणे—

श्री

मोहर

तहाच्या अटी

(ता. १४–५–१८१८)

नकल

यादि किले सोलापूर येथील ठरावाचीं कलमें सु॥ समान असेर मयातैन व अलफ. छ ८ रजब सन १२४७ वैशाख शु. ९ गुरुवार शके १७४० सन १८१८ माहे मे छ. १४.

१ किलेदार व दरकदार व कारकून जमादार व सिलेदार, बारगीर व बाजे लोक वगैरे आपलाली बायकांमुलें कचेबच्चे चीजवस्त हत्यार पत्यार घोडे तट्टू बैल गुरे वगैरे सुधा घेऊन जातील त्याच उपमर्द देऊ नये पार करून द्यावे. कलम.

१ गणपतराव भाऊ पानसे यास व त्याची चीजवस्त घोडे तटू कारकून मंडळी शागीर्द पेशा झाडून पार करून द्यावे.

१ गांवांतील कारकून हाजरनीस सिबंदी किल्ल्यांत चाकरीस होते ते किल्ल्यांतून बाहेर निघोन गांवांत व परगांवीं आपलालें घरीं मुललेकर चीजवस्तसुधा राहतील त्यास कौल देऊन हरयेकविसी उपद्रव लागो नये.

१ कौल द्यावयाचे तपसील.

१ गणपतराव भाऊ यांस कौल व पत्रें.

१ चीजवस्त कारकून व मंडळीसुधा व खासगत पार व्हावयाचा कौल.

१ पुण्यांत जाऊन आपले वाड्यांत हरयेक जागा राहतील व त्याचे सरंजामाच्या वगैरे पेशजीप्रमाणें बंदोबस्त करून देण्याविसी आलपिस्तन साहेब यांस पत्र.

१ विसाजी देवराव किलेदार यास कौल व पत्रें.

१ चीजवस्त मंडलीची व खासगत सुधा घेऊन जाण्याविसीचा कौल.

१ पाच्छापूरच वतन पेशजीपासून साल गुदस्तपावेतो चालत आल्या प्रमाणें पुढें चालविण्याविसी मामलेदार यासी पत्र.

१ घरची बायेका मुलेमाणसे चीजवस्त व जती व बंदीस ठेविले आहेत म्हणोन वर्तमान आहे. येविसी मामलेदार यांचे नांवे पत्र देऊन मोकले करून स्वाधीन करावे.

१ पुण्यात बाग नवी विहीर खणून केली आहे. आम्हाकडे चालविण्याविसी अलपिष्टनसाहेब यास पत्र द्यावे.

१ जमादार व लोक वगैरे यांचे नावे कौल कीं, ज्यास जेथें सोय पडेल तेथें त्याणी राहिले असता उपसर्ग देऊं नये.

१ गणेश नारायण जोसी कारकून याचे घर मौज हिंडील ता साळसी येथे आहेत. ते आपले घरी चीजवस्तसुधा जाऊन राहतील त्यास हरयेकविसी उपसर्ग होऊ नये म्हणोन किले मालवण येथील मामलेदार यास पत्र.

सदरहू प्रमाणें ठरून कौल पत्र देऊन गोला गोली बंद जाहल्यापासून सहा प्रहरांत किला हवाला करून बाहेर निघोन जाऊ. येणेंप्रमाणें पांच कलमें.

इंग्रजी हारफ (हर्फ; हरफ=अक्षर, लेख)

ता. १०-५-१८१८

बळवंतराव बापूजी याचे नवाबसाहेब यांस पत्र :

१ छ. ९ तारखीस आस्तमाणी लस्करांत अखबार घेऊन गेला होता तो आला त्याणे बातमी आणली. तोफखाना छ. ८ तारखीस दोन प्रहरा रात्रींस सोलापुरास दाखल जाला. आपलेहि लस्कर मौजे देवगांवचे वढ्यावर जाऊन उतरले आहे. आपल्याकडील तुरुप तलाव्यास गेले होते, त्याणी किल्यावरून च्यार तोफा डागल्या. ह्मणौनही बातमी आणली. तेथून पुढे कचा येक कोस मौजे बाले ह्मणोन गांव आहे. तेथील गढी लढाऊ आहे. तेथे पाणशे यांणी च्यार तोफा ठेऊन जागा बलकाविली आहे. मोर्चा बांदला आहे. लढावयाचा दम बहुत आहे. आणखी किल्यात गांवची रयत देशमुख व देशपांडे शेट्ये माहाजन व बारा हाक्कदार नेऊन बसविले आहेत. फितूर होईल ह्मणौन. आज आणखी अखबार लस्करांत पाठविली आहे. काये बातमी येईल ती खरी.

ता. १२-५-१८१८.

बलवंतराव बापूजी याचे जनरेल तामस मंडरोल यास पत्र.

१ सोलापुराकडील वर्तमान आपल्याकडील दोघे तिघे जासूद दोघे तिघे लष्करांत बातमीस गेले ते परतले नाहीत. परंतु तोफखान्याचा पल दरोबस्त स्वार व कांहीं आरब व सिद्दी व काही गोसाई जखमी केलेले येथ येऊन उतरले आहेत. छ. १० तारखीस मोठीच लढाई जाहाली. आवायाहि फार आले. तोफखान्याकडील हजार पाचशे मणुशे ठार जाले. तिकडील सरदार रो विठ्ठल बच्याजी व काकोपंत ठार जाले. आपल्याकडील याणी पेठेत जाऊन मोर्चे लावले त्यामुळे आपल्याकडीलही बहुत खराबा जाहाला. प्रहरा रात्रीस काल पटवर्धण याचे वकिलाचे पत्र आहे. हजरत जनरेल तामस मंडरोल सो पडले. कांही काल बहुतसी लढाई जाहाली नाहीं. तोफखान्याचे पलामधे आपल्याकडील तुरूपानी दऊड करून सापडले त्यास तोडलेच. मोठी सडघान केली. हजार पाचशे मणुशे जखमीही केले. ज्याला जिकडे वाट फुटली तिकडे पलाले. या प्रो मार आहे. पुढे काये खबर येईल ती खरी.

१ किल्यात फितूर होईल म्हणोन रो भाऊ गोडबोले व विठ्ठलपंत गाडगील या उभयताचे पायांत बेड्या घालून पानशे यानी टाकले आहेत. हाली लढाई चालली आहे. मोठा दम आहे. किला बलकाऊन रो गणपतराव पानशे याचे हातास गोल्याची जखम जाहाली झणौनहि बातमी आहे. आपले लस्कर किल्याचे पोटी पडले आहे. येथे पो लाग केला आहे.

ता. १४।५।१८१८.

बलवंतराव बापूजी याचे नवाबसाहेब यास पत्र.

१ सरदार लोक व साहेब लोक व हजरत खुदावंत जनरेल तामस मंडरोल साहेब सुधा खुशाल आहेत. रविवारचे लढाईतच काये लोक पडले ते मात्र पडले. अलीकडे कांहीं (लो) क बहुतशे पडले नाहीत. पाठीशी पेठ टाकून गाव हस्तगत करून कौल देऊन किल्यानजिक जाऊन मोर्चे लावले आहेत. लढाई चालेली आहे. किल्याकडील जमा (ब) बाहीर कांही नाहीं. आंत पांच-सहा हजार लोकांचा जमाव सांगतात. कलम-

ता. १३-५-१८१८

बलवंतराव बापूजी याचे नवाबसाहेब यास पत्र.

अर्जदास्त फिदवी बलवंतराव बापूजी बादबंदगी आदाब तसलीमात कुरनिसात बज्या आऊरदे मारूजमे रसानद आके येथील खैर सला अखबार देवढी मुा मंगलवेढ नजीक श्री पंढरपूर ता छ १३ माहे मे सन १८१८ ईसवी मुताबिक छ ७ माहे रजेब सन १२३३ रोज बुधवार पो यथास्थित असो विशेष. इकडील मार कालचे अखबारीत लिा जासूद गेले ते आले नाहीत. त्यांणी बातमी आणली लढाई चालली आहे. तोफखान्याचे दरोबस्त लोक किल्यांत शिरले आहेत. आपल्याइकडील लोक पेठत जाऊन मोरचे लावून रेवणीस लागले आहेत. लस्करात हावालदिली नाही. लोक हुशार आहेत. वरचेवर मणुशे पडतात. किला अद्याप जेरीस आला नाही. मणुरुपचे आंगून तोफा लावल्या आहेत. कोण पडले कोण राहिले हे कोन्ही लस्करात बोलत नाहीत. पनास पाऊनशे डोल्या जातात येतात. तोफखान्याचे स्वार व पायेदल बाहीर होते. त्यास निरोप दिल्हा. त्याचे माघे आपल्या इकडील तुरुप व कांही लयेनचे लोक याणी दऊड करून मोठी सडघान केली. दोनतीन कोस मुडदे पडले आहेत. कांही पलुन गेले. लष्करांत याप्रमाणे बातमी आहे. बाहीर व येथे मुखत्यारच पडले (मनरो) म्हणौन लोक स्पष्ट बोलतात. किल्ल्यांत येथे वकिलाचें पत्र आलें त्यांत सरदार पडल्याचें वर्तमाण लिहितो ती बातमी रो गोविंदपंत ओक यांणी येऊन सांगितली. त्यावरून ऐकिले ते लिहिणे प्राप्त जाले. परंतु लस्करातहि बोलतात. ऐसी लढाई कधीच घेतली नाही. उभयेपक्षी मणुशे बहुत मेले. बाजार बातमी तर मणश्वी येतात. रात्री येकाण सांगितले कीं दुलेखान यास गोली लागली, तेव्हा धोत्रीकडे (डॉक्टरकडे) घेऊन चालले तो वाटेतच काल जाहाला. आणि लस्करांत तर कोन्ही कोन्हासी बोलत नाही. निवल जाल्यावर खरे खोटे वर्तमान कलल. दुसरे येकाण सांगितले ज्यानखान जामदार पहिले पानशे याजकडे नवकर होता हाली त्याजपाशी चार हजार आरब आहेत त्यास पत्र पो आहे. तिसरे एकाने सांगितले रो भाऊ गोडबोले पुढे होते त्याणी व पेठचे शेट्याने फितूर केला ह्मणोन आपल्याकडील लोक पेठेत सिरले. गोडबोले आपल्या लस्करांत

मिळाले. शेट्या यास धरून पानशे याणी तोफचे तोंडी देऊन उडविला. जेऊरचे टप्याकडील वरधी आली. आपल्याकडील येक पलटण * * सिनावर आले आहे व श्रीमंताचे माघे पलटणे होते ते धारुराकडे आले आहेत. कलावे. तासगावकर पटवरधण याजकडील वकील रा॥ बापू ह्यासकर आज येथून आपले लस्करास गेले. छ १२ तारखीसी अखबार रवाना केली ती येऊन पोचलीच आशल. मा॥र साहेबाचे खिजमतीस लि॥ आहे. बंदगीस रोशन होये. हे अर्जदास्त.

(३) पुढें देण्यांत येत असलेली लढाईची हकीकत खुद्द कंपनी सरकारच्या मद्रास आर्मीच्या जर्नलवरून म्हणजे रोजनिशीवरून घेतलेली असल्यामुळे ती सर्वांत अधिक विश्वसनीय होय. ही माहिती— "Journal of the sieges of the Madras Army in the years 1817, 1818, 1819 with observations on the system, according to which such operations have usually been conducted in India and a statement of the improvements that appear necesary by Edward Lake, Lieutnant of the Hon. E. I. Co. Madras Engineers. (Publish 1825.)

सदर पुस्तक सर जॉन माल्कमच्या आज्ञेवरून मुद्दाम अभ्यासपूर्वक लिहिण्यांत आलें होतें.

"बेळगांवचा किल्ला जिंकल्यानंतर मद्रास आर्मीला ब्रिगेडिअर ज. प्रिझलर याच्या रिझर्व्ह डिव्हिजनपैकी कांही सैन्य येऊन मिळालें. नंतर ते सर्व सैन्य सोलापूर किल्ल्यावर चालून गेलें. इंग्रज सैन्याचा तपशील असा—

राइट ब्रिगेड—हींत युरोपियन फ्रँक बटालियन व रायफल कोअर होतें. एकूण माणसें १०६०; सेन्टर ब्रिग्रेड—हींत चवथ्या मद्रास नेटिव्ह इन्फट्रीचे दुसरे बटॅलियन, एकूण माणसें १११०; लेफ्ट ब्रिगेड—हींत सातव्या बॉंबे नेटिव्ह इन्फन्ट्रीचे पहिले बटॅलिअन व बाराव्या मद्रास नेटिव्ह इन्फन्ट्रीचे दुसरे बटॅलियन, एकूण माणसें १४३०; याखेरीज बावी-

साऱ्या ड्रगूनचे २ स्क्वाड्रन्स्, संख्या १८०; तोफखाना कामगार, संख्या सर्व मिळून १२३ व पायोनिर्सच्या चार कंपन्या.

९ मे १८१८ रोजीं हें इंग्रज सैन्य सोलापूर किल्याच्या पश्चिम अंगास २॥ मैलावर येऊन बसलें. किल्यावर झाडी बरीच असल्यामुळें किल्याची रचना चांगलीशी उमटून दिसत नव्हती. तथापि मराठ्यांचें पायदळ आणि तोफा दिसत होत्या. हें पायदळ किल्याच्या उतरत्या तटबंदीवर दिसत असून त्यांची रांग दाक्षिणेकडे तळें आहे त्याच्या काठापर्यंत होती. मात्र तळयाच्या काठच्या भिंतीमुळें त्यांचा फक्त छातीवरचा भागच तेवढा दिसत होता.

सोलापूर शहर व किल्ल्याभोंवती अफाट असें सर्व सपाट काळे वावर होतें. फक्त ओढ्यानाल्यामुळें जमीन किंचित मधेंच तुटल्यासारखी दिसे इतकेंच. सोलापूरच्या दक्षिणेस मात्र जमीन एकंदरींत चढणीची परंतु त्यांतच चढउतार असलेली अशी आहे. शहराला पक्का मातीचा तट असून जागोजाग चिरेबंदी बुरुज आहेत. फक्त नर्ऋत्य कोनांत मात्र तटबंदी नाही. कारण तेथेच सोलापुरच्या किल्याची हद्द शहरपेंठेला येऊन मिळते. फक्त तीनशे यार्डाचेंच अंतर दोघांत आहे. किल्याच्या दक्षिणेस मोठा थोरला तलाव असून त्याचें पाणी किल्याच्या तटावर डचमळत असतें. याच तळ्यांतून किल्याच्या तटाभोंवतालच्या खंदकांत पाणी घेण्याची सोय केलेली आहे.

इंग्रज सैन्य आल्या दिवशींच म्हणजे ९ तारखेस सकाळीं नऊ वाजता जनरल प्रिझलर सोलापूरच्या पेंठे भोवती तलाव्यास गेला. त्याचा हेतु तट आणि दरवाजे कितपट बळकट आहेत हे पाहण्याचा होता. पुन्हां संध्याकाळींहि दुसरी एक तुकडी दक्षिणेकडे प्रत्यक्ष किल्ल्याचा लागभाग पाहाण्यासाठी पाठविण्यांत आली. सकाळीं गेलेल्या तलाव्याच्या टोळीवर किल्ल्याच्या पश्चिमेकडून मराठ्यांनी वाढून येण्याची हूल दाखविली. पण ते तटाचा आसरा सोडून फारसे पुढें आले नाहीत. फक्त आघाडीच्या लोकांची झीटपीट झाली इतकेंच. तलावा झाल्यानंतर किल्याआधीं पेठच जिंकण्याचें इंग्रजांनीं ठरविलें. व त्याप्रमाणें ता. १० रोजीं पहाटें तीन वाजतां एक इंग्रज तुकडी कांही तोफा घेऊन तळावरून बाहेर पडली. शहरपन्ह्यापासून उत्तरेस हजार यार्डावर येऊन ठेपल्यावर फिरून

हल्ल्याच्या सोईसाठी त्या तुकडीच्या दोन तुकड्या करण्यांत आल्या व कांहीं थोडे लोक उपराळ्यासाठीं तेथेंच राखून ठेवण्यांत आलें. दिवस उजाडतांच तोफा लागू करून त्याच्या आसऱ्यानें त्या दोन्ही तुकड्या हल्यास उठल्या. इंग्रजांची हालचाल मराठ्यांना कळून चुकल्यामुळें त्यांनींही बंदुका मारण्यास सुरवात केली होती. दोन्ही तुकड्यांनीं तटाला एकाच वेळीं शिड्या लाविल्या. त्यांना प्रतिकार असा फारच थोडा झाला. थोड्याच वेळांत शहराच्या तटावरून व आंतील रस्त्यावरून मराठ्यांचे लोक त्यांनीं मारून काढले व पळाचा पाठलाग करीत पेठेच्या दुसऱ्या टोकास वेस होती तेथपर्यंत जाऊन वेस कबजांत घेतली व मग बंदुकांचा मार धरिला.

याच वेळीं मराठ्यांची मोठी हालचाल दिसूं लागली. ते कांही तोफा घेऊन पेठेच्या दक्षिण दिशेकडून येऊं लागले. त्यांचा हेतू पूर्व दिशेकडील दरवाज्यांतून पेठेंत शिरण्याचा किंवा त्या बाजूस इंग्रजांनीं ठेवलेल्या त्या उपराळ्याच्या तुकडीवर हल्ला करण्याचा असावा.

पेठ जिंकून झाल्यावर जनरल मनरोने, बाहेर मराठ्यांचें सैन्य जमून तोफा चालवूं लागले होते त्याचा मुकाबला घ्यावा असें ठरविलें. म्हणून पेठेंत गेलेल्या इंग्रज सैन्यापैकीं दोन कंपन्या आणखी भरतीस घेऊन व तोफांची सरबत्ती सुरू करून इंग्रज सैन्य चाल करून गेलें. याच वेळीं मराठ्यांच्या तोफखान्यांतील एक दारू गोळ्याचा खटारा भडकून मोठा स्फोट झाला. त्याने गोंधळांत भरच पडली व तें मराठी सैन्य दाणादाण होऊन पळालें. त्यांच्या तीन तोफा इंग्रजांना मिळाल्या. बाकीच्या तेवढ्यांतल्या तेवढ्यांत त्यांनीं खंदकांत लोटून दिल्या होत्या.

किल्ल्यांतील मराठ्यांनीं, पेठेंतून किल्ल्यानजिक जाऊन पोंचलेल्या इंग्रज शिपायांवर, सतत बंदुकांचा मार चालविला होता. हा मार तटाच्या आडून व तटावर त्यांनीं एक नवाच मेढा उभा केला होता त्यांतून चालविला होता. त्यामुळें इंग्रजांचें पुष्कळ माणूस मेले किंवा जायाजखमी झाले. पण मराठ्यांचीही हानी जबर असली पाहिजे; कारण चार वाजण्याच्या सुमारास त्यांनी मेढा सोडून दिला व ते पूर्व दिशेने मैदानाकडे गेले.

अशा रीतीने किल्ल्याभोंवतालचा शत्रूप्रतिकार मोडून काढल्या-वर प्रत्यक्ष किल्ल्याचा वेढा सुरू झाला. ११ मे रोजीं इंग्रजांनी बातेऱ्या बांधण्यास सुरवात केली व पेठेच्या दक्षिण वेशीजवळ तळ्याच्या

धक्क्याच्या मागे उभारलेल्या बातेरीवरून चार तोफांचा मार धरिला. या मारामुळे किल्ल्यातील घरें जळालीं व मराठ्यांच्या कांही तोफाही बंद पडल्या. १२ रोजीं सायंकाळपासून इंग्रजांनी तोफांचा पुन्हा अखंड मार धरिला. १३ रोजीं तलावांतील देवळांत इंग्रजांनी बरकंदाज नेऊन बसविलें. कारण हें देऊळ किल्ल्याच्या तटापासून फारच जवळ होतें. तेथें उभारण्यांत येत असलेल्या बातेरीच्या बेलदार गवंड्यांना संरक्षण द्यावें हा एक हेतु होताच; शिवाय मराठ्यांकडून, तलावाचा दरवाजा चोरीने फोडून, सर्व जळबंब करून टाकण्याचा प्रयत्नहि उघडकीस आला होता. १४ रोजीं इंग्रजांच्या सर्व बातेऱ्यावरून धुमधडाका सुरू झाला व तट भराभर ढासळूं लागला व दुपारीं मोठेंच खिंडार पडले. तेव्हा किल्ला बोलूं लागला व अखेर करार ठरून दुसरे दिवशीं सकाळीं आठ वाजतां इंग्रजांचें निशाण किल्ल्यावर चढलें.

या सर्व वेळ्यांत म्हणजे पेठेवरील हल्ल्यासुद्धां इंग्रजांचे एकूण फक्त ९७ लोकच मेले, त्यांत ४ ऑफिसर होते. इंग्रजांना ४० तोफा व अनेक जेजाला मिळाल्या.

पाठभेद

आम्हांस याच पोवाड्याची एक दुसरी प्रत मंगळवेढ्याचे श्री. अबूराव करमरकर यांनी, एका गोंधळ्यास हा पोवाडा म्हणावयास लावून, तो उतरवून घेऊन पाठविली होती. दोन्ही प्रती ताडून सरस वाटले ते पाठ स्वीकारून त्यावरून नवी प्रत तयार केली तीच पुढे संहिता म्हणून छापली आहे. शितूत प्रत व ही प्रत यांतील पाठभेदांचा तक्ता पुढीलप्रमाणे.

शितूत प्रत	नवी प्रत
दाणापाणी उदंड भरले अरब कोरडीला	दाणापाणी उदंड भरले अरब ते कुरु हेला
तीन हजार गारदी शिपाई अरबाचे वेळेला । बंदोबस्तीने किला रेखल दिला तोफ रुपला ॥	दोन हजार कारडा काय बोले कोकण्याला । तीन हजार गारदी शिवायअरब चाफेलीला ॥ बंदोबस्तिने किल्ला रोकिला हुकुम केला तोफेला ॥

तुरुपस्वाराने वेठ उठविला—तोफ किल्यासमोर	तुरुक स्वारानें गेट उठविली तोफखान्याच्या म्होर
सल्यामल्यासाठी फिरंगी चाल्लून पुढे गेला। ईश्वराने अंत घेतला सांगतसे मुक्र	सल्यामामल्यासाठी फिरंगी चालुन गेला मोऱ्हं। इश्वासानं अन्त घेतला सांगतसे मजकुर
अवघी दख्खन घेतली—तुम्ही कायल बहुत आम्हावर	अवघे दख्खण घेतले तुम्ही कां—लढतां आम्हाबरोबर
गड किल्ले सोन	गड किल्ले सोडून
वेशीवर ते शीर ठेविले—पातले सार	येशीवरतं शीर ठेवलं पाहातसे लष्कर
लइन उठे तंबूर	लहिन पुढें तंबूर
सतरा हजार अरब—चेतिला जाव्या दुदकर	सात हजार अरब छाटिला झालासे धुंदकार
कयक जन नवस वरती फिरला	कैक जन नवस करितीं पिराला
तोफा बाणाच्या मळावलुनि नेल्या लष्करांत	तोफखानाच्या माळा ओढुनि नेल्या लष्करांत
आला किल्यावर बहुत	आला किल्ल्याभोवत
रणमंडळा लावून तोफ सोडिली	रणमंडळाहून तोफ सोडिली
दिल्या मुडद्यावर हात फिरंगी शिरला गोळा पुरात	दिले मुंड्यावर ढाल फिरंगी शिरला सोलापुरांत

सऱ्येंवकऱ्यानें प्राण सोडिला	सावकाराने प्राण सोडिला
गल्लोगाल्लिने मनुष्य पडे मुड्दे चपबत	जसा अवकाळी मेघ वर्षतो । तसा तसा गोळा विपरित । गल्लोगाल्लिनें माणुस पडलं मुड्याचं पर्वत
म्हांकाळ बुरुजावरून बळावली तोफाचि विपरीत । कुदा घालुनी तोफ ठासली दरी मुजरा पेठेत	दाहि बुरज्यानी तोफ डागली रणमंडळावरत । रणमंडळाचा तट पाडिला उरतले खालत ॥ महंकाळ बुरूज येउन बळविला तोफेच्या विपारित । खुर्दा घालुन तोफ ठासली धरि मुजरा पेठेत
हजार बाराशें लटानी— उडली पायक घाटकत दरवाजाला नेउन बुडविली शिडया लावि खंदकात ।	हजार बाराशे लहिन— उडालि पाव एक घटकत दरवाजाला जाउन भिडाले छडया (शिडया) लावि किल्ल्यात
किल्ल्यामधिं झाला फितुर मग पडली मसलत	किल्ल्यामधे झाला फितूर मग पडली मसलत किल्लेदारानें रुमाल फिरवि- ला परचक्रासी आले
सोडुन किल्ला जाळायाला नीर फुटला लोकाला	सोडुन किल्ला झाला वायला निरुप दिला लोकाला
दाखने मधि पयस फिराविला	दखणमाधि पैसा फिराविला
चांगला दिला रगड सायबाला	चांगला दिला गरूड सायबाला
गराड सायबांची फार जेर्थीम रणम फिराविला	गरूड सायबाची फार चौकशी जाहीरनामा फिरवला ।

चवड त्यांनी घेतला कफवल दिला रतल। झडझड मुसलमान सला व दिली पायाला	चौहप्त्याने ध्यावा पैसा कौल दिला रयतेला । गड किल्ले हे आड्या बावड्या चट मांडाया लागला। झाडझुड मुलमाणसं चट ल्हिया लागला।
चप गेवूनी	चाक घेवूनी
हरबक्षीनें कुळें रक्षिलीं	हरबाबतीनें कुळें रक्षिलीं
लाचलुच दरम्यान खर्चित वतन पडलें जप्तिला	लांचलुच जो म्याल खाल तर वतन पडल जप्तिला
हजार रुपये वसुल करावे येक प्रांती अंमल	हजार रुपये आम्ही वसूल करावे काय प्राती आम्हाला
तपाकिरीला पयसा मिळेना येते जवळि बायला	तपकिरीला पैसा मिळेना व्यर्थ जाच ल्हियाला
बे ग्रहच मोडी सुटली मरण जादरनल	वाघा हातची (वाघ्राची) मेंढी सुटली मारि पंजा धरणिला।
वमकुरी सदसीपाय रत्नरावजी बोलला। भयरल नीत गरजे	राव मजकुरी संगे शिपाई रत्नराव बोलला। भयरवनाथ गर्जे

सोलापूरच्या लढाईचा पोवाडा

११

(शाहीर—रत्नराव)

श्रीमंत म्हाराज पेशवे धनी मुकले राज्याला ।। शिरी सलामत इंग्रज बहाद्दर दख्खनी झेंडा लाविला ।। ध्रुवपद ।।

श्रीमंत गेल्यावर पाठीमागे वर्तमान काय झाला । सोलापूरच्या किल्ल्याजवळ तोफखाना लढूं लागला । त्या किल्याचा धनी गणेशपंत काय बोले फिरंग्याला । लक्ष बांगडी फुटेल परंतु किल्ला देईना तुह्माला । दारूगोळी भांग तमाखू कमी नाही पैशाला । दाणापाणी उदंड भरलें अराब कोरडीला । कडीतोडे बक्षिसी पोशाग देईन शिपायाला । हरतऱ्हेने लढवीन किल्ला नका खवळूं आह्मांला । तीन हजार गारदी शिपाई अरब चाफेलीला । बंदोबस्तीने किल्ला रेखला हुकुम केला तोफेला । नव्हते किल्याचें लगीन लागलें बाशिंग बांधलें रणमंडळाला ।। १

शिरी सलामत इंग्रज बहादूर—इंग्रज बहादुराचे शीर सलामत राहिले म्हणजे त्याची सरशी झाली. **किल्ल्याचा धनी गणेशपंत**––किल्याचा धनी आणि गणेशपंत असा अर्थ घ्यावयाचा. धनी म्हणजे किल्लेदार दुसराच होता. गणेशपंत म्हणजे गणपतराव पानसे तोफखानेवाले हे मदतनीस होते. देईना—देईन ना असें पाहिजे. **भांग तमाखू**—दारू गोळ्या इतकीच भांग तमाखू शिपायांना अत्त्यावश्यक असते त्यावाचून शिपायांचें चालणारच नाही म्हणून सैन्याबरोबर या वस्तूंचा संग्रह अवश्य करीत असत. आजहि शिपायांना सिगारेटस अशाच आवश्यक समजल्या जातात. भांग दक्षिणी शिपायांकरिता नव्हे, मुख्यतः गोसावी किंवा उत्तर हिंदुस्थानी परदेशी शिपायांसाठी. **अराब कोरडीला**—आरब कराडीला असें असावे. कराडी म्हणजे तटाची कड. भावार्थ तटा जवळ त्याच्या संरक्षणार्थ अरब जय्यत तयार ठेवले आहेत. **अरब चाफेलीला**—सफेली–तटाची भिंत. चाफेलीला–सफेलीला. **रेखला—रोखला.** **नव्हते किल्ल्याचें लगीन लागले बाशिंग बांधले रणमंडळाला**—किल्ल्याला वेढा पडून त्यावर शत्रूचे गोळे पडल्याखेरीज किल्याचें लग्न झालें असें समजत नसत

चौभोंवतेनें घालून वेढा वाजवी तंबूर । अकराशें पलटण शिवाय दुलेखान सरदार । तुरुप स्वारानें वेंठ उठाविला तोफ किल्यासमोर । व्यर्थ जिवासी तुह्मी कां मरतां धाडा मनसुबदार । सल्यामामल्यासाठीं फिरंगी चालून गेला म्होरं इश्वासानें आत घेतला सांगतसे मुजकुर । अवघी दखन घेतली तुह्मी कायल बहुत आह्मांवर । गडकिल्ले सोडून पळाले बातमी दुरवर । किल्लेदाराने धरून फिरंगी कापलें शीर । वेशीवरतें शीर ठेविलें पाहा-तसे लष्कर । आग तळव्याची गेली मस्तका लईन पुढें तंबूर । रेवनीला होता आरब तोफखान्यासमूर । खननन तलवार झडली एक सवा पार । सतेरा हजार अरब छाटिला जालासे धुंदकर । पांच पलटन घायाळ झाली डोली

रणमंडळ—सोलापूरच्या किल्ल्यातील एका बुरजाचें नांव आहे. त्या बुरुजावर निशाण उभें केलें म्हणजे त्यास बाशिंग बांधले ? **तंबूर**—Tamboorin चा मराठी अपभ्रंश. ड्रम वगैरे नगाऱ्यासारखें इंग्रजी रण-वाद्य. **तुरूप स्वार**—ट्रुप स्वार म्हणजे घोडदळ. **वेंठ उठाविणें**—हल्ला करणें. **तोफ किल्यासमोर**—किल्ल्यासमोर मराठ्यांकडील लोक तोफा डागीत होते त्या तोफांवर तुटून पडण्याच्या इराद्याने इंग्रजी ट्रुप स्वारांनी हल्ला चढविला. **व्यर्थ जिवासि इत्यादि**—हा इंग्रजाचा किल्लेदारास निरोप. **मनसुबदार**-मनसुबेदार. मनसुबा जाणणारा म्हणजे तहरहाचें बोलणें करणारा कोणी जाणता शहाणा माणूस पाठवा. थोडक्यांत तहास या. **सल्ल्या-मामल्यासाठी**—तहरहासाठी. **आत घेतला**—पांढरे निशाण देऊन इंग्रजांनी आपला माणूस निरोप कळविण्यासाठी किल्लेकऱ्याकडे पाठ-विला होता. असलें निशाण ज्याचे जवळ असते त्यावर गोळा टाकूं नये असा तेव्हां सर्वमान्य रिवाज होता. **कायल**—रुष्ट, हैराण, विरुद्ध. अवघी दखन आम्ही घेतली आता तुम्हीच तेवढे आह्माशी विरुद्ध कां जातां ? **धरून फिरंगी कापले शिर**—वास्तविक जो माणूस मारला तो हिंदूच होता. पोवाड्याची प्रस्तावना पहा. **लईन पुढे**—तंबूर वाजवीत इंग्रजांची लेन म्हणजे पलटण चालून आली. **रेवनी**—रेवणी Ravelin चा अपभ्रंश भुईकोट किल्ल्याचे तटाबाहेर जी मातीची भर घालतात ती रेवणी-(शास्त्री कोश). **पार**—प्रहर. **पावून**—पाहून. **जन**—

करा तयार । त्या वेळेला खासा पडला फिरंग्याचा सरदार । घायाळ मुडदे पावून कयक जन नवस करती पिराला । येवढी लढाई पार पडू दे करीन कंदुरी तुला ॥ २

तोफा बाणाच्या माळा ओढुनी नेल्या लष्करांत ॥ भर दुपारा हल्ला नेमिला आला किल्याभोवत ॥ रणमंडळाहून तोफ सोडिली गोळा लष्करांत ॥ दिल्या मुडद्यावर हात फिरंगी शिरला गोळा पुरांत ॥ दुल्लेखानाने लूट घेतली जलमाची संगत ॥ सावकारानें प्राण सोडिला होईल कोणची गत ॥ गल्लोगल्लींने पडले मुडद्याचे पर्वत झांकाळ बुरुजावरून बळावली तोफचि विपरीत । खुर्दा घालुनी तोफ ठांसली धरी मुजरा पेठेत । हजार बाराशें लहिन उडाली पावएक घटकेत । दरवाज्याला जाऊन भिडले शिड्या लावी खंदकांत । किल्यामधिं झाला फितुर मग पडली मसलत । ठाणें मोकळें करून देतों वाट यावी आम्हांला । सोडून किल्ला जाला वायला ॥ नीर फुटला लोकांला ॥ ३

दखनेमधिं पयस फिरविला राजे आले हाताला । सातारा देश प्रांत चांगला दिला गरुड सायबाला । गराड साहेबाची फार चौकशी जाहिरनामा

जण, कैकजन कैकजण. नवस करिती पिराला—किल्ल्यांत नवसास पावणारा प्राचीन पिर आहे. कंदुरी—नवसाची जत्रा बकरे कापणें वगैरे. दिल्या मुडद्यावर हात फिरंगी शिरला गोळा पुरात—गोळापुरांत ही वाचनाची चूक आहे. सोलापुरांत असें मुळांत असलें पाहिजे. दिल्या मुडद्यावर हात याचा अर्थ काय? दिला मुंढ्यावर हात असे तर नसेल? हल्ला करून जाताना तरवारी धरलेले हात उगारल्यासारखे वर केलेले असतात. किंवा कप्तानाने हात वर उचलून हल्ल्याचा हुकूम केला असाही अर्थ होईल. जलमाची संगत—जन्मभर पुरून उरेल इतकी लूट दुल्लेखानानें केली. खुर्दा—रेजगण, धातूचे तुकडे, खिळे इत्यादि घालून. मुजरा धरणें—नेम धरणें. जाला वायला—निराळा झाला. किल्ला सोडून मोकळा झाला. नीर फुटला—झाडून सर्व लोक किल्ला सोडून गेले. पयस—प्रेष फितूर. राजे—सातारकर छत्रपति. गरुड—ग्रँट साहेब. गराड सायबाची फार

फिरविला । चौहप्त्याने द्यावा पैसा कौल दिला रयतेला । गड किल्ले हे आड बावड्या चट मांडाया लागला । झाडझुड मुलमाणस चट ल्हिया लागला । चाक घेऊनी गोरा हिंडतो जमीन मोजियला । हरबाबतीने कुळें रक्षिली ताकीद शेकदाराला । लांचलुच जो म्याल खाल तर वतन पडल जप्तीला । हजार रुपये अम्हि वसुल करावे काय प्राप्ति आम्हाला । तपकीरीला पैसा मिळेना व्यर्थ जाच ल्हियाला । तुरा लावुनी रयत हिंडतो दुःख जमेदाराला । वाघाहातची मेंढी सुटली मारि पंजा धरणीला । असे युक्तीने राज्य चालवी गरड सायब तो भला । गाव मजकुरी संगे शिपाई रत्नराव बोलला । भैरवनाथ गर्जे सभेला त्याने पवाडा केला ॥ ४

चौकशी इ.—हा सबंद चौथा चौक प्रक्षिप्त वाटतो. त्याचा सोलापूरच्या लढाईशीं कांही एक संबंध नाहीं. सातारा प्रांत हातीं आल्यावर ग्रँट साहेबानें प्रांताची व्यवस्था कशी लावली, झाडून माणसाकाणसांची, आड बावड्यांची, घरादारांची टीप घेऊन गणती कशी केली, चाक घेऊन म्हणजे टेपानें सर्व जमिनीची मोजणी कशी केली, शेकदारादि सर्व जुन्या वतनदारांचें बंड कसें मोडलें व रयत त्यांच्या जुलमांतून कशी सोडविली, त्यामुळे पूर्वी रयत जमेदाराचा गुलामच असे, तो मुक्त होऊन ऐटीने मान वर करून कसा वागू लागला व जमेदारांची कशी हानि झाली, लांचलुचपत कडक हुकूम काढून कशी बंद पाडली, एकंदरींत रयत कशी सुखी केली त्याचें या चौकांत वर्णन आहे.

रूपराम चौधरी याचा पोवाडा

ऐतिहासिक माहिती

रूपराम चौधरी याचा मुलगा रामचंद्र चौधरी यानेंच ता. ८ सप्टेंबर १८३२ रोजीं रूपरामाची सर्व हकिकत मुंबईच्या गव्हर्नरास लिहून दिली. ती पेशवा रोजनिशी मालेंतील 'कैफियत यादी' या खंडांत छापली आहे. तीवरून पुढील माहिती सारांश रूपाने पुढे दिली आहे.

(१) थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दींत प्रथम रूपराम पेशव्यांच्या तोफखान्याच्या चौधरकीचें काम पहात असे. पुढे तो रघुनाथरावाचा पक्षःपाती झाला. नारायणरावाच्या खुनानंतर रघुनाथराव स्वारीस निघाला तेव्हां रूपरामाकडे रथखाना व तोफखाना यांची मुखत्यारी देऊन त्यानें त्याला बरोबर घेतला. त्रिंबकराव मामा पेठ्याचा रघुनाथरावानें मोड करून त्यास पकडलें, त्या सांगोल्याच्या लढाईंत रूपरामानें चांगला पराक्रम केला. पुढें रघुनाथरावाबरोबरच रूपराम सुरतेस इंग्रजांच्या आश्रयाने होता. शेवटीं रघुनाथरावाला पेशव्यांनीं कोपरगांवीं कायमचें नजरबंद करून ठेवलें. तेथेंहि रूपराम त्याच्याजवळच राहिला.

रघुनाथराव वारल्यावर पेशव्यांनी रूपरामास आपल्या नोकरींत घेऊन राघो विश्वनाथ गोडबोले यांच्या रिसाल्यांत लोकसुद्धां नेमले. रूपरामाच्या तोफखान्याच्या पथकांत चांगले ४००-५०० कवायती कुडतीवाले होते. बदामीच्या वेढ्यांत रूपरामाने चांगली कामगिरी केल्यामुळें पेशव्यांनी आणखी ५००--६०० लोक त्याच्या पथकांत भरती करण्यास मंजुरी दिली. त्यानंतर श्रीरंगपट्टणचा वेढा व सुप्रसिद्ध खर्ड्यांची लढाई यांतहि त्याच्या पथकाने चांगली मर्दुमकी गाजविली. मशीराला पुण्यास कैद करून आणलें तेव्हां त्याला बंदोबस्तानें आणावयाचें काम रूपरामाकडेच होतें.

दुसरा बाजीराव गादीवर आल्यावर त्यानें रूपराम हा वाडिलार्जित एकनिष्ठ सरदार म्हणून त्यावर साहजिकच विशेष लोभ केला व त्याकडे एक स्वतंत्र पलटणच नेमून दिलें. यानंतर थोड्याच दिवसांनीं मनोहर गीर गोसावी याचेंहि पलटण त्याजकडे दिलें. तसेंच तोफखान्याचें काम व १०० स्वारांची पागाहि सांगितली व या सर्वांसाठी साडेतीन लक्षांचा सरंजाम आणि जात खर्चासाठी १२००० चा सरंजाम दिला.

दुसऱ्या बाजीरावांत रूपरामाने त्रिंबकचा किल्ला नगरकरांकडून जिंकणें, कोरीगड जिंकणें व खानदेशांतील पेंढाऱ्यांचा बंदोबस्त राखणें इत्यादि कामें केलीं. यशवंतराव होळकराच्या पुण्यावरील चढाईनंतर बाजीराव कोकणांत पळून गेला. तेव्हां महाडापर्यंत रूपराम त्याच्याबरोबर होताच. पुढें वसईचा तह होऊन बाजीराव पुनः पुण्यास परत आल्यावर त्यानें त्यावर कृपाळू होऊन सिंहगड, पुरंदर, त्रिंबक, कांगोरी वगैरे किल्ले त्याचेकडे देऊन शिवाय तीनचार लक्षाच्या मामलतीहि त्याला सांगितल्या. यानंतर वेलस्लीसाहेब पुण्याहून गावीलगडच्या स्वारीस निघाला तेव्हां बाजीरावानें त्याजबरोबर जी स्वतःची फौज मदतीस दिलीं तींत विंचूरकर व बापू गोखल्याबरोबर रूपरामहि होता. ती फौज खानदेशांत गाळण्यानजिक असतां बाह्मणवाड्यापासून नाशिक, त्रिंबक, खानदेशपर्यंत भिल्लांचे दंगे सुरूं झाले. त्यांच्या बंदोबस्ताचें काम रूपरामाकडेच आलें व तेंहि त्यानें मेहनत करून बरोबर बजाविलें. भिल्लांच्या ज्या जागा होत्या त्या जाळून पोळून त्यांचा रामनगरपर्यंत सतत दोनतीन वर्षेंपर्यंत पाठलाग करून भयंकर उग्र शासनें करून त्यानें भिल्लांचें बंड मोडून टाकलें! यानंतर दोन तीन वर्षांनीं रूपराम पुण्यांत आजारी होऊन वारला.

बाजीरावानें त्याचा मुलगा रामचंद्र याच्याकडे रूपरामाचीच कामें ठेवली. त्याच्यासंबंधी सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, १८१८ सालीं इंग्रजांनीं सिंहगड जिंकला, त्यावेळीं किल्लेदार रामचंद्र चौधरी हाच होता व त्यानें दहा दिवसपर्यंत किल्ला नेटानें लढविला. 'पेशवाईची अखेर' या विश्वसनीय साधनग्रंथांत "रूपराम चौधरी जेष्ठ व॥ ३० स मृत्यु पावले. त्यांस दत्तक पुत्र रामचंद्र चौधरी केलें." अशी शके १७३६ ची नोंद आहे. त्यावरून १८ जून १८१४ ही रूपरामाची मृत्यू तारीख ठरते.

(२) "रूपराम चौधरी यांजकडे पलटणें व पलटणांतील तोफांचे बेगमीस व गाड्यांचे रोजमऱ्याबद्दल महाल व गांव सरंजामास लाऊन दिल्हे. छ १७ जमादिलावल शके १७२४ (१५-९-१८०२)"

[पेशवाईची अखेर, पृष्ठ ११६.]

रूपराम चौधरी याचा पोवाडा

१२

श्रीमंत बाजीराष कन्हया श्रीकृष्ण आठवा आवतार, जन सेवक स्वामीच्या प्रसगी आयेकुन ध्यावे निरंतर ॥ रामभकत रुपराम चौधरी सावळी मूरत मणुहार। धने शुर रणशूर पांडववंशामाधि पारथवीर॥ दादा (सा) यबासंगे लडाया घेतल्या रावाबरोबर। निज्यामआली ज्यार केला पाहा राक्षेसभवनावर ॥ कोपरगावी भील कापले नाही राहिला ठिकाना। येकायकी रतण हारपले कसे कोपला भगवाना ॥ ध्रुपद ॥ १

मूरत—मूर्ती. मणुहार--मनोहर. धने--धन्य. पारथवीर—अर्जुन. दादासायबासंगे इत्यादि—दादासाहेबांच्या बाजूनें. रावा बरोबर म्हणजे थोरल्या माधवरावाबरोबर लढला. कोपरगावी भिल्ल कापले इत्यादि—कोपरगांवाआसपास भिल्लांचीं बंडें झालीं तीं रुपराम चौधरी यानें निष्ठूरपणें मोडून काढून भिल्लांचा अगदीं नायनाट केला. त्यांचा ठिकाणा म्हणजे पत्ता मुद्दासुद्धां शिल्लक उरू दिला नाही अशा कत्तली केल्या.

श्रीराम

राजश्री त्रिंबकराव शंकर ठाणे पेमगिरी गोसावी यास अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री रुपराम चौधरी रामराम विनंती उपरी. तालुके रतनगड वगैरे महाली चोरटे लोकांचा वगैरे उपद्रव होतो त्यापैकी पेमगिरीचे गावी येक दोघे चोरटे आहेत ह्मणोन राजश्री रामचंद्रराव आणा नगरकर याजकडून याद आली त्यावरून हे पत्र लिःहिले असें तर चोरट्यास धरावयास त्याजकडून स्वारी येईल त्याजला तुम्ही अडथळा करू नये. ते चौकसी करणे ती तिथे पाहूनच करतील रवाना छ २४ रमजान सुरू इहिद्दे अशर मया तैन व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती. (२४. १०. १८१०)

वरील पत्र आम्हास कान्हुर पठार येथील नगरकरांच्या दप्तरांत संशोधन करतांना उपलब्ध झालें तें अप्रसिद्ध असल्यामुळे मुद्दाम उध्दृत केलें आहे. रामभक्त रुपराम चौधरी अशी जी पोवाड्याच्या सुरुवातीसच शाहिराने ख्याती गाइली आहे ती या पत्रकावरील श्रीकारावरूनही सिद्ध होत आहे. पूर्वी पत्रलेखक आपल्या उपास्य दैवताचें नांव पत्रावर लिहीत. पदरीं कारकून

सुभेद्दार रुपराम चवधरी च्यातुर यक मोतीदाना। येकायकी रतण हारपले कसे कोपला भगवाना ॥ मिरजवाले राव रास्ते गुण घेती सिंदेस्याई। ईंचुरकर आणि बापु गोखले रणि जानती होलकर स्याई ॥ रुपरामचा सर्मजाम बिनमोल कृत ठाई ठाई। रेणु रेखले सतर शुतारनाला तो सिगता नाई ॥ छोटेखानी बाग बनविला फुलबागाची चेतुराई। नेला बंब नळ वाढुन

वगैरे असलेले सरदार लोक पत्र दुसऱ्यानें लिहिले तरी स्वहस्ते तो श्रीकार काढित असत. नुसत्या श्रीकारावरूनहि इतिहास-संशोधकांना ऐतिहासिक पत्रलेखकांची वर्गवारी पुष्कळदां करतां येऊं शकते. गणराज असले कीं पटवर्धनांचे. 'श्रीकृष्ण' असले की दीक्षित पाटणकरांचे इ. सुभेदार—हा रुपरामाचा किताब. मराठशाहींत मल्हारराव होळकर व पिलाजी जाधवराव अशा फारच थोड्या सरदारांना सुभेदार या बहुमानवाचक किताबाने गौरविलें जात असें. चातुर—चतुर. यक—एक म्हणजेच अपूर्व असामान्य. मोतीदाणा—मोत्याच्या दाण्यासारखा, विशेष महत्त्वाचा पुरुष. मिरजवाले राव रास्ते इत्यादि—वेळोवेळीं रुपराम चौधरी आपल्या तोफखान्यासह मिरजकर पटवर्धन, रास्ते, शिंदे, विंचुरकर, होळकर आणि बापू गोखले यांच्याबरोबर लढायांत कामकाजास होता व त्या लोकांना त्याच्या कामगिरीची चांगली माहिती आहे असा भावार्थ. शिंदेशाही म्हणजे शिंद्यांचे सैन्य. सर्मजाम—सरंजाम म्हणजे तोफखान्याचा सरंजाम. बिनमोल—उत्तम स्थितींत ठेवलेला. कृत ठायी ठायी—रुपरामाचा तोफखाना व जिनसी सामान निरनिराळ्या गांवीं 'डेपो' ठेवलेलें असें. रेणु रेखले—रेणु या शब्दाचा अर्थ लागत नाही. कदाचित रणरेकले असा शब्द असेल. रणरेकला म्हणजे रणगाडा. रेकला किंवा रणगाडा असे शब्द जुन्या ऐतिहासिक पत्रांतून वाचनांत आहेत. परंतु रणरेकला असा शब्द येथेच प्रथम आढळला. सतर—सत्तर(?) शुतार नाला—सुत्रनाळी बंदुका किंवा तोफा. शुतरनाला म्हणजे उंटावरची तोफ. तो सिगता नाई—? छोटेखानी बाग बनविला—रुपराम चौधरीचा बाग पुण्यांत प्रसिद्ध होता. नेला बंब नळ—पूर्वी मोठमोठे सरदार लोक पुण्यांत आसपासच्या ठिकाण-

आणिला सेहर पुन्यामधि सवाई ॥ मुरत गेली किरत राहिली हेच मागणे श्रीकृष्णा ॥ २

डोळ्यास आणुन पानी आपा दादासी बोलाविले । आता आम्ही काही वाचत नाही ब्रह्मालिखत करमी लेहिले ॥ श्रीमंतासी करा हिनती माहाल मुलुक घ्यावे आपले । सोडचिठ्या आपहास्तें दिधल्या । पाळिक लोक मनिं घाबरले ॥ बाबासाहेब धनी कृपाळू पत्र पाहताच संतोसले । स्याहानपनाची रीत वळकली सवस्थान राखुन ठिविले ॥ उमाबाई व रमाबाईला सांगा नका करू रोजना ॥ ३

श्रीमंताने वस्त्र दिले बोलावुन रामचंद्रासी । सिरी ठेविला हात. ‘ शुकी संभाळावे सवस्थानासी ’ । हि ... ... आखर जाला र पडरीच्या राना ॥ शुभेदार रुपराम चौधरी च्यातुर यक मोतीदाना । येकायकी रतन हारपले कसे कोपला भगवाना ॥ ४

हून स्वतःसाठी पाण्याचे मोठमोठे नहर किंवा नळ बांधून आणीत; पुण्यांतील नाना फडणिसांचे सदाशिव आणि पुष्करणीच्या हौदाचे नळ, पेशव्यांच्या कात्रेजेचे नळ व घाशिराम कोतवालाचा नळ हे प्रसिद्धच आहेत. नळ म्हणजे नहर. बंब म्हणजे मोठा. बंब is freely used to express thickness stoutness or largeness. etc. ‘ त्याचे केवढे हो बंब शरीर हे ’ किंवा ‘ बारीक चार वासोळ्या घातल्या त्यापेक्षां एकच मोठा बंब वासा घातला म्हणजे काम झालें ’ (मोल्सवर्थ). मौजे कोढवे येथून रुपराम चौधरी यानें पुण्यांत नळ बांधून आणला होता. (पुणें नगर संशोधनवृत्त पुणे म्युनिसिपल दप्तरांतील उतारा पृ. १५.) सवाई—नळाचे विशेषण. सवाई म्हणजे जुने कोणी कोणी नळ आणले होते त्याहून मोठा असा. हिनती—विनंति. पाळिक लोक—आश्रित. बाबासाहेब—दु. बाजीराव. संस्थान राखुन ठिविले—सरदारी रुपरामाच्या घराण्यांतच दत्तक देऊन कायम ठेवली. रोजना—शोक. शुकी—सुखीं, सुखें, सुखानें. आखर—अंत. पडरीच्या—पंढरीच्या (?)

पेशव्याच्या शुक्रवार वाड्याचा पोवाडा

सदर पोवाडा श्री. शंकरराव जोशी यांनी सोलापुरास मिळविला व तो भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकांत आठ–दहा वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला. त्यांनी पोवाड्यास 'शनिवार वाडा वर्णन' असें नांव दिलेलें असलें तरी तें नक्की कोणच्या वाड्याचें वर्णन आहे हें ओळखण्यास गमक पोवाड्यांत सांपडत नाही. पण तें शनवार वाड्याचें वर्णन मात्र खास नसावें असें वाटतें. कारण दुसरा बाजीराव पहिल्या एकदोन वर्षांनंतर शनवारवाड्यांत रहात नसे. त्याने स्वतः करिता शुक्रवार, बुधवार आणि विश्रामबाग असे वाडे किंवा दौलतखाने बांधले व पुण्याजवळ कोथरूड येथे चैनीकरिता एक जलमंदिर व विलासगृह बांधले.

प्रस्तुत पोवाड्यांत जलमंदिराचा उल्लेख आहे त्यावरून कदाचित पोवाड्यांतील वर्णन त्या कोथरूडच्या बागेंतील बंगल्याचें असावें असें वाटण्याचा संभव आहे. शिवाय मंदिर असाहि शब्द त्यांत रामजोशी वापरतो व सामान्यतः रूढ अर्थ देवाचें मंदिर किंवा लहानशी कलाकौशल्ययुक्त शिल्पाची इमारत असा आहे. पण संस्कृतांत मंदिर हा शब्द राजवाडा या अर्थीहि वापरला जातो व व्युत्पन्न रामजोशाने तो तसा येथें वापरला असणें अशक्य नाही. तथापि मंदिर म्ह. राजवाडा असला तरी शनिवारवाडा खास नव्हे.

पोवाड्यांत एके ठिकाणीं पुणें शहर हें एक सरोवर व पेशव्यांचा वाडा हें त्यांतील कमल असें रूपक रामजोशाने केलें आहे. त्या अर्थी कोथरूडचें जलमंदिर हें त्याला अभिप्रेत असावें. पण कोथरूड पुणें शहरांत त्यावेळीं व आजहि जमा होत नाही. पोवाड्यांत गोकुळ अष्टमीचा समारंभ वर्णिला आहे व पेशवे दप्तरांतील नोंदींत बाजीरावाने गोकुळाष्टमी निमित्त रामजोशाच्या कथाहि करविल्याचें उल्लेख सांपडतात. पण तेवढ्यावरून तो अष्टमीचा उत्सव शनवारवाड्यांतलाच असें निश्चित म्हणतां येत नाही. कारण पेशव्यांचा कुळाचार म्हणून गणलेला गणेशोत्सवही दुसऱ्या बाजीरावाने केव्हा कोपरगांवासही साजरा केल्याचे उल्लेख आहेत.

पोवाडा शुक्रवार वाड्यासंबंधीं असावा असें आमचें मत आहे. त्यासंबंधीं बाजीरावानें स्वहस्तें लिहिलेल्या खासगी जमाखर्चांत तिस्सा मया

तेन शके १७३० श्रावण उर्फ जमादिलाखर छ २३ जमादिलाखर या तारखेस पुढील नोंद आहे.

"१०० रु. रामजोसी सोलापूरकर यांणी गोकुला अस्टमीस शुक्रवारचे वाड्यांत कथा केली. सबब पारण्याचे दुसरे दिवशीं त्यास भोजनास बोलावून १०० रु. दक्षिणा दिली."

रामजोशी चरित्रावर आणखी प्रकाश

आमच्या ऐतिहासिक पोवाड्याच्या पहिल्या भागांत आम्ही रामजोशाचें विस्तृत चरित्र दिलें आहे. आतां १९२८ नंतर चौदा वर्षांच्या काळांत रामजोशाच्या चरित्रासंबंधीं उपलब्ध झालेले विश्वसनीय माहितीचे नवे कण एकत्र करून देतों. ते कणच आहेत तथापि महत्वाचे आहेत. रामजोशी याची उत्तम कीर्तनकार म्हणून पुण्यांत १७९३ पासूनच ख्याति झाली हें पुढील जमाखर्ची नोंदीवरून कळेल. तालेबंद खासगत गोविंदराव बाजी जोशी मु॥ पुणें सुरु आर्बा तिस्सैन मया व अलफ इ॥ छ २४ सवाल वैशाख मास अवलसाल ता॥ छ ५ जिलकाद वगैरे.

देहनगी खर्च

२ रामजोशी सोलापुरकर याचे कथेचे दिवसी गुरव आसामी २ पखवाज वाजवावयासी बोलाविले त्यास.

दुसऱ्या बाजीरावाची त्यावर बहाल मर्जी बसली. ती कशा प्रकारची होती हें पेशवे दप्तरांतलि बाजीरावानें स्वहस्तें लिहून ठेवलेल्या स्वतःच्या खाजगी जमाखर्चावरून व बाजीरावाचा दिवाण सदाशिव माणकेश्वर याच्या जमाखर्चांतील नोंदीवरून चांगलें कळून येतें. बाजीरावाच्या समान मयातेन जिल्हेज ऊर्फ माघमास या तारखेची नोंद अशी—"१०० रु. रामजोसी सोलापूरकर यांचे बिऱ्हाडीं जेवावयास गेलों तेथे देवापुढे दक्षिणा ठेवली. छ. २ जिल्हेज" [३१-१-१८०८]. त्यानंतर त्याच महिन्यांत पुनः ११ जिल्हेज तारखेस अशी नोंद सांपडते. "२०० रु. रामजोसी सोलापूरकर यांस देविले." [९-२-१८०८]. यानंतरहि फिरून त्याच वर्षांतल्या जून व ऑगस्ट महिन्यांतलि जमा-खर्चांत पुढील नोंदी सांपडतात.

(१) तिसा मयातेन शके १७३० जमादिलावल ऊर्फ आषाढ—२०० रुपये रामजोसी सोलापूर यास धर्मदाय दिल्हे. छ. १ जमादिलावल (२६-६-१८०८)

(२) तिसा मयातेन शके १७३० श्रावण ऊर्फ जमादिलाखर-- १०० रु. रामजोसी सोलापूरकर याणी गोकुला अस्टमीस शुक्रवारचे वाड्यांत कथा केली. सबब पारण्याचे दुसरे दिवशी त्यास भोजनास बोलावून १०० रुपये दक्षिणा दिली. छ २३ जमादिलाखर (१६–८–१८०८)

(३) येकादसीस रामजोसी सोलापूरकर याणी कथा केली. सबब द्वादसीस त्यासी १०० रुपये दक्षिणा दिल्ही. छ. २५ जमादिलाखर (१८-८-१८०८).

या नोंदींवरून बाजीरावाची रामजोशावर कशी मर्जी बसली होती व तो त्याच्या घरीं मेजवानी घेण्यासहि कसा गेला होता तें कळतें.

बाजीरावाने राम जोशाला कारणपरत्वें दिलेल्या बिदाग्याखेरीज त्याला दरमहा २५ रुपयांची नेमणूकहि करून दिली होती. तसेंच त्याच्यासाठीं महालानिहाय थोडीबहुत पट्टीहि जमा करून दिली होती हें बाजीरावाचा दिवाण सदाशिव माणकेश्वर याच्या जमाखर्चांतील नोंदी-वरून दिसेल.

"तालेबंद खासगत रा.सदाशिव माणकेश्वर सु॥ तिसा मयातैन व अलफ सन १२१८ इ॥ छ. १ माहे मोहरम फाल्गुनमास त॥ छ. ३० माहे रबि-लावल उर्फ वैशाखमास यैकूण माहे तीन. स्वारी कोपरगांवास जाऊन पुण्यास येतो पावेतो (त्यांपैकीं नोंदी १६–२–१८०९ ते १५–५–१८०९).

७५ रामजोसी सोलापुरकर यांस पेशजी दिनानाथ नाईक यांजकडून दोनसे रुपये देविले होते ते धर्मादाव खर्चीं लिहिले. त्याची कराराची यादी कार्तिक मासीं जाली. पुढे रामजोसी यांची पटी गावगना धर्मादाय ब॥ केली. त्यांत दोनसें रुपये वजा करून ध्यावयाचें त्यांपैकीं वसूल आले ते जमा वि॥ गोविंद गोपाल माहे मोहरम फाल्गुनमास.

५ बांबले व तांबवे

२५ मौजे लोम

ऐ....१०

२५ मौजे आवसरी भांडगांव वगैरे देहे
४ पे ॥

१० मौजे जकेली व घोंटी
१० कसबे वावडे.

५० रामजोसी सोलापूरकर दरमहा नेमणूक रुपये २५ प्रा॥ तीन माही रु. ७५ पो फालगुन मासाब ॥ माघ मासचे सुडात खर्ची लिहिले ते वजा रु. २५, बाकी चैत्र वैशाख दुमाही.

(२) तालेबंद खासगत राजश्री सदाशिव माणकेश्वर इ॥ छ १० रजब भाद्रपद मास शु॥ ११ सुरूसमान मयातैन व अल्लफ सन १२१७ ता॥ सन सलास अशर मयातैन व अलफ सन १२२२ ज॥खर छ ५ जेष्ठ शुद्ध ७ अखेर किता जमा रुपये

१४५० पटी माहाला निहाये रामजोसी सोलापूरकर याजबद्दल विद्यमान व्यंकाजी सदाशिव चांदवड रुपये खेरीज मुशाहिरा धर्मादाय १३९६ रामजोसी सोलापूरकर

(२०-७-१८१२ ते ५-६-१८१३ पर्यंत)

महाराष्ट्र सारस्वतकार कै. वि. ल. भावे यांच्या सारस्वताच्या भाग २, तिसऱ्या आवृत्तींत पुढीलप्रमाणें लिहिलें आहे. "एके वेळीं आपण काशीयात्रेस जावें असें मनांत येऊन जोशीबोवांनीं आपली ही इच्छा लोकांस दर्शविली. तो स्वराज्याचा आबादानीचा काळ आणि त्यांत अशा गुणिजनाची मागणी मग काय उणें ? लगेच पंधरावीस हजारांची परडी जागच्याजागीं जमली. परंतु जोशीबोवांना काशीयात्रेचा योगायोग नव्हता. लवकरच दुखणें येऊन शके १७३० मध्ये विभवसंवत्सरीं चैत्र शु. १ जोशीबोवांनी पुण्यासच देह ठेविला." वरील माहिती देऊन त्या पानाखाली मुद्दाम पुढील टीपही त्यांनी लिहिली आहे. "सुमारें वीस-

बावीस वर्षांपूर्वीं सोलापूर येथे जोशी बुवांच्या घरचे दप्तर पहावयास गेलो असतां त्यांचे वंशज रा. श्रीपाद गोपाळ जोशी यांनी सांगितलेल्या हकीकती-वरून वरील मजकूर व जोशीबुवांचा मृत्यु काळ दिला आहे. छापील पुस्तकांत मृत्युकाळ शके १७३४ हा आढळतो.”

श्री.भावे यांच्या वर दिलेल्या दोनही अवतरणांपैकीं रामजोशांनी काशी-यात्रेस जाण्याची इच्छा दर्शविली होती एवढा भाग पूर्णपणें बरोबर आहे. बाकी जागच्या जागीं १५–२० हजारांची परडी जमली वगैरे अतिशयोक्ति आहे. त्याचप्रमाणे पूर्वींच्या लोकांनी दिलेलें मृत्यूचें साल भावे यांनी त्यांना मिळालेल्या नव्या माहितीवरून चूक ठरविलें आहे. पण अलीकडे आम्हास उपलब्ध झालेल्या व वर दिलेल्या जमाखर्चीं अस्सल पुराव्यावरून भावे हेच चूक ठरतात. त्यांपैकीं एका नोंदींत १४५० व १३९६ रुपये रामजोशास दिल्याचा उल्लेख आहे. ती नोंद २०–७–१८१२ ते ५–६–१८१३ या कालखंडांतील आहे. अर्थात् रामजोशी ५ जून १८१३ पर्यंत तरी खास मेलेला नाही. सारांश मूळ शालिग्राम वगैरे चरित्रकार, किंवा रामजोशाचे खुद्द वंशज श्री. गो. जोशी व तिथीसुद्धां तपशील देणारे सारस्वतकार भावे हे सर्वच चूक ठरत आहेत. रामजोशाचा मृत्यु ५ जून १८१३ नंतर केव्हां तरी झाला इतकी पक्की गोष्ट या विवेचनावरून निष्पन्न होतें. भारतवर्ष पंतप्रधान शकावलींत सलास अशर मयातैन व अलफ १२१३ सालीं “सोलापूरकर रामजोशी मेले. यांचा जन्म १७६२” अशी नोंद आहेच.

पंधरावीस हजारांची परडी जागच्याजागीं जमली हेंही विधान अति-शयोक्त आहे असें आम्ही वर जो जमाखर्च दिला आहे त्यावरून दिसतेंच. आमचा पोवाड्याचा पहिला भाग प्रसिद्ध झाल्यानंतर सुप्रसिद्ध महामहोपाध्याय रंगाचार्य रड्डीशास्त्री यांनीं खुद्द रामजोशाच्या घरचीं त्याने स्वहस्तें लिहून ठेव-लेलीं कांही काव्याचीं जीर्ण बाडें आम्हास दिलीं होतीं व त्यावरून पुष्कळसा भाग आम्ही नकलूनहि ठेविला होता. पुढें तीं बाडें श्री. रड्डी यांनीं श्री. लाड यांस देण्यासाठी आमचेकडून परत नेलीं. आम्ही नक्कल करून ठेवलेल्या रामजोशाच्या कवनापैकीं कांही भागच सर्वस्वी नवीन व पुराव्याचा म्हणून पुढें उतरून घेतों. त्यावरून काशीयात्रेस जाण्याबद्दल रामजोशांनी बाजी-

रावाकडे व पुण्यांतील त्याच्या आश्रित विद्वानांकडे सूत्र कसें लावलें, त्याची सांपत्तिक स्थिति कशी होती हें कळून येतें. मात्र त्या निमित्ताने तत्कालीन विद्वान लोकांचीहि नांवनिशी कळते हाहि एक लाभ आहे. बाडातील पानें अगदीं जीर्ण फाटून गेलेलीं. त्यांत उरला तेवढा मजकूर नकल केला.

॥ श्री ॥

आलो राव बाजीपासी ॥ या कविस घडावी कासी ॥ धृ ॥

धणिकाला मद्गुणचि कळेना ॥ कळते त्याला धनचि मिळेना ॥ ज्ञाता तरी शेठ तो निवळेना ॥ ग्राम्य जनाला हे आकळेना ॥ कोणासही मद्गुणची कळेना यासाठी × × मर्म जाणता ॥ धर्मज्ञ प्रभु कर्मठ दादा ॥ नर्मरसिक क ×× चें र्म आसावा ॥ चेर्म ×× कधी पाहावा ॥ तछनी ×– ... ... व मनोरथ आपुला ××

× ... ... नो वि हारा ॥ याणे सांडि ... ... भाऊ जोग ... ... त इष्क रसीकाचा प्यारा ॥ त्या

(२)

... ... सोलापुरकर जोशी

... ... घरा फिर्ताना थकलो ॥

... ... अजिबात झुकलो ॥ काव्य कराया नाही चुकला काये करू लोभाला विकलो ॥ रात्रंदिस घरदारा चुकलो ॥ वर्ष जाहाले–उन्हात पिकलो ॥ कर्ज खाऊनी येथें टिकलों ॥ परंतु आहे प्रथम दिवस हे भिक्षुक मंडळी सुक्ष्म मधुर बोलती ॥ मत्कार्यावर नेट्न पडती ॥ तथें नृपतींची बडती ॥ शुभाशुभे दैवानें घडती ॥ श्रौत सुमंडित खंडमंड पक्ष्यखंडित ॥ मल्हार श्रोती यांसी भेटलों ॥

(वरील पानाची पाठबाजू)

मग पाटकजीचे नंद व पौराणीक अंणा ॥ चीमण भट्ट ते आनंद भट्ट ब्रह्मगी मग सखाराम पौराणीक तुळसीबागेंतील ॥ यवलेकर वैद्य पाहीले ॥ भाऊ वैद्य ही चीक सारे ॥ तं (उत्तम ?) जाणते तपस्वी ॥ गोपाळाभिद गोसावी ॥ सखाराम गोसावी ॥ गायेक सीनरकर गोसावी ॥ नाना त्रिंबक आत्माराम पाहीले ॥ बापु वर्तक ठाकुर्दास तसे नारायण

××××××जीस भेटलो ॥ मग पाहुनी संताजी बावा आनंद फंदी छेंदी हेही पाहीले ॥ सीवाये रास्ते ×××××× गुणात कस्ते ××××

गौडमैथिली द्रविड कराडे ॥ कोकणस्थ देशस्त××राडे ॥ रामानुज तैलंग कानडे ॥ दुर्लभ ते बनबल्ल××× कासीकर मग ॥ ठासी कर मग उज्जेनकर मग बराणपुरकर सीन्नरकर । कालपी नगरकर । नासीक ×× मग पुणतांबेकर । जीतीकर मग वोतुरकर । कोपरगावकर । द्विजे संगमनेरी । येवलेकर वैदिक नांदेडकर । ×× प्रवरा संगम टोकेकर । कायेगांवकर पैठणकर मनरथ ××××र ॥ राक्षसभुवनकर द्विजे अंबेड-कर खेडकर । ना××××कर जालनेकर सोन पेटकर तसे मानवतकर ××× देकर आवढेकर ॥ परळीकर मुग्दलकर ॥ बीड

घेउनि ह्रुदये विचारा ॥ तदुप ×× दक्षीत नाना तारा ॥ बोला याच्या सुक्ष्म विच्यारा ॥ श्रीमंतानी करूनी ×× रा ॥ हा मज बांधुनी दिधला धारा ॥ मीही बोलाया नीर्धारा ॥ श्रौत सुमंडित खंडमंड पाद्यखंडित ॥ ××× परशराम यज्ञेश्वर शास्त्री ॥ सूर्याभीद सिधेश्वर शास्त्री ॥ तिमिंगळाचार्य नृसिव्ह शास्त्री ॥ गुर्जर मग नारायेण शास्त्री ॥ विठ्ठल पंडित पंढरपुरकर ॥ उपाध्याये भुपर्तीचे दादा ॥ करवे यासी बरवेपण संपादुनि जोसी ॥ विद्याधर निळकंठ जोसी ॥ चांदेकर मग शंकर जोशी ॥ नाम ××× डगेळ मयूर जोसी.

पेशव्यांच्या शुक्रवार वाड्याचा पोवाडा

१३

(शाहीर—रामजोशी)

कृष्णजन्म आनंद वाटतो गोकुळ अज हे पुणे ॥ श्रीमंताचे मंदिर काही वसुदेवाहुनि उणे ॥ ध्रु ॥ अद्भुत कविचा वार पहा हो कृतमंदिर चातुरी ॥ काय कल्पना अचाट शोभा बाहेर तसि भीतरी ॥ १ ॥ जिकडे तिकडे रंग कटाडी खिडक्या जाळयावरी ॥ ज्याणे जेथें बसुनि पहावे तेथे सुख अंतरी ॥ २ ॥ ठांई ठांई हवुद जळाचे अमृतरसाचे परी ॥ स्नाने करिती संध्या जपतप किति विप्रांच्या हरी ॥ ३ ॥ जेथे नर नारायण पूज्या सांबासह आदरी ॥ प्रभुच्या हस्ते विप्रभोजने भोजन

कृष्णजन्म आनंद वाटतो—कृष्णजन्माचे वेळीं साऱ्या गोकुळांत जसा आनंदीआनंद झाला व मोठा उत्सव आबालवृद्ध गोपगोपींनीं केला तसाच प्रकार आज पुणें शहरांत दिसत आहे. **श्रीमंतांचें मंदिर**—मंदिर म्हणजे राजवाडा असा अर्थ; मात्र तो शनिवारवाडा नव्हे. बाजीराव, पहिले फारच थोडे दिवस शनिवारवाड्यांत राहिला. त्याने शुक्रवार व विश्रामबाग हे दोन नवे राजवाडे स्वतःस राहण्याकरिता बांधले होते. त्यांपैकीं कोणता तरी एक वाडा येथें कवीस अभिप्रेत असावा. **श्रीमंतांचे मंदिर कांही वसुदेवाहुन उणे**—वसु म्ह. संपत्ति. वसुदेव म्हणजे कुबेर. पेशव्यांचा राजवाडा अर्थात् कुबेराच्या भांडारासारखा संपन्न; मग तेथें कशाची उणीव भासणार? असा अर्थ घेतां येईल. **अद्भुत कविचा वार**— ? **कृतमंदिर चातुरी**—मंदिर किंवा राजवाडा बांधण्यांतलें कौशल्य. **भीतरी**—आंत. रचनेंत आंत बाहेर अशी कल्पकता दाखविली आहे कीं कोठूनहि अमूप शोभाच दृष्टीस पडावी. **कटाडी**—मूळ शब्द कठाड किंवा कठारा म्हणजे कठडा (a railing or paling (मोल्स). **हरी**—हारी, रांगा. **नर नारायण पूज्या सांबासह आदरी**—राघोबाच्या वेळेपासून नरनारायण व सांब यांची पूजा केली जात असे. बापाचें तें व्रत दुसऱ्या बाजीरावानेंहि यथासांग चालविलें होतें. रघुनाथराव व बाजीराव यांच्या संबंधीच्या अनेक ऐतिहासिक पत्रांतून सांबाची पालकी किंवा नरनारायणाची पालकी असे उल्लेख येतात. स्वारींत हे देव पालक्यांतून बरोबर चालवीत. त्यास अनुलक्षून सांबाची पालकी असा शब्द येतो.

ऐका तरी ॥ ४ ॥ साग्र गर्दळी-दलें तयावरि षड्रस साखरपुरी ॥ भात

" शिवरात्रीचे दिवशीं मध्यरात्रीस सांबाची पूजा जाली ते समयी पांच तोफा जाहल्या.

[१२ मार्च १७९६ खरे पत्र नं. ३७१०]

छ. १७ जिल्हेजीं कूच करून पुण्यास स्वारी आली. श्रीमंताजवळ मुत्सद्दी अथवा राऊत जवळ नसावा. दोन बाणाचे लांबीनें चालावें. बरोबर बाळाजीपंत अथवा रामचंद्र गवई तिसरा कोणी नाही. जिलबीचे लोकहि व लग्या नसतात. सांबाचे पुढे जिलब चालतात.

[८ मार्च १७९६ खरे पत्र नंबर ३७०४]

त्याजवरून सहा घटका रात्रीस श्रीमंताचे डेऱ्यास गेलो. तो श्रीमंत स्नान करून धोत्रे नेसत होते. मला पहातांच 'नमस्कार करूं नका, कपाळी कांही लाविले नाही' म्हणोन आज्ञा जाली. धोत्रे नेसून कुदल्यांत जाऊन संध्येस बसले. मला राजश्री आपाजी राम सहस्रबुद्धे घेऊन सांबाचे दर्शनास राहुटींत गेले. सांबाचे दर्शन जाले. पंचमुखी स्फटिकाचे लिंग बहूत अपूर्व आहे. गवई यांचे गाणे होत होते.

[५ मे १८०१ खरे पत्र नं. ६०५१]

श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांची स्वारी पौष शु॥ १४ पुण्यांत आली. रात्रौ विश्रामबागांत स्वारी होती. पौर्णिमेचे दिवशी वो।। रा॥ वैजनाथ भट भागवत याचे घरी इष्टी करून फराळ करून सासवडास भोजनास गेले. भोजन पुण्यात न करावयाचे कारण सांब सासवडास राहिले. स्वारी-बरोबर आाणले नाही. पूजा करून मग भोजन करावे याप्रमाणे नेम आहे. याजकरिता माघारी स्वारी गेली.

[२ जानेवारी १८०१ खरे पत्र नं. ५९१५]

वद्य ७ शुक्रवारीं १२ घटिका दिवसास मुहूर्त होता तेव्हां निघोन पर्वतीस गेले. [दुसरे बाजीराव] जरिपटका व साहेब नौबत हत्तीवर दिली. सायंकाळचे सहा घटिका दिवसास मुहूर्त. मग जामदारखाना व सांबांची देवपूजेचीं भांडीं वगैरे झाडून पुढे रवाना केली... ...

[१ ऑगस्ट १८०१ चें पत्र खरे भाग १४ प. नं. ६१०८.]

केसरी भक्षुनि वाद्यें सवै वरपिती खिरी ॥ ५ ॥ पक्वदळाचे विडे सुवसने ज्या त्यावरि भर्जरी ॥ हार गळ्यामधे तुरे लटकती ज्याच्या त्याच्या शिरी ॥ ६ ॥ गीत कला नर्तने दिवानिशी सदैव रसमाधुरी ॥ राजसु जाहाला येक वेळ ह्या नित्योत्सव मंदिरी ॥ ७ ॥ ज्या ज्या रुतुचे जसे यथोचित

नरनारायणासंबंधी पुढील नोंद पाहा. तालेबंद माहाल जामदारखाना खासगी स्वारी राजश्री पंतप्रधान स्वारी जुन्नर इ॥ छ. २६ जिलकाद अश्वीन-मास तागायत छ. ३. जिल्हेज कार्तिक मास शके १७३८ धातनाम संवत्छरे सुरुसबा अशर मयातेन व अलफ या मथळ्याखाली नरनारायणासंबंधी पुढील उल्लेख आहे.

१० छ. २९ रोज वोवालणी . ७ सौ. दुर्गाबाई गोखली यांस, १ सहलखर्च छ. ३ जिल्हेज., ३ श्रीसांब व नरनारायणाकडे. ३ छ. १ रोज मोहोरा १७.

२४

[इतिहास संशोधक मंडळ दप्तर, श्री. स. ग. जोशी रुमाल.]

गर्दळी दळें—कर्दळी दळें. म्हणजे कदलीदलें, केळीचीं पानें. साग्र म्हणजे सबंध ठाव. वाद्यें सवै वरपिति खिरि—सनई वगैरे वाद्यांच्या गोड आलापासह खिरी ओरपतात, म्हणजे तोंडाने गोड पक्वानें सेवन करतात व कानानें त्याच वेळीं मधुर संगीत श्रवण करतात. वरपणें म्हणजे ओरपणें भुरके मारीत चव घेत खाणें. सुवसने—याचा संबंध विड्याकडे आहे. नुसत्या पिकल्या पानांचे विडे नव्हत. तर त्या विड्यावर सोनेरी वर्ख गुंडाळलेला असे. वर्ख हें विड्याचें भरजरी सुवसन किंवा वस्त्र. हार गळ्यामध्ये वगैरे—ब्राह्मणांचा हारतुरे घालून सन्मान करण्याचा परिपाठ अद्यापहि वसंतपूजेच्या वेळीं दिसून येतो. ती जुनीच पेशवाईतलि प्रथा आहे. दिवानिशि—अहोरात्र. राजसु—राजसूय यज्ञ. राजसूय यज्ञाचा महोत्सव एकदांच काय तो धर्मराजाचे वेळीं झाला. पण बाजीरावाच्या कारकीर्दींत रोजच राजसूय यज्ञासारखा महोत्सव सुरूं आहे.

विलास नाना परि ॥ भागवतांचे थवे नवे किति कीर्तनरस या घरीं ॥ ८ ॥ तळी धरुनिया शिरो मंदिरा पर्यंकहि येकसरी ॥ पडदे कुल रेशमी बिछोने जरबाबी झालरी ॥९॥ कविने मंदिर कमळ म्हणावे जर ही सरसी पुरी ॥ पंकज मंदिर खरें न कमला राती कमलोदरी ॥१०॥ या सदनामध्ये निरंतर श्री दिवाराति साजिरी ॥ संधेपासुनि निशांत शोभा दीप तिमिर संहरी ॥११॥

भागवत—भगवद्भक्त–हरदास. कीर्तनकार, पुराणिक वगैरे लोक. तळी धरुनिया शिरो मंदिरा पर्यंकहि येक सरि—? कुल—सर्व, एकजात, एकूण एक. बिछोने—बिछाने. जर्बाबी—जरीचे किंवा भरजरी.मू.श. पर्शिअन जरबाब म्हणजे जरतारी विणेचें भर्जरी वस्त्र असा आहे. सर्व पडदे व बिछाने रेशमाचे व त्याच्या झालरीं भर्जरीच्या असा थाट. "कविने मंदिर" पासून "कमलोदरी" पर्यंत—जर ही (पुण्य) पुरी सरसी (मानली) तर कवीने हें मंदिर कमळ आहे असें म्हणावें; आणि हें मन्दिर हेंच खरें पंकज; कारण कमला (लक्ष्मी) कमलोदरींच राहते हें प्रसिद्ध आहे. सरस म्हणजे मोठे तळे किंवा जलाशय (गीर्वाण लघुकोश) पुरीचे तें विशेषण करून संस्कृत पद्धतीने तें स्त्रीलिंगी सरसि असें बनविलें आहे. राति–राहाति किंवा राहाते. कमला राति म्हणजे कमला राहाते. पुण्यनगरी किंवा पुणें शहर हा एक सुंदर जलाशय असून त्यांत विकास पावलेलें कमनीय कमळ म्हणजे हा पेशव्याचा राजवाडा असें रूपक करून कवि म्हणतो कीं या राजवाड्याला कमळच म्हणणें योग्य कारण लक्ष्मी ही कमळांतच निवास करते. सर्व वैभवसंपन्नता येथे आहे. श्री—शोभा. संधे पासुनि—संध्याकाळपासून. निशान्त—निशेचा अन्त होईपर्यन्त म्हणजे उजाडेपर्यंत. फाणस—कंदील. मूळ पर्शिअन शब्द फानुस असा आहे. पोत—A link composed of rolls of coarse cloth. This portion together with the विडी or iron handle constitute the मशाल or torch. दुशाखा—मूळ शब्द दुशाख (f) a stick with two or more curved iron-spikes fixed at the extremity for the reception of wicks, forming

फाणस कंदिल पोत दुशाखा हिलाल समया तरी ॥ समया अगणित मेण-बत्तिचा प्रकाश अंतःपुरी ॥१२॥ सायंकाळी सुवास लक्ष्मीसमा फिरति सुंदरी ॥ दांत मंचकी किती कितिक त्या डोले वरि नागरी ॥ १३ ॥ ज्याच्या दामल मुक्ता सत्कुच कंदुक शोभति उरी ॥ आनंदे क्रीडती नारि किति न कळत या किन्नरी ॥ १४ ॥ सुभोवत्या अप्सरा पहा हो चिन्ह भासते कसे ॥ सूक्ष्म दृष्टीने पाहिल त्याला सत्याचि सर्वहि दिसे ॥ १५ ॥ यास्तव या घरि कृष्णजन्म हे सत्याचि लटिके नसे ॥ टाळ विणे किती रबाब भेरी वाद्यें वाजति रसे ॥ १६ ॥ दानधर्म आनंद पहा हो किति निशिदिनि होतसे ॥ जेथे नरनारायण वसले स्वये भक्तिच्या गुणे ॥ ते मंदिर कविराय वर्णितो नको म्हणावे कुणे ॥ १७ ॥

---

a sort of torch on occassions. **समया**—समयास म्हणजे प्रसंग विशेषीं. राजवाड्यांत फाणस, कंदील, पोत, दुशाखा, हिलाल आणि समया सारख्या तेवत असतातच; त्यांचा सदैव प्रकाश असतोच तथापि प्रसंगविशेषीं अन्तःपुरांत म्हणजे दिवाणखान्यांत बैठक किंवा मेजवानी किंवा कांही समारंभ असेल त्यावेळीं हंड्यांतून हजारो मेणबत्त्या लावून लखलखाट केला जातो. **सुवसना**—सुंदर वस्त्र परिधान केलेल्या. **दांत**—हस्तीदंती असा अर्थ संस्कृत कोशांत सांपडतो. दांत मंचकी म्हणजे हस्तीदंती पलंगावर. **डोले**—डोलती (?). **नागरी**—पुरस्त्रिया किंवा नगरांतील स्त्रिया. **दामल मुक्ता**—मोत्यांच्या माळा. ज्यांच्या उन्नत वक्षस्थळावर मोत्यांच्या माळा लोळत आहेत अशा स्त्रिया. **किन्नरी**—यक्ष किन्नरी. **अप्सरा**—या शब्दावर श्लेष असावा. अप्सरा म्हणजे सुंदर स्त्री; पण अप्सरा म्हणजे मुळांत पाण्यापासून जन्मलेली किंवा कमळ असाहि अर्थ आहे. कवीनें पुण्याला सरोवराची उपमा वर दिलीच आहे. तेव्हां पुण्यांतील पेशव्याच्या वाड्यांतील या सुंदर स्त्रिया म्हणजे अप्सरा किंवा कमळेंच होत हें सूक्ष्म दृष्टीनें पाहील त्याला पटेल असें कवी सांगतो. **रबाब**—A kind of fiddle, a rebeck, **कुणे**—कुणी, कोणी.

१४

(शाहीर प्रभाकर)

श्रिमंत झाले लोक श्रिमंतापासुन लक्षावधी ॥ दुरावले श्रीमंत आपल्या दृष्टिस पडातिल कधी ॥ ध्रुवपद ॥

शिंदे होळकर उत्तरेस पश्चिमेस सेनापती ॥ पूर्वेकडे भोंसले, मिरजकर दक्षिणचे अधिपती ॥ हरीपंत नानाच्यापुढे किति बुद्धिवान लोपती ॥ बृहस्पती अणि शुक्र जसे काय तारांगणिं तळपती ॥ विपूल त्या रास्त्याच्या घरीं आजवर संपत संतती ॥ इचलकर्जिकर बारामतीकर सोयऱ्यांत

'श्रिमंत झाले' येथपासून 'दृष्टिस पडतील कधी' पर्यंत—श्रीमंतांपासून म्हणजे पेशव्यांपासून सर्वसामान्यतः 'स्वामी' किंवा 'महाराज' हा किताब छत्रपतीसाठीं व 'श्रीमंत' हा किताब पेशव्यांसाठीं वापरला जाई. पेशव्यांच्यामुळें अनेक सरदार महत्पदास चढले. ते सरदार शिल्लक राहिले आहेत. परंतु ते पेशवे मात्र नष्ट झाले आहेत! "या पेशव्यांच्या कृतीवर बावन सरदार ।शिंदे होळकर वाढले भारी" (पोवाडा) **दुरावले इत्यादि**—पेशव्यांस दूर ब्रह्मावर्तास नेऊन ठेविलें त्यास अनुलक्षून.

पश्चिमेस सेनापती—सेनापति म्हणजे वास्तविक दाभाडे. पण पुढें सेनापतिपद किंवा सेनाखासखेली गायकवाडांकडे गेली. गायकवाडांचा मुलूख गुजराथ–काठेवाड पश्चिमेस आहे. **हरीपंत नानाच्या पुढे**—हरीपंत आणि नाना फडणिसांच्या पुढे.

बृहस्पती—गुरु. **विपुल त्या रास्त्याच्या घरीं आजवर संपत संतती**—पेशवाईतील सर्व सरदारांत रास्ते फार धनत्तर होते. मूळ ते सावकारी करीत असत. गोखल्यांचे रास्ते झाले इत्यादि दंतकथा उपलब्ध आहे ती याच घराण्याबाबत. नानासाहेब पेशव्याची बायको गोपिकाबाई ही रास्ते घराण्यांतीलच **सोयऱ्यांत धनपती**—पेशव्यांच्या घराण्यांत ज्या सोयरिकी झाल्या त्या बहुधा अत्यंत मातब्बर धनत्तर सावकार घराण्यांतील. उदाहरणार्थ, बारामतीकर जोशी, चासकर जोशी, कोल्हटकर, दीक्षित (पटवर्धन), साठे, थत्ते. थत्त्यांना तर 'नवलाखे थत्ते' असेंच म्हणत असत. शरीरसंबंधामुळें पेशव्यांचे आप्त बनलेले हे सर्व लोक श्रीमंत होतेच.

धनपती ॥ (चाल) ॥ पाहा कृष्णराव चासकर ॥ कोंकणचे कोल्हटकर ॥ महाशूर सोलापूरकर ॥ दीक्षित पेठे साठे ओक ओंकार सभाग्यामाधिं ॥ फाटक थत्ते बरवे देवधर, पेंडशांची रित सुधी ॥ १ ॥ दुरा० ॥

तथापि कर्तबगार, नामांकित मुत्सद्दी व लढवय्येही होते. बाळाजी विश्वनाथाची मुलगी अनुबाई ही इचलकरंजीकर घोरपड्यांना दिली होती. **कोंकणचे कोल्हटकर**—कृष्णाजी मोरेश्वर कोल्हटकर कसबे पेण यांची कन्या भाऊसाहेब पेशव्यास दिली होती. नांव पार्वतीबाई पेशवे (पे. द. भाग ४४ पृष्ठ ३२). **सोलापूरकर**—बाबूजी नाईक व आबाजी नाईक जोशी. राघोबादादाची मुलगी दुर्गाबाई ही बाबूजी नाइकाचा पुत्र पांडुरंगराव यास दिली होती **दीक्षित**—दीक्षित-पटवर्धन; विश्वासराव पेशव्याची बायको लक्ष्मीबाई ही या दीक्षितांच्या घराण्यांतली. **पेठे**—हे भाऊसाहेब पेशव्यांचे मामा लागत. पेठे आणि पटवर्धन यांची आपसांत चुरस असे. आणि पटवर्धन मंडळी पेठ्यांच्या पेशव्यांशी असलेल्या नात्याचा उल्लेख करून पेठ्यांना टोमणे देत असत. कर्नाटकच्या स्वारींत सेनापतिपद पेठ्यांकडे थोरल्या माधवरावानें दिलें तेव्हां पेठे सांगतील ती हलकी कामगिरीहि पटवर्धनाना बजावावी लागली. त्या वेळीं पुरुषोत्तम दाजी पटवर्धनानें "श्रीमंत भाऊसाहेब यांचे मामा ते साऱ्या राज्याचे मामा!" असा टोमणा त्यास दिला होता.

त्याचप्रमाणें दुसरे एका प्रसंगीं "आम्ही कांही लेकी अथवा बहिणी देऊन रोजगार मिळवून श्रीमंतांची कृपा संपादिली असा अर्थ नाही" असें मामाच्या तोंडावर त्यास चोख उत्तर दिलें होतें. चिमाजीअप्पास त्रिंबकराव मामा पेठ्यांची बहीण दिलेली होती. (हरिवंशाची बखर पृ. ३५ व ३७) **साठे**—नारायणराव पेशव्याची बायको ही साठ्यांची मुलगी. लग्न १७६३ सालीं सिंहगडावर मोंगलांच्या दंग्याच्या वेळीं झालें. **ओक**—प्रसिद्ध आनंदीबाई पेशवीण ही ओक घराण्यांतील. **ओंकार**—थोरले चिमाजी अप्पासाहेब पेशवे यांची मुलगी बयाबाई ही ओंकार घराण्यांत दिलीं होती. **फाटक**—दुसऱ्या बाजीरावाची चौथी बायको वाराणशीबाई ही नाना रास्ते फाटक वाईकर यांची कन्या. लग्न ता. ११-६-१८०६. **थत्ते**—

भागवत मंडलिक दामले रामदुर्गकर बळी ।। आपा बळवंत पारजाइ

सवाई माधवरावांचें पहिलें लग्न १०-२-१७८३ रोजीं झालें. वधू रमाबाई ही केशव नाईक थत्ते टोकेकर यांची मुलगी. नाईक हा शब्द ऐतिहासिक कालीं सावकारांना लावीत असत. **बर्वे**—बाळाजी विश्वनाथ पेशव्यांची बायको राधाबाई ही डुबेरकर बर्वे घराण्यांतील. **देवधर**—दुसऱ्या बाजीरावाची पांचवी बायको. वेणूबाई ऊर्फ कुसाबाई ही हरी रामचंद्र देवधर (ढमढेरे) यांची कन्या. **पेंडसे**—बाजीरावाची सहावी बायको सरस्वती-बाई ही बळवंतराव पेंडशांची कन्या. **भागवत**—धोंडभट भागवत याची मुलगी शके १७०६ सालीं दुसऱ्या बाजीरावास दिली (पे. द. भाग ४४ पृ. २५). **मंडलीक**—सुप्रसिद्ध रावसाहेब मंडलीक यांचे आजे धोंडोपंत मंडलीक यांची कन्या दुसऱ्या बाजीरावास दिली होती. लग्न १८।६।१७९३ रोजीं झालें. **दामले**—दुसऱ्या बाजीरावाचा भाऊ चिमणाजी अप्पा याची बायको सीताबाई ही मोरोपंत दामले यांची कन्या.

सोनवणी—महादजी सोनवणी हे सवाई माधवरावाच्या हुजुरपागेकडे चाबुकस्वार म्हणून कामास होते ते अखेरपर्यंत पेशव्यास एकनिष्ठ राहिले व ब्रह्मावर्तासहि बाजीरावाबरोबर गेले. तिकडेच ते वारले. **अडेल मोठे खळी**—म्हणजे गाडून उभे राहून लढणारे. दृढ-निश्चयानें, चिकाटीनें, प्राण पणास लाऊन लढणारे. रामाजी महादेव हे फार लढवय्ये व मुत्सद्दी गृहस्थ होते. त्यांच्याकडे कोंकण-सुभा असे. प्रथम ते वसई मोहिमेंत पहिल्या बाजीरावाच्या वेळीं उदयास आले. जंजिरा घेण्याबाबत व आंग्र्यांविरुद्ध मोहिमा करण्याबाबत यांचाच पुढाकार असे. कल्याणास यांचें आडनांव सुभेदार असेंच पडलें आहे. **हमेशा कार्लेकर देती भिल्ल कोळ्यांना गळी**—या कार्लेकरांचें नांव गंगा-धर राम कार्लेकर. पाहा, सवाई माधवराव पेशवे रोजनिशी vol. II पान १५९ नोंद ३६१ (७४३ अ) "संताजी सिरकंदा कोळी याचें नांवें अभयपत्र कीं तुवा कोळी मेळवून मुलखांत धामधूम करीत होता. त्यास बजीद होऊन तुवा अर्ज केला कीं 'मागील अन्याय सरकारांतून माफ जाहल्यास हुजुर येऊन येकनिष्ठेने नोकरी करीन' म्हणून गंगाधर राम

रणांत फोडुन फळी ॥ रामाजी माहादेव रणांगणीं अडेल मोठे खळी ॥ हमेशा

कालेंकर याणी विदित केले त्याजवरून तुझे बजिदीवर नजर देऊन मागील अन्याय माफ करून हें अभयपत्र सादर केलें असे. तरी तुवा बेसवास सरकारांत येऊन एकनिष्ठेने वर्तणूक करणें."

कौल १ (पेशव्यांनी दिलेला कौल) इसन्ने समानीन २ रबिलावलचा हुकूम. याचप्रमाणे तसलाच एक कौल त्याच भागांतील पुढील पृष्ठावर छापलेला आहे. नोंद नं. ६५२ (७४४) पृ. १६०. गळी देणें—फाशी देणें, फासावर चढविणें. हमेशा—नेहमी. भिल्ल कोळी वगैरे जाती पूर्वापार चोरट्या व उपद्व्यापी. त्यांचा मुलूख जंगलांदऱ्याखोऱ्यांतील अडचणीचा व ते वन्य लोक यामुळें सध्या आफ्रिडी लोकांचे दंगे ज्याप्रमाणें सरहद्दीवर सतत सुरू असतात व इंग्रज सरकारला ते हर प्रयत्नांनी मोडून काढावे लागतात त्याप्रमाणें तेव्हांहि पेशव्यांना कडक उपाय योजावे लागत. कोळी, भिल्ल यांचा बंदोबस्त करणें फार कष्टाचें काम आहे. शिवाय त्या वेळीं सध्यासारखी शस्त्रास्त्रांची किंवा वाहतुकीच्या यांत्रिक साधनांची सोय नसल्यामुळें वाटेल त्या उपायांनीं बंडखोरावर जरब बसविणें एवढाच एक उपाय असे व तो शिवाजीपासून सर्व लहान थोर ब्राह्मण मराठे सरदारांना नाइलाजानें अमलांत आणावा लागे. उदाहरणार्थ, तिसैनमया व अलफ १ रज्जब (१७८९-९०) या तारखेचा पेशव्यांचा हुकूम पाहा.

"६५६ [१००७] भिल्लांनी मुलकांत दंगा केला कण्हेरा किल्ला घेतला सबब त्यांचे पारिपत्यास सरकारांतून फौज पाठवून पारिपत्य करून किल्ला सरकारांत घेतला. तेथून भिल्ल पळोन गेले आणि बजीद होऊन सरकारांत भिल्लांनी बाळाजी भिकाजी व बाजी नारायण यांचे मारफतीनें माहादाजी अनंत यांजपाशीं बोलणें लाविलें कीं, पूर्वी श्रीमंत कैलासवासी बाजीरावसाहेब याणी तह ठराबून गावगन्ना हक्क द्यावा, भिल्लांनीं जागल गावगन्ना करावी, याप्रमाणें करार केला आहे. त्याप्रमाणें हल्लीं चालत नाही; त्यास साहेबी कृपाळू होऊन आमचा हक्क गावगन्ना चालवावा. मुलखांत दंगा करणार नाही म्हणोन; त्याजवरून भिल्लांचे नाईकापासून मुचलका सरकारांत लेहून घेतला की, रानांत व डोंगरांत हट्ट्या आहेत त्या मोडाव्या. गांवगन्ना राहून जागल करावी. हक्क पूर्वीचे कराराप्रमाणें गावगन्ना सुदामत घ्यावा.

कोरळकर देती भिल्ल कोळ्यांना गळीं ।। झांशिवाले बिनिवाले बुंदेले रिपु खांडेकर छळी ॥ कितीक लक्षाधीश प्रतिष्ठित ही घरची मंडळी ।। चाल ।। मर्दाने विंचूरकर भरपूर नारो शंकर ॥ विश्वासुक ओढेकर ॥ चाल ।। नाय-

---

हत्यार तरवार बंदूक बाळगूं नये. कमठा व तीर दरगांवीं जागलीस व वाटघाट चालवावयास बाळगावा; आणि लाखेचा लाखोटा गळ्यांत सरकारचे मोहरेचा बाळगावा व मोहरेचे लाखोट्याशिवाय भिल्ल राहील त्याचें पारिपत्य करावे. याप्रमाणें करार करून सरकारांतून तीर्थस्वरूप कैलासवासी बाजीरावसाहेब याणी गांवगन्ना हक्क चालावयाचा करार केला आहे त्याप्रमाणें हल्ली करार करून भिल्लापासून गावगन्ना जागलीची व वाटघाट चालवावयाची चाकरी घेऊन व गळ्यांत लाखेचा लाखोटा सरकारचे मोहरेचा बांधून हक्क पूर्वीपासून चालत असेल, त्याचा भोगवटा मनास आणून गांवगन्ना रयत निसबत ताकीद करून सुदामतप्रमाणे हक्क चालवीत जाणें म्हणोन महालानिहाय वगैरे यांचें नांवें चिटणिसी पत्रें.

[वाडकृत—पेशवा डायरी, सवाई माधवराव भाग २ पृ० १६८.]

झाशीवाले—नेवाळकर **बिनीवाले**—विसाजी कृष्ण **बुंदेले**—गोविंदपंत बुंदेले आडनांव खेर. **रिपु खांडेकर छळी**—बुंदेले, बिनीवाले झाशीवाले आणि खांडेकर यांनी शत्रूला जर्जर केले. खांडेकरांचे मूळ अर्जक पुरुष दोन. गणेश संभाजी व गोपाळ संभाजी. पथ पिंपळोदची जहागीर मूळ मंडावळ परगण्यांतील. पेशव्यांनी तो मुलुख जिंकून धारकर पवारांना दिला; पण पुढें १७६५ सालीं पथ पिंपळोदची जहागीर मात्र निराळी काढून घेऊन खांडेकरांच्या हवाली केली. **विंचूरकर**—विठ्ठल शिवदेव. **नारोशंकर**—राजेबहाद्दर मालेगांवकर. **ओढेकर**—रंगराव ओढेकर. मूळ पुरुष शिवराव शंकर पाहिल्या बाजीरावाजवळ शिलेदार होता. दाभाड्याशीं जी डभईची लढाई झाली त्या वेळेस त्याने आनंदराव पवारास फोडून आणले म्हणून बाजीरावानें पुढे त्यास आनंदरावाची दिवाणगिरी दिली. शिवराव शंकरचा ज्येष्ठ पुत्र रंगराव ओढेकर. तो कुंभेरीचे वेढ्यांत जाटांच्या छाप्यांत मारला गेला. नंतर त्याचा भाऊ त्रिंबकराव शिवदेव सरदारी करूं लागला. ओढेकरास पवा-

गांवकर पुरंदरे प्रतिश्रीमंत ते गुणनिधी ॥ सखाराम भगवंत राजकारणांत केवळ विधी ॥ २ ॥ दुरा० ॥

नगरकर आंबेकर चिंतो विठ्ठल स्वारीकडे ॥ पवार जाधव धुमाळ डफळे देवकांते धायगुडे ॥ दरेकर सरलष्कर बाबर सोनवणी पायगुडे॥ निंबा-

---

शंचे सरदारीपैकीं परगणें आगर व परगणे सुनेल हे सरंजामास दिले होते. त्रिंबकराव शिवदेवास बाराशें रावतांच्या चाकरीसाठीं माळव्यांत महाल सरंजामास दिलेले होते. पे. द. भा. ४४ पृ. ८. **प्रतिश्रीमंत**—पेशव्यां सारखेच वैभवशाली. **सखाराम भगवंत**—सखारामबापू बोकील. साडे-तीन शहाण्यांपैकीं एक सबंध शहाणा. **विधि**—ब्रह्मदेव. **नगरकर**—नारो बाबाजी व त्यांचें घराणें. खरे आडनांव अभ्यंकर. हा मूळ पहिल्या बाजीरावापाशीं शागीर्दीनें होता. पण फार कर्तबगार असल्यामुळे जंजिऱ्यावरील शिद्याच्या स्वारींत दीड हजार माणूस घेऊन फार मेहनत केली म्हणून पेशव्यांची कृपा झाली. हा फार वृद्ध होऊन १७७५ सालीं वारला यांचें घराणें पेशवे आप्तासारखें मानीत असत. अहमदनगर दौलताबाद वगैरेंची किल्लेदारी यांच्याकडे असे. **अंबेकर**—आंबीकर पाहिजे. यांचा मूळ पुरुष दामाजी माणकेश्वर हा बाळाजी विश्वनाथ पेशव्याचा साहाय्यकारी होता. (कैफीयती यादी पृ. ९७.) **चिंतो विठ्ठल**—चिंतो विठ्ठल रायरीकर. **धायगुडे**—मूळ पुरुष माणकेश्वर धायगुडे. त्याला दोन मुलगे त्रिंबकराव व चिमणाजी. त्रिंबकराव हा इहिद्दे खमसैनांत शाहूमहाराजांच्या चाकरींत होता व त्यास २५००० फौजेचा सरंजाम होता; व चिमणाजीस ८००० फौजेचा सरंजाम होता. **बाबर**—गोविंदराव बाबराचे माधव-राव पेशव्यास २५-८-१७६१ तारखेचे पत्र. या पत्रांत त्याने आपल्या बाबर मंडळींनी पेशव्यांची सेवा :प्राण देऊन कशी केली तें सांगितले आहे तो लिहितो.

“ दिरंग न लावतां जलदीने यावे यैसी आज्ञा त्यास आपण एक-निष्ठ सेवा वीस बावीस वर्षे केली आणि उभयतां श्रीमंत दयाच करीत गेले त्याहीमध्ये लोकांचा जथ आज जहालिया बाबरखेरीज करून हजार लोकांचा आहे. पेसजी जे जे जाहले वर्तमान ते स्वामीस दखलच असे. श्रीमंत राजेश्री

ळकर नाईक धायबर पाटणकर फांकडे ॥ मुधोळ गुत्ती गजेंद्रगडकर स्वस्थानीं घोरपडे ॥ गुजर घाटगे माहाडिक मोहिते विचारे शिर्के बडे ॥ चाल ॥ बाइ माने म्हसवडकर ॥ आठवले उंबरखेडकर ॥ रणनवरे राजवडकर ॥ पिसाळ

भाऊसाहेब याजपासी (पानपतास) सेवा मेहनत जे करावयाचे ते केली. निदान समई घोडा तेथेच ठार जाहाला आणि तीर्थरूप महिपतराव बाबर व लिंबाजी बाबर सूतर असामी जागाचवरी राहिली!! परंतु ईश्वरे माव राहिली नाही. माघारा येती तरी श्रीमंतांचे पायाजवळ सार्थकच होते. परंतु ईश्वराचे चितास न आले." (पेशवे दप्तर, भाग ३८, प. नं. २१, पृ. १८) या घराण्यांत नारायणजी बाबर व आनंदराव बाबर हे नामांकित सरदार होऊन गेले. या घराण्याचा मूळ पुरुष अंबोजी बिन जैतोजी. त्याचा मुलगा बहिरोजी. हा बहिरोजी बाळाजी विश्वनाथापासून पेशव्यांचा सरदार होता. त्याचे ५०० स्वारोचें पथक असून त्यास पालखीचा मान होता. शिंद्यांना जामगांव जहागिर दिलें, त्याच्या आधीं तें गांव बहिरोजीलाच सरंजामांत दिलें होतें. हा बहिरोजी पानपतच्या युद्धांत ठार झाला. याला दोन मुलगे. एक नारायणजी बाबर व दुसरा आनंदराव बाबर. बापाप्रमाणेच हे दोघेहि स्वामीसेवा बजावीत असतां धारातीर्थी पतन पावले. नारायणजी बाबर शके १७१२ त टिपूच्या स्वारींत धारवाडच्या वेढ्यांत पडला. नारायणजी बाबराकडे मौंजे सातर्डी, रहटी मौंजे साकत परगणें जामखेड व रतलगांव परगणे पांडे पेडगांव व मौंजे शिरसोफळ तर्फ पाटस, सरंजामास दिलेलें होतें. आनंदराव बाबर हा बापू गोखल्याबरोबर अष्टी–येवतीच्या लढाईत मेला.

नारायणराव बाबर १७९० सालीं नोव्हेंबरांत धारवाडच्या वेढ्यांत गोळी लागून मेला. किल्लेकऱ्यांच्या तोफा काबीज करावयाच्या होत्या तेव्हा परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं ती महत्वाची कामगिरी नारायणजी बाबर व सखोजी काटे या नामांकित पथक्यांना सांगितली होती. नारायणजी बाबराबद्दल सेनापती परशुराम भाऊंना किती आदर होता हें पुढील समकालीन पत्रावरून कळेल. " तों जिकडे या दोन्ही पागा गेल्या होत्या त्याजवर किल्यावरून गोळे मारीतच होते. तेथे एक गोळा येऊन खुद्द नारायणजी बाबर

शितोळे वाघ आयतुळे लढाईला ते आधीं ॥ शाहामिरखां रोहिले, फिरंगी, पठाण, आरब, सिधी ॥ ३ ॥ दुरा ० ॥

यासर्चा बसला. डावे हातचे फऱ्याजवळ मागेसी बसला. तो उजवे कुशीस पार होऊनि गेला मशार निल्हे ठार झाले हे वर्तमान आले. तेव्हां यजमान बहुत कष्टी झाले. नारायणजी बाबरासारखा मनुष्य जाया होऊन जर काम कांहीच न जालें तर ठीक नव्हे असें मनांत आणून कप्तान लिटलीस सांगितलें कीं, खामखां आम्हापुढे तोफा आल्या आहेत त्या पाडाव कराव्या. तुम्ही करीत असल्यास बरें; नाहींतर आम्ही गाडदी उठवितों, आणि फौजाहि उठवितों." (खरे पान ४२९८)

आनंदराव बाबर अष्टीस लढतांना मेला. त्याच्या पराक्रमाचा उल्लेख प्रभाकर शाहीराने पुढीलप्रमाणें केला आहे.

"माघ शुद्ध पौर्णिमेस बापूसाहेब रणीं भिडले । जखम करून जर्निलास फिरतां जन म्हणती पडले । गोविंदराव घोरपड्याचे दोन हात भले झडले । आनंदराव बाबर ढिगामधिं खुप जाऊन गढले." आपा बळवंत-- बळवंतराव मेहेंदळ्यांचा मुलगा. मूळ पुरूष हरीहरेश्वरास राहाणारे बहिरव-भट. त्यांना दोन मुलगे. एक विश्वनाथ भट व दुसरा गणपत-राव. हे दोघे बाळाजी विश्वनाथाच्या सख्खे बहिणीचे लेक म्हणजे भाचे लागत होते. पुढें बाळाजी विश्वनाथाने गणपतरावास पागेंत नोकरीस घेतले. गणपतरावाचा मुलगा रामचंद्र ऊर्फ बळवंतराव तो पानपतावर पडला. त्याचा मुलगा तो आपा बळवंत. पेशव्यांनी स्वाऱ्या केल्या, तितक्यांत आपा बळवंतांनी चांगली कामगिरी केली. (कैफीयती वाड पा. १७२)

रामाजी माहादेव—रामाजी माहादेव बिवलकर हा कल्याणचा पहिला सुभेदार. यानें देवळे, विहिरीहीं बरींच बांधिलीं. लोहगडनजीक डोंगरगांव येथील विहिरीवर खालील लेख आहे.

"रामाजी महादेव बिवलकर श. १६८८ व्ययनाम संवत्सरे चैत्र आधिक प्र॥" श. १६८१ च्या पूर्वी १२ वर्षांपासून रामाजी माहादेव सुभेदार होता. चार पिढ्या या घराण्यांत सुभेदारी चालली. वंशावळ

ताकपीर थोरात पांढरे स्वामीपदिं सादर ॥ धुळेप यांचा इंग्रज

येणेप्रमाणें—रामाजी महादेव—आनंदराव राम—रामराव अनंत—आनंदराव राम.

रामाजी महादेव शके १६९४ च्या श्रावण महिन्यांत पुणें मुक्कामीं वारला व त्याची बायको श. १६९७ च्या आश्विनांत वारली. (पेशवाईच्या सांवलींत, प्रस्तावना पृ. ५). **स्वस्थानी**—संस्थांनी. **शहामीरखा**—१७८० सालीं जनरल गॉडर्ड याशीं कोंकणांत मराठ्यांच्या लढाया झाल्या, तेव्हा नाना फडणिसांनी ईर्षेने इंग्रजी पायदळाशीं बरोबरीनें लढणारें शेलकें देशी पायदळ चाकरीस ठेवलें. त्या कणखर व कजाख लोकांपैकींच शाहामीरखान पठाण होता. त्याच्या हाताखाली एक अरब पलटण असें. खर्ड्याच्या लढाईतहि तो होता. प्रभाकर शाहिराने आपल्या खर्ड्याच्या पोवाड्यांत तिसऱ्या चौकांत शहामतखां नांवाच्या किराणी सरदाराचा उल्लेख केला आहे, तो हाच. नाना फडणीस मेल्यावर दुसऱ्या बाजीरावाने त्याच्या पक्षाचे मुत्सद्दी व सरदार कैद करविले. शनवारवाड्यांत (१४ जून १८०० सालीं) हा प्रकार केला तेव्हा लगेच त्या सरदारांच्या पदरीं असलेल्या जबरदस्त अरब पठाणांनी निकराचें युद्ध केलें. तरी त्यांवर सवाई जबरदस्ती करून सर्व अरब काढून टाकण्यांत आले. नाना चक्रदेव याला शनवारवाड्याच्या आरसे महालांत कैद केले तेव्हां त्याच्याबरोबर आलेल्या शहामीरखानाच्या तीनशे लोकांनी दंगा केला. त्यावेळीं त्यांची कशी तरी समजूत काढण्यांत आली. पुढे नानाचे वाड्यांत राहून अरबांनी दंगा केला तेव्हां बाजीरावाने वाड्यावर तोफा लावल्या त्यांत अरबांचे दहा व पेशवे शिंदे यांचे वीस माणूस ठार झालें. भवानी पेठेंत शहामीरखानाचा वाडा होता तोही लढला. शें-दीडशें माणूस जखमी झालें. शहामीरखानाचा लेकही पडला. नंतर शहामीरखान आपल्या हाताने आपल्या बायकांस मारून वाड्याबाहेर आला. त्यावेळीं त्याच्या मांडीस गोळी लागली. पुढे शिंद्यांनीं मध्यस्थी करून स्वतः जामीन राहून अरबांच्या पगाराचा पेशव्यांकडून फडशा करवून देऊन अखेर शाहामीरखान वगैरे अरब पुण्याबाहेर घातले. (खरे पान ६४५० ते ६४५५).

टोपी काढुन करति आदर ।। श्रीमंतांचे प्रतिबिंब अली बाहादर समशेर बाहादर ।। कुशाबा हैबतशिंग सजेले काय रूप सुंदर ।। सातारकर पोतनीस मुख्य चिटणीस लेखक नादर ।। छत्रपतिस विनवून देविती श्रीमंतांस चादर ।। चाल ।। निळकंठराव धारकरी । संनिध त्याची चाकरी ।। मोहीम हैबतराव करी ।। बाबुराव हरि सखाराम हरि शूर वीरांचे क्षुधी ।। अहंकारी मल्हारराव जगजीवन नसे परबुधी ।।४।। दुरा०।।

धन्य प्रभु पेशवे ज्याचे ऐश्वर्य बघुन मन रिझे ।। परशत्रूनें शौर्य ठांइच्या ठांई प्रसंगीं थिजे ।। सुखी लोक मुलखांत केशरी भात घरोघर शिजे । गृहस्थ भिक्षुकांचें गौरवें तुपांत मनगट भिजे ।। तीर्थीतीर्थीं नित्य शेरभर सोनें सकाळीं झिजे ।। नाहिं दुःख कोणास पलंगी आनंदांत जन निजे ।। चाल ।। ईश्वरा असे ह धनी ।। महा पराक्रमी साधनी ।। सर्वत्र सगुण शोधुनी ।। गंगु हैबती म्हणे जयाचे विघ्न गजानन वधी ।। महादेव गुणि प्रभाकराचें कवन शर्करा दुधीं ।। श्रिमंत झाले लोक श्रिमंतांपासुन लक्षावधी ।। ५ ।।

श्रिमंतांचे प्रतिबिंब—कुशाबा हैबतसिंग सजेले काय रूप सुंदर—हें सर्व पेशव्यांचे लेकावळे म्हणजे उपास्त्रियांचे पुत्र. समशेर बहाद्दर हा मस्तानीपासून झालेला मुलगा. त्याचा मुलगा अली बहाद्दर, पुन्हां त्या अलीबहाद्दरचा मुलगा समशेर बहाद्दर. हैबतासिंग, कृष्णसिंग व लक्ष्मणसिंग हे नानासाहेब पेशव्याचे लेकावळे. कुशाबा म्हणजेच कृष्णसिंग. कृष्णसिंगाचा मुलगा कोंडीरामसिंग. हैबतसिंगाच्या मुलाचें नांव ठाऊक नाहीं. पण खंडेराव व गणपतराव हे हैबतासिंगाचे नातू होते. हैबतसिंग हा सन १८३२ सालीं वैशाख व ।। ३० स वारला. त्याच्या आधीं लक्ष्मणसिंग १८३१ सालीं भाद्रपद मासीं वारला होता. लक्ष्मणसिंगाला दोन मुलगे होते. पहिल्या बाजीरावसाहेबांचे व पेशव्यांचे हे लेकावळे फार शूर होते. त्यांची बरदास्त औरस पुत्रासारखीच ठेवण्यांत येत असे.

आप्पा देसाई निपाणकराचा पोवाडा

आप्पा देसाई याचें खरें नांव शिधोजीराव नाईक निंबाळकर. नणंदीकर देसाई म्हणून जें पुरातन लिंगायत घराणें होतें, त्यापैकींच हा होय. या घराण्याचा मूळ पुरुष शिदगवंडा. हें घराणें आदिलशाही कारकीर्दीपासून शिरगुप्पी व निपाणी या गांवांचे इनामदार होते. हें घराणें मूळचें लिंगायत असून मराठशाहींत मराठे झालें. शिदगवंडाचा मुलगा रघुनाथराव. रघुनाथरावाचा मुरारराव. मुराररावास दोन बायका होत्या. थोरलीला एक पुत्र, व धाकटीला तीन झाले. थोरलीचा पुत्र तोच पोवाड्याचा नायक शिधोजीराव ऊर्फ आप्पा देसाई.

त्याचा जन्म शके १६९६ म्हणजे सन १७७४ सालीं झाला. शिधोजीरावाची आई आणि कोल्हापूरकर छत्रपती शिवाजीराजे यांची राणी या सख्या बहिणी होत्या. अर्थात् शिधोजीरावाचे लहानपणापासूनच छत्रपतींच्या कुटुंबांत फार जाणें येणें असे. किंबहुना महाराज त्याला पुत्रासारखे वागवीत व हाही त्यास वडिलाप्रमाणें मानी. शिधोजीराव लहानपणापासून कोल्हापुरींच राहिला होता. तो अत्यंत धाडसी व शूर शिपाई असल्यामुळे महाराजांनीं त्याला आपल्या खास एकांडे मानकऱ्यांत जागा दिली होती. असें असतांही एक गोष्टीमुळें शिदोजीरावाचें व छत्रपतीचे कायमचें हाडवैर पडण्याचा योगायोग आला,

त्याचें कारण असें कीं शिदोजीरावाचें लग्न गजेंद्रगडकर घोरपडे अमीर उल उमराव यांच्या मुलीशीं व्हावयाचें ठरलें; परंतु पुढें कांही कारणानें महाराजांनीं तें मोडून ती मुलगी हिम्मत बहादर चव्हाण उमदेतुल उमराव या पदरच्या कुलवंत सरदारास दिली. या अपमानामुळें शिधोजीरावास भयंकर त्वेष आला व त्यानें सूड घेण्याचा मनांत निश्चय केला व आतां प्रत्यक्ष छत्रपतीची मुलगीच बायको करीन तर नांवाचा शिधोजीराव अशी शपथ वाहिली व तसें स्पष्ट बोलून दाखवून त्याने कोल्हापूर सोडलें व कोल्हापूरकरांचे हाडवैरी सुप्रसिद्ध परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या पदरीं तो जाऊन राहिला.

त्याच्या शिपाईगिरीबद्दल वादच नव्हता. भाऊनें त्याला आपल्या सैन्यांत सरदारी दिली. नंतर पट्टणकुडीच्या सुप्रसिद्ध लढाईंत व त्यानंतर पट्टण कुडीचा सूड घेण्याकरितां झालेल्या कोल्हापूरवरच्या दुसऱ्या स्वारींत शिधोजीराव हजर होता. पुढें या अफाट माणसाचें दुसऱ्या एका अफाट माणसाशीं सूत्र

जमलें. तो मनुष्य म्हणजे प्रसिद्ध सर्जेराव घाटगा. हे दोघेही जितके धाडसी तितकेच कृतघ्न, उलट्या काळजाचे क्रूरकर्मे होते. कोल्हापूरच्या सन १८०० मधील स्वारीनंतर घाडग्याच्या अनुमतानें यानें मिरज वगैरे पटवर्धनांवरच सारख्या स्वाऱ्या करून मिरजेपासून विजापूरपर्यंतचा प्रदेश उध्वस्त करून सोडला. धोंडजी वाघाविरुद्ध झालेल्या मोहिमेंत वेल्सले बरोबर निपाणकर होता. तसेंच १८०३ नंतर शिंद्याविरुद्ध झालेल्या लढाईत असई येथे पेशव्यांतर्फे हजर होता. इंग्रजांनी बाजीरावाजवळ त्याची शिफारस केल्यामुळे त्यास पेशवे सरकारचें सरलष्करपद देण्यांत आलें तसेंच त्याचा ३ लक्ष २८ हजार रुपयांचा सरंजाम कायम करण्यांत येऊन सरलष्करीबद्दल जादा २१३१२० रु. नवीन सरंजाम देण्यांत आला. त्याखेरीज नवीन २००० स्वारांची फौज ठेवण्यासाठी चिकोडी व मनोळी हे दोन तालुके लावून देण्यांत आले. निपाणकराने आपल्या लष्करांत अरब लोकांचा पुष्कळच भरणा केला. बाजीराव पेशव्यांची बहाल मर्जी असल्यामुळे त्याने जुलूमजबरदस्तीची सीमा करून सोडली. आधीच भूत आणि त्याला बाजीरावासारख्या भूतनाथाचा वरदहस्त. यामुळे सर्जेराव घाडग्याप्रमाणेच याने उत्पातांची परिसीमा केली. कोल्हापुरकरांचा सूड घेण्याचा त्याचा कृतनिश्चय असल्यामुळें पेशव्यांनी चिकोडी व मनोळी हे जे कोल्हापूकरांचे दोन तालुके निपाणकरास लावून दिले होते ते त्यानें जबरदस्तीनें ताब्यांत घेण्यास सुरवात केली तेव्हा छत्रपतीलाहि युद्धास तयार होणें भाग पडलें. सावगांव येथे दोघांची निकराची लढाई ता. ४ फेब्रुवारी १८०८ रोजीं झाली. व तींत छत्रपतीची दाणादाण उडाली. निपाणकराने छत्रपतीचीं सुमारें दोन हजार माणसें मारली, अडीच हजार जखमी केलीं व चारपांच मोठमोठे सरदार पाडाव नेले. खुद्द महाराजांना वेढून त्यांना जखमा केल्या. पण रायाजी जाधव यांनी त्यास मोठ्या शर्तीने रणांतून बाहेर काढून वांचविले. या पराभवामुळें चिकोडी मनोळी व हुकेरी परगणाहि निपाणकरानें कबजांत घेतला.

अखेर कांही तरी करून निपाणकराचें भूत कायमचें शांत केलें पाहिजे म्हणून छत्रपतींनी पेशव्यामार्फत तहाचें बोलणें लावलें. अर्थात निपाणकरानें पहिलीच अट ही घातली की छत्रपतीची राजकन्या आधी

मजला द्यावी तर पुढे इतर बोलणें! नाइलाज होऊन महाराजांना रुकार द्यावा लागला व शके १७३० वैशाख शुद्धपक्षी विवाह ठरला. पण झाला तो सारा राक्षस विवाहाचाच प्रकार झाला. उभयपक्षीं दग्याची भीति यामुळे निपाणकरानें आधी हिंमत बहाद्दर चव्हाणास आपलेकडे ओलीस ठेवून घेतले. नंतर निपाणकर आपली निवडक फौज घेऊन करवीरास आला व शहरची नाकेबंदी करून त्याने वाड्याभोंवती नागव्या तलवारींचा व तोंडे पेटवून जय्यत केलेल्या बंदुकबारदारांचा पहारा ठेवला व अशा रीतीनें एकदांचा विवाह २१ जून १८०८ रोजीं झाला. सांगण्यासारखी आणखी विशेष गोष्ट ही कीं लग्नसमारंभाचे वेळीं कांही दगा असल्याचा संशय निपाणकरास आला त्याबरोबर त्यानें अक्षत पडतांच नवरी घेऊन ताबडतोब निपाणी गांठली.

हा राक्षस विवाहाचा समारंभ जितका भयंकर तितकाच करुण व तितकाच विनोदीहि होता. पुढे दिलेल्या पोवाड्यांत शाहिराने केलेलें वर्णन वाचतांना एकाच वेळीं या तिन्ही रसांचा कांही विचित्र अनुभव आल्याखेरीज राहणार नाही. सुप्रसिद्ध त्राटिका नाटकांतील प्रतापरावाच्या जबरदस्तीच्या लग्नसोहळ्याची त्या प्रसंगीं आठवण होणें अपरिहार्य आहे. तथापि प्रतापरावाचा क्रूरपणा वरपांगी खोटा असल्यामुळें त्राटिकेच्या दृष्टीनें करुणरस निर्माण होत असला तरी प्रेक्षकाच्या दृष्टीनें विनोद किंवा हास्यरसच निर्माण होतो. पण येथे करुण व भयानक हेच रस उत्कट होते. शाहिरानें प्रत्यक्ष लग्न सोहळ्याचें जें वर्णन केलें आहे तें मात्र विनोदी आहे.

"कुठे आहे माझी सुंदरा वोढा बाहीर ॥ दरारारा मुलगी वोढुन बाहीर उभा कर ॥ गरारारा त्यानें आरब बसविले सार ॥ नाही बोधले मांडव जमिनीवर ॥ त्यांनें उगाच रेघा ओढिल्या भिंतीवर ॥ नाही भट बिरामण कुणी बलाविला म्होर ॥ भटास विचारतां मोतुर लबाडसार ॥ ती आपल्या रांड कां करतो बोवल्यावर ॥ सारे लोक उभे केले भोंवत्या भोर ॥ दिले एकेकाला तांदुळ मुठमुटभर ॥ सोभेद्दान कुणाला येईना अक्षर ॥ कोणी म्हणत्यात दीन दीन हरहर सार ॥ दिले तांदुळ टाकून वर कीं झाले नवर ॥ मी जन्मून आलों त्याच वेळेवर ॥ आहे

ब्रम्हाचा म्होतूर माझेबरोबर ॥ नाही गेला मारुतीला वरात बाहीर ॥ नाही सोडलें कांकण उचलली नार ॥ नार घेऊन घोड्यावर, उडवीला घोर ॥ निपाणीला परत गेला माघार ॥"

निपाणकर परत गेल्यावर पुनः त्यानें कोल्हापूरकरावर स्वाऱ्या घालण्यास सुरवात केली. व १८११ सालीं फिरून एकदां महाराजांचा त्यानें पराभव केला. अखेर इंग्रजांना मध्यस्थी घालून महाराजांनीं निपाणकरांशीं १ ऑक्टोबर १८१२ रोजीं तह करून घेतला. त्या तहानें चिकोडी व मनोळी या तालुक्यावरील हक्क महाराजांना सोडावा लागला. यावेळीं निपाणकर हा १०–१२ लक्षांचा मातबर सरंजामदार व फौजबंद सरदार बनला होता. पण पुढीलच सालीं ते दोन तालुके बाजीरावाच्या सांगण्यावरून त्यास सोडावे लागले. यामुळे मनांतून निपाणकर पेशव्यावर रुष्ट झाला. पुढे पेशव्याची व इंग्रजांची अखेरची लढाई सुरू झाली तेव्हां मन्रोनें कोल्हापूरकर अगोदरच इंग्रजास मिळाले असल्यामुळे चिकोडी व मनोळी हे तालुके कोल्हापूरकरांच्या हवाली केले. त्याला पेशव्यातर्फे निपाणकरांनीं हरकत घेतली. पण खुद्द निपाणीसच इंग्रजांनीं वेढा देण्याचें मुक्रर केल्यामुळें व एकंदर रागरंग पाहून निपाणकरानें इंग्रजांशीं स्वतंत्र तह करून घेतला !

"इंग्रजी झाल्यावर देसाई आपणाजवळचे स्वार, पेंढारी व आरब लोक यांस सोडून देऊन कार्याकारण लोकानिशी निपाणीचे जुन्या किल्ल्यांत राहूं लागले. पुढें एक नवा मोठा किल्ला बांधण्यास आरंभ केला. परंतु तो बांधू नये म्हणून एल्फिन्स्टन साहेबांचा हुकूम झाल्यावरून तसाच राहिला. नंतर त्यांनी निपाणीस बराच मोठा सुंदर वाडा बांधला. वाड्यांतील त्यांचे महाल व क्रीडेचीं स्थळें अद्याप पाहण्याजोगी आहेत. शिधोजीराव अंगाने धिप्पाड, धष्टपुष्ट बळकट व शूर जवान होते. त्यांनी स्वपराक्रमानें व आपल्या मनगटाच्या जोराने जहागीर संपादन केली. त्यांचे अंगीं विलक्षण शक्ति होती. त्यांची स्वारी साधारण घोड्यावर निभावत नसे. त्यांची बंदुक किंवा तरवार दुसऱ्यास झेपत नसे. त्यांची जोडी व करेला अद्याप निपाणीच्या वाड्यांत दाखवितात. त्यावरून त्यांचें सामर्थ्य विलक्षण असावें असें अनुमान होतें. परंतु त्यांचा शीलस्वभाव फार दुष्ट होता. ते स्वभावाने क्रूर, निर्दय व रानदांडगे असे होते. कोणतेंहि कृत्य करण्यास ते मागेंपुढें सरत

नसत. सखाराम घाडगे, घाशीराम कोतवाल वगैरे जे महान दुष्ट मराठ्यांच्या कारकीर्दींत झाले त्यांच्यांतच यांची गणना करतात. प्रजेवर जुलूम करणें, नोकरांस मरेमरेपर्यंत मारणें, श्रीमान लोकांस दंड बांधून नागविणें वगैरे गोष्टींनी त्यांचा दरारा आसमंतात इतका होता कीं, लोक त्यांचें नांव ऐकून थरथर कापत. ज्या ज्या ठिकाणीं यांनी अंमल सर केला त्या त्या ठिकाणच्या श्रीमान सावकारांनी त्यांच्या मागण्याप्रमाणे द्रव्य दिलें नाही म्हणजे त्यांस कैदेंत टाकावे याप्रमाणे यांचे कैदेंत शेंकडो लोक दहा–दहा, बारा--बारा वर्षें होते. कित्येक तर यांच्या निर्दयपणास बळी पडले असें सांगतात. जनरल मन्रो साहेब निपाणी नजीक फौज घेऊन आले तेव्हां त्यांनी पुष्कळांस मुक्त करविलें.

श्रीमान् लोकांप्रमाणे सुंदर स्त्रियांवरहि यांचा डोळा असे व त्यांसहि धरून कारागृहांत टाकण्याचा यांचा परिपाठ होता. यामुळे अशा दीन स्त्रिया याजपाशीं पुष्कळ होत्या. पुढे तर या दीन अबलांवर भलत्याच प्रकारचा जुलूम करू लागले असें म्हणतात. त्यांचे वाड्यांत सज्जाचेखाली जलक्रीडेकरिता एक लहानसें सरोवर आहे. सज्जास कठडा नाही. त्या सज्जावर सुंदर तरुण स्त्रियांस ओळीनें उभ्या करून त्यांपैकीं एकादीस पटकन खाली कृत्रिम सरोवरांत ढकलून देऊन ती बुडून कशी मरते व तिचे हाल कसकसे होतात ते पाहत राहत. तसेंच एका प्रसंगीं दोघे नोकर, नोकरी करण्यांत चुकले त्यांस त्यानी इतकें मरेमरेपर्यंत मारिलें कीं त्यांपैकीं एक तत्काळ मेला व दुसऱ्याची बरेच दिवस आशा नव्हती. असो, याप्रमाणे त्यांच्या क्रूरपणाविषयीं इंग्रज ग्रंथकारांनी अनेक गोष्टी प्रसिद्ध केल्या आहेत. त्या एकतर्फी आहेत व या कारणास्तव त्यांवर अक्षरशः भरंवसा ठेवितां येत नाही. निपाणीचे लोक शिधोजीरावांच्या शूरत्वाच्या, पराक्रमाच्या, त्यांच्या धैर्याच्या व अलौकिक सामर्थ्याच्या जितक्या गोष्टी सांगतात तितक्या त्यांच्या निर्दयत्वाच्या सांगत नाहीत. इतकें खरें आहे कीं, शिधोजीरावांचा आसमंतात भारी धाक व दरारा असल्याचीं मात्र प्रमाणें आढळतात."

"यांनी अपरंपार संपत्ति जवळ गोळा केली होती. खर्च बाताबेतानें करून संग्रहीं द्रव्य व दागदागिने फार केले होते. निपाणीच्या दागिन्याची

आख्या तर परवांपर्यंत होती. यांच्या लग्नाच्या एकंदर एकवीस स्त्रिया होत्या ! त्या प्रत्येकीच्या अंगावर भारी दागिने होते. इतक्याहि स्त्रिया असून शिधोजीरावास पुत्र नव्हता. यामुळे पुढें दवलत खालसा होईल या चिंतेंत पडून अखेरीस त्यांची वृत्तीही बदलली. अखेर अखेर तर वायूचा विकार होऊन फेपरें येऊं लागलें. पुढें यांच्या पत्नींपैकीं एक ताई-बाई इनें आपणांस खोटा पुत्र निर्माण करण्याचा यत्न करून एका विधवेचा पुत्र आपणांस झाला असें उठविलें व त्या विधवेस ठार मारिले व ही गोष्ट शिधोजीरावाच्या संमतानें झाली असें निमित्त करून पोलिटिकल एजण्टांनी निपाणी सरंजाम खालसा करण्याविषयीं शिफारस केली. निपाणकरांचा वृद्धापकाळ व त्यांनी ब्रिटिश सरकारास वेळोवेळीं केलेली मदत मनांत आणून ब्रिटिश सरकारनें दवलत एकदम खालसा न करतां त्यांचे तहाहयात मात्र चालेल आणि पुढें त्यांचे पोटच्या किंवा दत्तक पुत्रास चालणार नाहीं असा ठराव केला. पुढें शिधोजीराव सन १८३९ सालीं निवर्तले व दवलत खालसा झाली." (मोडकांचा इतिहास).

आप्पा देसाई निपाणकर हा शूर उलट्या काळजाचा खरा. परंतु तितकाच नीच आणि विश्वासघातकी होता. त्याच्या विश्वासघातकीपणाचा कळस म्हणजे त्यानें खडकीच्या लढाईपासून आंतून इंग्रजांशीं स्नेह करून बाजीरावाची सर्व बातमी इंग्रजांस कळविण्याचें शतकृत्य केलें ही होय ! त्यानेच छत्रपतीस दग्याने इंग्रजांच्या हवालीं करविलें व त्यानेच अखेर बाजीरावास जाळ्यांत अडकवून अशीरगडाजवळ माल्कमच्या हातावर स्वराज्याचें उदक सोडण्याचा प्रसंग आणला. प्रभाकर शाही-रानें "कोणी कसून लढेना क्रियेस जागोन" किंवा "फितुर करुनि सर्वांनी असलें राज्य मात्र बुडविलें" असे उद्‌गार काढले ते यथार्थ होते. उदाह-रणार्थ—३१ जुलै १८१८ तारखेचें केसो गंगाधर यांचे पुढील पत्र पहा.—

श्री संवत १८७५ आषाढ—

व॥ १४ (३१ जुलै १८१८)

साहेबाचे सेवेसी अज्ञाधारक केशो गंगाधर कृतानेक सां॥ नमस्कार विज्ञा-पना येथील कुशल ता। आषाढ व॥ १४ रोज शुक्रवार पावेतों स्वामीचे कृपे-करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असें. विशेष. साहेबाकडेस दोन रवानग्यापत्रे

पा।। तीं पावलींच असतील. त्याजवर कालपक्षेण करून घरू माणसे आली. त्यांणी सांगितले कीं कनिष्ट साहेब याणी त्या प्रांतांत जमाव बहूत केला होता. परंतु दैव सानुकूल नसले म्हणजे सगळे प्रतिकूल होते तसें थोरल्याकडील सरदार जितके उठून गेले तितके त्याजजवळ सामील जहाले. त्यांणीही जमाव करण्याचा विचार चांगला योजिला होता. परंतु अस्तनींतून आम्र निघालीं त्यास (उ) पाय नाही. निपाणकर याणी आठ महिने जाहले जलचरासी मिळून पन्नास लक्ष रुपये घेतले आणि उभयेतास हस्तगत करोन द्यावे म्हणोन पैदरपै उद्योगांत होते. जी मसलत याणी केली तें वर्तमान जलचरास मसलत समजावी. त्याणी आगाव तिकडील बंधन करीत असावे. हे सैन्य घेऊन तिकडेस गेले नाहीत तो जलचरांनी जाऊन पोहोचावे यात्रे।। दृष्टीस पडू लागले. ते समई चौकशी केली कीं आपली मसलत त्यास कसी समजते. तेव्हां शोध करितां वरकड सरदार मंडळींत गलबल नाही. निपाणकर छेटीने उतरत होते त्यांजकडे हलकारे जातात व येतात हें पक्केपणें लक्षांत आणिलें आणि त्यास आणून विच्यारिलें कीं हें काय आहे ? त्यांनी ते वेळेस तरी उडवाउडवीने भाषणें करोन उठून गेले. ते निपाणकर यांच्या चित्तांत राहून बहुत लगट केला तो थोरले तरी इकडेस हजार स्वार व अरब नवे ठेऊन धुळकोटावर येऊन दाखल जाहले. त्याची येवस्था पेशजी लिहिली आहे. त्यास पुढे आपलेकडेस येत आहे. तिकडील वृत्त साहेब लिहतील तेव्हा समजेल.

निपाणकर याणी सातारकर महाराज यास तरी जलचराचे हवाली करोन दिल्हे. हे त्याणी नेताच मुक्कामी नेऊन गादीवर बसविले आणि तमाम सरदार यास पत्रें लिहिली की हे (पेशवे) बंड ! याणी आम्हास कैद केले होते तो कंपणीनी दोस्ती करोन आम्हास जागेवर आणिले त्यास तुम्ही त्यास सामील न राहता उठून कंपणीस येऊन मिळावे. हे न केल्यास सरंजाम जप्त करोन पारिपत्य केलें जाईल. असी पत्रें जातांच सगळयाचे होष उडाले. याजकरितां सगळे उठउठून चहूकडेस गेले. बाकी डेंगळे व कनिष्ट तळावर राहिले. पलीकडेस निपाणकर होते. त्यांणी जलचरास आणून उभयता धणी चाकर यांस हस्तगत केले. त्यांत डेंगळे यांचे हातास चर्माच्या थैल्या घातल्या आहेत. दुसऱ्यांनी भोजनास घालावे आणि म्यान्यांत ठेवून बाहेर कुलूप लावीत आहेत. जाबता बहुत करीत आहेत. कनिष्ठास (चिमणाजी आप्पास)

वसईस नेऊन ठेविले. कोकण पट्टीतील दुर्ग सगळे जलचराकडेस जाहले. मावळे माणसे काढून येक येक गोरा व पांच पांच माणसे त्याणी ठेविली आहेत. मालवणचें दुर्ग सुभ्याची जागा केली आहे. वसई सुभा मोडिला. सातान्यास येक गोरा वर ठेविला आहे. सातारचे महाराजास मुक्कामींच ठेविले आहे. सरदार सगळे जवळ गेले आहेत.

निपाणकर इतके शिष्टकृत्य करोन सरंजामसह निपाणेस गेले. त्याच्या मागोन पलटणें (इंग्रजांची) लागली आहेत. ते थेट गेले तेथे मोर्चे लाविले आहेत. कारण की तुम्ही हरामखोर. 'पन्नास लक्ष रुपये घेऊन आजपावेतो ज्याचे म्हणविला त्याचा घात करावयासी चुकला नाही तेव्हा तुम्ही काफर आहांत. याजकरिता ऐवज माघारी देणें. यास्तव त्याच्या मागे शुक्रकाष्ट लागलें आहे.

(शिंदेशाही इतिहासाचीं साधनें पृ. २५६–५७ लेखांक १८०)

आप्पा देसाई निपाणकराचा पोवाडा

१५

(शाहीर–नागनरू)

[हा पोवाडा घालवाड पेटा शिरोळ येथें बाबाजी एसबा शिंदे यानें म्हणून दाखविला. —शितूत]

धनी निपाणकर आपासाहेब सरदार । ते राज्य करून गेले हिंमत-बहादर ॥ धृपद ॥

धनी आकुलजीचे देसाई वतनदार । एका घोड्यावरला स्वार होता

एका घोड्यावरला स्वार होता बिनघोर–सामान्य शिलेदार होता. शिलेदाराला स्वतःचें घोडें बाळगून नोकरी करावी लागे. शिलेदाराला आणखी दहावीस घोडीं बाळगून चाकरीस आणण्याची पथक्याची कामगिरी मिळाली तर मात्र त्याच्यामागें म्हणण्यासारखा घोर किंवा काळजी उत्पन्न होई. कारण तितकीं घोडीं व शिलेदार जमविणें, त्यांचें मनोधारण करणें व लढायांत शिलेदारांची घोडीपिडी किंवा पानपडताळें गमावलीं, तर तीं मुख्य सरदाराकडून किंवा सरकारांतून भरपाई करून देणें इत्यादि अनेक जबाबदाऱ्या येत. पण नुसताच साधा शिलेदार असेल, तर तो या व्यापापासून मुक्त व पूर्णपणें बेजबाबदार. आज या मालकाचें पटलें नाहीं तर उद्यां आपल्या घोड्यानिशीं दुसऱ्या मालकाकडे जाऊन नोकरी धरावी. सारांश, सामान्य शिलेदार असेल, तर तो पथक्यापेक्षां बिनघोर हें खरें. तथापि शिलेदारापेक्षांसुद्धा बारगीर असेल, तर तो अधिक बिनघोर. कारण घोडें व हत्यारपात्यार त्याला मालकाकडून मिळे. यामुळें घोडें राखण्याची कांहींच जबाबदारी त्याच्यावर नसे. उलट सामान्य शिलेदार झाला, तरी त्याला नेहमीं घोडें बचावण्याची काळजी; त्याचें घोडें लढाईंत पडलें, तर त्या घोड्याची मालकाला खरी सर्व किंमत सरकारांतून बहुधा कधींच मिळत नसे. कारण तें पंचायतीचें काम. म्युनिसिपालिटीनें किंवा सरकारनें एखाद्याची जागा सक्तीनें घेतली, तर ज्याप्रमाणें पंचाकडून मालकाला खरी किंमत कधींच मिळूं शकत नाही तोच प्रकार त्या बाबतींत होई. यामुळें येथें बिनघोर हा शब्द सार्थ करावयाचा, तर शिलेदारापेक्षां बारगीर असाच अर्थ घेणें युक्त होईल.

बिनघोर । रघुनाथ देसाई पिता वडील तो थोर । वेणूबाई माता दिसे देव अवतार । नाना बाबा दादा बंधू ते चार । हा मधला आपा आला जानीचा बाहार । बारा वर्षांची उमर जानीचा बाहार । आली आपाच्या मनांत करावी तलवार । रघुनाथ देसाई होते सदरेवर ॥ कर जोडून आपा गेले त्याच्या समोर ॥ ही वडीलाची भाकरी खाऊं कुठवर ॥ मला हुकूम द्या मी करतों रोजगार ॥ रघुनाथ म्हणतो मुला नेणतें पोर ॥ नको जाऊं देशावर मुलूख दुरवर ॥ हाये वडलाची भाकरी जमीन चावर ॥ नाहीं देणें घेणें कवणाचें कशाचा घोर ॥ तुम्ही स्वस्थपणानें खेळून राहावें घर ॥ मोठा क्रोध आला आपाला दांत करकर ॥ नाही तुझ्या वंशी जन्मलो कुणाचा तस्कर ॥ गरारारा मागें उलटे माघार ॥

पिता वडील तो थोर—पिता व वडील अशी निष्कारण पुनरुक्ति आहे. थोर याचा अर्थ मनानें थोर असा घ्यावा.

आला जानीचा बहर—वयांत आला; उमेदवार झाला; वास्तविक सर्व शाहिरी वाङ्मयांत बारा वर्षांच्या उमरींत जानीचा म्हणजे जवानीचा भर आला म्हणून कौतुकानें फक्त स्त्रियांचेंच वर्णन करतात. बारा वर्षांची उमर म्हणजे स्त्रीच्या यौवनाचा पहिला सर्वोत्तम बहर, असें ऐतिहासिक काळीं समजलें जाई, हें लावण्यांच्या अभ्यासकांच्या पूर्ण परिचयाचें आहे. येथें तेंच वर्णन बारा वर्षांच्या मुलाला लावलें आहे; यामुळें तें थोडें विचित्र वाटतें. मात्र मराठशाहींत बारा-बारा वर्षांच्या लहान-लहान मुलांनींही प्रत्यक्ष रणांगणावर चाकऱ्या-उमेदवाऱ्या केल्याचें शेंकडों दाखले आहेत. आतांसारख्या शाळा व त्यांचें पुस्तकी शिक्षण तेव्हां नसे. प्रत्यक्ष अनुभव तीच शाळा; यामुळें ब्राह्मणाचा मुलगा असेल, तर तो कारकुनीपणांत व मराठ्याचा मुलगा असेल, तर तो आपल्या बापा-भावाबरोबर लष्करांत उमेदवारासारखा अगदीं अल्पवयांतच जाऊं लागे. येथें शाहिरानें बारा वर्षांची उमर सांगितली आहे, ती अर्थात् अतिशयोक्ति धरावयाची. **सदरेवर**—कचेरींत. **आली आपाच्या मनांत**—आलें आपाच्या मनांत. **मुला नेणतें पोर**—मुला ! तूं नेणतें पोर आहेस. **वडिलाची भाकरी**—वाडवडिलांनीं मिळवून ठेवलेली वतनी, इनामी अशी चावरभर जमीन; चावर—चाहूर म्हणजे १२० चौरस बिघे इतकी जमीन. **घर**—घरीं. **नाही तुझ्या वंशीं जन्मलों कोणाचा तस्कर**—बापाचा तो उपदेश

वेणूबांई माता होती खोलीच्या दार ।। हा चरणावरते जाऊन ठेविले शिर ।। पंचामृताची मला पाजली धार ।। बाई तुमच्या ह्या दुधाचा झाला मला उपकार ।। मला निरोप द्या मी जाऊन करतो रोजगार ।। मीं आणून दस्ता ठेवीन आपल्या म्होर ।। तवां हा दुधाचा फिटेल उपकार ।। वेणूबाई माता म्हणते नेणते पोर ।। नको जाऊं देशावर मुलुख भेसूर ।। हाय वडलाची भाकरी जमीन चावर ।। नाही देणें घेणें कवणाचें कशाचा घोर ।। नाही मातेचे ऐकले उलटे माघार ।। गेला घोड्याच्या पागेंत हिंडे चौफेर ।। पाससूर होता घोडा कुमाईत बोर ।। त्यावरते टाकिला खडा कीं पाठीवर ।। तडाडाडा उडाला घोडा वरच्यावर ।। ह्या घोड्यावरती बरी लाविली नदर ।। ह्या घोड्यावरती होईल माझी तलवार ।। केलें सामान बंदोबस्त लेस तयार ।। दिला पाय रिकीबांत झाला स्वार ।। गेला नगरामाधीं हिंडून पाहातो चौफेर ।। केलें गैबीचें दर्शन उलटे माघार ।। आला आपुल्या वाड्यापुढें दरवाज्या म्होर ।। तो वडील बाबाबंधू बोलाविला म्होर ।। त्याला नानापरीचे सांगतों अक्षर । तुम्ही वडीलपणानें करा आपला संसार ।। ह्या वडीलावरती फार

ऐकून आयतें मिळणारें मेलेलें अन्न खाण्याची अगदीं चीड आलेला आपाजी बापाला संतापून एकदम म्हणाला, "ज्याअर्थीं असला नादान उपदेश तुम्ही मला करतां, त्याअर्थीं तुम्ही माझे बाप नव्हेत. मला तस्करासारखे तुम्ही कोठून तरी पळवून आणलें असावें." **खोलीच्या दार**—बापलेकांचें भांडण चाललें असतां आई वेणूबाई खोलीच्या दाराआड येऊन ऐकत उभी होती. सदरेवर घरांतील स्त्रियांनी बाहेर लोकांदेखत न जाण्याचा जो जुन्या कुलवान घराण्यांतील दंडक असतो त्यास अनुसरून- **रोजगार**—नोकरी. **दस्ता**—मोडीवाचनाची चूक 'द' व 'ब' चा घोटाळा. बस्ता असा सूळ शब्द असावा. **बस्ता**—थैली, गाठोडे. **भेसूर**—भयासूर, भयंकर, कठिण. **ऐकला**—ऐकलें. **पाससूर**—समोर (?) **कुमाइत बोर**—कुमाइत व बोर या घोड्यांच्या विशिष्ट जाति आहेत.

लेस—तयार. बंदोबस्त व लेस हे दोन्ही एका अर्थीं शब्द वापरले आहेत. **अक्षर**—मजकूर. **गोठण**—गांवाबाहेर गुरें चरावयास

असावी नदर ॥ दादाचें काम कोठचिं त्याचें न्यार ॥ नानास दबावूं नका नेणतें पोर ॥ केली ताकीद बंदोबस्त निघाला बाहीर ॥ दिली टांच त्या घोड्याला उडविला बोर ॥ गेला गोठणाच्यावर ॥ करी विचार कुणीकडे जावें कुण्या देशावर ॥ धनि निपाणकर० ॥ १

त्यांनी पाहिलें पुणें पुढें सातार ॥ त्यांनी पाहिलें जी काबूलकंधार ॥ रूम पाहिलें पाच्छाईचें नगर ॥ चिनी मुंगी पैठण शार पाहिलें सार ॥ सातपुडे उतरून बारी झाला पार ॥ ह्या आपाला नाहीं कुठे कुठे रोजगार ॥ झाला काळा मोरा उलटला माघार ॥ काय तोंड दावीत जाऊं वडिला म्होर ॥ त्यांनीं मनामंधि शोध केला विचार ॥ हाय छत्रपतीचें गांव पुढे करवीर ॥ बरें जाता जाता तिथें करून जाऊ मुजरे ॥ जर असेल माझी भाकरी तिथ एक कोर ॥ वरी जगदंबेचें देणें तूच देणार ॥ फरारारा उडीवला घोडा कुमाईत बोर ॥ हा भर गुजरीचा धरला सुमार ॥ भर गुजरी घोडा उडविती

जातांना किंवा सायंकाळीं चरून आल्यावर गांवांत परत येतांना ज्या विशिष्ट जागीं गुरें एकत्र जमतात ती जागा.

काबूल, कंधार, रुम, चिनी—ही सर्व अतिशयोक्ति. कंधार हें शहर निजाम राज्यांत आहे. वास्तविक शाहिराला निपाणकर हा सातारा, पुणें, अहमदनगर, पैठण व निजामचें राज्य इतक्या मुलुखांत रोजगारानिमित्त हिंडला असें म्हणावयाचें; पण तो रोजगाराकरिता अगदी लांब लांब जाऊन आला हें वर्णन करण्याच्या झोकांत काबूल, कंदाहार, रूम, शामपर्यंत गेला अशी अतिशयोक्ति केली. **चिनी मुंगी पैठण**—वास्तविक मुंगी चिनापट्टण असें पाहिजे. **शार**—शहर. **काळामोरा**—गोरामोरा. मोरा—पांढरे व काळे ठिपके यांचें मिश्रण असलेला. सध्या आपण गोरामोरा म्हणतो त्याचा अर्थ खजील झाल्यामुळें किंवा घाबरल्यामुळें कावराबावरा झालेला असा असतो. येथें इतकें फिरूनही मनासारखी नोकरी मिळाली नाही म्हणून तो काळजीनें काळवंडला असा अर्थ घ्यावा. **कोर**—चतकोर. **गुजरी**—बाजार पेठ. **नानापर**—नाना प्रकारांनी. आपलें शिलेदारीचें कौशल्य दाखवितांना मराठे स्वार नाना चालीवर घोडीं दौडवून दाखवीत. सैन्याचा तळ हालला म्हणजे

नानापर ॥ शिवछत्रपती होते बंगल्यावर ॥ धनी महाराजाची होती गुजरीवर नदर ॥ काय घोडा देखणा सवार उमतवार ॥ हांक मारली जासूदास पळ लौकर ॥ हा कोठून आला स्वार आणा हितवर ॥ गेला जासुद धांवून केला आपाला मुजर ॥ चला हुकूम महाराजाचा चला तिथवर ॥ खदखदा हांसले आपासाहेब सरदार ॥ बरें जगदंबेचें देणें तूंच देणार ॥ गेले घोडा उडवीत गेले सदरे झोर ॥ धनी महाराजांनीं वरी लाविली नदर ॥ काय वघ्र शिपाई झुरत अनिवार ॥ कायराव तोंडावरते मारतो लहर ॥ हाय कुरुम डोळ्यांमधिं भरपूर ॥ महाराज बोलते झाले परमेश्वर ॥ काय नांव तुमचें गांव कुठें राहणार ॥ बरी कवणीकडून आला कुठे जाणार ॥ तवां आपासाहेबांनीं काय केला उत्तर । मी अकलूजचे देसाई वतनदार । रघुनाथ माझा पिता तुमचा चाकर । माझें नांव आपा म्हणत्यात लहानथोर । फार मुलुख महाराज हिंडलों दूरच्यादूर ॥ मला ठेवाया सारखा नाही कुणी सरदार ॥ असा शब्द ऐकतां राजास चढली ईर ॥ माझा लौकिक देवा होईल दुनयावर ॥ एक खेडें गेलें म्हणीन वरीसभर ॥ एक तरी महिना ठेवीन हा चाकर ॥ धनी० ॥ २

दुसऱ्या तळावर जातांना वाटेंत मराठे शिलेदार गमतीनें आपापल्या घोड्यांचीं कसबें कशीं दाखवीत याचें वर्णन तत्कालीन युरोपियन लोकांनी केलेलें प्रसिद्धच आहे. सवार—स्वार. उमतवार—उमेदवार; जवान, हितवर—येथवर. वघ्र शिपाई—वाघासारखा. झुरत—जुरत—शौर्य. लहर—तोंडावरचें तेज. कुरुम—पाणी. बरी—बरें. कवणीकडून—कोणीकडून. मला ठेवायासारखा कुणी सरदार—मला पदरीं ठेवून घेईल असा मातबर धनीच मला भेटला नाहीं. ईर—ईर्षा. दुनयावर—दुनियेवर, जगांत. एक खेडें गेलें वरीसभर इ.—राजानें असा विचार केला कीं, असला हा नामांकित एकांडा आपण जवळ बाळगावाच. त्याच्या एकट्यासाठी भलताच पगार द्यावा लागला तरी हरकत नाही. असला माणूस पदरीं आहे हाच लौकिक काय थोडा होईल ? एका गांवाचा वार्षिक वसूल याच्या एकट्याच्या पगारांत खर्च होईल तो होईल. काय वाटेल तें होवो, एक महिनाभर तरी

हांक मारली मोतद्दारा हवाली कर ॥ हा घोडा नेऊनी लावें ठाण्यावर या भोजनाच्या वेळेला कीं :ताटावर ॥ केली ताकीद बंदोबस्त खबरदार ॥ असें करतां करतां दिवस झाले च्यार ॥ आले दादबा

याला नोकरीस ठेवून पाहणारच. तुकोजीराव होळकरांचा मुलगा मल्हारराव होळकर—ज्याचा दुसऱ्या बाजीरावींत पुण्याजवळ शिंद्याच्या फौजेने हल्ला करून वध केला—त्यानेंहि आपल्या पदरीं एक लाख रुपये पगाराचा एकांडा बाळगला होता, व त्यावरूनच त्या एकांड्याचें लौकिकांत 'लाख्या बारगीर' असें नांव पडलें होतें, एक लाख रुपये महिना पगार ही अर्थात् अचाट अतिशयोक्ति होय. आपण 'लाख माणूस' म्हणतों त्याच अर्थानें 'लाख्या बारगीर' होय. मल्हारराव होळकराच्या पोवाड्यांत थेट निपाणकराच्या पोवाड्यासारखेंच वर्णन आलें आहे. लाख्या बारगीर हिंडुन आला दरबारीं घेऊन सारी सेना ॥ लाख रुपये कुठून द्यावे हिंय्या कोणाचा होईना ॥ लाख्या बारगीर म्हणे मल्हारबा आलों मी तुमच्या दर्शना ॥ मल्हारजी होळकर बोलूं लागला नाही लाखाचा परगणा (चाल) ज्याने थोर हिंय्या केला । लाख्या बारगीर ठेविला ॥ एक घोडा बसाया दिला ॥ पन्नास माणूस दिमतीला ॥ दहा माणूस सेवेला ॥ किती जेवी त्यांच्या पंक्तीला ॥ पांचशे रुपये निवळ मोजून घातले त्याच्या पदरांत ॥ असे रुपये कितीक झाले करा वर्षाचें गणीत ॥ वाहवाजी मल्हार ॥ (ऐतिहासिक पोवाडे, भाग १ पान ३२३.) एकांडे—एकटे स्वार. हे निधड्या छातीचे मर्द शिलेदार ब्राह्मण, मराठे रजपूत, मुसलमान वगैरे सर्व जातीचे असत. सामान्य स्वाराचें वेतन जरी सालीना अडीचशे, तीनशे, चारशे रुपयेपर्यंत घोडे माणूस पाहून असें तरी सातआठशे पासून दोन दोन हजारापर्यंत तैनाता देऊन व पालख्या अबदागिऱ्या वगैरे बहुमान देऊन हे एकांडे प्रत्येक पथकांत व पागेंत दहावीस, पन्नास, शंभर असे एकंदर स्वारांच्या संख्येचें मान पाहून बाळगलेले असत. आणीबाणीच्या वेळीं नेहमीं हे मोहरे अघाडीस असावयाचे. हेच पुढें बढती मिळून पागे व पथके होत असत. (खरे–इ. वं. बखर, पान ३१.) ताटावर—पानावर बसलें असता; भावार्थ अन्नाला साक्ष ठेवून. दिवस झाले चार—कांहीं एक लाव—

साळखे चाडखोर ॥ खूळ लागले राजाला सांगु कुठवर ॥ बारा हजार दरमहा कसा केला बरोबर ॥ अशी आपानी कोठें केली तलवार ॥ कुठे लाव नाही लष्कर दुनयावर ॥ ह्या आपाला तुम्ही घाला वाघावर ॥ ह्या कोंकण खेड्याला ल्याहा तुम्ही पत्र ॥ कुठे असतील ढाण्या वग्र असावी नदर ॥ उद्यां महाराज शिकारीला खचीत येणार ॥ राजाचें अंग सोन्याचें पितळकान खर ॥ हलकी गोष्ट ऐकून लिहिलें बरोबर ॥ झाला हुकूम सैनेमधिं झडत नगार ॥ केली ताकीद ढालाईताला ढाल तयार ॥ ही ढाल चलावी राशिवड्यावर ॥ आगड धो धो डंके झडती घोड्यावर ॥ दलभार निघाले राजाचें लष्कर ॥ महाराज अंबारींत हत्तीच्यावर ॥ दोई बाजूनें मोर्चाल उडे दरार ॥ झळझळां गंगावन झळकते ह्मोर ॥ दल म्हाराजाचें निघाले लष्कर ॥ ३

गेली वस्ती करीत चालले ह्मोरे ह्मोर ॥ धीनफोंड्या घाटावर ठाकले डेर ॥ महाराज डेऱ्यामाधि बसले देव अवतार ॥ आले कोंकणे बहाद्दर लंगोटे सार ॥ त्यांनी बांधून कंबर केले मुजरे ॥ ह्या अश्वल

निशाण, लाव लष्कर असा शब्द ऐतिहासिक वाङ्मयांत पुष्कळ वेळा येतो. त्याचा अर्थ लष्कर व निशाणें असा असतो. भावार्थानें लावलष्कर म्हणजे सैन्य सरंजाम. **दुनयावर**—दुनियेवर. एक लाख रुपये आपा खाणार पण सारें जग शोधलें तरी त्याच्या जमावाची किंवा निशाणाची निशाणी कोठें आढळत नाहीं. अशा उपटसुंभाला दर महा एक लाख! **वग्र**—वाघ. **राजाचे अंग सोन्याचे पितळ कान खर**—राजा उदार, गुणग्राही इतर दृष्टीनें सारा सोन्यासारखा आहे पण हलक्या कानाचा आहे. शाहीरानें उपयोजिलेलें हें गांवठीं सुभाषित फार सुंदर आहे. गाय साऱ्या अंगीं पवित्र पण तोंडात अपवित्र, त्याप्रमाणे छत्रपति इतर सर्व दृष्टीनी चांगला परंतु हलकट लोकांची मसलत ऐकणारा असा भावार्थ. **बरोबर**—तसेंच ठरल्याप्रमाणें. **ढाल**—निशाण. **दलभार**—सैन्य, तुकड्या. **गंगावन झळकतें ह्मोर**—चौऱ्या. महाराजावर दोन बाजूंनी मोर्चले झळकत होतीं व चौऱ्या वारल्या जात होत्या. **धीन**—(?) दीन असा शब्द असेल तर त्याचा संबंध ह्मोर या शब्दांकडे घेतां येईल ह्मणजे ह्मोर दिन ह्मणजे पुढील दिवशीं. **अश्वल खोरी**—अस्वलदरा; अस्वलखोरें;

खोरीमध्ये वाघाचे घर ॥ तुम्ही लोक निवडा भलेभले उमेदवार ॥ ह्या माच्यां वरते उभा करून धरा फर ॥ धनि महाराजांची दया कीं आपावर ॥ तुम्ही संभाळा आपला नेणते पोर ॥ मधि घालून आपाला सांभाळा सार॥ चारसे लोक निवडले कीं उमेदवार ॥ ह्या माच्यावरते उभा केले तयार ॥ खोरीत उतरले कोकणे भले बहादर ॥ लोलो मारली बोंब केला गजर ॥ धडधडाडली खोरी हालले वग्र ॥ दरदरा वरते चढून आले डोंगर ॥ होते महाराज दूरच्या दूर कोसावर ॥ हत्तीला घातले अंदू अंबारीवर ॥ महाराज अंबारींत बसले वर ॥ हाती घेतली दुर्बीण लावली नदर ॥ दरदरा वरती चढून आले डोंगर ॥ ह्या करवीरच्या लोकांनी पाहिले डोळेभर ॥ जसा फुटला बाजार पळाले सार ॥ तवां बघतो लिपाणकर मागे म्होर ॥ या ईश्वरा काय वेळ आली माझ्यावर ॥ माझे बाजूचे मानकरी पळाले सार ॥ घोड्यावरनें टाकली उडी पायउतार ॥ हांक मारली मोतदाराला येरे लौकर ॥ संभाळ माझा घोडा कुमाईत बोर ॥ कर वडलाचे हवालीं नेऊन माघार ॥ घोड्याच्या पडतां पाया तूंच ईश्वर ॥ तुज माझें बाबा हुतें आजवर ॥ ह्या विघ्नांतून होऊन येईन जर पार ॥ तर माझ्या बोरा मीच तुझा सरदार ॥ ह्या विघ्नामाधिं होऊन जाईन जर ठार ॥ तर वडील बाबा बंधू तुला बसणार ॥ घोडयानें टाकली मान खांद्यावर ॥ दळदळा गळतीं

जेथें अस्वलांची वस्ती आहे असें खोरें. माची—डोंगराच्या पायथ्याच्या उतारावरील मैदान "माचीतु उपत्यका" राजव्यवहार कोश. फर—फरे. मूळ शब्द फरा–रांग. लोलो मारली बोंब केला गजर—हाका सुरू केला. सावज बाहेर हुसकण्यासाठी हाके लोक आरडाओरडा करून बोंबा मारून, डबे वाजवून काठ्या आपटून मुद्दाम गोंगाट करतात. खोली—वास्तविक खोरी–खोरें असें पाहिजे. धडधडाडली—दुमदुमली. हत्तीला अंदू घालणें—हत्ती पळून जाऊ नये, जागचा हालू नये म्हणून त्याचे पाय साखळदंडानें जखडून टाकणें. जसाफुटला बाजार—बाजार बुणग्यांची पळापळ होते त्याप्रमाणें. या ईश्वरा—हे ईश्वरा; हा ईश्वरा. पडता—पडतो असें पाहिजे. हुते—होते. तुझा माझा इतके दिवस ऋणानुबंध होता, तो आज संपणार. तुला बसणार—तुझ्यावर

नेत्र पाण्याची धार ॥ रडूं नकोस माझ्या ब्रोरा हें ब्रह्माचें अक्षर चुकल कसें झोर ॥ फरफरारला घोडा उलट माघार ॥ हातीं काढणी निघाला मोतद्दार ॥ धनी० ॥ ४

खालीं ठेविली तलवार दर्शन कर ॥ बाई वडलाच्या हातची यशसूर ॥ माझा प्राण बाई तुझ्या जिवावर ॥ आज पावेतोंर नाहीं मारलें माजार ॥ मग उचलली समशेर पाय दिला म्होर ॥ तेव्हां मुंड्याला गुंडाळलें धोतर ॥ चढीवली ढाल मुंढ्याला झाला तयार ॥ रघुनाथ देसाई नको म्हणत होते खर ॥ मी नाहीं ऐकलों तसाच आलों म्होर ॥ हे नाना बाबा बंधू राहिले दूर ॥ ही वेणूबाई माता माझी अंतर ॥ मग पाय दिल्हा तो म्होर चालला वीर ॥ हाक मारली वघ्राला बलावी बहादर ॥ येकयेक तुटोनि या माझ्या आंगावर ॥ एक वघ्र तुटला किरण केलें आपावर ॥ आपानें घेतली डुब लावी तलवार ॥ एक हातांत लेखणी दोनी तुकडे बरोबर ॥ सावघ्राला चढली वीर पाय उकर ॥ एकदांच किरण केलें आपावर ॥ साहात मारिलें पातें लवतां बरोबर ॥ सात वाघ मारून झाला पलीकडे पार ॥ धनी महाराजाची होती त्यावर नजर ॥ हत्तीचे काढले अंदू ढकलला झोर ॥ इतक्यांत धांवत आले निपाणीकर॥झाराज उतरले खाल हतीच्या झोर ॥ तवां चरणावरते येवून ठेवले शीर ॥ तवा महाराजानी हात ठेविला शिरावर ॥ वाहवारे आपा नांव तुझे सरदार ॥ तुम्हीं जनमल्याली वेळ नक्षीतर ॥ खांद्यावरते

बसणार. यशसूर--यशस्वरी, यशदाती. दर्शन कर—प्रणाम करी. दळदळा—ढळढळा वडिलांच्या हातची—वाडवडिलांपासून जवळ असलेली. माजार—मांजर. आप्पा देसायाच्या बोलण्याचा भावार्थ असा बाई समशेरी तुझ्याकडून लढायांत माणसें मारलीं पण कधीं शिकार मारण्याचा प्रसंग आला नव्हता. पाय दिला म्होर—पवित्रा टाकला. मुंड्याला—डोक्याला. मुंढ्याला—पाठीला. अंतर—अंतरे, अंतरली. एक हातांत लेखणी दोन्ही तुकडे बराबर—-बोरू मोडून बरोबर दोन तुकडे करावे तसे त्याने आपल्या पटयाच्या वारानें वाघाचे बरोबर दोन तुकडे केले. सावघ्राला—सा वघ्राला-सहा व्याघ्रांना, एक मारल्यानंतर उरलेल्या सहांना. वीर—ईर, ईर्षा. पाय

टाकला हात दोघे बरोबर ।। खुस मर्जी महाराजाची आपावर ।। तवा मानकऱ्यांची पोटे चावती सार ।। झाली ह्या राजाजी दया आपावर ।। राणू म्हात त्याला बलाविला लौकर ।। हुता मगनमस्तीत हत्ती अष्टौपार ।। त्याला मगनमस्तीच्या गोळया चढीव दोनचार ।। हे नुकते राजे बसतील गादीवर ।। दे इतक्यांत हत्ती सोडून दे बाहेर ।। धनी० ।। ५

झालें कूच महाराजांचे उलट माघार ।। केलें अंबेचें दर्शन उलट माघार ।। हे नुगते राजे जाऊन बसले गादीवर ।। केली झाताने गडबड झाले तयार ।। दिला हत्ती सोडून जाऊन शिरला शाहार ।। मारतो गुरें ढोरें अंत ना पार ।। पाडलीं अवधीं गरिबाचीं घरें दारें ।। मारले गोरगरिब लेंकरें पोर ।। गला गरीबाचा आरडा राजाम्होर ।। दडदडा बडविती ऊर राजा म्होर ।। आज गरिबाचा बुडाला संसार ।। तुम्ही दयावंत म्हाराज करा कृपा आम्हांवर ।। ह्यो आपला हत्ती नेऊन बांधा ठाणावर ।। तेव्हां म्हाराजाच्या डोळ्या लागली धार ।। हीं गरीब माझीं मारलीं लेकरें ।। अरे उठा उठा मानकरी व्हावें तयार ।। ह्यो हत्ती नेऊन बांधा ठाणावर ।। तेव्हां मानकऱ्यांनी मसलद केली सार ।। बारा बारा वर्षे राबतो तुमचे बरोबर ।। बरें एका वर्षी नाही दिले शंभर ।। दिली कुर्डू पिकायाची खेडी माळावर ।।

उकर—पायांनी उकरूं लागले. वास्तविक वाघाच्या बाबतींत हें वर्णन तितकेंसें बरोबर नाही. घोडा किंवा बैल असले पशू रागावले किंवा कावरे-बावरे झाले म्हणजे पायांनी जमीन उकरतात. वाघ तसें करीत नाही. आतां कदाचित मांजर वगैरे प्राणी नखाला धार लावण्याकरिता ज्या-प्रमाणे झाडाच्या सालीं ओरबडतात त्याप्रमाणे हल्ला करून जाण्याच्या आधीं त्या वाघांनीं आपले पंजे भुईवर घासून नखें पाजळलीं असें वर्णन करण्याचा शाहिराचा हेतू दिसतो. **तुह्मी जन्मल्याली वेळ नक्षीतर**—तुझ्या जन्मकालीं मोठे बलवत्तरच ग्रह पडले असले पाहिजेत एरव्ही तूं आज वांचतास ना. **नक्षीतर**—नक्षत्र, ग्रह. **दोघे बरोबर**—बरोबरीच्या नात्यानें. एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून चालले. **खुसमर्जी**—खुष-मर्जी. **पोटें चावती**—पोटांत चाऊं लागलें म्हणजे मत्सर उत्पन्न झाला. **अष्टोपार**—अष्टौप्रहर. **नुकते बसती गादीवर**—गादीवर बसले नाहीत तों. **शिरला शाहार**—शहरांत शिरला. **कुर्डू**—माळावर उगवणारें रानटी

ही सावकाराकडे घाण पडली सार ॥ नाही पोटाला भाकरी आंगवस्तर ॥ कसें चालून जावें महाराज हत्तीवर ॥ दर महिना रुपये खातो बारा हजार ॥ तो नेऊन हत्ती बांधील ठाण्यावर ॥ आपानी शब्द ऐके कानभर ॥ हे खचित देवा आले कीं माझ्यावर ॥ दिला पाय रिकीबींत झाला स्वार ॥ धनी महाराज येऊन केला मुजर ॥ धनी ॥ नि० ॥ ६

धनी महाराजाची मजवर राहावी नजर ॥ मरून गेलों तर धुळ पायाचे खर ॥ इतक्यांत हत्ती बांधीन ठाणावर ॥ केला महाराजाला मुजरा निघाला बाहिर ॥ हुता मैदान जागा गेला गोठणावर ॥ मध्यें रोवला भाला घोडा मंडळावर ॥ इतक्यांत हत्ती आला त्याचे समोर ॥ मी देसायाचा वीर आलो तुजवर ॥ चल गांडू भडव्या ये मज आंगावर ॥ कां मारतोस ढोरें गुरें गरीब लेंकर ॥ हत्तीनें ओळखला शब्द आपाचा खरा ॥ दरारा मोहरा केला आपावर ॥ आपानें उडविला घोडा बाजूवर ॥ दोघांची लागली कुस्ती झाले दोन प्रहर ॥ कवणास कोण हटेना दोघे बरोबर ॥ काय तारीफ त्या घोड्याची नक्षेदार ॥ त्यानें बगलेंत मुडा धरिला वरचेवर ॥ हत्तीला फावला वाव वर्सला कार ॥ तवां सोंड पोचूं लागली डोईवर ॥ तवां महाराजाचे डोळ्या लागली धार ॥ अरे उठा उठा मानकरी बांधा कंबार ॥ पायांत पेचला घोडा घात झाला बर ॥ आतां खचित मरतें देसायाचें पोर ॥ तवां आपा साहेबाने ऐकला उत्तर ॥ नका नका तुमचे मानकरी बसूं द्यात सार ॥ म्हाराजाची बारीक राहावी नदर ॥ इत-

---

गवती फूल. **कानभर**—कान भरून, लक्ष लावून. **धूळ पायाचे खर**—महाराजांनी आता माझ्या पराक्रमावर नजर ठेवावी. मी फुकट १२ हजार रुपये खात नाही. मी हत्ती बांधीनच पण तें न साधलें आणि मेलों तर मी काय बोलून चालून तुमच्या पायाचा धुरळा धुळींत धूळ मिळून जाईल. **घोडा मंडळावर**—मैदानांत मध्यावर भाला रोवून त्याच्या भोंवती मंडलाकार घोडा फिरवूं लागला. **नक्षेदार**—तारफेचें विशेषण. **तारीफ**—कौशल्य. **त्यानें बगलेंत मुडा धरिला वरचेवर**—घोडा मागील दोन पायांवर उभा होता त्याचे पुढचे पाय हत्ती आपल्या सोंडेनें पकडूं पहात होता, म्हणून त्या घोड्याने आपले पुढले पाय आखडून मोडून बगलेशीं दाबून धरले. **बारीक रहावी नजर**—

क्यांत हत्ती बांधीन ठाणावर ।। दिली धाप मानेवर घोडा हुशार ॥ फराराराा घोडा उडवला वरच्या वर ।। च्यारी टापा उचलुन ठेविल्या पाठीवर ।। दिला घोडा सोडून झाला हत्तीवर स्वार ॥ दिला मार अंकुशाचा हत्ती चिर-चिर ॥ दराराराा ओढून नेला ठाणावर ॥ पायांत भरला बिंडा बांधून तयार ॥ केला म्हाराजाला मुजरा येऊन माघार ॥ झाली म्हाराजाची दया आपावर टाकी खांद्यावरते हात दोघे बरोबर ॥ माझ्या बाजूचा मानकरी भला बाहादर ॥ दिला लोड तक्या उजव्या बाजूवर ॥ तो उजव्या बाजूचा मानकरी भला बाहादर ॥ खुस मर्जी महाराजाची त्या आपावर ॥ असें करतां करतां महिना झाला पार ॥ केला जोहार म्हाराजाला मागे पगार ।। बारा हजाराचा तोडा टाकला झोर ।। घ्या आपा मोजून खोटे खर ।। संभाळा चुकूं नका त्यांत तिळभर ।। केलें पंगतीचें ताट बरोबर ।। केली आपाला वस्तरे जरीचे जरतार ।। केला आपानें कंबरबस्ता झाला तयार ।। पानाच्या देतो पट्या खिसमतगार ।। केला मुजरा म्हाराजाला निघाला बाहेर ।। छत्रपती महाराज बंगल्यावर ।। तेव्हा महाराजाची गेली आपावर नजर ।। दडदडा बडीवतों ऊर डोळ्याला धार ।। माझ्या पागेतला रणशूर निघाला बाहीर ।। शिनहाळ माझी पागा दिसती सार ।। फिराफिरा

माझ्याकडे महाराजांनी लक्ष देऊन पाहावे. बिंडा—दोरी सूत इत्यादिकांचें बिंडोळें (महाराष्ट्र शब्दकोश) तृणैराविष्टते रज्जुः यदा नागोपिबध्यते. हत्तीचे पाय बांधावयाचें दोरखंड. बारा हजाराचा तोडा टाकला झोर--सामान्यतः हजार रुपयांचा एक तोडा अशी समजूत आहे पण अलीकडील इतिहास संशोधकांनीं ती खोटी ठरविली आहे. उदाहरणार्थ, (भा. इ. सं. मंडळ त्रैमासिकांतील ना. गो. चापेकर यांचा लेख पहा.) कंबरबस्ता करणें—कंबरपट्टा आवळून सिद्ध होणें. शिनहाळ—शिनहाळ असा शब्द कोशांत सांपडत नाही. शाहिराच्या म्हणण्याचा रोंख 'तुझ्यावांचून माझी पागा ओकी, उदास विधवेसारखी दिसते असा आहे.' माझीं पागा रांडावली आहे. जुन्याकाळीं रांड या शब्दास सध्यासारखा वाईट अर्थ नव्हता. रांड म्हणजे विधवा, अगतिक झालेली स्त्री. मराठी लष्कराच्या जमाखर्चांत रांडरोटी असा शब्द नेहमी येतो तेथें त्याचा अर्थ मेलेल्या शिपायाच्या बायकोला दिलेलें पेन्शन

आपासाहेब यावे माघार ॥ माझे सांगण्याचा मजकूर ऐका खिणभर ॥ असा दरमहा तुम्हाला नाही मिळायचा बरबर ॥ कारकून लुचे सारे करतील मागे म्होर ॥ तुम्ही बरे नव्हे गडी उठाल जीवावर ॥ एक गांव निपाणी देतो तुझा नादर ॥ दाहाविस खेडी आहेत भोवत्या भोर ॥ ते सारे मोडून एक वशिव जा शाहर ॥ तीन कोसावरचे पाणी नळाचे सार ॥ आठ पेठा वशीव जा प्रत्यक्ष दिसावें करवीर ॥ सात रेवण्या खंदक जोरावार ॥ चौकोनी बांद जा किल्ला नक्षीदार ॥ धनी० ॥ ७

तवा आपासाहेबानें काय केला उत्तर ॥ हे नेऊन लखोटा दावीन वडलां म्होर ॥ त्यांनीं जा म्हटलें तर माघें येणार ॥ त्यानें नको म्हटलें तर तिकडेच राहणार ॥ आपसात लाखोटा येईल आपला माघार ॥ केला मुजरा म्हाराजाला उडविला बोर ॥ आला आपल्या गांवामधि उलट माघार ॥ रघुनाथ देसाई हुते सदरेवर ॥ त्यानें कंबरबस्ता ठेविले वडिला म्होर ॥

असा असतो. शिनहाळ हा शिंदळ किंवा शिंदाळ या शब्दाचाहि अपभ्रंश असूं शकेल, व म्हणून त्याचा अर्थ विधवा असाच होईल. **खिणभर**—क्षणभर. **मागेम्होर करणें**—लबाडी करणें. **तुम्ही बरें नव्हे गडी उठाल जिवावर**—तुम्ही इरईचे सरदार अहां प्रसंगीं जीव द्यायलाहि तयार व्हाल. **नादर**—अत्युत्कृष्ट, अपूर्व (मोल्स्वर्थ). राजाचा भावार्थ असा कीं तुम्हाला १२ हजार रुपये पगार दिला, पण तुम्ही शिपाई गडी, तुमचे कारकून म्हणजे कारभारी, त्यांची नाही नाही त्या सबबी काढून वासलात लावून पुन्हा तुम्हास कर्जबाजारीच ठेवतील. म्हणून तुम्हांस मी एक दहावीस खेड्यांचा गांवच इनाम देतो म्हणजे तो तुम्हास वंशपरंपरा उपभोगितां येईल. **भोवत्या भोर**—आसपास, सभोवार. **रेवण्या**—मूळ शब्द रेवणी, हाही शब्द इंग्रजी रॅव्हेलिन् या शब्दाचा अपभ्रंश आहे. रॅव्हेलिन् म्हणजे–Earth heaped up slopingly against the outer side of the wall of a fort, or if there be a ditch, of the side of the ditch for protection against shot. (2) the Counter scarp or the outer region around the ditch of a fort. **आपसांत**—आपसूक **कंबरबस्ता ठेवले वडलां म्होर**—कमरेचा पट्टा व तलवार काढून

वेणूबाई माता ह्मणे यशवंत पुतर ॥ माझ्या वंशाला जन्मला कीं रामचंद्र ॥ मग बसले बाजूवर जरा खिणभर ॥ मी जातों लिपाणीला पाहाया मजकूर ॥ फरारारा उडविला घोडा कुमाईत बोर ॥ निपाणीचा मारग धरिला ह्मोर ॥ पाहतो निपाणीला न्याहाळून चौफेर ॥ लहानसें दिसतें भोवतें डोंगर ॥ हीं सारीं खेडीं मोडून बसवावें शाहार ॥ असा मनामधिं शोध केला विचार ॥ धनी० ॥ ८

ह्यो किल्ला बांधायाचा केला सुमार ॥ जिते दावील माझा घोडा तिथे तयार ॥ दिला लगाम टाकून ऐका मानेवर ॥ दिली टांच त्या घोड्यास उडविला बोर । भरधांव घोडा हिंडतो भोवत्या भोर । गप करून उभा राहिला जाग्यावर । खाली उतरले सरदार घोड्याच्या ह्मोर । त्यांनी बोलाविले वड्ड कोरवी बेलदार ॥ खंदकाचें लावले काम अचंबर ॥ जित पाणी खंदकामधिं काळें-भोर ॥ त्यामधिं सोडले मासे कासाव सुसर ॥ सानरेवण्या खंदक जोराबार ॥ किल्ल्याचें लावलें काम नक्षेदार ॥ गोरगरीब भरती पोटें अंतनापार ॥ चौकोनी बांधला किल्ला नक्षेदार ॥ सदरेचें चाललें काम किल्ल्याह्मोर ॥ सुरूचे लावलें खांब बाजूवर ॥ वर वर्ख दिला सोनेरी नक्षेदार ॥ खिडक्या भोंवर आयने सार ॥ हीं नानापराचीं काढलीं चितर ॥ सांबर भेकर हत्ती सार ॥ चालले की शिलेदार माहालदार ॥ अशी नानापरींची काढिलीं चितर ॥ धनी० ॥ ९

सदरेंत बसलीं स्वारी देव अवतार ॥ त्यांनी सदरेमधि बसून लिवलीं पतर ॥ देशाला धाडून दिली कीं दुनयावर ॥ कोणी असाल वाणी उदमी शेटे सावकार ॥ कवलाने देतो पटे भरवा बाजार ॥ नाही जकात फसकी

वडलांच्या पायावर ठेविली. बाजूवर—बाजूस, शेजारी. सुमार—संकेत. वड्ड, कोरवी, बेलदार—ह्या सर्व कर्नाटकांतील जाती. यांचें काम खाणी खणणें, दगड काढणें, दगड फोडणें इत्यादि असें. ऐतिहासिक काळीं लष्कराबरोबर ही मंडळी सध्याच्या सॅपर्स मायनर्सचें काम करीत. अचंबर—आश्चर्य वाटण्याजोगें, अचंबा वाटण्याजोगें भोंवर— (?) कौलानें देतों पट्टे भरवा बाजार—ऐतिहासिक काळीं एखाद्या सरदाराला सरकाराबरोबर आपल्या गांवांत नवीन बाजारपेठ

घेत कुणा तिळभर ॥ तुम्ही स्वस्थपणाने विकावी ढोरगुर ॥ आठ पेठा केल्या प्रत्यक्ष करवीर ॥ तीन कोसावरनें पाणी नळाचें सार ॥ आठ पेठेंत पाणी केलें अचंबर ॥ तिथे राज्य करतो धनी हा निपाणकर ॥ जसा जाळीमधिं वग्र तसा बिनघोर ॥ करवीरामधिं सोंदे लुच्चे सार ॥ तेव्हां महाराजाला शिकवतात वरवर ॥ ह्या आपाला तुह्मीं दिलें निपाणी शाहार ॥ ह्यो वंशानवंशीं फुकट बसून खाणार ॥ अशी आपानें कुठे केली तलवार ॥ हें निपाणी सुटायाचा एक हुन्नेर ॥ आम्हीं सांगतों तुह्मी ऐका राजेश्वर ॥ या दुनयामधिं मातलें अनंतपूर ॥ तिथं धाडून द्यावा नाहीं मागे येणार ॥ तो मरून तिकडे होऊन जाईल ठार ॥ आपसांत निपाणी सुटेल आपलें शार ॥ मोठा रम्य जागा आहे तो भेसूर ॥ दीन दीन रण खेळत अष्टोपार ॥ तिथें भोंग्याचा भडिमार वर्षतो कार ॥ तिथे गलिमाचा काठ नाही तिळभर ॥ धोंडे दगड पाठी लागत्याती डोंगर ॥ मोठे राजे प्रजे पळून गेले सार ॥ मोठे रुमचे बाच्छा बारा वर्षें

बसविण्याची अनुज्ञा मिळाली म्हणजे तो, वाणी उदम्यांस कळवी कीं तुम्हांस अमूक इतक्या वर्षांपर्यंत दुकानपट्टी किंवा इतर कोणतेही कर तुमचेकडून घेणार नाहीं. तुम्हांस घरें दुकानें बांधण्यासाठीं सवलतीनें जागा देतों. इस्तावा—नवीन जमीन कीर्दमामुरीस येतेवेळीं कांहीं वर्षेपर्यंत भर साऱ्यापेक्षा कमी परंतु दरसाल वाढत्या साऱ्याने जमीन देण्याविषयींचें करारपत्र (महाराष्ट्र शब्दकोश). पट्टा—करारपट्टा. फसकी—एक प्रकारचा बाजारांतला कर. हा कर धान्य भाजीपाला विकणाऱ्या दुकानदारांकडून घेतला जाई (मोल्स.) वरवर—पुन्हा पुन्हा. निपाणी सुटायचा हुन्नर—आप्पाकडून निपाणी काढून घेण्याची युक्ति. हुन्नर—युक्ति. भेसूर—भयंकर. तेथे भुताटकी आहे. अनंतपूर जागा मोठी रम्य आहे परंतु झपाटलेली आहे. दिन दिन रण खेळत अष्टोपार—तेथें अष्टौप्रहर रणांगणांत होणाऱ्या अशा गर्जना ऐकूं येत असतात. भोंग्याचा भडिमार—तेथे अकस्मात टोळधाडीसारखे भुंगे उठतात. अफझुलखानाच्या पोवाड्यांत किंवा बखरीत खानाने पंढरपूरचा विठोबा फोडल्यावर भयंकर भुंगे उठून त्यांनी खानाच्या सैन्यास हैराण केल्याची हकीकत आलेली आहेच. काढ—काट पाहिजे.—काट चालणे हा शब्द प्रसिद्धच

बरोबर ।। झाडें लावून आंबे खावून पळाले सार ।। भिवा अर्जुनासारखे दमले वीर ।। रामचंद्रासारखे गेले नाही म्होर ।। तसल्याला नाही आले आनंतपूर ।। तिथे धाडा निपाणकर नाही येणार ।। राजाचे 'आंग सोन्याचें पितळकान सार ।। त्यांनी ही हलकीं गोष्ट ऐकून लिहिले बरोबर ।। तुम्ही निपाणकर बहादर यावे लौकर ।। मोठी वेळ बावा पडली माझ्यावर ।। जर लिपाणी मधि भोजन केलें तर ।। तुम्ही हात धुण्याला जलदी यावे करवीर ।। माझ्या उजव्या बाजूचा मानकरी होशील तर ।। मोठी वेळ बाबा माझ्यावर ।। केला हुकूम कारकुनाला जलदी तयार ।। केला स्वाराच्या हवालीं पळ लौकर ।। या निपाणकराला जलदी द्यावें पत्र ।। भरधांव घोडा करीत मारामार ।। एक तासामधिं गांठ निपाणी शाहार ।। धनी आपासाहेब सरदार सदरेवर ।। इतक्यांत जाऊन पोंचला ऐका स्वार ।। त्यानें नेऊन लाखोटा दिला कीं आपाझोर ।। त्यानें मुजरा करून राहिला परभार ।। तवा आपासाहेबानें वाचून पाहातो अक्षर ।। धडधडा बडीवता ऊर डोळ्याला धार ।। काय वेळ देवा आली मज राजावर ।। आतां सामान घालायासी होईल उशीर ।। तशी होती बुरखी टाकली पाठीवर ।। नाहीं लगाम तोंडामधि झाला स्वार ।। एक लहिजेमधिं गांठलें करवीर ।। भरधांव घोडा सोडला कुमाईत बेर ।। थयथया नाचवी घोडा सदरे झोर ।। तवां माहाराज ह्मणाति आपा खाल उतर ।। कुठे गलीम मोरचा आला तुमचेवर ।। मला दावून राजे बसाजी गादीवर ।। कुटे गलीम मोरचा नाहीं माझ्यावर ।। तुला सांगण्याचा मजकूर ऐक खिणभर ।। या दुनयामधिं

आहे. अनंतपुरावर शत्रू चालून जाईल. पण तेथे त्याचा क्षणभरहि काट चालणार नाही. **धोंडे दगड पाठीं लागल्याती डोंगर**—दगड येतात. **राजे-प्रजे**—राजेरजवाडे. प्रजे याची उपपत्ति ज्याच्या पदरीं कांही प्रजा किंवा रयत आहे असे सरदार किंवा जहागिरदार अशी लावावी. **झाडें लावून इत्यादि**—झाडें रुजून त्याला फळें येतील इतका काळपर्यंत अनंतपूराला वेढा देऊन बसलें तरी तें त्यांच्या हातीं आलें नाहीं व शेवटीं त्यांना उठून जावें लागलें. **भिवा अर्जुनासारखे**—भीमा अर्जुनासारखे. **वेळ पडली**—वक्त गुदरला, प्रसंग पडला, संकट आलें.

मातलें अनंतपूर ॥ कुठे वडील आमचे गेले हुते माघार ॥ ते पळून गेले म्हणून हंसतात सार ॥ त्यांच्या वंशीं जन्मून राज्य करूं काय ह्मोर ॥ माझ्या उजव्या बाजूचा मानकरी होशील तर ॥ ह्या अनंतपूरचीं कापून आणा शिर ॥ दर वेशीला शीर बांधा शंभर शंभर ॥ १०

तवां आपासाहेबानें काय केला उत्तर ॥ जर घेईन अनंतपूर काय देणार ॥ राजाची जात बैलाची कळलें नाहीं ह्मोर ॥ फटकरूनि राजाच्या मुखीं आला उत्तर ॥ जर घेशील अनंतपूर सांगतो खर ॥ माझ्या पोटची कन्या करीन तुझी नार ॥ माझा खांसा जांवाई घेईन मांडीवर ॥ हें अर्धें राज्य तुझें हवालीं सार ॥ तवां आपासाहेबानें काय केला उत्तर ॥ ह्याप्रमाणें बंद लिहून द्या करकर ॥ सातशें नायकवडी घाला साक्षी सार ॥ याप्रमाणें बंद लिहून दिला करकर ॥ केला मुजरा ह्याराजाला निघाला बाहीर ॥ तेव्हां म्हाराजानें स्पष्ट केला उत्तर ॥ घे दारूगोळा खर्ची संगे बरोबर ॥ घ्या पालख्या पिलवान हत्ती उंट सार ॥ व्हावें तें लष्कर न्यावें बरोबर ॥ तवां आपासाहेबानें काय केला उत्तर ॥ या करवीरचे मला लोक नका तिळभर ॥ मी फकस्त

माझ्या उजव्या बाजूस मानकरी होशील तर—माझ्या उजव्या हाताला बसणारा तूं मानकरी असशील तर. **बुरखी**—भुरकी झूल A cloth covering the body and head of a horse (मोल्स.) **तशी होती**—होती तशीच. **लहज**—धाव, लहर. मूळशब्द लहज (अरबी) त्याचा अर्थ a moment, an instant असा आहे. (मोल्स.) **गलीम मोरचा**—गनीमाचा मोरचा. **उजव्या बाजूचा मानकरी होशील तर**—तर म्ह. जर. लोके सांगतात कीं माझ्या वाडवडलांनी अनंतपुरावर स्वाऱ्या केल्या; पण तेथे त्यांची फजिती होऊन त्यांना दरवेळीं परत यावें लागलें, तो दुर्लौकिक मला धुऊन काढावयाचा आहे करितां जर तूं खरा माझ्या उजव्या हाताचा मानकरी म्हणवीत असशील तर तें काम तूं आतां करून दाखवावेस. **राजाची जात बैलाची कळलें नाही म्होर**—राजा निर्बुद्धच; आपण असलें अचाट काम सांगतो खरें पण त्याचा परिणाम काय होईल याचा त्याला तर्क झाला नाही. **फटकरुनी**—ताडकन. **बंद**—कागद, करार. **खर्ची**—

एकटा घेईन अनंतपूर ॥ पुनपायाचा प्रताप असावा मजवर ॥ केला मुजरा ह्यारांजाला उडीवला बोर ॥ आला आपल्या निपाणीला उलट माघार ॥ रघुनाथ देसाई होते सदरेवर ॥ त्याने नेऊन लखोटा टाकला वडीला ह्मोर ॥ रघुनाथ देसाई घेऊन लखोटा ह्मोर ॥ जेव्हां अनंतपूरची वोळ लागली ह्मोर ॥ फ़ट करून लखोटा टाकला धरणीवर ॥ धडधडा बडीवतो ऊर डोळयाला धार ॥ नको नको त्यांची निपाणी सोड त्याचें शाहार ॥ चल आपल्या खेड्यामधिं करूं रोजगार ॥ ह्या अनंतपूरची वाईट बाबा खबर ॥ तिथे गेल्याला कुणी नाही आला माघार ॥ तुझे आजेपणजे तिथे खपले सार ॥ ह्या अनंतपूरची वाईट बाबा खबर ॥ नको जाऊं अनंतपूरा फिरा माघार ॥ ११

वेणूबाई माता होती खोलीच्या दार ॥ नको जाऊस माझ्या मुला आनंतपुर ॥ ह्या अनंतपूरची वाईट बाबा खबर ॥ तिथें गेल्याला कुणी नाही आला माघार ॥ मुखांत घालितीं मुख गाई गहिंवार ॥ तोंडावरनें फिरविते हात पुसते पदर ॥ पंचामृताची धार पाजून आजवर ॥ माझें व्यरथरे बाबा झालें सार ॥ ह्या अनंतपुरासाठीं झालास उपवर ॥ तुझी सुरतरे सुरत बघूं कुठें आतां ह्मोर ॥ म्या केला रजाचा गज लहानाचा थोर ॥ म्यां डोळयाचे दिवे केले आजवर ॥ म्या केले हाताचे पाळणे तळहातावर ॥ ह्या आपासारखा धनी कुणी नाही होणार ॥ गोरगरीब रडती रडती लहानथोर ॥ झारपोर रडती रडती रैत लेंकर ॥ पागेंत घोडीं हिंसती चौकडे सार ॥ गाय गोठणा आरडती घरीं वांसर ॥ हे शिकारखाने कुत्री रडती सार ॥ राधाबाई त्याची अस्तुरी खोलीच्या दार ॥ अरे थुः थुः गांड्र काय रडतां सार ॥ शूर मर्दाच्या जन्माला वंशीं करावी तलवार ॥ नव्हे

पैका. पिलवान—महात, पील—हत्ती. व्हावे ते—हवे ते. पुन्हा पायाचा प्रताप इ.—पायाची कृपा किंवा आशीर्वाद. वोळ—अनंत पुरासंबधीचा मजकूर. या अनंतपुरासाठी झालास उपवर—उपवर—थोर. आई म्हणते या अनंतपुरावर स्वारी नेऊन तेथे अखेर मरण्यासाठीच का बाबा मी तुला लहानाचा मोठा केला ? म्यां डोळ्याचे दिवे केले इत्यादी—जुन्या स्त्रियांच्या ओव्यांतहि हीच उपमा बरोबर याच शब्दांनी आली आहे. उदाहरणार्थ, “ माऊलीचे कष्ट कुठें रे फेडूं देवा। तळ हाताचा पाळणा नेत्राचा केला दिवा!”

साळी कोष्टयाचा बसून राहशील घर ॥ जर सोडून अनंतपूर फिराल माघार ॥ तर तोंड घेऊन जावें देशावर ॥ जर सोडून अनंतपूर फिराल माघार ॥ तुझ्या आईच्या लावशील हात निरीला झोर ॥ तेव्हा निपाणकराला अचेष्ट पडली वीर ॥ तेव्हां निपाणकराचे लाल डोळे तंबर ॥ पंचारती घेऊन आली सुंदर ॥ तिनें ओवाळीला भरतार जसा विश्वर ॥ फरफरा पाटाव फेडून टाकलीं झोर ॥ तिने फेक पांढरें नेसली धोतर ॥ फरफरा जोडवीं टाकलीं चहूंकडे चार ॥ फडफडा कांकणें फोडून केला चूर ॥ तडतडा डोरलें तोडून टाकलें वरचेवर ॥ फरफरां कुंकू पुसलें कपाळावर ॥ मी रांड जी रांड झाले आजवर ॥ तुम्ही येण्याच्या पावतर हाच अवतार ॥ वर्जिलें अन्न पाणी घेती सुटसाखर ॥ एक पै वजनाची किती होईल साखर ॥ कसा प्राण जीतजला त्याच्यावर ॥ महापतीव्रता मावली सत्यभामा थोर ॥ काय तुळस बोलत होती तिच्या बरोबर ॥ गेली तुळशीपाशीं एकच पायावर ॥ त्या तुळशीला करती नमस्कार ॥ माझे बाई देसाई जात्यात अनंतपूर ॥ तुह्मीं जावें पाठीवर होऊनि तयार ॥ मी ब्रींदावणापाशी येवून राहणार ॥ तेव्हा निपाणकरानें मनिं केला विचार ॥ माझे

रैत—रयत. **हिंसती**—हिंसती. **नव्हे साळी कोळ्याचा इ.**—अरे रडतां काय तुम्ही कांही साळी कोष्टयांच्या वंशांत जन्मला आहां? जो क्षत्रिय आहे त्याने हसतच लढाईस जाऊन तरवार म्हणजे पराक्रम केला पाहिजे. साळी कोष्टी इ. बिनलढाऊ वंशांतले जे असतील त्यांनी वाटलें तर घरीं बसून रहावें. **तोंड घेऊन जावें देशावर**—तोंड काळें करून परंगदा व्हावें. **अचेष्ट पडली वीर**—भयंकर इर्षा उत्पन्न झाली. **तंबर**—उन्मत्त, धुंद. (महाराष्ट्र शब्द कोश) **पाटाव**—उंची नेसतें वस्त्र. **डोरलें**—डोरलीच्या फळासारखा दागिना. डोरलें ही सुपारी एवढ्या पिवळ्या धमक, रान वांग्याची एक जात आहे. **मी रांड झालें आजवर इ.**—तुह्मी अनंतपुराच्या स्वारविरून परत येईपर्यंत मी विधवाच झालें आहे असें समजतें व म्हणून सर्व सौभाग्यालंकारही मी फेकून दिले आहेत. **आजवर**—आजपासून. **जितजला**—जगविला. **तुळस बोलत होती तिच्याबरोबर**—सत्यभामा ही महापतिव्रता होती व तुळस तिच्याबरोबर प्रत्यक्ष बोलत असे.

बाळपणाचे आरब आहेंत मैतर ॥ त्या अरबस्थानाला ल्याहावे पतर ॥ मोठी वेळ पडली बाबा माझ्यावर ॥ बारा हजार आरब बांधून या कंबर ॥ ह्या आरबस्तानाला पोचलें पतर ॥ काय वेळ पडली आमच्या मैत्रावर ॥ बारा हजार आरब बांधली कंबर ॥ रातोरात येऊन पोंचले निपाणी शाहर ॥ बरें म्यान रुप्याचें कट बंदुकिला सार ॥ बंदुकींत भरले बार झाले तयार ॥ जोडजामग्या जळती निघाले लष्कर ॥ रातोरात येवून पोंचले निपाणी शाहार ॥ या निपाणकराला येवून केले मुजर ॥ त्याने दुध भाताचे ताट ठेवलें म्होर ॥ सकळांनी घातला हात क्रिया बरोबर ॥ कुणी करशीला होगड्या फांदाफितूर ॥ त्यांनी शिवलाजी पाह्य बेलभंडार ॥ मी गुळाचा गणेश गादीवर ॥ ह्या निपाणीमधि झडा तुमचा कारभार ॥ १३

बींदावण—वृंदावन. **माझे बाळपणाचे अरब आहेत. मैतर इ.** – निपाणकराच्या सैन्यांत अरबांची विशेष भरती होती हें ऐतिहासिक हकीकतींत सांगितलें आहेच. अरब लोक हे अत्यंत कडवे असल्यामुळे देशी लष्करांतून त्यांचा मुद्दाम भरणा करीत. फार काय मराठे सरदार स्वतःच्या शरीरसंरक्षकांची जी बॉडीगार्ड्सची खास तुकडी नेमीत ती अरबांचीच असे!! **अरबस्थान**—खरें अरबस्थान नव्हे तर अरब लोकांची जमात रहात असे ती जागा. **बरें**—उत्तम; उंची. **कट**—A ring around a matchlock securing the barrel in its socket. **जामगी**—The Match of a gun. बंदुकीचा तोडा; वात किंवा काकडा. **क्रिया**—शपथ. सर्वांनी अन्नावर हात ठेऊन शपथ घेतली. **कुणी करशील होगड्या फांदफितूर**—कुणी करशील हो गड्यांनो फंदफितूर. अरे आतां कुणी फंदफितूर कराल तर बघा. कारण तुम्ही बेलभंडार उचलून शपथ घेतली आहे. शपथ घेण्याचें वेळी बेल व हळद (भंडार) उचलून हातांत धरण्याची पद्धत असे. **मी गुळाचा गणेश इत्यादि**—मी नावांचा गुळाचा गणपती असें समजा. क्रिया कर्तृत्व सारें तुमचें. सारा काराभार निपाणीमध्यें तुमच्या जिवावर चालला, तर आतां यावेळीं मदत करून तें आपलें माहात्म्य सिद्ध करा.

बाईसाहेबाला पोंचलीं खबर ॥ ह्या कुणबीणींनें सांगितला मजकूर ॥ हे खाशाचे कोणी आल्यात भैतर ॥ हे सारे आहेत अरब एकशिणेचे सार ॥ त्या लोकांशीं बलावा हितवर ॥ तवां आरब चालून गेले सार ॥ तुम्ही परदेशाला सर्व लोक जाणार ॥ त्या मुलुखाची काय आणतां पर ॥ कोण म्हणतो साडी चोळी आणू तयार ॥ कोण म्हणतो सोनें रुपें मोहरा सार ॥ आग लावा सोनें रुपें जळो तें सार ॥ मज कुंकू संभाळून आणा माघार ॥ बारा हजार आरब होऊन जाऊं ठार ॥ तेव्हां बाई तुमच्या खाशाला देव ईश्वर ॥ धीन धीन बोलले हरहर ॥ ह्या लखनापुरावर ठोकले डेरे ॥ ह्या आंखली मांजरीचा धरला सुमार ॥ गेले कृष्णा वलडून पलीकडे पार ॥ गेले वस्ती करीत चालले झोर झोर ॥ तीन कोसांवर-तें उरलें अनंतपूर ॥ तेव्हां आपासाहेबाने काय केला विचार ॥ कसें निजल्यावर चालून जावे बर ॥ हे अनंतपुरचे लोक करितों हुशार ॥ हे अरबदादा तुह्मी ऐकावें सार ॥ मी देसायाचा वीर आलों तुह्मांवर ॥ तुम्ही अनंतपूरचे लोक राहावें तयार ॥ जर लढायाची मर्जी असेल तर ॥ तुम्हीं बांधून कंबर राहावें हुशार ॥ जर लढायाची मर्जी नसेल तर ॥ सल्याने सोडून किल्ला निघा बाहेर ॥ मी देसायाचा वीर आलों तुम्हांवर ॥ जर नसेल दारू गोळी खर्ची तर ॥ मला लिहून पाठवा देईन धाडून बरोबर'॥ केला हुकूम जासूदाला पळा लौकर ॥ गेले जासुद धांवून पहा कचेरी झोर ॥ तिथ रावसाहेब नाना दोघे बंधु बरोबर ॥ तिथ भरली होती कचेरी लहानथोर ॥ त्यांनी पाहिला लखोटा वाचून सार ॥ खदखदां हांसू लागले लहान थोर ॥ हा कुठला निपाणकर कालचा पोर ॥ ओंठ पिळले तर निघेल दुधाची धार ॥ तुझ्या बापाला जाऊन विचार जा खबर ॥ तुझे आजे पणजे पडल्यात माळावर ॥ छे उगाच जा गरिबा फिरून माघार ॥

पर—विशेष वस्तू. त्या मुलुखांत होणारी विशेष नामांकित वस्तू. कसें निजल्यावर चालून जावें—शूर पुरुष शत्रूस सावध करून त्यावर हल्ला चढवितात. खरा शिकारीहि वाघाला सावध करून मग त्याला गोळी घालतो. रावसाहेब आणि नाना—(?) पडल्यात माळावर—तुझे आजे पणजे अनंतपूरच्या माळावर पूर्वींच लढा-

नाहीं तर हाडे पडतील देशावर ।। ह्या प्रमाणें त्यानें खालीं लिहिला उत्तर ।। दिली थोबाडींत जासुदाला रडत माघार ॥ धनी आपासाब सरदार नामी सरदार ॥ रडत जासूद सांगू लागला खबर ॥ जसा भुजंग फुगला नाग जसा फरार ।। तडाडाडां उडाले बंद आंगराखे सार ॥ तुम्ही आरब दादा पाहा कसा मजकूर ॥ ह्या लुच्चांनी कसा लिवला उत्तर ।। मी आपा-साहेब सरदार रणांत रणशूर ।। तीन घटकेमाधिं घेईन आनंतपूर ॥ १४

धीन धीन बोलले बोलले हरहर ।। त्याची जनमल्याली वेळ नक्षतर ।। हें कुठले भुंगे दगड गप झालीं सार ॥ गरांरारां वेढा दिला भोंवत्या भावर ॥ हे आनंतपूरचे लोक होते हुशार ॥ झिरझिऱ्या मारिती गोळ्या अंतनापार ॥ अरबानीं झाडिली फैर गोळी दरार ॥ जशी खापरामाधिं लाह्यी त्याला उशीर ॥ आरबांनीं सोडिल्या तऱ्हा कीं बाणचक्र ॥ कैकांचीं उडालीं शिरें वरच्यावर ॥ झाली बाणाची गर्दी उडालीं चक्र ॥ घेतलें भाजभाजुनी केले घाबरे ॥ कडदोऱ्याचे एक सोडीना पोर ॥ चरचरा कापीले गळे नि भरले हार ॥ हा करवीरच्या वाटेनें निघाले तयार ॥ जर वेशीला शीर बांधा शंभरशंभर ॥ तीन घटकेमधिं सर केलें अनंतपूर ॥ ही गणता नाही मुरद्याला गलीम सार ॥ त्यावरनें हिंडती कावळे घार ॥ सडघाण झाले मुडद्याची रक्ताचा पूर ॥ जसे वगळी वाहून जात असे दरार ॥ हा भगवा झेंडा चढला बुरुजावर ।।

ईत मुडदे होऊन पडलें त्याची आठवण कर. **झिरझिऱ्या**—सूंसूं; झिर-झिर–पावसाच्या झडी सारख्या. **जशी खापरामधिं लह्यी त्याला उशीर**—लाह्या करताना खापरांत लाह्या त्याही कमी वेगानें तडातड उडत असतील इतक्या जोरानें अरबांच्या गोळ्या उडूं लागल्या. **तऱ्हा की बाण चक्र**—(?) चक्राकार फिरणारे तऱ्हेदार म्हणजे विशेष बनावटीचे आगीचे बाण. **कडदोऱ्याचे एक सोडीना पोर**—लंगोटी न नेसणारी, नुसताच कडदोरा घालणारीं लहान पोरेंसुद्धा मारून टाकलीं. **हार**—हारे. मोठ्या टोपल्या. **जरवेशीला**—दरवेशीला असें पाहिजे. **वगळी**—वघळी–ओघळी. **दरार**–पऱ्हार असें पाहिजे. पऱ्हा–ओढा. पाणलोंढा. ज्याप्रमाणे एखादा ओढा वेगानें वाहुं लागावा त्याप्रमाणे भगवा झेंड्याचा फरारा

हें द्रव्य भरलें बारा गाडे अंतनापार ।। हें भगवें निशाण लावलें गाड्यावर ।। धनी बसला घोड्यावर स्वार ।। दोन्ही बाजूनें अबदागिऱ्या देव अवतार ।। जन लोक म्हणती कुठला परमेश्वर ।। म्हणूनच घेतलें यानें अनंतपूर ।। द्रव्याचा कीं ढीग घातला राजा थोर ।। तुम्ही वळखा आपलें अनंतपूर ।। तुझी वाचून पाहा खोटें कीं खरें ।। कुठे हाय माझी सुंदरा आणा बाहीर ।। मी जायाचा लौकर नका उशीर ।। मुलगीला शिकवितात तऱ्हा सोदे सार ।। तुझी राजवंशाला जन्मून व्यर्थ सार ।। तुज नशीब जी नशीब फुटलें सार ।। उद्यां तुझांला कोण येवुन करतील मुजर ।। तीन रुपडीचा चाकर तुमचे भरतार ।। बरोबरीचे राजे प्रजे सोडून सार ।। तुझी देसायाची होऊनी गेलां नार ।। मुलगीनें शब्द ऐकतां बडविती ऊर ।। मी जन्मून आलों त्याच वेळेवर ।। माझ्या बाईने नाही घातली वार ।। बाई सुरतीनें सांगू कुठवर ।। त्याचें नाक नकटें दिसतेंय काळे भोर ।। बाई प्रत्यक्ष कोरवी जसा वद्दर ।। माझ्या बापाला जाऊन सांगा खबर ।। जड झाल्या कन्या तुम्हांला सांगतों थोर ।। मला घोंगड्यांत घालून मोट बांधा करकर ।। माझ्या वजनाला धोंडे घाला दोन चार ।। ही पंचगंगा भरून जाती भरपूर ।। त्यामधिं टाकून या माघार ।। तेव्हां महाराजाला जाऊन पोंचली खबर ।। याया निपाणकर तुम्ही बाहादर ।। मुलगीने

बुरुजावर उडूं लागला. हुबेहूब वर्णनाच्या दृष्टीनें हे दोन्ही चरण फारच सुंदर आहेत. "जसें वघळीं वाहून जात असें पऱ्हा र। हा भगवा झेंडा चढला बुरुजावर ।।" **कुठला परमेश्वर**—दुसरा परमेश्वर कोणचा ? हाच परमेश्वर म्हणून हा अनंतपूर जिंकू शकला. **राजा थोर**—कोल्हापूरकर छत्रपतींपुढे. **सुंदरा**—राजाची मुलगी, छत्रपतीची देऊं केलेली मुलगी. **सोदे**—लबाड, **मी जन्मून आले—त्याच वेळेवर माझ्या बाईने नाही घातली वार**—मी जन्मल्याबरोबर आईने किंवा सुईणीने मला वारेबरोबरच पुरून टाकून तेव्हांच जगांतून नाहिसें कां केलें नाही ? **सुरत**—रूप, स्वरूप. **त्याचे नाक नकटें दिसतेंच काळेभोर**—नाक नाहीच, इतकें नकटे कीं फक्त त्याची दोन काळीं काळीं भोकें तेवढीं दिसतात.

घेतला हट्ट अनिवार ॥ ह्या मुलगीचे टाकून द्यावे पतर ॥ ह्या निपाणी-सारखे देतो दोनचार शाहार ॥ जर मनांत असेल तर माग माझें करवीर ॥ मी खचीत देतों ना बघत मागे झोर ॥ असा शब्द ऐकतां निपाणकर बाहेर ॥ आला क्रोध मनामधि लाल डोळे तंबर ॥ तूं राजा आहेस कीं बैल कळेना बर ॥ खालीं ठेवितो कागद मूत द्यावर ॥ तूं मूतशील राजा ह्यांत कांही नाही घोर ॥ जर मुतलासि तर नाही सोडीत माझी नार ॥ आज आठव्या दिवशीं खचीत मी नेणार ॥ आता संभाळ राजा आईक खबरदार ॥ नाही मुजरा म्हाराजाला केला माघार ॥ फरारारा घोडा उडविला कुमाईत बोर ॥ गेला आपल्या निपाणीला उलट माघार ॥ १५

मग बसला सदरेवर जाऊन खिणभर ॥ खुशाल झाले सोष्ट सारें घरदार ॥ हे म्हारेपोरे येवून करती मुजर ॥ रघुनाथ म्हणतो आला माझा पुतुर ॥ त्याचे वडील गेले होते आदले सार ॥ प्रत्यक्ष माझ्या वंशाला रामचंद्र ॥ वेणूबाई माता बाळ पोटाशीं धर ॥ रणशूर माझा पुतूर केली तलवार ॥ अलाबला घेती जाऊन पोटशीं पुत्र ॥ मग बसला बाजूवर जरा खिणबर ॥ हांक मारा वैराळाला बलाव लौकर ॥ बाईस भरला चुडा दिसे गुलजार ॥ पायपंजाणे फोलारे वाजती सार ॥ जवहार पुतळ्याची माळ गळाभर ॥ लसण्या ठुशा कंठा गळीं भरपूर ॥ कानीं कुंडलें कीं भोकरें कीं नक्षी-

---

पतर—पत्रिका; ह्या मुलीची लग्नपत्रिका त्याज्य ठरवा म्हणजे या मुलीचा नाद सोडा. **तूं राजा आहेस कीं बैल इत्यादि**—अरे तूं राजा आहेस कीं बैल आहेस, दिलेला शब्द मोडतोस? बैल असलास तर तूंच लिहून दिलेल्या करारावर मुतायला कमी करणार नाहीस. पण तसा मुतलास म्हणजे करार मोडलास, तरी सुद्धां तुझी मुलगी मी नेल्याशिवाय सोडणार नाही. **सोष्ट**—(?) स्वस्थ तर नव्हे? **आदले सार**—(?). **अलाबला घेणें**—दुःख किंवा इडापिडा टाळावी म्हणून दृष्ट काढतात ती. **वैराळाला**—कासाराला. आपल्या बायकोस चुडा भरण्याकरिता; कारण अनंतपुर जिंकून येईपर्यंत तिनें वैधव्याची दीक्षा घेतली होती. **पायपंजानें**—पाय पैंजणें. **फोलार**—मूळ शब्द-(पु.) स्त्रियांच्या पायाच्या बोटांतील एक दागिना (सरस्वती कोश).

दार ॥ कानांत घातले काप वरते मोर ॥ दोन द्राक्षाचे वेल बुगडीवर ॥ सात सुर्जाची नथ ठपकेदार ॥ भांग भरला मोत्याने दिसे गुलजार ॥ केवडाराकडी कीं माथ्यावर ॥ सूर्याची शोभती कोर चंद्रकोर ॥ नागबंद छंद पाठीवर ॥ तीन दिवस कमी होते महिन्यामध्यें सार ॥ तदपर्यंत बाई एकच पाया वर ॥ शीर आंखडली पायाची वरच्यावर ॥ कुर्लाबणीनें चोळता बेजार ॥ पंच अमृताचें ताट वाढलें थोर ॥ उभयतांनी घातला हात ह्मणून हरहर ॥ मग बसले सदरेवर आपा सरदार ॥ वडलाला सांगतो गोष्टी नानापर ॥ ह्या निपाणीमधि तुह्मीं करा संसार ॥ मी खचीत उद्या जायचा निघून करवीर ॥ रघुनाथ म्हणतो मुला जरा दम धर ॥ मी वडीलपणानें लिहितों राजाला पतर ॥ तुम्ही राजे महाराज थोर देव अवतार ॥ आम्ही पायाचे चाकर तुमचीं लेकर ॥ ही आनंतपूरची जाहीर दुनयावर ॥ त्या विघ्नामधिं माझें घातलें पोर ॥ जर मरून तिकडे होऊन जाईल ठार ॥ ह्या डोळ्यानें मी कस बघावें माघार ॥ जर जाईल त्याची अबरू गाडाभर ॥ जर जाईल आपली अब्रू नाहीं मिळणार ॥ हें थुकल्यालें तांबूल घेतां वर ॥ ही अकल नव्हे राजाची गोष्ट बरोबर ॥ जर लढायाचीच मर्जी असेल तर ॥ यापरमान मजला खालीं ल्याहावें उत्तर ॥ जर संतोषाने असेल द्यायाची नार ॥ ह्यापरमान मला कळवावा मजकूर ॥ झाला

भोंकर—स्त्रियांचा एक दागिना (सर. को०) सरजा—(फा. सराचाह्द) पु. बायकांच्या नथेला मुख्य मोत्यांच्या वर गाड्याला जीं लांबोडीं मोतीं लावलेलीं असतात तीं समुच्चयानें. अशीं मोतीं असलेली नथ ती सरजेदार (सर. कोश). छंद—मनगटांत किंवा पायांत घालतात तें सोन्याचें किंवा चांदीचें कांही नक्षीचें वलय (सर. को.). एकच पायावर—निपाणकराची बायको तो परत येईपर्यंत तुळशीपुढें एका पायावर उभें राहून तप करीत होती. ही आनंतपूरची जाहीर दुनयावर इ.—अनंतपूरची भुताटकी दुनियाभर प्रसिद्ध असतां तेथें माझ्या मुलांला तुम्ही मनांत कपट धरून पाठविलें. हेतु हा कीं, जर तो तिकडे परस्पर ठार झाला, तर त्याची गाडाभर अब्रू (मोठी कीर्ति) आपोआपच नष्ट होईल. उलट तो अनंतपूर जिंकून परत आला तर मात्र माझी राजाची अब्रू जाईल. थुकल्यालें तांबूल वर घेणें—दिलेलें वचन परत घेणें.

हुकुम जासूदाला पळ लौकर ॥ नेऊन लखोटा द्यावा राजा झोर ॥ गेला जासूद करवीराला पोंचे लौकर ॥ तिथे भरली होती कचेरी लुच्चे सार ॥ त्यांनी पाहिला लखोटा हंसते सार ॥ काय बिसाद देसायाची मारुं खेटर ॥ येतो लढाय ह्मणून स्पष्ट ल्याहावें उत्तर ॥ लुच्चांचे ऐकून राजेसर ॥ ह्यापरमान त्यानें खालीं लिवला उत्तर ॥ नेम कागलावर थळ नेमिला झोर ॥ झाला हुकूम महाराजाचा झडती नगार ॥ मुहूर्तानें ठोकिले डेरे उजळाईवर ॥ आली स्वारी महाराजाची हलसवड्यावर ॥ आला निपाणकर रणशूर कोगनोळीवर ॥ आली महाराजाची स्वारी कागलावर ॥ दुधगंगा उतरून आले आपा सरदार ॥ महाराज उभे राहिले डेऱ्या झोर ॥ आले उजव्या बाजूवर निपाणकर ॥ गांवो गांवचे पाटील कुलकर्णी सांगती सार ॥ तुम्ही राजा संगे नका बांधू कंबर॥ तुम्ही सोंदे लुच्चे काय सांगता सार ॥ बघूं बिशाद या राजाचा दम कुठवर ॥ केली ताकीद त्या आर्बांला खबरदार ॥ आधीं गोळा मारूं नका गादीवर ॥ आधीं महाराजाचे फार सुटूं द्यात बार ॥ किती लोक माझे पडले पाहूं बर ॥ ज्या वेळेला तुम्हांवर फिरवीन नदर ॥ त्या वेळेला तुम्ही होऊन यावें तयार ॥ हीं आधींच कोलापुरे ढबाखोर ॥ झिराझिऱ्या मारिती गोळ्या अंतनापार ॥ झाला हुकूम तोफखान्याला उडे दरार ॥ तेव्हां निपाणकराचे लोक पडले चार ॥ तवां निपाणकारानें जरा फिरविली नदर ॥ आरबांनी झाडिली फैर गोळी दरार ॥ तवां महाराजांचे लोक पडले शंभर ॥ तवां म्हणतो निपाणकर आपा सरदार ॥ ही गरिब मारून काय मला मिळणार ॥ फरारारा घोडा उडविला कुमाईत बोर ॥ ती तोफ आनंदी टाप दिली त्यावर ॥ दरारारा तोफ त्यांनी

हसते सार—सारी कचेरी हसूं लागली. राजेसर—राजेश्री, छत्रपति. नेम—नेमिला. हीं आधीच कोलापुरे ढबाखोर—ढब, गर्व, दिमाख, ढबाखोर—गर्विष्ठ. निपाणकरानें आरबांना असा हुकूम दिला कीं, आधी कोल्हापुरीं सैन्यांतून गोळी वाजूं दे. त्यांचे काय दिवे लागतात तें पाहूं. मग आपण हल्ला करूं. त्याप्रमाणें झालें. प्रथम कोल्हापुरकरांनी गोळ्यांचा मार धरला त्यानें निपाणकरांचे अवघे चार लोक मेले. नंतर निपाणकरांच्या आरबांनी उलट फैर झाडली, तेव्हां शत्रूचे शंभर मुडदे झाले. आनंदी—तोफेचें नांव.

वोढिली होती बाहीर ॥ तवां करवीरच्या लोकांचा फुटला बाजार ॥ एकएकानें तोंडांत गवत धरिलें मुठमुठभर ॥ आह्मीं गाईचीं वांसरें तुमची लेंकर ॥ जिती वोढयापावतर पळतां जीव बेजार ॥ गपागप बसविले भाले पाठि पेंढार ॥ शाहारांत शिरलें पेंढार गर्दी झाली फार ॥ कुणी वाणी बामणी म्हणेनात चटसार ॥ शहरांत लाविल्या आगी जळती घर ॥ १६

पायउतार झाला राजा पळतो चोर ॥ त्याने यळगुडाचा धरला सुमार ॥ गेला उसाच्या फडांत घुसला झोर ॥ उसाची झाली कुसकांटे आंगभर ॥ तिथें गोविंद पाटील भला होता बाहादर ॥ आला देवाची पालखी घेऊन बाहीर ॥ पालखींत राजा घालुन परमेसुर ॥ रातोरात त्यानें पोंचविला करवीर ॥ राण्या बाया घेऊन पाणी झारीभर ॥ मुखास लाविली झारी नेहून म्होर ॥ त्या पाण्यांत म्हणतो आलालाला निपाणकर ॥ थंडताप आली राजाला आंगीं फेपर ॥ राण्याबाया हात जोडून आल्या म्होर ॥ जर नात्यानें माझा बंधू होशील तर ॥ चुडादान राजा द्यावा भोळा शंकर ॥ तुम्ही नात्यानें माझ्या बहिणी होशील तर ॥ कुठे आहे माझी सुंदरा वोढा बाहिर ॥ दराराराा मुलगी ओढून बाहीर उभा कर ॥ गराराराा त्याने आरब बसविले सार ॥ नाही बोवले मांडव जमिनीवर ॥ त्यानें उगाच रेघा ओढिल्या भिंतीवर ॥ नाही भट बिरामण कुणी बलाविला झोर ॥ भटास विचारतां मोतुर लबाड सार ॥ ती आपली रांड कां करतो बोवल्यावर ॥ सारे लोक उभे केले भोवता भोरे ॥ दिले एकेकाला तांदुळ मुठमुठ भर ॥ सोभेदान कुणाला येईना अक्षर ॥ कोणी म्हणतात दीन दीन हरहर सार ॥ दिले तांदुळ टाकून वर कीं झाले नवर ॥ मी जन्मून आलों त्याच वेळेवर ॥ आहे ब्रह्माचा म्होतूर माझे बरोबर ॥ नाहीं गेला मारुतीला वरात बाहीर ॥

वाणी बामणी म्हणेनात—कोणी वाणी बामन म्हणेनात असें मुळांत असलें पाहिजे. म्हणजे पेंढारी गांवांत शिरले; त्यांनी लढाऊ-बिनलढाऊ न पाहतां सर्वांची कत्तल केली. **चोर**—चोरासारखा लपून-छपून. **त्या पाण्यांत म्हणतो इ.**—राजाला प्यायच्या पाण्यांतहि निपाणकर दिसूं लागला इतकी धास्ती बसली. **आल्या झोर**—राण्या राजाला जीवदान द्यावें म्हणून निपाणकरांकडे आल्या. **मोतुर**—मुहूर्त.

नाहीं सोडलें कांकण उचलली नार ॥ नार घेऊन घोड्यावर उडीवला बोर ॥ निपाणीला परत गेला माघार ॥ हुता परभारी किल्ला त्यांत ठेविली सुंदर ॥ दिला कुणबिणीचा पाहारा भोरत्याभोर ॥ काय दिवस राज्य केलें तिच्या बरोबर ॥ एक दिस तिला फावला वाव जरा तिळभर ॥ तिनें घेतली हिरकणी हरपली नार ॥ खदखदां हासतो बसून निपाणकर ॥ माझी होती तेवढी ईर केली म्यां खर ॥ जर मरून गेली माझी झाटमार ॥ पतिव्रता माझी सुंदरा आहे सुकुमार ॥ पुढे झालें म्हातारपण झोर झोर ॥ थंडताप आली खाशाला काटा आंगावर ॥ त्यानें बोलाविले मानकरी शिपाई सार ॥ माझ्या पोटीं नाही बाबा कुणी वेलविस्तार ॥ तुम्हा पालनवाला कुणी नाही माघार ॥ तुम्ही जावा देशावर कीं मुलुखावर ॥ खरें महाराजाचे होऊं नका चाकर ॥ शालेचापी माझा वीर बलावा लौकर ॥ त्याला सांगण्याचा हाय माझा मजकूर ॥ माझे सारखा सरदार नाही होणार ॥ या शिपायाची नाहीं राह्याची ईर ॥ आतां झाली इंग्रजी कीं अंमलदार ॥ पुढे होतील मामलतदार फौजदार ॥ त्या शिपायाच्या खांद्यावर देतील पोर ॥ पुढें कारकून अवघे होतील सार ॥ या शिपायाला म्हणतील धू धोतर ॥ पुढे जातील गांवाला घोडे धर ॥ त्या शिपायाची नाही राह्याची ईर ॥ हगत्याला अस्तोरी हंसेल म्होर ॥ १७

शालेचापी येवून उभा राहिला म्होर ॥ त्याला सांगतो मजकूर मनांतले सार ॥ जीव जाईना तो म्होरे येतो माघार ॥ माझी आस्ता राहिली येवढी पुरीव माघार ॥ या दुनयांमाधिं हिंडलों जसा जोखमार ॥ कुणी गांडू भडवा

सोभेदान—शुभमंगल सावधानचा अपभ्रंश. परभारी—निपाणकरानें दुसरा किल्ला बांधला होता त्यांत. शालेचापी—(?). पुढें होतील मामलतदार फौजदार—यापुढें इंग्रजी अमलांत शिपाईगिरीचा नष्टांश होईल. मामलेदार हा मुलकी अधिकारी पण तोच फौजदारांचे अधिकार गाजवूं लागेल. शिपायांना खांद्यावर बंदुकांऐवजीं वरिष्ठांचीं पोरें घ्यावीं लागतील. शिपायांना धोतरं बडवावीं लागतील आणि वरिष्ठांचीं घोडीं हातांत धरून नेण्याचें मोतद्दाराचें काम त्यांना करावें लागेल. शिपाईपेशाची पुढील काळांत कांही ईर म्हणजे अब्रू राहणार नाही. शिपायाला घरच्या बायकाही हसतील. हगत्याला—हंग त्याला जोखमार—मूळ शब्द जोख माप असा आहे. त्याचा अर्थ तोलावयाचें

आला नाही माझ्यावर ॥ हा किल्ला बांधून व्यरथ झालें सार ॥ किल्ल्याचें झालें नाही लगीन लागला घोर ॥ ही अेवढी आस्ता पुरीव माझे माघार ॥ जर मिठाचा चाकर होईन तर ॥ पांच गोळे तरी मारीन किल्ल्यावर ॥ तुम्ही सोडा महाराज प्राण नका करूं घोर ॥ पांच गोळे तरी मारीन किल्ल्यावर ॥ किल्ल्याचें कराशिल लगीन वरनें बघीन तवां जाईल मनचा घोर ॥ घडधडला नरड्यांत गेला ईश्वर ॥ या निपाणीमधि गडद पडला अंधार ॥ भले दिवसमास होयाचे होणार ॥ गेली इंग्रजाला खबर जलदी फार ॥ चार कुंपीन नेमून आले निपाणीवर ॥ आरबांनीं केली तयारी बांधून कंबर ॥ चपरणी तोफा वोढिल्या बुरुजावर ॥ तीन दिवस गोळा उडाला भाडिमार ॥ एक किंवडा साहेब ठार निपाणीवर ॥ मग सोडून दिला किल्ला निघाले बाहीर ॥ त्याच्या कळवातीणीचा पोर होता रणशूर ॥ जरिपटका घेउन उडाला वरच्यावर ॥ सातरेवण्या खंदक उडून झाला पार ॥ कुण्या देशासि गेला नाही आल आजवर ॥ तो इंग्रजाला जरब आहे तो फार ॥ आझून निपाणी शाबूत हाय तें शाहार ॥ जवां गावेल जरीचा पटका तवा गेली म्हणतील अवघी सार ॥

एक वजन म्हणून जोखमार याचा अर्थ अब्रूनें-वजनदारीनें असा घ्यावा. (२) ज्याच्या तुलनेने पदार्थविशेषाचें वजन तराजूच्या साधनानें ठरविण्यांत येतें तो धोंडा (सर. कोश). **किल्ल्याचें नाहीं लागलें लगीन**— किल्ला लढला नाहीं तोंपर्यंत त्याचें लग्न लागलें असा समजत नसत. वेढा देणाऱ्या सैन्यानें त्यावर गोळे टाकले व आंतून बाहेरच्या सैन्यावर गोळे पडले म्हणजे खऱ्या अक्षता पडल्या, व किल्ल्याचें विधिपूर्वक लग्न लागलें ही कल्पना. निपाणकरानें जो नवा मोठा किल्ला बांधावयास सुरुवात केली होती त्यासंबंधीं हें वर्णन आहे. **माझे माघार**—माझ्यामागून; मी मेल्यावर. **घोर**—चिंता. **वरने**—आकाशांतून, स्वर्गांतून. **धडधडला नरड्यांत गेला ईश्वर**—घोर लागून मेला. निपाणकराच्या एकंदर अचाट चरित्राला "धडधडला नरड्यांत" हें वर्णन पूर्ण अनुरूपच आहे ! ! **चपरणी**—(?) **किंवडा**—(?) **जवा गावेल जरीपटका तवा गेली म्हणतील अवघे सार**—निपाणकरांचा लेकवळा जरीपटक्याचें निशाण घेऊन नाहींसा झाला. तो लेकवळा व तें निशाण अद्याप इंग्रजांना हस्तगत झाले

आरबांनी निघाले बाहिर आले सार ॥ नाही इंग्रज आडवे झाले त्याला तिळभर ॥ हाय इसानी चाकर जाऊं दे सार ॥ गेले हुपरीवर ते तळ दिला सार ॥ बिन धन्याच्या वांचून परदेशी सार ॥ गेली देशावर ते उडून जशीं पांखर ॥ शूर मर्दाचा पवाडा बोल धडधडा ऐक शाहीर ॥ गुरू नागनरूचें कवन सोंन्याची वोवण ऐक शास्तर ॥ भर जरींचें निशाण ऐका कलगी डफावर ॥ बाबाजी गातो पवाडा करूनि निवाडा द्या पानाचा विडा जाऊंद्या पिडा लौकर ॥ तुम्ही दैव बसला काशीकरा चौकाशी जाउदे झोर ॥ १८

नाही आणि तें हस्तगत झाल्याखेरीज निपाणीचा किल्ला हरला असें कदापि म्हणता यावयाचे नाही अशी सर्वसामान्य लोकांची अभिमानाची भोळी समजूत !! बिन धन्याच्या वाचून—बिन हा शब्द निरर्थक:असतो. ऐतिहासिक पत्रव्यवहारांतून असा वाक्प्रचार सर्वत्र आढळतो. उदाहरणार्थ, ‘ विनापारिपत्य केल्यावांचून मनास करमणार नाही. ’

डामाजी नाईकाचा पोवाडा

प्रस्तुत पोवाडा इतिहाससंशोधक श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांच्याकडून संशोधनार्थ आम्हास एक बाड मिळालें, त्यांत सांपडला. तो बालबोध लिपींत लिहिलेला होता. हाच पोवाडा आम्ही पूर्वी आपल्या ऐतिहासिक पोवाड्यांचा पाहिला भाग प्रसिद्ध केला त्या वेळीं दळवी यांच्या ‘ मराठी कुळांच्या इतिहासांत ’ वाचला होता. किंबहुना त्यांतील विषय महत्वाचा वाटल्यामुळे त्याचा अभ्यास करण्याचाहि प्रयत्न केला होता. पण एक तर पोवाडा त्रुटित व कमालीचा अशुद्ध छापलेला. यामुळे शब्दांची कितीहि तोडजोड केली किंवा मूळपाठ ठरविण्याकरिता कितीहि कल्पकता लढविली तरी समाधान होईना. गोंधळ्याच्या वाणीने झालेले अपभ्रंश, नकलाकाराच्या अक्कलहुषारीच्या चुका आणि त्रुटितपणा यामुळे कांही इलाज न चालून तो पोवाडा आम्ही तसाच ठेवून दिला. त्यानंतर अनेक वर्षांनी प्रस्तुतची ही प्रत उपलब्ध होत आहे. ही प्रत त्या मानाने पुष्कळच विस्तृत व बऱ्याच प्रमाणांत शुद्ध आहे. अपपाठहि अर्थात् आहेतच. पण पहिल्यांतल्या इतकें विपुल नाहीत. उदाहरणार्थ, तिसऱ्या ओळींत ‘मांडण’ शब्दाऐवजी ‘मांजण’ असा शब्द पाहिजे. सातव्या ओळीचा अर्थ लागत नाही. दुसऱ्या कडव्यांतील पांचव्या ओळींत ‘ थोर थोर मांडिल्यावर मोठे गोळयाचा ’ असा अशुद्ध पाठ आहे, त्याऐवजीं ‘ थोर थोर भांडी (तोफा) त्यावर मोठ्ये गोळयाच्या ’ अशी दुरुस्ती हवी. त्याच कडव्यांत आठव्या ओळींत ‘ पाडाव केली सपाट ’ या ऐवजी ‘ पाडाव केली खपाटं ’ (खपाटा–अेक तऱ्हेची लहान होडी) असा पाठ पाहिजे. पांचव्या कडव्यांत ‘ मरणा ’ या शब्दाऐवजीं ‘ सरणा ’ असा मूळ शब्द असला पाहिजे असें उघड दिसतें. सहाव्या कडव्याच्या दुसऱ्या चरणांत ‘ बोरज ’ शब्द आला आहे, तो ‘ बोरद ’ असा मुळांत असावा. मूळ तो देखील इंग्रजी नाविक परिभाषेंत सी बोर्ड, स्टार बोर्ड, ली बोर्ड इत्यादि शब्द आहेत, त्यांतील बोर्ड या शब्दाचा मराठी अपभ्रंश होय. या पोवाड्यांत आलेले ‘बोरद’ ‘बोरज’ किंवा ‘बोडद’ हे सर्व शब्द एकच होत. सातव्या कडव्यांतील चौथ्या ओळीचा अर्थ लागत नाही. वाचकांनी पुढे छापलेला पोवाडा व श्री. दळव्यांच्या पुस्तकांतील पोवाडा समोरासमोर मांडून पाठभेदांची मौज पाहून घ्यावी.

आमच्या नव्या प्रतींत दोन ठिकाणीं सन व एके ठिकाणीं महिना, तिथि व वारहि दिला आहे. तसेंच 'खमस साल यंदाचें फार कठीण' असा कालोल्लेख केलेला आहे, त्यावरून पोवाडा वर्ण्यप्रसंगाशीं समकालीन आहे हें उघड दिसतें. पोवाड्याच्या शाहिराचें नांव मात्र नक्की सांगतां येत नाही. दळवी प्रतींत 'बापू खंदेसी' असें नांव दिलें आहे. प्रस्तुत प्रतींत तें तसें नाही. दळवी प्रतींत पाठ असा 'बापू खन्देसी गातो पोवाडा त्याची वस्ती तळे घोसाळा.' प्रस्तुत प्रतींत 'गुरु आत्मगिरी फकीर । डामाजी आमचा मैतर ॥ ख्याल गातो जीर । खान खानदेशाला । हल्ली वस्ती तळा घोसाळा । ठाउक सर्वाला ।' असा आहे. यांतील 'खान खानदेशाला ।' हे शब्द, 'ख्याल खंदेशाला' यांचे अपभ्रंश असतील तर मात्र बापू खंदेसीच या पोवाड्याचा शाहीर म्हणता येईल.

ऐतिहासिक माहिती

या पोवाड्यांत पेशव्यांच्या एका आरमारी सरदाराचा पराक्रम व एक निष्ठा वर्णन केली आहे. पोवाड्यांत वर्णिलेल्या प्रसंगासंबंधीं अस्सल ऐतिहासिक पत्र खऱ्यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत एकच सांपडतें. तें व फॉरेस्ट वगैरेंचे इंग्रजी साधनग्रंथ पाहून खऱ्यांनी या आरमारी लढाईची किंचित हकीकत दिली आहे व तिचें महत्व पुढीलप्रमाणे वर्णिलें आहे.

"जमिनीवर ज्याप्रमाणें लढाई सुरू होती त्याप्रमाणें इंग्रजांशीं पाण्यांतहि लढाई सुरू होती व तींत इंग्रजांची प्रथमपासून सरशी होती. त्यांच्या आरमारानें वसइ बंदराचा बारा कित्येक महिनेपर्यंत आडविला होता, परंतु त्यांस तेथून हाकून लावणें मराठी आरमाराच्यानें झालें नाहीं. उलटपक्षीं इंग्रजी आरमारच मराठी आरमार जेथें दृष्टीस पडेल तेथें त्याचा पाठलाग करीत असे. "पाण्यांतील कामास सांप्रत काळीं इंग्रज अधिक आहे" हें हरिपंत फडक्यानें सुद्धां कबूल केलें होतें. एका प्रसंगीं इंग्रजांच्या आरमाराने मराठी आरमाराचा पाठलाग करितां करितां त्यांपैकीं एका गलबतास गांठून लढाई करून त्याचा नाश केला तेव्हा त्यावरचे बहुतेक लोक प्राणास मुकले यासंबंधे ग्रांट डफ लिहितो कीं, 'मराठ्यांचीं पांच गलबतें होतीं त्यांत तीन अनुक्रमें

शेचाळीस, अडतीस व बत्तीस तोफांचीं होतीं व दोन तेवीस तेवीस तोफांचीं होतीं. इंग्रजांचीं गलबतें, ‘ रिव्हेंज ’ व ‘बॉंबे’ नांवाचीं दोनच होतीं. मराठी आरमार दिसण्यांत प्रचंड होतें तरी इंग्रजी गलबतांस पाहिल्याबरोबर तें पळूं लागलें. तेव्हां इंग्रजी गलबतांनी निकड करून सर्वांत मोठें शेचाळीस तोफांचें ‘ समशेर जंग ’ नांवाचें गलबत होतें तें गांठिलें व त्यास लढाई करणें भाग पाडिलें. नंतर तीन तास लढाई होऊन ‘समशेर जंग’ दारूस आग लागल्यामुळें जळून गेलें. त्यावरचा नाखुदा व बहुतेक लोक मेले व गलबताचा विध्वंस झाला. यासंबंधें पुरंदराहून पटवर्धनाच्या वकिलानें हकीकत लिहिली आहे. ती अशी—‘सरकारच्या एका पालाच्या पाठीस इंग्रजांकडील पाल लागलें. निकड झाली तेव्हा आपल्याकडील लोकांनी बारुदखान्यास (दारुखान्यास) आग लावून जाळिला. त्यांच्या हातास लागूं दिला नाही. माणसें कांही आलीं, फार करून मेली ’ प्रसंगाचें पर्यवसान दोन्ही वर्णनांत एकच आहे पण प्रसंग कसा व कां घडला या वर्णनांत मात्र तफावत आहे. कारण कीं लढाईत यदृच्छेने दारूस आग लागून गलबत जळणें व माणसें मरणें निराळें, आणि एका गलबतानें दोन गलबतांशीं तीन तास निकरानें लढून शेवटीं सर्व उपाय हटले तेव्हा सरकारचें गलबत शत्रूच्या हातीं जाण्यापेक्षा जळून खाक झालें तरी बेहेत्तर, त्या कामीं आपण सर्व मेलों तरी बेहेत्तर, अशा राष्ट्राभिमानानें प्रेरित होऊन आपण होऊन दारुखान्यास आग लावणें व सर्वांनीं मरावयास तयार होणें हें अगदीं निराळें आहे.”

पोवाड्यांतील हकीकत

प्रस्तुत पोवाड्यांवरून निघणारी हकीकत अशी. धुळपांच्या पदरीं दामाजी किंवा डामाजी नाइक (कुवेसकर) नांवाचा एक शूर दर्यावर्दी सरदार होता. विजयदुर्गच्या आरमाराची सुभेदारी पेशव्यांनी धुळपांना दिल्यानंतर कांही दिवसांनी ‘समशेर जंग’ नांवाचा एक लढाउ पाल वसई अर्नाळ्याच्या आरमारांतून धुळपांस देण्यांत आला. हा पाल वसई आरमाराचा सर सुभेदार विसाजीपंत लेले म्हणून एक कर्ता व वाकबगार पुरुष होता, त्यानें मुद्दाम बांधविला होता. ‘समशेर जंग’ पाल वसईस बांधण्यांत आला. तो पाल फारच नामी बांधणीचा होता. शाहीर म्हणतो,

‘ साच्यांत ओतून काढिला जसा नगिना ’ म्हणजे मुद्दाम विशेष तऱ्हेची मूस ओतून एखादी अपूर्व वस्तु निर्माण करावी तसें त्याचें रूप होतें. हा पाल तिर्कटी म्हणजे, तीन काठ्यांचा होता. इहिदें सबैनमध्ये म्हणजे सन १७७०-७१ त धुळप गोव्याकडे स्वारी शिकारीस गेलेले असतां हा पाल विजयदुर्गास येऊन दाखल झाला. धुळपांच्या आरमारांत नारायण पाल, महादेव पाल, दत्तपाल, फत्तेजंग पाल वगैरे अनेक नामांकित लढाऊ पाल होते. त्या सर्वांत ‘समशेर जंग’ पोक्त तरतुदीचा.त्यावर निवडक शिपाई व मोठमोठ्या तोफा चढविलेल्या होत्या. या पालानें समुद्रांत अनेक पराक्रम केले. डामाजी नाईक (कुवेसकर) हा त्यावरचा मुख्य सरदार असे.१७७५-७६ सालीं इंग्रजांनी साष्टी दग्यानें घेऊन ३६ वर्षांपूर्वी चिमाजी आप्पानी जिंकलेल्या उत्तर कोकणास शह देऊन मराठी राज्यावर मोठें अरिष्ट आणलें. त्यावेळीं कारभाऱ्यांनी धुळपांना ताकीद देऊन, समुद्रांत इंग्रजांचा पिच्छा पुरवण्यास सांगितलें. स्वतः धुळपाचें अेक आरमार रेवदंड्याकडे गेलें. चार महिने त्याने किनाऱ्याने घस्त घातली. असें फिरत असतां माही शुद्ध पाडवा बुधवारला म्हणजे माघ शुद्ध प्रतिपदेस, म्हणजे १ फेब्रुवारी १७७५ रोजीं गोपाळगडचे बाऱ्यावर धुळपांच्या आरमाराने दोन लढाऊ इंग्रजी गलबतें पाहिलीं. मग आपले सर्व पाल जवळ बोलावून त्यांनी इंग्रज जहाजांना अडविण्याचें ठरविलें.आघाडी अर्थात ‘समशेर जंगा’ची म्हणजे डामाजी नाईकाचीच होती. ठरल्याप्रमाणे ‘समशेर जंग’ पालाने इंग्रजी गलबतावर चाल केली. पण दुर्दैवानें याचवेळीं वारा पडला आणि दुसरें पाल पाठपुराव्यास जवळ येऊं शकले नाहीत आणि मग ‘ इंग्रजास मदत ईश्वर । दोन जाहाजें त्याचीं जबर । एकला पाहून समशेर । मारामार करूं लागला ॥’’ इंग्रज जहाजानी दोनही बाजूंनी ‘समशेर जंगा’च्या दोनही बोर्डांवर म्हणजे बाजवांवर गोळ्यांचा पाऊस पाडला. पण एकाकी असतांहि ‘समशेरजंगा’ने तुंबळ युद्ध केलें. तीन प्रहर झाले तरी समशेरजंग हटेना व कौल घेईना. इंग्रजांनीं तोंडांत बोट घातलें. ‘अरे पांढरें निशाण पालवा, फुकट कां मरतां ! कौल घेऊन भेटण्यास या’ असें त्यांनीं ओरडून सांगितलें. पण डामाजी नाइकाने ‘न येऊं शरण । करूं पेशव्याची नामना (ख्याति, कीर्ति) । (आम्ही) सती होऊन बसलों सरणा । येरे टोपीवाल्या अडाव-

णीला। आम्ही पेशव्याचे शिपाई। निमक दाऊं तुजला।" असें खडखडीत उत्तर देऊन फिरून लढाई सुरू केली. मग इंग्रजांनींही चेवून तोफांचा मार धरून रेजगण मारून, आणि दांडीचे गोळे फेकून, 'समशेरजंग पाल' खिळखिळा केला. डोल काठी, गावी, परबाण पाडले आणि फोडले. जहाजावरील लोकहि खूप मेले आणि जखमी झाले. अखेर आतां अधिक वेळ पाल लढणें शक्य नाही, तो इंग्रज पागेस लावून विजय-मदानें मुंबईस घेऊन जाणार असें पाहून डामाजी नाइकाने आपल्या हातीं जहाजावर दारू पसरून त्यास आग लावून तें उडवून दिलें. त्यांत तो स्वतः व इतर अनेक लोक मेले, उडाले, कित्येक जळाले, कित्येक बुडाले. अशा रीतीने डामाजी नाइकाने आपल्या शौर्याची व इमानाची शर्थ करून इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेवलें. 'डामाजी नाइक धन्य! केलें हलाल धन्याचें अन्न!' 'डामाजी नाईक शर्थ करून मेला' 'या पेश-व्याच्या राज्यांत फार असर। पर कोणी जळून नाही मेला असा सरदार।' असें शाहिरानें गाइलेले धन्यवाद यथार्थ नाहीत असें कोण म्हणेल?

पेशवे-दप्तराचे अलीकडे सुमारें ४५ साधनखंड प्रसिद्ध झाले. त्यांत सवाई माधवरावाच्या कारकीर्दीतील साष्टी--वसई--प्रकरणासंबंधीं ५०० पृष्ठें भरतील इतकीं पत्रें नवीन छापलीं आहेत. त्यांत धुळपांच्या दर्यांतील स्वाऱ्या शिकाऱ्यांचीहि पुष्कळ आहेत. पण दुर्दैवानें नेमक्या या लढाईविषयींचें एकहि पत्र त्यांत आढळत नाही. खरे यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत जें एक छोटें पत्र छापलें आहे तेवढेंच. अशा स्थितींत या तपशीलवार व विश्वसनीय पोवाड्याची आज घटकेस तरी इतिहासाच्या अव्वल साधनांतच गणना निःसंशय केली जाईल.

वृद्धानें सांगितलेली माहिती

प्रस्तुत पोवाड्याचा नायक डामाजी नाईक याच्याविषयी माहिती उपलब्ध ऐतिहासिक साधनांत कांही मिळत नाही हें वर सांगितलेंच. १९३४ सालीं आम्ही कोंकणांत गेलो असतां विजयदुर्गाजवळ वाघोटण मुक्कामीं शिवराम गोपाळ पाटील नांवाचा एक फार वृद्ध माहितगार मनुष्य आहे असें समजलें. सबब त्याला मुद्दाम

बोलावून आणवून त्याच्याकडून पुष्कळ जुन्यां हकिकती दंत-कथा व माहिती काढिली. गृहस्थ म्हातारा, ९५ वर्षांचा, पण भाल्यासारखा ताठ व फारतर ६०-६५ उमरीतला दिसे. त्याने सांगितलेल्या हकीकतींचें टिपण त्याचवेळीं करून ठेविलें होतें. सुदैवानें त्यांत या डामाजी नाईकाची व त्याच्या मुलाचीहि कांही थोडी माहिती मिळाली ती अशी.

डामाजी नाईक यांचें आडनांव कुवेसकर. त्याच्या मुलाचें नांव चंद्रोजी चंद्रोजी अठरा वर्षांचा झाल्यावर धुळपांनी त्याला 'सवाई चंद्रोजी' असा किताब दिला व 'सवाई समशेर जंग' नांवाचें एक नवें जहाज त्याला मुद्दाम बांधून दिलें. बापाच्या मृत्यूचा बदला घेण्याकरिता चंद्रोजीने जयगडाजवळ पोर्तुगीजांच्या 'संतान' नामक जहाजाशीं लढाई करून तें विजयदुर्गास धरून आणलें. त्या जहाजावर इतकें कांहीं रेशीम भरलें होतें कीं, अखेर धुळपांनी आपल्या गुरावासरांचीं दावींहि त्या रेशमाचीं केलीं!! व शेंकडो दोर वळून आपल्या सोयऱ्याधायऱ्यांस वांटले! सध्या विजयदुर्गाच्या रामेश्वराच्या देवळांत घांटा आहेत त्या चंद्रोजीनेंच पोर्तुगीजांकडून जिंकून आणल्या असें म्हणतात. कोंड्याच्या तडीला डामाजीचें इनाम आहे. ही माहिती सांगणारा म्हातारा शिवराम गोपाळ पाटील याचा व डामाजीच्या घराण्याचा भाचेसंबंध आहे. म्हाताऱ्याने आणखीहि हकीकत सांगितली ती अशी कीं, डामाजी नाईकाचा सध्याचा वंशज यशवंत गोपाळ कुवेसकर हा मुंबईस असतो. डामाजीच्या घराण्याविषयीं हकीकत किंवा कागदपत्र राजापूरचे अभ्यंकर वकील यांच्याकडे मिळण्याचा संभव आहे. डामाजीचा पोवाडा शिरसे नांवाचा धुळपांचा गांव आहे, तेथील बाबु कोळगे भंडारी याला येतो.

वरील माहितींत सत्याचा पुष्कळ अंश आहे, तथापि त्यांतील कांही गोष्टींचा कालविपर्यास झालेला दिसतो. तें कसें।तें सह्याद्री मासिकाच्या अंकांत पो ीज साधनांचे एकमेव अधिकारी संशोधक गोव्याचे प्रो. पिसुर्लेंकर यांचा जो लेख छापला आहे त्यांतील एका नोंदीवरून दिसून येईल. ती नोंद अशी—'युरोपियन लोकांचीं तारवें धरून नेण्यांत विशेष शौर्य लागत असल्यामुळें मराठ्यांना असे प्रसंग अभूतपूर्व वाटत यांत आश्चर्य नाही. धुळप

यानें सन १७७२ सालीं पोर्तुगीजांचें संतान (Santana) नामक लढाऊ तारू काबीज करून पेशव्यांच्या दरबारांत केलेली प्रतिज्ञा सिद्धीस नेली. ह्या पोर्तुगीज तारवावर ४० तोफा होत्या. संतान तारवा बरोबर आणखी दोन लढाऊ गलबतें व कित्येक व्यापारी गलबतें होतीं. मराठ्यांनीं तीं पहिल्याच टकरींत काबीज केली.' वरील अस्सल माहितीवरून असें उघड दिसते कीं, संतान जहाज लुटण्याचा प्रसंग डामाजीच्या लढाईच्या आधीं ४ वर्षे घडलेला आहे. अर्थात चंद्रोजीनें लुटलेलें जहाज दुसरें कोठलें तरी असेल. तसेंच चंद्रोजीने बापाच्या मत्यूचा सूड घ्यावयाचा तर वास्तविक इंग्रजांचें जहाज त्यानें पकडले पाहिजे होतें. पण पकडलें आहे पोर्तुगीजांचें.

डामाजी नाईकाचा पोवाडा

१६

केले दंग समशेरजंग इंगरेजाला। सागरी राहिले छत्र बुडाला किल्ला ॥ धृ. ॥

घडीवेळ उत्तमा पाहून केली मांडण। धन्य धन्य कारागीर चतुर शाहाण। सरसुभा विसाजीपंत धनी होत जाणा। केलें तयार समशेरजंग वसई ठिकाणा। सांचांत ओतून काढिला जसा नगिना। शोभे वरि बोरदासारिखा अचंबर दाना। तिनकाठ्या उडवी ध्वज। झाझांत सवाई झाज। नांव समशेर-जंग साजे। जैसा सैनामधि हत्ती गर्जे। इहिदे सबईनच्या सालांत गेले गोंव्याला। ते दिवशीं समशेरजंग आले विजयदुर्गाला ॥ केले दंग० ॥ १

सुभा झाला धुलपरायाला आरमाराचा। नारायणपाल महादेवपाल दत्तपालाचा। फत्तेजंग समशेरजंग जोडा दोघाचा। अवघ्यामध्ये समशेरजंग बिनीचा। थोर थोर मांडिल्यावर मोठ्ये गोळयाचा। निवडून सिपाई चढविला भरवशाचा। दारुचा तरास पाण्यांत। फिरंग्याशीं धाक गोव्यांत। सारी पाडाव केली सपाट। कैकांशीं पडली धास्त। सवाई समशेर नांव ... दामाजी नाईक सरदार तोचि बिनीचा ॥ केलें दंग० ॥ २

सन खमस साल येंदाचे फार कठिण। ठाण्याचा किल्ला घेतला इंग्रजानें ॥ पत्र आलें धुळपरायासी यावें बेगुन। निघाले बंदरांतून आरमार घेऊन। दरकुच रेवदंड्यावर गेले चालुन। कांही दिवस कर्मिले घ्या ऐकुन। बार बार

केले दंग—आश्चर्यानें दिङ्मूढ केलें. **समशेर जंग**—समशेर जंगं म्ह. समशेर जंगानें. **सवाई समशेर जंग**—१७६८ सालच्या विजयदुर्ग येथील धुळपांच्या आरमाराच्या यादींत ‘सवाई समशेर’ या नांवाचें एक पाल आहे. पण हा पाल किंवा हें गलबत भर्त्या गलबतांत समाविष्ट आहे. त्यावर हशम म्हणजे लढवाई लोक २५ व दर्यावर्दी २५, एकूण ५० माणसें नेमलेलीं होतीं. (इ. सं. ‘जुन्या गोष्टी’ लेखांक २८, १७६८ मधील धुळपांचें आरमार.) **सागरी राहिले छत्र**—

हिंडु लागले । नांवाचे जानराव धुल्ले । चारमास झुजे मारिले असे माही सुध । पाडवा बुधवाराला । गोपाळगडचे बाऱ्यावर इंगरेज पाहिला ॥ केले दंग० ॥ ३

सारे पाल जवळ बसून मन्सोबा केला । महादेवपाल नारायणपाल समशेरजंगाला । तुह्मि कोठे एक बाजून घालावा घाला । आम्ही येतावो आतुन मदत तुम्हाला । पुढे होऊन समशेर दुमानी पडला । न कळे कर्त्याची कर्णी वारा राहिला । सारे पाल राहिले दूर । ना अैक भांड्याचा मार । अिंग्रेजास मदत ईश्वर । दोन जाजें त्याचि जबर । एकला पाहून समशेर । मारामार करूं लागला गोळ्यावर गोळा । नाही ऐके समशेरजंग खूब भांडला ॥ केले दंग० ॥ ४

इंग्रेज पुसे हटकून कोण सर्दार । दामाजी नाइक म्हणे मीच बादुर । कापितान मनी उमजला धनी यावर । म्हणून झडून पडला समशेरावर । दोहीकडे दोनीं जाजें करिती मार । खुब झुजला समशेरजंग तीन पाहार । कांहि केल्या आटोपेना । दंग जाला इंगरेज मना । 'ध्या घ्यारे कौल भेटांनां' । 'लोक म्हणती न येऊ शरणा । करूं पेशव्यांची नामना । सती होऊन बसलों सरणा । ये येरे टोपीवाल्या अडावणीला । आह्मी पेशव्यांचे शिपाइ निमख दाउं तुजला' ॥ केले दंग० ॥ ५

समुद्रावर कीर्ति राहिली. **बुडाला किल्ला**—किल्ल्यासारखा बळकट समशेरजंग पाल बुडाला. समुद्रांतला किल्लाच की काय असा पाल. **मांडण**—मांजण पाहिजे. मांजण म्हणजे मूर्तीवर तेलाशेंदराचा लेप देतात तो. येथें अर्थ) जहाजांची तांबरात किंवा रंगरंगोटी समजावी. **मांडण**--मांडणी, रचना, रचनेचा प्रारंभ. ? **धनी होत जाणा**—धनी होता जाण असें पाहिजे. जाण—शहाणा. **नगिना**--उत्कृष्ट वस्तु. **बोडद**—बोरज, बोरद-जहाजाची एक बाजू (Board). **शोभेवरी बोरदासारिखा** समुद्रावर खालवर होतांना त्याच्या बाजु किंवा कांठ (कडा) शोभतात. **अचंबर**--आश्चर्यकारक. **तिन काठ्या**-तीन डोलकाठ्यांचें तिरकती तारू. **थोरथोर मांडिल्यावर मोठे गोळ्याचा**-थोरथोर भांडी त्यावर मोठे गोळ्याचा असें पाहिजे; **भांडे**-तोफ. **भांडीं**—तोफा. **दारूचा तरास**—भावार्थ समशेरजंगावरील

इंगरेजास आला राग झाला सरमिंदा। भरभरून भांडी मारि दोंहिं बोरजा। दांडीचे गोळ फार करितो चेंदा। रेजगिरी सांखळी मारुन उडविला पडदा। मारली थोरली कांठी गावी परबाणसुद्धां। तक्ता फोडुन केला जुदाजुदा। लोक भांडले भार शर्तिन। जाति हिंदु मुसनमान। दामाजी नाइक धन्य। केलें हलाल धन्याचें अन्न। पाल नेइल वैरी म्हणून। दिल्ही आपल्या हाती अग्न। सवाई समशेर जळू लागला ।। दामाजी नाईक शर्त करून मेला। केले दंग० ।। ६

किति उडाले दारुन जळाले फार। काही उड्या टाकुन गेले तक्त्याबर। गेलि वस्त्रें नि पांघुरणें आणिक हातेरे। कसा गिलजा धात (?) पडला एकच कहर। या पेशव्याचे राज्यांत फार अमर। (पर) कोणि जळुन नाही मेला असा सर्दार। झुज झालें मिरया ठिकाणी। काहि गेले रत्नागिरीवरुनि। खुब केले त्या सुभेदारांनी। एकेक शेला दिला पाहूनी। कांही नेले इंग्रेजांनी। आले जखमी लोक खबर कळली लहान थोराला। कसा कहर राज्यावर पडला मोठा गलबला ।। केला दंग० ।। ७

तोफांच्या माराची गोव्यांतील फिरंगी आरमाराला धास्ती वाटत असे. **सपाट**—(खपाट पाहिजे) मूळ शब्द खपाटा. एकतऱ्हेची होडी किंवा पडाव किंवा तारूं. **बेगुन**—जलदीनें. **वारबार**—बहुधा हिरेबोरे असाच मूळ शब्द असला पाहिजे. मोडी वाचनाची चूक दिसते. हिरेबोरे Beating to windward, The tacking and turning of a ship under an adverse wind. (Molsworth) **बारा**—बंदर किनारा. **जानराव**—जानराव धुळप. **धुळे**—शूर, प्रतापी. **दमानी**—मूळ शब्द दमान. वाऱ्या समोरची बाजू (गलबतांची), शिडाचा मागचा डोलकाठीजवळ येणारा भाग. ६ जानेवारी १७७५ च्या जानराव धुपळांच्या पत्रांत हा शब्द आला आहे. " खुद्द आमच्या आरमारावर सहा तरांडीं व तिरकती पाल एक, अशी (इंग्रजांचीं) त्याशीं आम्ही मुकाबला घेणार होतो. परंतु आम्ही दमानाखालीं होतों यास्तव गांठ पडून आली नाही. " (पेशवे दप्तर). **नामना**—कीर्ति. **अढावणी**—अडावण. गलबताचें सर्व बांधकाम झाल्यावर मालाचे

मोठ्या पहाटेस दिवस उगवला न् राव आले। इंग्रेज पळून गेला असे कळले । आइकोन वर्तमान कष्टी झाले । गेलीं फत्येजंगाची बाजू देवा काय केले । वर्तमान ऐकून तेथून निघाले । गेले विजयदुर्गाचे बंदरामध्यें पोचले। सारे पाल गोदी घालून खाली उतरले। जे रणी राहिले खेत जिवाशी मुकले। किती हेटकारी झाले ठार। घ्या रुपये ढालाभर। राज पेशव्यांचे अंबर। बातनी विजयदुरुगावर। गुरु आत्मागिरि फकीर। दामाजी आमचा मैतर। ख्यालगाते जीर खान खानदेशाला। हालीं वस्ती तळा घोसाळा ठाउक सर्वाला ॥ केले दंग० ॥ ८

सोयीसाठीं आणखी एकदोन फळ्या मारतात त्या अगर साठ विणतात तो. अडावणीला येणें—जहाजाला जहाज भिडवून लढाई करणें. रेजगारी—रेजगण किंवा पत्र्याचे धातूचे तुकडे घालून तोफांतून उडवितात तें. परबाण—पडबांध. मोठ्या शिडाचें लाकूड. दोऱ्यानीं शीड ज्या लांकडास बांधतात तें. धोरली काठी—डोलकाठी. जुदा जुदा—निरनिराळा. कसा गिलचा धात पडला—?. गोदी—विजयदुर्गास धुळपांची गोदी अद्याप प्रसिद्ध आहे.

सखूबाई शिंदींचा पोवाडा

ऐतिहासिक माहिती

हा पोवाडा जयाप्पा शिंद्याची बायको सखूबाई शिंदे हिच्या विषयीं आहे. ही अहिल्याबाई होळकर, अनुबाई घोरपडे, यांसारखीच कर्तबगार बाई होती व तिनें पुरुषाबरोबरीनें आपल्या जहागिरीचा कारभार हाकला.

शिंद्यांचा मूळ अर्जक पुरुष राणोजी शिंदे. त्याला लग्नाची एक व बिन-लग्नाची एक अशा दोन बायका होत्या. लग्नाच्या बायकोचें नांव निंबाबाई आणि राखेचें नांव चिमाबाई. निंबाबाईला जयाप्पा, जोतिबा आणि दत्ताजी असे तीन मुलगे झाले. चिमाबाईला तुकोजी आणि महादजी असे दोन पुत्र झाले. निंबाबाईच्या मुलांपैकीं मधला जोतिबा अल्पवयांतच वारला. त्याच-प्रमाणें चिमाबाईचा थोरला मुलगा तुकोजीबाबा तोही तसाच वारला.

राणोजीच्या मृत्यूनंतर त्याची सरदारी त्याच्या औरस मुलांनी म्हणजे जयाप्पा दत्ताजींनीं चालविली. नंतर जयाप्पाचा मुलगा जनकोजी यानें चालविली. पुढे पानपतावर जनकोजीही ठार झाला तेव्हां सरदारी कोणास द्यावी हा प्रश्न आला. पण राणोजीचा अनौरस मुलगा महादजी हा पानपताहून वांचून आला होता व तोही कर्तबगारच होता. तेव्हां अखेर त्याच्याकडेच पेशव्यांनीं शिं-द्यांची सरदारी कायम केली. मात्र ती सरदारी महादजीकडे कायम बद्ध-मूल होईपर्यंत दरम्यान अनेक भानगडी झाल्या व त्यांपैकींच एक भानगड म्हणजे राणोजीची बायको निंबाबाई व तिची सून म्ह. जयाप्पाची बायको सखूबाई यांनी महादजीला तो अनौरस आहे या सबबीवर सरदारी देण्या-बाबत फार अडथळे आणले. शिंद्यांच्या घरांत त्या वेळीं मोठाच गृह-कलह माजला होता. पण शेवटीं सहाजिकच बायांचा पक्ष लंगडा पडला व पेशव्यांनीं सखूबाईला निराळी स्वतंत्र जहागीर तोडून दिली.

१७६४ सालीं रघुनाथराव एका पत्रांत लिहितो, “पांच लक्ष रुपये घेऊन खासा स्वारीबरोबर पांच हजार फौजेनिशी राहून चाकरी करावी हें महादजीनें कबूल केलें आहे; परंतु महादजीनें सखू-बाईस राजी राखले पाहिजे असेंहि बजावले आहे ” पण तें झालें नाही. सखुबाईचीं व महादजीचीं नित्य भांडणें होऊं लागलीं. यानंतर कांही

काल रघुनाथरावाने सखूबाईच्या भिडेमुळे मानाजी फाकडे शिंदे यासहि सरदारी दिली होती; पण पुढे थोरल्या माधवरावांनी ती बदलून महादजीकडेच कायम केली.

महादजीने सखुबाईस कसा त्रास दिला त्याविषयी पेशवे दप्तरांतील पुढील पत्र वाचनीय आहे.

श्री छ. १६ रमजान
ता. १५-३-१७६४

श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे सेवेसी प्रीतिपूर्वक सखुबाई सिंदे दंडवत विज्ञापना. येथील कुशल ता। फालगुण सुध्य १२ जाणून येथास्थित असे. याउपरी चिरंजीव महादजी सिंदे यासी आपण येथें पाठविलें. साहेबी पाठविले म्हणून आम्ही त्यासी कोणे गोष्टींचें द्वैत न धरतां त्याचे (लोका) स व त्यास वाडिय्रातच ठेविले. दोन तीन महिने आम्हापासी होते. सांप्रत्य कजिया करून दुसऱ्या वाडियात जाऊन राहिले. आम्हास अनेक प्रकारचे उपद्रव आरंभिला आहे. चहुकडोन बतंग केलें आहे. आमच्या जवळील माणूस देखील आम्हापासी येऊं देत नाही. सेते पोते आमच्या पोटापाण्याची होती ते झाडून बंद केली, ब्राह्मण देव दोघे जवळ होते त्यास पीडा करितात. आमची अन्नावस्त्राचीं विपत्यें आहेत. आणखी कोठवर ल्याहावे? आम्हावर ईश्वरें गहजब केला कीं येकायेकीं येकदांच मृत्यु पावले. आम्हास कोठें उभे राहावयासी जागा नाहीसी जाली. दुःखाचे परवत जाले आसतां महादजी शिंदे पाठी लागले आहेत. येक खावंदा५। भरवसा, त्यासी साहेबही परामृश (घेत) नाहीत. यैशा मणुशाकडून आमची आबरू घेवितात! तेव्हां आम्ही उपाय काय करावा? साहेबापासी वर्तमान ल्याहावयासी चोर जालो यैशा गती जाल्या आहेत. दासीचे दाशत्व आम्ही करावें यैसे साहेबाच्या मर्जीस येत असले तरी सुखरूप करावें परंतु ईश्वरास ह्या गोष्टी मानत नाहीत. साहेबाच्या चित्तांत आमचीं विपत्यें करावी यैसे आसले तरी तैसेच लिहून पाठवावें. विश भक्षून सर्वत्र प्राणत्याग करू! दुसरा उपाय नाही. हे जाचणूक आमच्यानें सोसवत नाही. दौलत साहेबी त्यांच्या हवाली केली. आज चार महिणे येथे येऊन बसले आहेत. एक राऊत अद्यापि

ठेविला नाही. पागेची बंदोबस्ती अगर शागीर्द (ये) कोणे गोष्टीची तरतूद तिळमात्र नाही. सारा बखेडा चहूंकडोन जाला आहे. कोणी पाठवून परामर्ष करावा. पुढे आमच्या संसाराचा कांही बंदोबस्त करून देतील तरी आमची जगणूक होईल. महादाजी शिंदे यांच्या जाचणुकेपासोन सोडवावे. बहुत काये लिहिणें हे विज्ञाप्ति.

सखूबाई, भागीरथीबाई, सगुणाबाई इत्यादिकांकडे पेशव्यांनी खासगी जहागिरीस गांव नेमून दिले त्याबाबत पुढील उल्लेख सांपडतात.

१७६५-६६ सालीं (सीत सितैन मया अलफ छ.२८ सवाल) पेशव्यांनीं भागीरथीबाई सिंदी व सगुणाबाई सिंदी यांस इनाम गांवें चालण्यासंबंधीं सनद करून दिली त्यावरून त्या दोघीकडे १२२२९३ रु. उत्पन्नाचे ५६ गांव होते असे कळतें. त्यांपैकी पन्नास हजार भागीरथीबाई व सगुणाबाई या उभयतांचे संसाराचे बेगमीस, ७२९३ शिबंदी व महाल मजकुर खर्च गांवगन्नाचा. ५००० ठाणे पेडगांव येथील खर्चास सदरहू तनखियाचें गांव किल्ल्याकडे उपयोगी पाहून नेमून दिले जातील ते सरकारांत द्यावे. ६०००० रु. स्वार २०० दोनशें यांणी हुजूर चाकरी करावी त्यांस तैनांत दर राउती येणेप्रमाणे—रु॥ ४०००० सवार पागेचे करोल १०० दर राउती ४००प्रमाणे सामान चांगलें बाळगावे. २०००० शिलेदार स्वार १०० दर २०० दोनशें प्रमाणें एकूण रु. ६०००० दोनशें स्वारांचा सदरहू तैनात साठ हजार रुपये.

१७६६-६७ सालीं सखूबाई शिंदे हिच्या नांवें पेशव्यांनी संसाराचे बेगमीस नेमणूक करून दिली त्यासंबंधीं सनदापत्रें वाड थोरला माधवराव डायरी खंड १ पृ. १६१ ते १६३ वर छापली आहेत. तसेंच १७२ ते १७४ पानांवरहि.

छ. २९ जमादिलावल (२४-१०-१७६७)

जयाप्पाची बायको सखूबाई शिंदे हिच्याकडे तिचें जाहगीर गांव पूर्ववतप्रमाणें निर्वेध चालावेत अशी पेशव्यानें आज्ञा केली. (पेशवे दप्तर, पेशव्यांच्या रोजनिशींतील उतारे भाग २२ पृ. १०४)

पे. द. भाग २९ पत्र नं. २२१ तारीख ६–१२–१७६८ पत्र माधवराव पेशव्याचे आहे. त्यावरून सखूबाई शिंदे हिच्याकडे सरंजामासाठी म्हणून मौजे वाघाली हा दरोबस्त गांव व मनेरे चिंचोली जागिरीचा

अमल असे होतें; तसेंच भागिरथीबाई व सगुणाबाई शिंदे यांच्याकडे मौजे करंदी हा गांव दरोबस्त मौजे, भाके जागिरीचा अमल व मौजे दडगांव (पेडगांव ?) स्वराज्याचा अंमल खेरीज जहागीर करून असे होते. हे पांची गांव पेशव्यांनी जप्त करून त्याची कमाविस नारायणराव पेशव्यास सांगितली. शिंद्यांच्या घरांतील गृहकलहामुळेच पेशव्याला ही गोष्ट करावी लागली. पुढे शिंदे बाया शुद्धीवर आल्या म्हणून सखूबाई व भागीरथीबाई शिंदे यांचा सरंजाम पेशव्यांनी वाटणीप्रमाणे मोकळा केला; पण भागीरथीबाई वाटणी घेईना. सबब तिचा सरंजाम तसाच जप्तीत ठेवला.

सखूबाई शिंदे ही मुखत्यारीनें आपल्या जहागिरीचा बंदोबस्त कसा करी याबाबत पुढील पत्रें उपयुक्त आहेत.

(१) रामशास्त्री प्रभुणे यांनीं एका प्रायश्चित्त प्रकरणीं तिला पत्र लिहिले तें. (शिवशाहीचा लेखनालंकार जोशी चांदोरकर)

(२) खुद्द सखूबाईने गंगाधर यशवंत चंद्रचूडास पुढील पत्र लिहिलें आहे. “ फिरंगीयांनीं चिरंजीव खेमसावंत यांजकडील ठाणें दगलबाजी करून घेतलें. त्याचें वर्तमान पेशव्यास कळवून नऊ महिने झालें. पेशव्यांचा कारकून फिरंग्याकडे जाऊन आठ-नऊ महिने झाले. फिरंगी दाद देत नाहीच. उलट अलीकडे आणखीहि एक दोन ठाणीं सावंतांची फिरंगी यांनी घेतलीं. सबब पेशव्यास व नानाफडणविसांस चिरंजीव महादजी शिंदेकडून पत्र पाठवून पुण्यांतील फिरंग्यांच्या वकिलास ताकीद होय व ठाणीं परत देत असें करावें.” (३) अहिल्याबाई होळकरणीचें हरिपंत फडक्यास ता. १७-९-१७८८ चें पत्र “ मौजे निंबगांव कल्याणखेडे हा गांव सखूबाई शिंदीचा नसतां लटका कजिया उपस्थित करून इकडील दोन नांवा तिनें फोडिल्या. गांवकऱ्यापासून २५० रु. घेतले व माणसें मारिली त्यासंबधी आम्ही पेशव्याकडे तक्रार केली.व त्यांनीहि योग्य तोच निकाल देऊन सखूबाईस ताकीद केली. पण ताकीदपत्राचा अंमल अद्याप झाला नाही तरी करवावा. ” (चंद्रचूड दप्तरापैकीं, निवडक उतारे,ग्वाल्हेर दरबार प्रकाशन पत्रें नं. १६५ व ७२).

सखूबाई शिंदीचा पोवाडा

१७

(हा पोवाडा पन्हाळा येथें जयराम गोंधळी याचे टाकाऊ दप्तरांत शितूतांना आढळला. या पोवाड्याचे मथळ्यावर कांहींच लिहिलेलें नव्हतें. त्याची ही अपुरीच प्रत आहे.)

करूनि गेली राज ह्मराजं सकूबाई । त्या पुण्याला पार नाहीं ॥ध्रुवपद॥ राणोजीराव बाबा होते सुभेदार त्याचे पोटीं जन्मले हिर ॥ आपासाहेब सत्त्वधीर ॥ केवळ पाहा ईश्वरअवतार ॥ मधवी बंधू जोतिबा सरदार ॥ जशी काई खर्गाची धार ॥ दत्तमहाराज दिगांबर ॥ नांव पाहा त्याचें दुरवर ॥ कोंती माद्रीचा माद्रीचा अवतार ॥ ऐकी दोहींतिहींचा विस्तार ॥ चिमाबाईचे पाहा पुत्र सत्वधीर ॥ तुकोजीबावा गुणगंभीर ॥ माहादजी

राज—राज्य **सकूबाई**—जयाप्पा शिंद्याची बायको, गाढवे यांची कन्या. **हीर**—हिरे. **मधवी**—मधले. **जशी काई खर्गाची धार**—खर्गाची म्हणजे खड्गाची. तरवारीच्या पात्या सारखा तेजस्वी म्ह. तल्लख असा भावार्थ. खर्ग असाच शब्द पूर्वी सेखोजी आंग्रयाच्या पोवाड्यांत आलेला आहे. **दत्त महाराज दिगांबर**—दत्ताजी शिंदे जणुं कांही प्रत्यक्ष दिगंबराचा म्हणजे दत्तात्रयाचाच अवतार असे. **कोंती**—कुंती. **दोहिं तिहिंचा विस्तार**—तिहींचा म्हणण्यांतील स्वारस्य कळत नाहीं; कारण राणोजी शिंद्याला दोनच बायका होत्या. निंबाबाई ज्येष्ठ, लग्नाची, आणि चिमाबाई राख; परंतु एके ठिकाणीं राणोजी शिंद्याला निंबाबाई आणि मैनाबाई या लग्नाच्या व चिमाबाई राख अशा तीन स्त्रिया होत्या असेंही लिहिलें आहे. **चिमाबाई**— ही महादजी शिंद्याची आई. ही मूळ रजपूत होती असे म्हणतात. जिवबादादा बक्षी यांचें चरित्रांत लेखक श्री. राजाध्यक्ष यांनीं ४४ व्या पृष्ठावर एक टीप लिहिली आहे. तींत महादजी शिंदे म्हणजे या चिमाबाईचा लेक हा अनौरस किंवा दासीपुत्र नव्हता असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी मराठी शाळापत्रक पुस्तक दोन अंक ४ पृ. १२५, १२६ यांवरील लेख त्यांनीं उद्धृत केला आहे. त्या लेखांत 'थोरल्या बाजीरावाचे कारकीर्दींत राणोजी शिंदे दतिया नामक रज-

बावा बावाचें तप थोर ॥ राजझेंडे सृष्टीवर ॥ धुमाळी ॥ ऐसे पांचीजन भाऊ

पूत संस्थानिकाशीं लढला. त्या लढाईंत राणोजीनें रजपुतांचा पूर्ण पराभव केला तेव्हां दतियेकर संस्थानिकाची राजकन्याच आपण होऊन राणोजीकडे आली राणोजीनेंही तिला आपल्याजवळ बाळगली व गांधर्व विधीनें तिचें पाणिग्रहण केलें' असें म्हटलें आहे. राजाध्यक्ष म्हणतात कीं, "पाटील बावा राणोजींचे अनौरस किंवा दासीपुत्र होते असा जो लोकप्रवाद आहे तो चुकीचा आहे;" पण ४४ व्या पानावर टीपेंत असें म्हणणारे हे लेखक त्याच्या आदल्याच पानावर "जनकोजीरावांच्या मागें पानपतानंतर राणोजीच्या औरस संततीचा नष्टांश झाला" असें स्वच्छ लिहितात! राजवाडे खंड ६ मध्यें पुरंदऱ्यांच्या दैनंदिन रोजनिशींत 'राणोजी शिंद्याची राख चिमाबाई कोनी निघाली' अशी निःसंदिग्ध नोंद आहे. तसेंच पेशवे दप्तरांतील एका पत्रांत, जयाप्पा शिंद्याची बायको सखूबाई व महादजी शिंदे यांचा गृहकलह लागला त्या वेळीं सखूबाईनें माधवराव पेशव्यास एक खरमरीत पत्र लिहिलें आहे. त्यांत ती असें म्हणते कीं, 'आम्हांस स्वतंत्र नेमणूक करून द्या यांनी दासीचें दास्य करावयास लाविलें आहे." राणोजी शिंद्याची बायको निंबाबाई हीसुद्धा वरील कारणांकरिताच सरदारी महादजीला देण्याविषयीं पूर्ण विरुद्ध होती. पेशवे दप्तर भाग २९ मधील ११ नंबरच्या पत्रांत "महादजी शिंदे याचे अनुकूल पडत नाही यैसे निंबाबाई स्पष्ट बोलली" असा उल्लेख आहे. तें पत्र २ जुलई १७६१ तारखेचें आहे. महादजी शिंद्याला लेकवळेपणाच्या प्रवादाचा जाच फारच होई व तें त्याच्या मनांत शल्यासारखें डाचें. त्यानें बलिष्ठ झाल्यावर जबरदस्तीनेंही कुळवंतांशीं सोयरिका घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत पे. द. भाग ४३ मधील सखाराम बापूंचें पुढील पत्र वाचनीय आहे.

"विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. रा. महादजी शिंदे याचा मराठे मातबर घरंदाज यासी गोतपत करावी व तनपुरे पाटील राहूरीकर याची कन्या मागतात. त्याणें मूल पलविली. त्याचे घरी चौकी बसविली आहे. मराठे सरदार रोज येऊन ये विसीचे काय ते आम्हास सांगा म्हणतात. ये विसीचा मार लिहिला ते कलला. त्यास हा प्रकार सरकारातून व्हावयाचा

जसे पंडूचे पांडवू ॥ धर्म अर्जुन बळी भिवू ॥ आणिक नकुळ सहदेऊ ॥ तैसे

नाही. राजीमंताचा प्रकार ज्याचा त्याचा आहे. बलात्कारें होणार नाहीं. तुम्ही लोकांस समजाऊन सांगितलें, उत्तम आहे. खातरजमा, तनपुरे यांचे घरीं चौकी बसविलीं त्याविसी व लोकांस पत्रें येतात येविसी त्यास वाईट न वाटे गोड दिसे असा प्रकार करितो. तुम्ही लवकर कूच करून जावे म्हणजे गोतपत सहजच राहिली. रा. छ १६ जिल्हेज हे विनंती. (पेशवे दप्तर भा. ४३ प. नं. ४९ ता. ७–२–१७७६.)

'The investiture of Scindia by the Peshwa, as Deputy to the Vakil-ul-mutlaq, immediately followed on their arrival at the Peshwa's palace. But on this occasion and on several others the pretended humility of Scindia gave disgust, when he insisted on being considered as the hereditary servant of the Peshwa entitled only to carry his slippers, and to be addressed by no higher title than that of Patel Though this affectation was meant to be in conformity with Maratha taste it failed in effect. No brahmin of education was pleased or deceived by such coarse self disparagement and the old Maratha, though Mahadji Scindia had purchased some hereditary privileges in the Deccan, would much more readily have acknowledged his new imperial titles than have assigned to him the appellation of Patel, a distinction which they considered due only to the legitimate Scindia."

[Memoir of the life of the late Nava Farnavis compiled from Family records, and extant works

क्षेत्री जिवू ॥ चौखंडी ज्याचे नाऊ ॥ म्हणविती अष्ट उमरावू ॥ बसविला ज्यांनी बाच्छाऊ तक्तशाई ॥ त्यांच्या पुण्याला० ॥ १

राजलक्षुमी लक्षुमीसी नाही अंत ॥ उदंड पाहा दिधली भगवंत ॥ हत्ती घोड्यासी घोड्यासी गणित ॥ उदंड पालख्या आणि रथ ॥ आपासाहेब पाहा गेले मारवाडांत ॥ तिथे वैऱ्यांनी केला घात ॥ दत्ताजी बावा बावा गेले कुळक्षेत्रांत ॥ ते न्हाले धारातीर्थ ॥ जनकोजी बाबा कोपला भगवंत ॥

---

by A. Macdonald first Published 1851. Reprint 1927. Page 85-86]

राजझेंडे सृष्टीवर—ज्यांच्या किर्तीचे झेंडे सर्व जगांत नाचले किंवा नाचतात असे. राजझेंडा याचा अर्थ जरीपटका असाहि घेतां येईल. हा जरिपटका छत्रपतींकडून मिळावयाचा असे. महादजी शिंद्यांनीं सर्व हिंदुस्थानभर जरीपटका नाचविला. **बळी**—बळवान. **भिवू**—भीम. **तैसे क्षेत्री जीवू**—क्षेत्री म्ह. क्षत्रिय. जीवू म्ह. प्राणी. क्षेत्री जीवू म्हणजे पराक्रमी क्षत्रिय.

नाऊ—नाव, कि्र्ती. **म्हणविती अष्ट उमरावू**—अष्ट प्रधानांनींहि धन्यवाद गाइले कीं पाटिल बावांनींच चगत्याच्या वंशाला दिल्लीच्या बादशाही तक्तावर स्थिर केलें. अष्ट उमराव म्हणजे लक्षणेनें सर्व मातबर सरदार असाहि अर्थ घेतां येईल. **बसविला ज्यानी बाच्छाऊ तक्तशाई**—'तक्तशाई, हा मूळ चक्ताई या शब्दाचा शाहिराच्या तोंडांत झालेला अपभ्रंश होय. दिल्लीचे बादशहा हे चक्ताई कुळांतले. त्यावरून दिल्लीच्या बादशाहीला चक्त्यांची पादशाही म्हणत असत. महादजी शिंद्यांनी गुलाम कादराचा बीमोड करून शहा आलमाला दिल्लीच्या तक्तावर बसविले. हे प्रसिद्धच आहे. **घोड्यासी गणित**—घोड्यासी (नाही) गणित. त्यांच्याजवळ अगणित हत्ती घोडे होते असा अर्थ. **वैऱ्यानी केला घात**—मारवाडांत नागोरच्या स्वारींत जयाप्पाला दग्यानें ठार मारण्यांत आलें त्यास अनुलक्षून. **कुळक्षेत्रांत**—कुरुक्षेत्रांत. **ते न्हाले धारातीर्थ**—ते धारातीर्थी पडले म्हणजे लढाईत ठार झाले. बदाऊच्या लढाईत ठार झाले. **जनकोजी बाबा कोपला भगवंत । नाही लागला त्याचा अंत**—जानकोजी शिंदे

नाही लागला त्याचा अंत ॥ राव माहादबानें रोकड ॥ घेतला चडलाचा सूड ॥ काबीज केलें मारवाड घेतला फत्तरगड ॥ मोडली गिलज्याची खोड ॥ आपलेसे केले चहूंकड ॥ आपलीसी केली चौकड ॥ रेफिरे हात बांधुनी आला पुढे दिधले परगाणे द्वाही ॥ त्याच्या पुण्याला० ॥ २

लिंबाबाईचें थोर पुण्य ॥ लक्षुमी दिली भगवंतान ॥ कुने गोष्टीचें नाही उण ॥ जानकूबाई लेंक रत्न ॥ जोगूबाई बाईवर दया पूर्ण ॥ नांव केलें मैनाबाईन ॥ येसूबाई बाई बहुत सुज्ञान ॥ काय मी वर्णू त्याचे गुण ॥ बयासाहेब नित्य करी बोळवण ॥ हंस पुरविली चोकून ॥ बयासाहेबाची सकूबाई वडील सून ॥ मानपानाची धनीन ॥ धुमाळी ॥ मधवी

पानपतावर ठार झाला. पण त्याचें शव प्रत्यक्ष कोणासच दिसलें नाहीं व म्हणूनच पुढें त्याचाही तोतया झाला होता. **रावमहादबा**—महादजी शिंदे. **रोकड**–रोकडा, पुरेपूर. **चौकड**—चौकट. **रेफिरे**—नफेर किंवा नफर असा मूळ पाठ असावा नफर म्हणजे गुलाम. **लिंबाबाई**—राणोजी शिंद्याची बायको जयाप्पा शिंदे याची आई. हिनेहि वडिलकीच्या नात्याने कारभार चांगला केला. पेशवे दप्तर भा. २९ प. न. ३ वरून तिच्याकडे मौजे अरणगांव दळवी याचे व हिवरे वगैरे दहाबारा गांवांच्या मामलती आणि पाटिलक्या होत्या असें दिसतें. २२ आक्टोबर १७५५ रोजीं ती वारल्याचे एका शकावलींत लिहिलें आहे; परंतु शिंदेशाही इतिहासाचीं साधनें भाग १ पृ. २३७ वर तिचें ७ नोव्हेंबर १७६१ तारखेचें पत्र छापलें आहे; शिवाय आम्ही या पोवाड्याच्या टीपांतच वर तिच्या विषयींच्या २ जुलै १७६१ च्या पत्राचा उल्लेख केलाच आहे. अर्थात् ती १७६१ नंतर केव्हां तरी वारली असावी. तिची समाधी किंवा छत्री श्रीगोंदे येथें आहे. सखूबाईचीही तेथेच आहे.

जानकूबाई—लिंबाबाईची थोरली लेक. तडवळेकर भोईटे यांजकडे दिली होती. **जोगूबाई**—लिंबाबाईची दुसरी लेक. नेरलेकर साळोंखे यांजकडे दिलेली. **मैनाबाई**—लिंबाबाईची चौथी मुलगी. रहिमतपूरकर माने यांजकडे दिलेली. **येसूबाई**—लिंबाबाईची तिसरी मुलगी पाटसकर शितोळ्यांच्याकडे दिलेली. **बयासाहेब**—हें लिंबाबाईचें टोपणनांव दिसतें. **नित्य करी बोळवण**—ज्या ज्या वेळीं या मुली माहेरीं

सगुणाबाई ॥ केलें राजपुण्य सवाई ॥ तिच्या पुण्यासी जोडा नाही ॥ आणखी भागीरथीबाई ॥ तिची कीर्ती वर्णू मी काई ॥ अन्नछत्र ठाई ठाई ॥ ब्राह्मण भोजन मिठाई ॥ पंक्तीस जेवी गोसावी शास्त्र गाई ॥ तिच्या पुण्या तिच्या पार नाही ॥ २

निंबाबाई बाई गेल्या सर्गाला ॥ राज्य स्थापिलें सकूबाईला ॥ सगुणाबाई केली तुमचे हवाला ॥ संभाळा भागीर्थीबाईला ॥ फार विनविलें विनाविलें बाईला ॥ जीवं लाव आपुले रयतेला ॥ सुखी राखावें सुखी राखावें अवघ्याला ॥ राज कर आशीर्वाद दिला ॥ सकूबाईनें प्रतिपाळ फार केला ॥ पार नाहीं त्यांच्या पुण्याला ॥ नाथ प्रसन्न द्दाय बयासाहेबाला ॥ लौकिक नांवाचा झाला ॥ चाल ॥ धुमाळी ॥ सोहिरे जोडले धुर ॥ अमृतराव निंबाळकर ॥ राणोजी त्याचे कुमर ॥ दिली दादीबाई सत्वर ॥ आणखी

येत त्या त्या वेळीं त्यांना उत्तम दागदागिने वस्त्रेंपात्रें देऊन त्यांची पुन्हां सासरी रवानगी करीत असे. हंस पुरविली चोकून—हंस ह्म. हौस. चोकून ह्म. चहूंकडून चौबाजूंनीं ह्म. सर्व तऱ्हांनीं. राजपुण्य—विशेष पुण्य. सगुणाबाई—राणोजीचा दुसरा मुलगा जोतिबा यांची स्त्री सगुणाबाई कात्राबाज मांडवगणकर भोपतराव देशमूख यांची कन्या. यांस संतान झालें नाही. कसबें बरवासांगर प्रांत बोंडसे येथील लढाईत ठार झाले. ही लढाई १७५२ च्या सुमारास झाली. वाडपेशवा डायरीमध्ये (सवाई माधवराव खंड १ पृ. २३१ नोंद २६८ (७११) सगुणाबाई सिंदीच्या मृत्यूचा उल्लेख आह, तिच्याकडे चालू असलेल्या वतनी गांवाचा अमल ती साल गुदस्तां मेल्यामुळे महादजी शिंदे यांजकडे चालवावा असें १७ साबान इसन्ने समानीनचे (१७८१-८२) पेशव्याचें पत्र. "सगुणाबाई ही सालगुदस्ता मृत्यू पावली. त्यांचे सरंजामाचे बंदोबस्तास" अशा मजकुराचें आप्पाजी विश्वनाथाचे सुरू इसन्ने समानीन माया व अलफ छ १९ सवालाचें पेशव्यास पत्र आहे. या पत्राची इंग्रजी तारिख ८ आक्टोबर १७८१. अर्थात् सगुणाबाई १७८०सालीं वारली असली पाहिजे. भागिर्थीबाई—दत्ताजी शिंदे यांची स्त्री. गोरखोजी भापकर यांची ही कन्या. गोसावी—कीर्तनकार. गाई—गवई. शास्त्र—शास्त्री. राजकर—राज्यकर. सोहिरे जोडले धुर—धुर

आईका सोयर ॥ सेनापती दिगांबर ॥ पाहो सखाराम चातुर ॥ अंबिकाबाईचे घर ॥ अंबिकाचें घर सांगू काई ॥ त्या० ॥ ४

राजे घोरपडे घोरपडे पाहा बळीवंत ॥ नाम जाहीर चौमुलूखांत ॥ गोविंदराव राजे त्यासी जाणती समस्त ॥ अहिल्याबाईचे कांत ॥ होते रणबहिरी जसे रणशूर जनांत ॥ कोपला त्यावर भगवंत ॥ काय मी सांगू सांगू हो त्याची मात ॥ रणसंग्रामी झाले शांत ॥ आणि सोहिरे सोहिरे सावंत ॥ राजा रामचंद्र गुणिवंत ॥ तयाचे वंशी राजे खेम सावंत ॥ लक्ष्मीबाई दिली तेथा ॥ धुमाळी ॥ लक्ष्मीबाईवर ॥ फार होता बयाचा प्यार ॥ इसमत नव्हत्या क्षणभर ॥ मोठा राज्याचा घोर ॥ पुसावा समाचार ॥ धाडी पत्रें वरचेवर ॥ कसे करील ईश्वर ॥ कधी एकेन त्याचे बरे कधी ऐकेन ॥ त्याचे बरोबरी सोई ॥ त्या० ॥ ५

म्हणजे आघाडीचे नामवंत किंवा कुळवंत. मोठमोठ्या मातबर कुलवान घराण्यांत मुली देऊन सोयरिका केल्या. **अमृतराव निंबाळकर**— जयाप्पाची मुलगी राजसबाई ही पिराजी नाईक निंबाळकर दहिबावकर यांच्या मुलास दिली होती. त्या मुलाचें नांव अमृतराव. अमृतरावाचा मुलगा राणोजी. **दादीबाई**—ही राणोजीची लेक. ताकपीर यांजकडे दिली असावी. "राणोजी शिंदे यांचे नातू लेकीचे लेक राणोजी ताकपीर यांचे पुत्र यांस कल्याण भिवंडी पैकीं २००० रु. नेमणूक" दिल्याचें सदाशिवराव भाऊंचें ता. १५-१-१७५७ चें :पत्र आहे. (शिंदेशाही इतिहाससाधनें खंड २ पृ. ५ ले. ६)

सेनापति दिगांबर—जयाप्पाची मुलगी, अंबिकाबाई नांवाची, राणोजी घोरपडे कापशीकर यांचा मुलगा सखाराम घोरपडे यास दिली होती. सेनापति दिगांबर असें म्हटलें आहे, त्यांतील दिगांबर या शब्दाचें मर्म काय तें कळत नाही. वर एके ठिकाणीं दत्ताजीबद्दल दिगांबर शब्द पाहिल्या चौकांत वापरला आहे पण तसा अर्थ येथे संभवत नाही. राणोजी घोरपड्यांचें दुसरें नांव दत्ताजी असें असल्यास न कळे **पाहो**—पहा हो! **गोविंदराव घोरपडे**—जयाप्पाची पांचवी मुलगी अहल्याबाई ही मालोजी राजे घोरपडे यांचा मुलगा गोविंदराव घोरपडे यास दिली होती. हा

धर्मराज पाहा केले बाईन ॥ नित्य करी दानपुन ॥ देव देवार्चन तीन वेळां पुराण ॥ वाची पुराणिक ब्राह्मण ॥ सर्वे अधिकारी चिचोरे दिवाण ॥ तयाचे हाती देणघेण ॥ विठलराव बापूवर दया पूर्ण ॥ फडणीसी वडलांपासून ॥ एकाएकीं कसें आलें बाईस दुखण ॥ उपाय चालेना कोणे गोष्टीन ॥ उदंड औषध देती वैद्य ब्राह्मण ॥ कसें केलें भगवंतान ॥ धुमाळी ॥ सामगांवा पत्र धाडिले ॥ आपासि बोलाविले ॥ त्यासी निरवानिरव केलें ॥ ब्राह्मणांसि दान वांटिले ॥ गाई म्हैसी शाल दुशाल

गोविंदराव घोरपडे बापू गोखल्याबरोबर अष्टी येवतीच्या लढाईत पराक्रम करून १८१८ सालीं ठार झाला. मात—गोष्ट. रणबाहिरी—रणशूर खेमसावंत। लक्ष्मीबाई दिली तेथ—शिंदेशाही इतिहासाचीं साधनें भाग १ ला या ग्रंथांत दिलेल्या तपशीलवार वंशावळींत वाडीच्या सावंताकडे जयाप्पाची जी मुलगी दिली होती तिचें नांव ठकाबाई (ठमाबाई पाहिजे? मोडी वाचनाची चूक?) असें दिलें आहे; परंतु पोवाड्यांत तिचें नांव लक्ष्मीबाई असें दिलें आहे. "महादजीचा बंधू जयप्पा शिंदे यांची मुलगी लक्ष्मीबाई ही या वेळीं लग्नाची होती. ती खेमसावंत यास मिळून शिंद्यांचा संबंध जुळला तर तो वाडीदरबारास पुष्कळच हितावह होईल असें सावंतवाडींतील मुत्सद्दी मंडळीस वाटत होतें. म्हणून त्यांच्या सूचनेवरून जिवबादादाचे वडील बंधु नरोबा यांनी हा संबंध जुळून येईल तर पहावे असे एक वेळ लिहिलें होतें. इतक्यांत जयाप्पाची बायको सखूबाई शिंदे हिजकडूनहि महादजींस मुलीच्या लग्नाची तजवीज करण्याविषयीं निकडीचें पत्र आलें. तेव्हां शिंद्यांनी ही गोष्ट एके दिवशीं जिवबादादा, बाळोबा तात्या वगैरे मंडळीपाशीं काढली. जिवबादादांनीं म्हटलें सावंतवाडीचे सरदेसाई खेमसावंत हे कुलीन व रूपसंपन्न पुतणीस योग्य वर आहेत, मर्जीस येईल तर कोंकणांत माणूस पाठवून खात्री करून घ्यावी. त्यावरून शिंदे यांनी कांही लोक सावंतवाडीस पाठविले. जिवबादादांनीही ही बातमी नरोबा यांस व वाडीच्या मुत्सद्दी मंडळास कळविली. पुढे शिंद्यांचे लोक वाडीस आल्यावर एके दिवशीं दरबार भरून त्यांची भेट घेतली. त्यांनी शिंद्यांचा हेतु राजेसाहेब, त्यांची मातुःश्री व इतर मुत्सद्दी मंडळी यांस कळविला व त्यांनीही त्या गोष्टीस रुकार

पलंग न्हाल्या तबक देविले ॥ ब्राह्मणाच्या हवालीं केलें ॥ बाईनें तीर्थ घेतलें ॥ बाईनें तीर्थ घेतलें ॥ बाईनें तीर्थ घेतलें सुख होई ॥ त्या० ॥ ६

पुस वद्य होती तीळसंक्रांत ॥ दिशा धुंद केल्या समस्त ॥ तुटला तारा दोपारच्या अंमलांत ॥ अचंबा करिती जन बहुत ॥ उगवला दिन गुरुवार चहुथ ॥ राजस्वरी वैद्य आला तिथ ॥ दिलें औषध औध्याच्या देखत ॥ पाहिली नाडी धरून हात ॥ प्राण झाला व्याकूळ व्याकूळ त्या घटकेंत ॥ सोडले अवघे गणगोत ॥ गेली निजधामा सकूबाई श्रीमंत ॥ एकच झाला आकांत ॥ रोजना करी दादीबाई ॥ ह्मणे देवा झाले काई ॥ आह्मां लोक आक्रोश करी ताईबाई ॥ निनाई गेली टाकुनी वत्से गाई ॥

दिला. पुढे ती मंडळी ग्वाल्हेरीस गेल्यावर त्यांनी वाडीच्या मुत्सद्दी मंडळींचा रुकार कळवून तेथील दरबारच्या थाटाची वगैरे तारीफ बरीच केली. त्यावरून महादजी शिंदे व त्यांची भावजई सखुबाई या दोघांसहि हें स्थळ पसंत होऊन शिंद्यांचा मूळ जहागिरीचा गांव श्रीगोंदे येथें हें लग्न इ. स. १७६३ त मोठ्या थाटानें झालें. यावेळीं खेमसावंत यांचें वय चौदा वर्षांचें होतें." (सावंतवाडी संस्थानचा इतिहास पान ७६, ७७) परंतु पुढील पत्रांत १७५० सालीं लग्न झाल्याचें म्हटलें आहे. त्यावरून जयाप्पास दोन मुली होत्या व दोघींहि सावंतवाडीकरांच्या घरांतच दिल्या असें ठरतें. जिवाजी विश्राम याचें पेशव्यास पत्र नं. १०७ ता. १३-५-१७५० "राजश्री जयाप्पा शिंदे यांची कन्या श्रीमंत राजश्री खेमसावंत भोसले सरदेसाई यास नेमस्त केली. लग्नाकरिता येजमानसहवर्तमान श्रीगोंदेस येऊन वैशाख शुद्ध ४ चतुर्थी शुक्रवारी लग्न संपादिलें. स्वामीची भेट घ्यावी हे सरदेसाई स्वामीचे चित्ती बहुत होतें." (पेशवे दप्तर भा. २४ पृ.१०५)

इसमत नव्हत्या—विसंबत नव्हत्या. **न्हाल्या**—न्यहाल्या–गाद्या. **राजस्वरी वैद्य**—राजवैद्य. **रोजना**—आक्रोश, शोक. **आह्मालोक**—अहमलोक म्हणजेच हमलोक म्हणजेच सर्व लोक. आह्मांलोक हा मूळ हम्‌ह या पराशियन शब्दाचा अपभ्रंश आहे. हमह म्हणजे सर्व. (मुधोळकर घोरपडे घराण्याचा इतिहास फारशी शब्दकोश.) **निनाई**—मुळांत निधाई असें असलें पाहिजे. त्याचा अर्थ धाईधाई, मोठ्या आक्रोशाने असा

अशी ह्मणे लक्षुमीबाई ॥ कसें झाज बुडालें डोहीं ॥ अंधकार पडला दुहीं शास्त्र पाही ॥ त्याच्या० ॥ ७

आहे. निधाय किंवा निधाई—P. great fuss or loud cry about; a mighty stir, bustle (Moles) मोल्सवर्थ. अंधकार पडली दुही—मुळांत 'अंधकार पडला ग्रुही' असें असावें. शास्त्रपाही— ?

अहल्याबाई होळकर यांचा पोवाडा

हा पोवाडा प्रभाकर शाहीराचा आहे. काव्यदृष्ट्या तो उत्कृष्टच आहे- विशेषतः "संसारी असुनि जिच्या वासना मेल्या तिजपुढे सहज मग मुक्ति उभ्या ठेल्या" ॥ हें सुभाषित कायमचें चित्तावर ठसल्याशिवाय राहणार नाही.

अहल्याबाईचा जन्म स. १७२५ सालीं झाला. हिचे माहेरचें आड-नांव शिंदे. तिचे वडील माणकोजी हे बीड तालुक्यांतील चोंटे या गांवचे पाटील होते. अहल्याबाईचें लग्न सुप्रसिद्ध मल्हारराव होळकराचा पुत्र खंडेराव यांच्याशीं झालें. खंडेरावाचा जन्म १७२३ सालचा म्हणजे या नवरा बायकोंत अवघें दोन वर्षांचें अंतर होतें. लग्न अर्थातच तत्कालीन पद्धतीप्रमाणे पांचव्या सहाव्या वर्षींच झालें असेल.

नवऱ्यापासून अहिल्याबाईला फारसें प्रेम कधी मिळालें नाहीं. खंडे-रावानें दुसऱ्याहि अनेक बायका केल्या होत्या. तथापि सासरा मल्हारराव व सासू गौतमाबाई यांचें तिच्यावर कमालीचें प्रेम होतें व त्यांनी तिला जीव की प्राण केलें.

१७४५ सालीं अहल्याबाईस मालेराव नांवाचा मुलगा झाला व त्यानंतर तीन वर्षांनीं मुक्ताबाई नांवाची मुलगीहि झाली. आपल्या सासऱ्यापासून ती सर्व राज्यकारभाराचें काम शिकलीच होती; शिवाय त्याच्याबरोबर ती अनेक मोहिमांत असल्यामुळें लढायांची आणि लष्कराचीही तिला चांगली माहिती झाली होती. तिच्या वयाच्या अठ्ठावि-साव्या वर्षापासून तिनें लिहिलेलीं किंवा तिला आलेली राजकारणी किंवा कारभाराचीं पत्रें दृष्टीस पडूं लागतात. १७५४ सालीं मराठ्यांनीं कुंभेरीला वेढा घातला. त्या वेढ्यांत अहल्याबाईचा नवरा गोळा लागून ठार झाला. अहल्याबाई ही त्या स्वारींत होतीच. ती सहगमन करणार होती. परंतु मल्हाररावानें तिला तसें करूं दिलें नाहीं.

खंडेरावाच्या मृत्यूनंतर मल्हारराव १० वर्षें जगला. पण त्या काळांत त्यानें आपला सर्व राज्यकारभार अहल्याबाईवरच सोंपवून दिला होता. १७६६ सालीं मल्हारराव मृत्यू पावला. मरणसमयीं त्यानें तुकोजी नांवाच्या आपल्या नातेवाईकास सरदारकीचें काम सांगितलें मात्र त्यानें

अहल्याबाईच्या तंत्रानें चालावें असें सांगून ठेवलें. याचें कारण अहल्याबाईचा मुलगा मालेराव हा जरी या वेळीं २० वर्षांचा झालेला होता तरी वेडसर होता. आणि पुढील वर्षींच म्हणजे १७६७ त तो वारला. सारांश, अहल्याबाईवर सर्वत्र दुःखाची परंपराच कोसळत गेली. यामुळे आधीच धर्मप्रवण असलेल्या तिच्या मनाला देवधर्माचा आणि परोपकाराचाच अधिकाधिक ध्यास लागत गेला. तथापि तिने राज्यकारभाराबाबत दक्षता बिलकुल सोडली नव्हती; किंबहुना प्रथम तें संभाळून मगच तिनें हे इतर उद्योग केले.

तिची खासगी वर्तणूक आणि दिनचर्या ऋषितुल्य होती. तिच्या दानधर्मामुळें तिचें नांव अजरामर होऊन राहिलें आहे. जिज्ञासू वाचकांनीं महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें बारकाईनें वाचून पाहिलीं तरी अहल्याबाईची कर्तबगारी व महानुभावित्व त्यांना चांगलें प्रतीत होईल.

'श्रीमंत राजश्री दादासाहेबांनीं रेवेस येथें घाट बांधला आहे. त्या घाटावर बाईनीं एक देवालय बांधून श्रीपरशरामजीची मूर्तिस्थापना अक्षय्यतृतीयेस केली' (महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें प.नं. १२१ ता. १५ मे १७८३ चें पत्र)

"जांबाचे घांटावर तळें मोठें बांधलें आहे. तेथे बाई उद्यापन करावयास वैशाख शु॥ ११ शनिवारीं जाणार आहे." (महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें पत्र नं. ५५ ता. २८ एप्रिल १७८४ चें.).

"(बाई) ओंकारेश्वरास जाणार ती राहिली. धर्मध्वज हजार खादी लाऊन केला होता तो ओंकारेश्वरास पाठविला." (महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें प. नं. ४६ आक्टोबर १७८३ चे.).

१९२३ सालीं होळकर सरकाराने देवस्थान क्लासीफिकेशन लिस्ट प्रसिद्ध केली व एक खास अधिकारी नेमून होळकर सरकारमार्फत देणग्या, इनामें किंवा नक्त नेमणुका जेथें जेथें चालू आहेत तेथें जाऊन त्यांची चांगली तपशीलवार माहिती गोळा करविली. त्यांत अहल्याबाई होळकरणीचा धर्मादाय पुढीलप्रमाणे—

नवीं देवळें बांधिलीं, जीर्णोद्धार केला, मूर्तींची पुनः प्रतिष्ठापना केली. १ पुष्कर २ हृषिकेश ३ सुलतानपूर ४ जेजुरी ५ संगमनेर राममंदिर

६ पंढरपूर राममंदिर ७ चोंडीमंदिर ८ नाशिक ९ चित्रकूट १० वेरूळ घृष्णेश्वराचें तळें ११ अयोध्या १२ उज्जैन अवंतिकेचें देऊळ १३ काशी-विश्वेश्वर १४ वैजनाथ १५ सोमनाथ.

घाट बांधले ते—१ मथुरा २ हरिद्वार ३ काशी ४ पुणतांबे ५ प्रयाग.

धर्मशाळा बांधिल्या त्या—१ बद्रिनारायण, २ नाथद्वार, ३ सप्तशृंग, ४ अमरकंटक.

नक्तनेमणुका, इनामें वगैरे—१ मल्लिकार्जुन, २ महांकाळ, ३ ओंकारेश्वर, ४ भीमाशंकर, ५ रामेश्वर, ६ नागनाथ, ७ त्र्यंबकेश्वर, ८ द्वारावती, ९ द्वारका, १० जगन्नाथ, ११ परशुरामक्षेत्र, १२ कर्नाटकांतील श्रीकाल्हाटी, १३ श्रीव्यंकटेश, १४ टोके, १५ पैठण, १६ परळी वैजनाथ, १७ चिंचवड, १८ कोल्हापूर अंबाबाई.

काशीच्या गंगोदकाच्या कावडी रामेश्वर मल्लिकार्जुन इत्यादि ३४ देवस्थानास दरसाल जातात.

याखेरीज विहिरी वगैरे बऱ्याच आहेत.

(इंडियन हिस्टॉरिकल रेकार्डस कमिशन व्हॉल्यूम ८ पृ. १३९ ते १४३.)

अहल्याबाई होळकर यांचा पोवाडा

१८

(शाहीर–प्रभाकर)

सति धन्यधन्य कलियुगीं अहिल्याबाई ॥ गेली कीर्त करुनिया भुमंडळाचे ठायीं ॥ ध्रुवपद ॥ महाराज अहल्याबाई पुण्य प्राणी ॥ संपूर्ण स्त्रियांमधिं श्रेष्ठ रत्नखाणी । दर्शनें मोठ्या दोषाची होईल ग्लानी ॥ झडतात रोग पायांचे पितां पाणी ॥ वर्णिति कीर्ति गातात संत ते गाणीं ॥ झाली दैवदशें ती होळकराची राणी । (चाल) ॥ उद्धार कुलाचा केला । पण आपला सिद्धीस नेला । महेश्वरास जो कुणी गेला (चाल) ॥ राहिला तेथें जो जाऊन घेऊन बापभाई । संसार चालवी दीन दुबळ्यांची आई ॥ १

प्रत्यहीं द्यावीं ब्राह्मणांस दशदानें । ऐकावी पुराणें बहुत आनंदानें ॥ शोभती होमकुंडें द्विजवृन्दानें । टाकिती हजारों नेमानें अवदानें । + + + + + + + + + ॥ चाल ॥ कधीं कोटि लिंगें करवावीं । वधुवरें कधीं मिरवावी ॥ अर्भका दुधें पुरवावीं ॥ चाल ॥ पर्वणी पाहुनि दान देतसे गाई । जपमाळ अखंडित हातीं वर्णू कांई ॥ २

जेथें ज्योतिर्लिंगे जेथें तीर्थें महाक्षेत्रें । घातलीं तेथे नेहमी अन्नछत्रें ।

दोषाची होईल ग्लानी—दोष कमी होतील. पापें झडतील. **झडतात रोग पायांचे पितां पाणी**—तिच्या पायांच्या तीर्थोदकानें पापांचे म्हृ. पापी लोकांचे रोग नाश पावतील. **पण**—निश्चय. **दशदानें**—गाय, जमीन, तीळ, सोनें, तूप, वस्त्र, धान्य, गूळ, मीठ व घर यांचीं दानें **अवदान**—एका आहुती पुरतें होम द्रव्य. म्हणजे ब्राह्मण हजारों आहुत्या वाकून वाकून अग्नींत टाकत आहेत. **वधुवरें कधीं मिरवावीं**—भावार्थ गोरगरिबांचीं धर्म लग्नें वगैरे करवून द्यावी किंवा बालकृष्ण आणि तुळस यांचें लग्न खऱ्या लग्नाप्रमाणें समारंभ करून लावावें. **अन्नछत्रें**—"गंगाजल निर्मल मातुःश्री आहल्याबाई यांची कीर्ति धर्मामुळें व जागोजाग अन्नछत्रें व देवालयाचे घाट व धर्मशाळेचे कारखाने चालतात त्यामुळे विस्तृत आहे व कैलासवासी सुभेदार याचा लौकिक त्यांनी आईकीला पाहिला आहे." [इ. सं. सन१७८५ लेखांक ६८ Selections from Chandrachuda records].

ज्यास आली जरा झालीं कांही विकळ गात्रें। पुरवावीं त्यास औषधें वस्त्रें पात्रें। कितिकांनी घेतलीं स्मार्तअग्निहोत्रें। दिलीं स्वास्थें करून त्या भटांस क्षणमात्रें॥ चाल॥ आधिं इच्छा भोजन द्यावें। उपरांतिक तीर्थ घ्यावें। वाढून ताट वर मग न्यावें॥ चाल॥ जेविल्या सर्व मग आपण अन्न खाई। रघुवीर चरित्रें ती रात्रिस गाई॥ ३

यात्रेकऱ्याला वाटी पंचेजोडे। कोणास आंगरखे कोणास धोतर-जोडे। कोणास दुशाला कोणास बटू घोडे। गवयास मिळावे सुवर्णकंठी तोडे। + + + + + + + + +। घाली गिऱ्याशाचे पायांत बेड्या खोडे॥ चाल॥ बांधिले घाटमठ फार। कुठे शिवास संतत धार। कुठें वनांत पाणी गार॥चाल॥ त्यासाठीं मुशाफर कायें धांवत जाई। विश्रांत पावती पाहुन आमराई॥ ४

किती ग्रहणसंधींत तिलतुला त्या केल्या॥ कधीं कनक रौप्य आणि कधीं गुळाच्या भेल्या॥ सांभाळ करून काशीस यात्रा नेल्या। कावडी शतावधि रामेश्वरीं गेल्या। संसारीं असुन तिच्या वासना मेल्या। तिजपुढें सहज मग

स्वास्थ्ये—स्वास्थ्य—नेमणूक, पेन्शन. **क्षणमात्रें**—ताबडतोब. **दुशाला**—A humble shawl शालजोडी. **बटु बट**—पु. लहान पण, बळकट शिंगरू, तट्टू, A strong and well made kind of pony. **गिराशी**—पु. गुजराथी दरोडेखोर (डोंगरांतला). **गुळाच्या भेल्या**—भेली, भेला–ढेप, रास. कधीं सोन्याच्या कधीं रुप्याच्या, कधीं गुळाच्या ढेपांच्या तुला केल्या. ऐपतीप्रमाणें वाटेल त्या पदार्थाची तुला करतां येते. **संभाळ करून काशीस यात्रा नेल्या**—पूर्व काळीं काशीयात्रा करणें, प्रवासाच्या अडचणीमुळे फार कठीण असे. वाटेंत चोऱ्या, लूटमार यांची भीति. तसेंच निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळे संस्थानिक यामुळे दस्तकें मिळवावी लागत व ते सामान्य मनुष्यास कठीण. यामुळे एखादा श्रीमंत किंवा सरदार मनुष्य काशीयात्रेस निघे तेव्हा त्याच्याबरोबर अनेक गरीब किंवा मध्यम लोक सोबतीने आपली यात्रा उरकीत. मोठ्या सरदाराची यात्रा म्हणजे सैन्य, बाजार, वैद्य वगैरे सारी सोय असे. वाचकांनीं खरे शास्त्र्यांनी आपल्या ऐतिहासिक लेख संग्रहांत गोपाळराव पटवर्धनांची बायको सरस्वतीबाई हिच्या काशीयात्रेसंबंधानें अनेक पत्रें छापिलीं आहेत तीं किंवा पेशवे दसरांत पेशवे कुटुंबांतील स्त्रियांच्या


मुक्ति उभ्या ठेल्या ॥ चाल ॥ कवि गंगु हैबती म्हणती पुण्याची कोण करील गणती। राज्यास होती पडपण ती ॥ चाल ॥ महादेव गुणीचें लक्ष तिचे पाई। कवनांत प्रभाकर करितसे चतुराई ॥ ५

काशीयात्रावर्णनांचीं पत्रें छापिलीं आहेत तीं पहावीत. पडपण, पडप--स्त्री-शोभा श्रृंगार, आवरण, प्रतिष्ठा. पडप म्हणजेच पडपण. भावार्थ--अहल्याबाई मराठेशाहीस अलंकारासारखी होती.

धुळपांचे पोवाडे

धुळप मंडळी प्रथम आंग्रयांच्या पदरीं आरमारांत सरदारकी करीत असत. १७५५-५६ सालीं पेशव्यांनी आंग्रयांविरुद्ध मोहीम केली, व तुळाजी आंग्र्यास दस्त करून त्याचा नायनाट केला त्या वेळेपासून धुळप मंडळी पेशव्यांच्या लगामी लागली. उदगीरच्या मोहिमेस भाऊसाहेब पेशवे निघाले त्यावेळीं त्यांनी स्वारीसाठीं रुद्राजी धुळप व जानोजी धुळप यांना जमावानिशीं बोलाविलें होतें असें पेशवे दप्तर भाग ४५ पृ. ९९ च्या वरील ३ डिसेंबर १७५९ च्या नोंदीवरून दिसतें. त्याच नोंदीवरून त्या सालीं विजयदुर्गचा सुभा नारो त्र्यंबक होता असेंही कळतें.

नारो त्र्यंबकानंतर विजयदुर्गचा आरमारी सुभा धुळपाकडे गेला. पाहिला सुभेदार रुद्राजीराव धुळप होता. १७६३ सालीं त्यानें हैदराच्या होनावर बंदरांत पेशव्यांचें आरमार उतरून तेथें हैदरास पुष्कळ त्रास दिला. रुद्राजीरावाचा सुभा १७७० सालीं निघाला. या रुद्राजीरावाचाच मुलगा सुप्रसिद्ध आनंदराव धुळप. हा पुढें १७९५ सालापर्यंत विजयदुर्गच्या पेशव्यांच्या आरमाराचा मुख्य सुभेदार होता. आनंदराव धुळपाबरोबर त्याच्या घरांतले दहापांच पुरुष मदतीस असत व तेहि सर्व नामांकित योद्धे होते. त्यांपैकींच हरबाजीराव व जानराव होत.



६ जून १७६३ रोजीं माधवराव बल्लाळ पेशव्यानें आनंदराव धुळपास ताबडतोब कांहीं जमाव साताऱ्यास पाठविण्याविषयीं सक्तीचें एक पत्र लिहिलें आहे. त्यांत तो म्हणतो "लोकांबरोबर सरदार असेल त्याचें आज्ञेंत लोक चालले पाहिजेत याकरिता तुमचे चुलते तिघे आहेत, त्यांतून येक जणांनी लाकांबरोबर यावें" (पे. द. भाग ३८, प. नं. १३१)

पत्रांत उल्लेखिलेले तिघे चुलते म्हणजे कृष्णाजी, जानराव व भगवंतराव हे होत.

४ जानेवारी १७७५ रोजीं आनंदराव धुळपानें लिहिलेल्या पत्रांत तो, कृष्णाजी, जानराव व हरबाजीराव या तिघांना तीर्थरूप लिहितो. वंशवेलावरून कृष्णाजी व जानराव त्याचे चुलतेच आहेत. हरबाजीराव मात्र त्याचा चुलतभाऊ होय, पण अर्थातच वरील पत्रावरून तो वयाने वडील असला पाहिजे. ११ डिसेंबर १७७४ च्या पत्रांत जानराव धुळप कृष्णाजीचा तीर्थरूप असा उल्लेख करतो त्यावरून त्यांपैकी लहानमोठा कोण तें कळतें.

हरबाजी हा आनंदराव धुळपाचा चुलतबंधू. मोठा पराक्रमी पुरुष होता. त्याच्यासंबंधीं ऐतिहासिक कागदपत्रांत फारशीं समकालीन पत्रें अद्याप उपलब्ध झालेलीं नाहीत. बारकाईनें पोवाडा वाचून पाहतां तो पूर्ण विश्वसनीय माहिती देणारा दिसतो. बापू गीरकर या धुळपाच्या आश्रयास असलेल्या दरबारी शाहिरानेंच तो रचलेला आहे. सदर पोवाड्यांत हरबाजीरावाच्या चेहऱ्यामोहऱ्याचें, स्वभावाचें व पराक्रमाचें सुंदर शब्दचित्र काढलें आहे. जयगडच्या बाऱ्यावर इंग्रज आरमाराशीं झालेल्या लढाईचें वर्णन, कोंकणांतील दुष्काळाच्या वेळीं हरबाजीरावानें दाखविलेलें औदार्य इत्यादी माहिती इतिहासदृष्ट्या उपयोगी आहे. पोवाड्यांत शेवटीं हरबाजीच्या मृत्यूचा काळ तिथीमितीवारासुद्धां तपशीलवार दिला आहे. त्यावरून तो ता. १४ डिसेंबर १७९५ रोजीं वारला हें कळतें. भारत वर्षांतलि पंतप्रधान यांच्या दुसऱ्या शकावलींत 'सीतातिस्सैन मया व अलफ ११९६ यासालीं छ १ जमादिलाखर हरबाजी धुळप मेले' अशी नोंद आहे. त्याची मुकाबल्याची तारीख जंत्रीवरून १३-१२-१७९५ येते, अर्थांत वार चुकतो. सोमवाराऐवजीं रविवार येतो. तथापि मोडक जंत्रींत एक दिवसाची चूक बऱ्याच वेळां होते. पोवाड्यांत वार, तिथी, शक

व्यवस्थित दिले असल्यामुळें त्यावरून येणारी इंग्रजी १४ डिसेंबर हीच तारीख खरी मानली पाहिजे. पोवाड्यांत वर्णिलेल्या गंगावतरणाच्या उल्लेखाला राजापुर गंगामहात्म्यांतही प्रत्यंतर मिळालेलें आहे.

या पोवाड्याच्या दोन प्रती उपलब्ध आहेत. एक शितूतांच्या पुस्तकांतील व दुसरी दळवी यांच्या मराठा कुळांच्या इतिहासांतील. त्यांतील पाठभेदांचा तक्ता पुढीलप्रमाणे—

शितूत प्रत	दळवी प्रत
१ हट्टी मूर्त गोमटी	१ हटी मूर्त गोमटी
२ वक्र भयासूर	२ वक्त्र भयासूर
३ वीर मारुती बीर उदार	३ वीर मारुती वीर उदार
४ तुरा शोभतो	४ उरा शोभतो
५ घोडा अचपट होता	५ घोडा अचाट होता
६ मनवर येती	६ मजवर येती
७ तुटून हे पडले	७ उठून हे पडले
८ आडास आले	८ आडस आले
९ मोठी झीमाझीम झाली	९ मो-कीमा झीम झाली
१० रागे न फिरे मागे काय अनर्थ घडले !	१० रागे न फिरे मागे काय...... घडले !
११ सत्यसाच्या	११ ससाच्या
१२ आहाट करिती	१२ आहा करिती
१३ भाव पाहुनी धावे	१३ भाव वाहुनी थांबे
१४ जाया भंगासी घरें सुन	१४ जाया भंगासी घरें सुनी
१५ तुटे आयुष्य उठे सोडी हरबाजीराव प्राण	१५ कुटे आयुष्य उटे सोडी हरबाजीराव प्राण

हरबाजीराव धुळपांचा पोवाडा

१९

(शाहीर बापू गींरकर)

पुण्यप्रतापी धन्य जगामधि धुळप राव हे कीं ।। रणबाहादूर हरबाजीराव थरथराट जनलोकीं ।। ध्रुवपद ।।

हटी मूर्त गोमटी भोळेशंकर बोलण्यांत ।। वक्त्र भयासूर पाहतां कंप भरे शरीरांत ।। धुंद कैफमें बुद्धी अकडबाज शोभिवंत ।। दिसे सांवळी तनू दोंद गणपतीचें दिसण्यांत ।। बीर मारुती वीर उदार कर्ण तसे देत ।। कडक स्वारी तडक जिलेबी चाले यशवंत ।। तुरा शोभतो कुरा जयाची मोठी दहशत ।। साहाकारी आनंदराव मर्यादा पाळीत ।। भैरी भूपाळ गैर भाषणें सोय लाविती कीं ।। रण० ।। १

रंग विलासी दंग इमानी खातर धन्याची ।। ऐका श्रीमंताचा घोडा अचाट होता ।। धनि ऐकती कर्णीं कीर्ति बसणार रावजीची ।। बडा खंकाळ

थरथराट—थरकांप. **हटी**—निग्रही. (आटीव तर नव्हे) आटीव—कसलेली. **भयासूर**—भयंकर, उग्र. **दोंद**—पोट. **वीर मारुती**—मारुतीप्रमाणें शूर. ‘ दास मारुती ’ ‘ वीर मारुती ’ असे मारुतीच्या ध्यानाचे प्रकार आहेत त्यापैकी वीर मारुतीप्रमाणे उग्र. **बीर**—हिं. A hero **तसे देत**—उदार, दानशूर. कर्णासारखे दाते आहेत. **जिलेबी**—परिवार. **कुरा कुर्रा**—नखरा, अक्कड. तुरा मोठा अक्कडबाज दिसतो. **साहकारी**—साहाय्यकारी. **भहिरी भुपाळ गैर इ. भहिरी**—शूर. **गैर**—गैर, याचा कोशांत सांपडणारा अर्थ घेऊन जुळत नाहीं. तो शब्द गैर नसून गौर असा असावा. गौर या शब्दाचा अर्थ खोल व पूर्ण विचार, काळजी असा आहे. (पट.) येवढे आनंदराव धुळप तेही त्यांची मर्यादा पाळतात व भहिरी भूपाळ इ. मोठे मोठे रणशूर राजे महाराजेही त्याच्याशीं फार काळजीपूर्वक विचार करूनच बोलतात. किंवा गौरवपूर्वक बोलून आपापलीं कामें साधून घेतात. **भाषणें सोय लाविती की**—सोय लावणें मतलब साधणें; काम करवून घेणें. **रंग विलासी दंग**—इ० हरबाजीराव रंग विलासांत दंग होते तरी धन्याशीं पूर्ण निष्ठावंत होते अशी धन्याची खातर इ. खातरजमा होती. **श्रीमंतांचा**—पेशव्यांचा. **अचाट**—प्रचंड, उत्छृंखळ (अचपट शितूतप्रत). **कीर्ति बसणार राव-**

घोडा त्यावर उडून बसले जी ॥ दिला सपाटा त्या घोड्याचीं खोड मोडली जी ॥ ख्यात जयाची विख्यात निशा जाहली खावंदाची ॥ शिरपेच घोडा बक्षिस दिला तेधवां जी ॥ भगवंताचे लाल खरे सर्व मानिती कीं ॥ रण० ॥ २

बाहादूर हे पाहा यशस्वी जरीपटका झुले ॥ जयगडच्या बाऱ्यावर मनवर येती मुंबईवाले ॥ जोर इंग्रजी थोर अंगावर तुटून हे पडिले ॥ नांगर सोडूनी खासे झुजासाठीं आडीस आले ॥ भांडी पेटविता सांडी गर्भ साठांचे गोळे ॥ मोठी झीमाझीम जाहाली कडाड तोफांचे सुटले ॥ रागें न फिरे मागें काय अनर्थ घडले ॥ पटपट मुडदे पडतां मनवर निघूनियां गेले ॥ अशा किती एक गलिमा मारूनी हटविती कीं ॥ रण० ॥ ३

जीत देवही भीत वृत्तांत ते गंगेवरचा ॥ आली नव्हती गंगा कुंडामध्ये सत्य साच्या ॥ आहाट करिती बोभाट ब्राह्मण वेदघोष त्याचा ॥ जय मातोश्री गंगा उपाय हरे सकळांचा ॥ जसा भगीरथें सहास करार

जं.ची—हरबाजी घोड्यावर बसण्यांत फार तरबेज आहेत असा लौकिक. उत्तम चाबुकस्वार आहेत असा लौकिक. **खंकाळ**—उच्छृंखळ. **सपाटा**—तडाखा. **ख्यात**—कीर्ति, आख्या. **निशा**—खात्री. **खावंदाची**—पेशव्यांची. **बाऱ्यावर**—बारा–The space opposite or contigious to the mouth of a harbour, or any particular position of a coast. The word often answers to offing (मोल्स). **मनवर**—(Man of war) एक लढाऊ जहाजाचा प्रकार. **भांडी**—तोफा. **गर्भ साठांचे**—गर्भछाटांचे. गर्भछाटी हा एका आरमारी बंदुकीच्या गोळ्यांचा प्रकार आहे. (मराठ्यांचें आरमार पारसनीस) गर्भसाठ किंवा गर्भछाट हा ग्रॅब शॉट या इंग्रजी शब्दाचा अपभ्रंश आहे. **झीमाझीम**—घनचक्कर. **गलिमा**—गलियां, गॅल्यॉ या शब्दाचा अपभ्रंश; ग्याली हा एक जहाजाचा प्रकार आहे. 'गलिमा' म्ह. 'शत्रूंना' असाहि अर्थ घेता येईल. **व्रतात**—वृत्तान्त. **आहाट**—आहट-गलबला, गोंधळ. हा हिंदी शब्द आहे. **आहाट**—हाच शब्द आट असाही वापरीत. आट किंवा आहाट ह्म. आकांत 'त्यांचे घरीं मुला माणसांचा उपोषणानें आट झाला.' (इ. सं. ऐ. स्फु. लें. पृ. १४). **सहास**—

केला शरीराचा ॥ नये माउली गंगा उपाय हरे सकळांचा ॥ त्या गायमुखा-खाली बसका रावजीचा ॥ म्हणती आता देणें लाभ तुझ्या दर्शनाचा ॥ वाहू लागल्याविना उठेना धट निश्चयाचा ॥ भाव पाहुनी धांवे गोमुखीं वाहे लोट गंगेचा ॥ केलें स्नान दक्षणा वाटती हर्षयुक्त ब्राह्मणांसीं ॥ धन्य धन्य अवतार मानिती आश्चर्य म्हणती हे आवतारी कीं ॥ रण० ॥ ४

राव साजते नांव जोडी हो रामलक्ष्मणा ॥ आनंदराव हरबाजीराव धुळप बंधु जाणा ॥ धन्यांनी जावे पुण्यास असें आले घडोन ॥ गेल्यावर दुष्काळ कोंकणीं पडला येवोन ॥ मेले कितीक गेले जाया भंगासी घरें सुन ॥ एक-निष्ठ पुण्याहुनी सहावें वर्षीं आले फिरोन ॥ जेव्हा पाहिली तेव्हा स्वारी गेली हौसेने ॥ धरोन आणिली बोट तांदूळ देती आनंदान ॥ चाल ॥ अन्नवस्त्र विपुल जाहलें दुष्काळ पळाला कीं ॥ रण० ॥ ५

वर्णितात हो करणी ज्याची श्रीमंत अझून ॥ सत्राशेंसत्रांत आलें घडोन ॥ तुटें आयुष्य सोडी हरबाजीराव प्राण ॥ मार्गशीर्ष शुद्ध तृतीया उत्तराषाढा जाण ॥ मृत्यु येई हा भृत्य शिवाचा सोमवार धन्य ॥ दोन प्रहरीं वैकुंठी आत्मा गेला निघोनी ॥ घोळंकार कल्होळ पडे आभाळ कोसळोनी ॥ दादा बापू काकी गेली मूर्च्छित होऊनी ॥ शुद्ध बुडाली बुद्ध मेरु तो गेला खचोनी ॥ मोठा आकांत झाला वाईट केले ईश्वराने ॥ जगांतील ही सर्व रडती बापू कष्टी जो की ॥ रण० ॥ ६

साहस; धाडस. **करार**—निश्चय. **करार केला शरीराचा**—शरीर अर्पण करण्याची प्रतिज्ञा केली. **नये माउली गंगा**—राजापूरच्या कुंडांत गंगा आली नाहीं. **बसका**—बैठक. **धट**—दृढ. **धन्यानी**—हरबाजीरावांनी. **जाया भंगासी**—जाया-निरुपयोगी; जायबंदी. भंगास किंवा भगास–उजाड किंवा उध्वस्त. भंगसाळ–भयाण वाडा, भंगासी--हें घराचें विशेषण; जाया हें लोकांचें विशेषण. **फिरोन**—माघारे. **वर्णितात**—वानितात; स्तुति करतात. **तुटे**—खुटे, खुंटे असें तर नव्हे ? **भृत्य शिवाचा**—शिवभक्त, या शिवभक्ताला सोमवारींच मृत्यु आला तेव्हा तो धन्य. **भृत्य**—किंकर, सेवक. **घोळंकार**–गोंधळ, कल्होळ (मोल्स.) **बुद्ध मेरु**—बुद्धीचा महामेरु.

सवाई जानराव धुळपाचा पोवाडा

या पोवाड्याच्या दोन प्रती उपलब्ध आहेत. पहिली प्रत शितूत यांच्या पोवाड्यांच्या संग्रहांत छापलेली व दुसरी प्रत गोपाळ दाजीबा दळवीकृत मराठा कुळांचा इतिहास या पुस्तकांत छापलेली. हे दोन्ही पोवाडे एकाच दप्तरांतून म्हणजे विजयदुर्ग येथील धुळप इनामदारांच्या संग्रहांतील एकाच वहीवरून दोन्ही संपादकांनी उतरून घेतले; पण तरीही त्या दोघांच्या नकलांतून पुष्कळच अशुद्ध लेखन आणि त्यामुळें अपपाठ निर्मिति झाली आहे. त्याचा तक्ता पुढीलप्रमाणें—

शितूत प्रत	दळवी प्रत
१ संवाई जाणराव धुळप मोहरा विजयदुर्गाला । नित्य वाजतो चौघडा खाशा वाड्याला ॥ धृ. ॥	१ दळवी प्रतींत ध्रुपद दिलेलेंच नाही
२ या तळेराव कोंकणामध्यें आंगरा होता ।	२ या तळेकोकणामधि आंगरा होता जी ।
३ दुरून काय हवा दिसतो जंजिरा ।	३ दुरून कोट हा दिसतो जंजिरा जी ।
४ एक ख्याती केली	४ येक आखा केली
५ चोही बंदरीं धाक लाविला	५ चोही बंदरीं घाला लाविला
६ पुढें चालती बैराग जरीपटका.	६ पुढें चालती बैरागी जरीपटका
७ हरबाजीराव हे कुळीं दीप लागला	७ हरबाजीरावाचे कुळीं दिप लागला

या दोन प्रतींची तुलना करून बरे वाटले ते पाठ स्वीकारून पोवाडा नकलून पुढें दिला आहे.

सवाई जानराव धुळपांचा पोवाडा

२०

(शाहीर—बापू गीरकर)

सवाई जानराव धुळप मोहरा विजयदुर्गाला जी ॥ नित्य वाजतो चौघडा खाशा वाड्याला जी ॥ धृ. ॥ या तळे कोंकणामधि राव आंगरा होता जी ॥ त्याणें विजयदुर्गाचा पाया घातला जी ॥ ह्या कणक्या गोव्या प्रति सारंग दुर्गाला जी ॥ दुरून कोट हा दिसतो जंजिरा जी ॥ १

ह्या किल्याची सांगतो मात घ्या ऐकून जी ॥ हा विजयदुर्ग पिंजरा दिसे त्रिभुवनी शोभिवंत जी ॥ अेक अख्या केली रुद्राजीराव धुळपाने जी ॥ चोहीं बंदरी धाक लाविला भल्या मर्दाने जी ॥ २

रामलिंगाची दया धुळपरायाला जी । त्याने आरमाराचा सुभा दिला

सवाई जानराव—एकाच नानांचीं दोन माणसें एकाच वंशांत झालीं म्हणजे खालच्या पिढींतील त्या नांवामागें सवाई हें उपपद लावण्याची पद्धती असें. जसे माधवराव, सवाई माधवराव, जनकोजी, सवाई जनकोजी. दुसऱ्या बाजीरावालाहि सवाई बाजीराव असें क्वचित म्हणत असत. जानरावाच्या आजाचें नांव जानरावच होतें म्हणून त्याला सवाई जानराव म्हणू लागलें. इंग्रजींत एडवर्ड दि फर्स्ट किंवा एडवर्ड दि सेकंड असें म्हणण्याचा प्रघात आहे. तसाच हा इकडला देशी मराठी प्रघात होता. **ह्या कणक्या गोव्या इ.**—आंग्ऱ्यांने विजयदुर्गाप्रमाणेच कनकदुर्ग, गोवागड, सारंगगड वगैरे किल्लेही बांधिले. **कोट हा—जंजिरे** विजयदुर्गाचे कोट. **मात**—ख्याती, वैशिष्टय. **पिंजरा**—श्रीयुत ना. गो. चापेकर यांनी श्रमपूर्वक जमविलेल्या नाविक शब्दकोशांत पिंजरी म्हणजे बावटा उभारण्यासाठी केलेली चौकट असा अर्थ दिलेला आहे. पोवाड्यांतील पिंजरा व ही पिंजरी एकच होत. भावार्थ, विजयदुर्गाच्या किल्ल्यावरून फडफडणारा आंग्ऱ्यांचा झेंडा लांबवर दिसून येई. **अख्या**—ख्याती, कीर्ति. **रुद्राजीराव**—हा आनंदराव धुळपांचा बाप. १७५६ सालीं तुळाजी आंग्ऱ्यांस बुडविल्यावर कांही दिवसांनी पेशव्यांनी रुद्राजी धुळपासच विजयदुर्गचे आरमारी सुभेदार नेमले. **रामलिंग**—धुळपांचें

तयाला जी ॥ पुढे चालती बैरागी जरीपटका आघाडीला जी ॥ दोन ढाला शिरी बांधिला मंदिल जरी पटका जी । डोईवर छत्र दिसे राज मोहरा जी ॥ असा रामलक्ष्मणाचा जोडा दोघांचा जी ॥ ३

हरबाजीरावाचे कुळीं दीप लागला असे जी । जसे काशीमध्यें सूर्यबिंब उगवला जी ॥ त्यानें आरमाराचे तोफेचा भडिमार केला जी ॥ लोकाला साखर वाटली आनंदानें जी ॥ बाप गीरकर शेवक गातो सभेला जी ॥ डफावर लाविला कलगी भगवा फरारा जी ॥ ४

कुलदैवत. **बैरागी**—बैरखी असे पाहिजे. मूळ शब्द अरबी, बैरक असा आहे. त्याचा अर्थ निशाण किंवा झेंडा. **जरीपटका**—जरीपटक्याचें निशाण. हें निशाण छत्रपतीकरितां म्हणून पेशव्यांनी प्रत्येक सरदारास एकेक स्वतंत्र दिलेलें असे. याखेरीज प्रत्येक सरदाराचें स्वतःचें म्हणून स्वतंत्र निशाण असेच. **ढाला**—मूळ शब्द ढाल–निशाण "मोंगलावर दिल्यारे ढाला पुण्याबाहेरी". **मंदिल जरिपटका**—भरजरीचा मंदील म्हणजे रुमाल. **राजमोहरा**—राजबिंडा. **रामलक्ष्मणाचा जोडा**—आनंदराव धुळप व त्याचा चुलत भाऊ हरबाजी धुळप. **कुळीं दीप लागला**—हरबाजीरावास पुत्ररत्न झालें. **जसें काशीमध्यें सूर्यबिंब उगवलाजी**—जसें आकाशामध्यें सूर्यबिंब उगवलेंजी असा मूळ शुद्ध पाठ असला पाहिजे, **तोफेचा भडिमार**—पुत्रजन्मोत्सवानिमित्त तोफा सोडल्या. **भगवा फरारा**—भगवें निशाण.

गायकवाडांचे पोवाडे

ऐतिहासिक माहिती

या पोवाड्यांत पुणें आणि बडोदे याची गमतीदार तुलना अनंतफंदीने करून दाखविली आहे. साम्य शोधण्याच्या भरांत कित्येकवेळां त्याच्या हातून अनुचितपणा वा अतिशयोक्तीही झाल्यासारखी कोणास वाटेल. उदाहरणार्थ–" इकडें नाना फडणीस तिकडे सिताराम दिवाणगाजी " तथापि एकंदरींत शाहिराने साम्य मोठ्या मजेदार तऱ्हेनें दाखविलें आहे. एके ठिकाणी " इकडे माती तिकडे रेती। हाच फेर जमिनी माजी " असें सांगितलें आहे तें वाचून मात्र हंसूं आल्याखेरीज राहणार नाहीं ! मेघडंबरीबाबत मात्र अगदी पुणें-बडोद्यांत तंतोतंत साम्य आहे एवढे खरे. नाना फडणविसांनी सवाई माधवरावासाठीं मेघडंबरी नांवाची एक सुंदर इमारत बांधविली होती बडोद्यांतही मेघडंबरी याच नावाची एक इमारत आहे.

सयाजीराव गायकवाड हे गोविंदराव गायकवाड यांच्या चौथ्या स्त्रीचे पुत्र. यांचा जन्म बडोदें येथे वैशाख शु. ९ संवत् १८५६ रोजीं झाला. यांच्या जन्मानंतर पांचसहा महिन्यांतच त्यांचे वडील वारले. नंतर त्यांचे सापत्न वडील बंधु आनंदराव गादीवर आले. आनंदरावाचे धाकटे बंधु फत्तेसिंगबाबा यांस इंग्रजांनी पुण्याहून सोडवून आणून त्यांना प्रतिनिधि नेमलें; व त्यांच्या नांवाने कारभार चालू केला. आनंदरावाचा कारभार कुलमुखत्यारीने पाहणाऱ्या फत्तेसिंग बाबाकडेच राजपद जाणार हें ठरलेलें होतें. फत्तेसिंगबाबा तडफदार व कर्ते होते. दहाबारा वर्षे त्यांनी प्रतिनिधिपद संभाळलें. पण दुर्दैवाने वयाच्या बावीसाव्या वर्षी ता. २३ जून १८१८ रोजीं ते एकएकी मृत्यु पावले. (Historical selections from Baroda State Records Vo. 5) " यादी चिरंजीव फत्तेसिंगराव गायकवाड यांचा ज्येष्ठ व॥ ५ मंगळवारी छ १८ माहे शाबान सन तिसा आशरचे तेरखेस काल झाला, [२३-६-१८१८] नंतर कारभाराची वस्त्रे चिरंजीव रा. सयाजीराव गायकवाड यांस दिली. मितीं छ १४ रमजान आषाढ व॥ २ [१९-७-१८१८] [बडोदे राज्य दप्तरांतील ऐतिहासिक वेचे खंड ५ नंबर १८२]

फत्तेसिंगाच्या मृत्यूनंतर प्रतिनिधिपदाकरिता सयाजीरावाखेरीज दोन नवे हक्कदार पुढे आले; एक फत्तेसिंगबाबाच्या ज्येष्ठ पत्नीने दत्तक घेतलेला पोरवयी गोविंदराव व दुसरा आनंदरावाच्या तक्ताबाई नांवाच्या उपस्त्रीचा मुलगा बलवंतराव. पण इंग्रज सरकाराने सयाजीरावासच प्रतिनिधिपद दिलें. पुढल्याच वर्षी आनंदराव आपल्या व्यसनांत निमग्न असतां ता. २ ऑक्टोबर रोजीं कैलासवासी झाले व ओघानेच सयाजीरावास राजपद मिळालें. २८ वर्षे राज्य करून ता. २७ डिसेंबर १८४७ रोजीं सयाजीरावांचे देहावसान झालें.

फत्तेसिंग गायकवाडांचा पोवाडा

२१

(शाहीर—अनंत फंदी)

पुण्यांत बाजीराव बडोद्यामध्ये फत्तेसिंग महाराजे। उदार स्वामी सेवक त्यांना कर्णाची उपमा साजे ॥ ध्रु. ॥

इकडे अमृतराय वडील तिकडे बाके आनंदराव दादा। इकडे प्रभु बाजीराय तिकडे फत्तेसिंग साहेबजादा। इकडे अप्पासाहेब तिकडे महाराज सयाजी उमदा। इकडे पांच–चार वाडे तिकडेही तसाच महाल जुदा ॥ इकडे स्वामी चाकरीस पलटणें तिकडे सेवक इंग्रेज ॥ पुण्यांत० ॥ १

इकडे स्वार शिपाई तिकडेही तसेच थोडेबहुत । इकडे श्रावण मासीं दक्षिणा तिकडेही धर्म होत । इकडे आल्यागेल्याचा आदर करितात यथास्थित श्रीमंत । तिकडेही जो आला कुणि जन तो नाही गेला रिक्तहस्त । इकडे पेशवे तिकडे गायकवाड उभयतां शिरताज ॥ पुण्यांत ० ॥ २

इकडे भरगच्ची पांघुरणें तिकडेही याहून चढी। इकडे अन्नशांतीचा तडाखा तिकडेही चालू खिचडी । इकडे आदितवार बुधवार तिकडे मांडवींत घडामोडी। इकडे मुळामुठा तिकडे विश्वामित्रा जोडी जोडी। इकडे तलाव पर्वतीचा तिकडे सुरसागर नांव गाजे ॥ पुण्यांत० ॥ ३

साहेबजादा——राजपुरुष. पांच चार वाडे—पांच चार स्त्रिया.श्रीमंत किंवा सरदार लोकांच्या बायकांचा वाडा पहिला, वाडा दुसरा असा उल्लेख करितात. महाल याचाही अर्थ राणी असा होतो. महाल पहिला महाल दुसरा असेंहि राजांच्या राण्यांचा उल्लेख करितांना म्हणतात. ‘वाडे’ म्हणजे राजवाडे असा अर्थ घेतला तरीहि शोभेल. कारण बाजीरावाचे शनिवार, शुक्रवार, बुधवार, विश्रामबाग असे चार राजवाडे होतेच. जुदा—वेगळा, निराळा, पलटणें—इंग्रज पलटणें. इंग्रजांशीं झालेल्या तहामुळें पदरीं बाळगावीं लागलेली इंग्रज पलटण शिरताज—शिरोलंकार, शिरोभूषण, मुकुटमणी. पांघुरणें—पोषाक, वस्त्रें, अर्थात् श्रीमंत पेशव्यांनीं दिलेलीं किंवा देतात तीं. याहून चढी—याहून सरस. मांडवींत घडामोडी—मांडवी ही प्रसिद्ध व्यापारी पेठ. तेथें

इकडे भूमीवर आंथरूण तिकडे रेतीमुळे घरोघर खाटा । इकडे पैका पुष्कळ तिकडेहि सुवर्णाच्या लाटा । इकडे जुना वाडा तिकडे लहरीपुऱ्याचा बोभाटा । इकडे पुरणवरण तिकडे चुरमा क्वचित वरंटापाटा । इकडे पैठणी लफ्फे तिकडे उशाजवळ अमदाबाज ॥ पुण्यांत० ॥ ४

इकडे हत्ती--घोडे--पालख्या तिकडेहि कमती नाही । इकडे रावबाजी तिकडे फत्तेसिंगाची द्वाहीदुराई । इकडे जोगेश्वरी तिकडेही दैवत बेचराई । इकडे देवस्थानें तिकडेही तशींच सांगू काई । इकडे लोक दाक्षिणी तिकडे गुजराथी न्यारी मिजाज ॥ पुण्यांत ० ॥ ५

इकडे उत्साह गणपतीचा तिकडे तशीच चंपाषष्ठी । इकडे हरदासांच्या बिदाग्या तिकडे तशाच भरमुष्टी । इकडे मेघडंबरी तिकडेही तशीच

इकडच्या रविवार–बुधवारसारखी घडामोड चालते. **लाटा**—चिपा. **इकडे जुनावाडा**—शनिवारवाडा असावा. जुनावाडा म्हणण्याचें कारण दुसरा बाजीराव शनिवारवाड्यांत राहात नसे. **लहरी पुरा**—रावजी आप्पाजीचें पत्र. १७ डिसेंबर १८०२. "प्रातःकालापासून इंग्रजांनी तोफ मारिली नाही. अरबांनी लहरीपुरावरील तोफ सोडितात. माणसें इंग्रेजांची फार बंदुखीच्या गोळीनें जखमी होतात. (बडोदें राज्यांतील ऐतिहासिक वेंचे खंड ४ पत्र नं. ५८.) **चुरमा**—चुटिया चुरमा--खुसखुशीत इरोळया चुरून त्यावर तूपसाखर वर घालून केलेला लाडू. **क्वचित् वरंटापाटा**--लाडू हेंच मुख्य पक्वान्न असल्यामुळें पुरणाप्रमाणें पाटा–वरवंट्याचें क्वचित्च काम पडावयाचें. **लफ्फा**—Gold or silver cloth (Mols). **तिकडे उशाजवळ अमदाबाज**—इकडे ज्याप्रमाणें पैठणचे लफ्फे आहेत त्याप्रमाणे तिकडे बडोद्याजवळ अहमदाबादचें कापड प्रसिद्ध आहे. **दुराही किंवा दुराई**—दवंडी, ग्वाही, ताकीद. **काई**—किती **न्यारी मिजाज**—येथे मिजास या शब्दाऐवजीं चुकीने मिजाज शब्द पडला असावा. मिजास – डौल, ऐट; मिजाज– प्रकृति. **भरमुष्टी**—बडोद्यातील देकारापैकीं एक प्रकार **मेघडंबरी**—The main

पहा जा दृष्टी। इकडे ओंकारेश्वर तिकडे मुक्तेश्वर नवीच सृष्टी। इकडे दिग्गज पाहिलवान तिकडे जेठी कुस्त्या रोज ॥ पुण्यांत० ॥ ६

इकडे नाना फडणीस तिकडे सिताराम दिवाण गाजी। इकडे पंत सदाशिव तिकडे शास्त्री गंगाधर दाजी। इकडे बागमळे तिकडेहि हरजिन्नस होती भाजी। इकडे माती तिकडे रेती, हारफेर जमिनी माजी। इकडे हौद पाण्याचे तिकडे कुव्यावर मोठी मौज ॥ पुण्यात० ॥ ७

इकडे राव बाजी पंढरीस आषाढी यात्रे जातात। तिकडे विसा कोशांवर ठाकुरजी पंढरीनाथ। इकडे गंगा जवळ तिकडेही तसेच रेवा-तीर्थ। इकडे तसाच तिकडे घटाव दोन्हीकडला यथार्थ। इकडे कडे न तोडेवाले तिकडेही तशीच लहज। इकडे आनंदफंदी तिकडेही जाऊन आला सहज ॥ पुण्यांत ॥ ८

---

building of the शनवारवाडा consisted of the six storeys and it is said that the spire of the Alandi temple could be seen from the upper-most terrace of this building. Sawai Madhavrao Peshwa used to enjoy a beautiful view of the Parvati Temple and of the city from the terrace of his मेघडंबरी room and often spend evening hours looking at the stars in the sky through a telescope which was presented to him by Charles Malet." (Poona in Byegone days Page 4.)

पहा जा दृष्टि—आपल्या डोळ्याने पाहून खात्री करून घ्या. पंत सदाशिव—सदाशिव माणकेश्वर हारफेर—'हाच फेर' पाहिजे. मोडींत च आणि र यांचा घोटाळा होतो. तथापि 'हारफेर' असाहि शब्द आहेच त्याचा अर्थ फरक. कुवा—आड, विहीर. घटाव—घटना. यथार्थ—एकसारखा. न—आणि.

थोरले सयाजीरावांचा पोवाडा

२२

(शाहीर—प्रभाकर)

धनी सयाजी महाराज धुरंधर भाग्यवान भूपती । स्त्रियापुत्रसहवर्तमान ते भोगितात संपती ॥ ध्रु० ॥

प्रौढ प्रतापी शाहू छत्रपति सिंहासनीं सुंदर । सभोंवताले सरदार शूर मध्ये आपुण पुरंदर । प्रांत परगणे गांव ज्यांनी सोडविले गिरिकंदर । सरंजाम ते तयास दिधले जहागिर एकंदर । फौजबंद गायकवाड सेनापती समशेरबहादर । वंशध्वज त्या वंशीं जन्मले हे स्वकर्मीं सादर ॥ (चाल) ॥ महाराज सयाजी मणी लालसा ॥ करी प्रकाश कुळीं दिनमणी फारसा ॥ देई चिंतित चिंतामणी पहा कसा ॥ (चाल) ॥ तसा पुरुष ह्या दिसांत पाहतां नाहीं असा अधिपती ॥ जी सुपुत्र प्रसवली धन्य ती जननी धन्य ते पती ॥ १

निष्कलंक निर्दोष स्वामिनी करून पूर्वार्चन । प्रसन्न केला असेल मागिल जन्मि भाललोचन । पदोपदीं तो सांब म्हणुनि करी प्रसंगीं भयमोचन । धैर्यवान दृढ पिंड न बाधे पदार्थ होई पाचन ॥ लेजिम जोड्या जोरं कसुन खूप केलें बलसंचन ॥ सहस्रांत सौंदर्य गौरपण पीत जसें कांचन ॥

स्त्रियापुत्रसहवर्तमान इ० —सयाजीरावांना दोन बायका होत्या; शिवाय चार उपस्त्रिया होत्या. सयाजीरावांस दोन विवाहित स्त्रियांपासून सहा पुत्र व सहा कन्या व चार उपस्त्रियांपासून तीन पुत्र व दोन कन्या अशीं मिळून एकंदर सतरा अपत्यें होतीं. या सतरा अपत्यांपैकीं एकदोन खेरीजकरून बाकी सर्व अपत्यें त्यांच्या कारकीर्दींत हयात होतीं; आणि या प्रत्येक अपत्याचा वंशविस्तार त्यांच्या हयातींत झाला होता. तेव्हां कौटुंबिक सौख्यामध्यें मुख्य सौख्य जें गृहिणीसौख्य आणि अपत्यसौख्य त्यासंबंधानें सयाजी महाराज किती भाग्यशाली होते हें सांगणें नको (श्री. थो. स. म. च. भा. २ पा. ४९९ व ५०३). पुरंदर—देवेंद्र, इन्द्र. गिरिकंदर—भावार्थ किल्लेकोट. स्वकर्मीं सादर—कर्तव्यतत्पर. लालसा—लालासारखा, रत्नासारखा. फारसा—फार. पूर्वार्चन—

(चाल) ॥ पगडीस तुरा वांकडा, कांहीं जरा ॥ जेग्यास जडित आंकडा, गोजरा ॥ कानीं भिकबाळी चौकडा, साजरा ॥ (चाल) ॥ राजबीज फांकडा सुशोभित दिव्य शरीरसंपती ॥ गळ्यांत कंठ्या हार, कडीं करीं जडावाचीं तळपतीं ॥ २

मर्जी होइल त्या दिशीं स्वारी कुलतमाम श्रृंगारणें । पूर्व कधीं पश्चिमेस जाती मृगशिकारीकारणें ॥ भरपल्ला फेंकून अडचणींत घोडा ललकारणें ॥ स्वतां शिस्त बांधून गोळी हटकून ठीक मारणें ॥ भले लोक बोथाटी टाकितां वरचेवर वारणें ॥ मागे पुढे बाजूस हूल दावुन भाला फेकणे ॥ (चाल) ॥ सुती हात तिरंदाजीचा वाणितीं ॥ डाव दुसऱ्यावर बाजिचा, आणिती ॥ आला न्याय गरीब गाजीचा, छाणिती ॥

पूर्वजन्मांतील ईश्वराचें अर्चन, सेवा. **सांब**—[शालि० प्रतींत खांब असे आहे !]. **कांही जरा**—किंचित्. **जेगा**—पागोट्यावर बांधण्याचा एक रत्नालंकार (पट.). **गोजरा**—सुंदरा. **कुलतमाम**—सर्व. **भरपल्ला**—भरधाव. **ललकारणें**—थांबवणें, खडा करणें. **सिस्त**—निशाण, नेम [पट.]. **ठीक मारणे**—बरोबर, बिनचूक. **भले लोक**—शिलेदार. शालिग्रामांच्या पोवाड्यांत 'भील लोक' आहे. भल – मराठा शिलेदार [खरे]. भील शिलेदार 'भील लोक पागेचे भगवंतराव यांचेवर उठवले' [भा. व. पंतप्रधान बखर ६४] **सुती**—बिनचूक, कुशल. **वाणिती**—वानिती, कौतुक करतात. **डावा हात दुसऱ्यावर बाजीचा आणिती**—दुसऱ्यास हार खावयास लावतात. डाव दुसऱ्यावर बाजिचा, आणिती (शालिग्राम)–दुसऱ्यावर डाव आणतात; स्वतः विजयी होतात. **अन्याय गरिब गाजीचा**—गरीब लोक गाजीचा अन्याय (सयाजीरावाकडे) आणिती आणि ते तो छाणिती म्हणजे गरीब लोक वरिष्ठांनीं केलेले अन्याय सयाजीरावाकडे आणितात व ते त्याची छाननी करतात. भावार्थ-गरीब नवाजे आहेत. गरीब लोकांवर अन्याय होऊं देत नाहीत. **(२) आला न्याय गरिब गाजिचा छाणिती**—गरीब-श्रीमंतांचे जे कांही न्यायाकरिता दावे येतात त्यांची नीट छाननी

(चाल) ॥ खबरदार लिहिण्यांत कल्पना इतरांची अल्प ती ॥ समइं मुख्य जंद्राल पेचितां न गवसतां जल्पती ॥ ३

सर्व गोष्टींचा शोख जातिनें हुशार तर कुस्तिस ॥ दंडभुजा आटीव उमर रायाची तीस-पास्तिस ॥ तूपसाखर आणि कणीक उस चारुन आणुन मस्तिस ॥ साठमार चहूंकडुन खिजविती नित्य नव्या हस्तिस ॥ पहिलवान किती जेंठी येउन राहतात तेथें वसतिस ॥ खुराक उत्तम त्यास कारकुन वर बंदोबस्तिस ॥ (चाल) ॥ हें जाणुन कवीसागर, धांवती ॥ गुण सभेस नट-नागर, दाविती ॥ बक्षीस कडीं लंगर, पावती ॥ (चाल) ज्याकडे पाहती कृपादृष्टि तो करतिल लाखोपती ॥ सप्तपिढ्यांचें दरिद्र विच्छिन्न होऊन रिपु लोपती ॥ ४

भक्तजनाचें माहेर देशावर श्रीपंढरपुर ॥ याचकांस हें योग्य बडोदें सर्व क्लेश करी दुर ॥ नित्य उठुन वांटितात खिचडी ब्राह्मणही महामुर ॥ स्त्रिया-पुरुष मुली मुलांसकट शेर होतो भरपुर ॥ पुण्यवान गायकवाड जगतीं तळांत ते महशूर ॥ सर्व कनकमय लोक घरोघर निघे सोन्याचा धुर ॥

करतात. **खबरदार लिहिण्यांत कल्पना इतरांची अल्प ती**—लिहिण्यांत मोठे फर्डे आहेत व त्यांत इतरांनी सुचविलेला मजकूर नसतो. बहुतेक आपल्या बुद्धीनेच लिहितात. **समइं मुख्य जंद्राल पेचितां न गवसता जल्पती**—जंद्राल–जनरल पेचितां–अडचणींत कोंडतां. न गवसतां--न सांपडतां. जल्पती--उत्तरें देतात. समइं--वेळप्रसंगीं. **शोक**—आवड. **हुशार**—तय्यार. **आटीव**—कसलेले. **साठमार**—रमण्यांत हत्ती सोडून त्यांशीं लढणारा. **जेठी**—मल्ल. **गुण सभेस नट नागर दाविति**—नटनागर सभेस गुण दाखविती. सभेस–राजदरबारांत नट-नागर–कलावंत लोक. **समजून**—बुध्या. **लंगर**—मोत्यांचा सर (आपटे). **नित्य उठुनि वाटितात खिचडी इ.**—" फत्तेसिंगबाबा वारल्यावर प्रतिनिधिपदाचा अधिकार व आनंदराव वारल्यावर राज्यपदाचा अधिकार जो सयाजी महाराजांना प्राप्त झाला तें सर्व बेचिराजीच्या कृपेचें फळ असा त्यांचा पूर्ण ग्रह होता. त्यांची श्री. बेचाराई व बोलाई यांच्या ठिकाणीं इतकी भक्ति होती कीं त्यांचें तीर्थ घेतल्याशिवाय ते अन्नग्रहण

(चाल) ॥ जें देणें दिलें एकदां, योजुन ॥ तें परत न घेती कदां, समजुन॥ कोणी फंद करील जर कदां, माजुन ॥ (चाल) ॥ दर्शनास तो अयोग्य त्यावर विधिहरिहर कोपती ॥ अशा प्रभूच्या रक्षणार्थ उडी घाली म्हाळसापति ॥ ५

अहारे बडोदें शहर, कोट चौफेर काम मजबुत ॥ चार दरवाजे चार दिशांनां वर शिपाई कलबुत ॥ चोहों रस्त्यांवर दाट हवेल्या काय संगिन शाबुत ॥ मांडवींत मोहोरमांत जमती सर्व तिथे ताबुत ॥ अजब शहर वसविलें गिराशे करून नेस्तनाबुत ॥ बागबगीचे तलाव साहेब घेति हवा तंबुत ॥ (चाल) ॥ महा जागृत राजेश्वर, पावती ॥ संकटीं नीळकंठेश्वर, धांवती ॥ भुत वाटेस यवतेश्वर, लावती ॥ (चाल) ॥ बहुत उग्र नरसिंह समंधादिक थरथरकांपती ॥ प्राशन करितां तीर्थ हिमज्वर इतर रोग करपती ॥ ६

विठ्ठल-मंदिर सुरेख दुसरे देउळ बालाजिचें ॥ खंडेराव दक्षिणेस उत्तरपंथी बेचराजिचें ॥ भीमनाथ केदार राममंदीर रंगामेजिचें ॥ महाकाली भद्रेंत लक्ष्मी लक्षणीक मुख जिचें ॥ गोजिरवाणी सूर्त नांव

करीत नसत व तोच क्रम ब्राह्मणांच्या खिचडीसंबंधानेंहि ते पाळीत असत. (श्री. थो. स. म. च. पा. ८३८). **जर कदा मानून**—जर कदा माजून असें पाहिजे. माजून म्हणजे मत्त होऊन. **जर कदा**—जर केव्हां. **कलबूत**—अत्यंत दांडगा; राकट मनुष्य. **संगीन**—मजबूत, सुंदर, उत्कृष्ट. **गिराशे**- बंडखोर; दरोडेखोर. **नस्तनाबूत करणें**—नाश करणें. **इतर**—आणखी दुसरे. **विठ्ठलमंदिर**—"प्रसिद्ध विठ्ठलमंदिर तर त्यांच्या सापत्न मातोश्री गहिनाबाईसाहेब यांनी बांधलें आहे" थो. स. म. च. पा. १८९ "शहरांतील जुन्या वाड्याशेजारील सरकारी प्रसिद्ध विठ्ठलमंदिर हें गहिनाबाईचें चिरकाल स्मारक त्यांची आणि सयाजीरावाची धार्मिकपणाची साक्ष बडोद्यांतील सर्व आबालवृद्धांस प्रत्यहीं साक्ष देत आहे. (थो. स. म. च. पा. ८३८)." **बेचराजी**—"सयाजीराव राज्यावर बसल्यानंतर त्यांनी आपली उपास्य देवता जी श्रीबेचिराजी तिचें देवालय आठ हजार रुपये खर्च करून बांधिलें" (थो. स. म. च. पा. ८३८). **लक्षणीक मुख जीचें**—लक्षणहीना-

नारायण सुंदर जिचें ॥ कांही पुढें बाहेर महंमदवाडिंत घर काजिचें ॥ (चाल) ॥ किती धर्म हरीभक्तिचा, होतसे ॥ लल्लू पारख खुषवक्तिचा, दिसतसे ॥ सामळ सौदा नक्तिचा करितसे ॥ (चाल) ॥ दैवशाली गोपाळराव मैराळ राखिती पतीं ॥ खुशाल अंबईदास रतंजी असे कितिक धनपती ॥ ७

महाराजांचे आप्त आवंतर धारकरी बरोबर ॥ एकासारखे एक पांढरे करिती डौलडंबर ॥ घोरपडे उमराव लक्ष्मणराव कसुन कंबर ॥ मागें न फिरती रणांत पडल्या तुटुनी जरी अंबर ॥ मानसिंगराव शिर्के आणिक रघुनाथराव धायबर ॥ थोर कुळींचे मर्द राजे मंडळींत असे नंबर ॥ (चाल) ॥ मामांची मानमान्यता, चांगली ॥ करवितील दुर दैन्यता, लागली ॥ ही चौघांमध्यें धन्यता, वागली ॥ (चाल) ॥ भाऊ पुराणिक पूर्ण कृपेंतिल जे कारण स्थापिती ॥ मान्य पडे तें प्रभूस गुरुवर दया करी गोपती ॥ ८

च्या उलट ह्म० सुंदर, रम्य. हरिभक्ति—"हरि आणि भक्ति हे दोघे बंधु विशालाड वाणी जातीचे असून पुण्यास व्यापाराकरितां गेले. तेथे त्यांनी पेशवे दरबारांत प्रवेश करून घेऊन त्यांनीं लवकरच पेशव्यांची पोतदारी मिळविली त्यांनीं पोतदारीचा धंदा बरीच वर्षें इमानेंइतबारें केल्यामुळें पेशव्यांनीं मौजे कजापूर परगणे डभई हा गांप वंशपरंपरेने त्यांस इनाम दिला. नंतर त्यांनी बडोद्यास सराफी दुकान काढलें. पहिले सयाजीराव व फत्तेसिंगराव बडोद्यास गादीवर असतां त्यांस यांनीं मदत केली. यांची प्रतिष्ठा व व्यापार वाढला. त्यांनीं मुंबई, पुणें, नागपूर, ग्वाल्हेर, सुरत, पेटलाद, अहमदाबाद इत्यादि अनेक ठिकाणीं आपल्या पेढ्या स्थापिल्या. या दोघां बंधूंच्या नांवावरून त्यांच्या पेढीस हरिभक्तीची पेढी असें नांव पडलें. त्यांना पुत्रसंतान नव्हतें. फक्त सामळ, नंदलाल, व दुल्लभ असे तीन भाचे होते." श्री. थो. स. म. चरित्र पान ६१७–६१८. खुष वक्तीचा–खुश्वक्ति—आनंद; खुशाली भावार्थ-संतुष्ट; आनंदित; खुशाल. नक्तिचा सौदा—रोखीचा व्यवहार. डौलडंबर—ऐट; झोकनोक. लक्ष्मणराव—लक्षुमणराव घोरपडे. बरे—चांगले. नंबर—मान; आसन. ही चौघामध्यें धन्यता वागली—चारचौघांत (लोकांत) नांवलौकिक झाला किंवा होता किंवा आहे.

हस्तमुखें खावंद गादीवर बसून सोपस्कर ।। रुमाल चौरी वारितात वर भोंवते उभे किंकर ॥ नारायणराव दिवाण, भास्कर विठ्ठल जोडुन कर ॥ सदय हृदय शास्त्रज्ञ मुतालक मुख्य भिमाशंकर ॥ रामचंद्र विश्वनाथ फडणिस येती पुढें लौकर ॥ मुजुमदार ते नारायणराव, माधव करंदीकर ॥ (चाल)॥ विश्वासुक बक्षी, खरे, मर्जिचे ॥ किती शब्द सुचविती बरे, अर्जिचे ॥ गोपाळपंत गुणी पुरे, मर्जिचे ॥ (चाल) कृपावंत सरकार म्हणुन हो श्रम सारे हरपती ॥ चाहती उमाशंकरास बारिक कामकाज सोपती ॥ ९

अशा प्रभूचें उमाकांत कल्याण सदोदित करो । गाई-म्हशी-गज-तुरंग वहनीं अपार पागा भरो ॥ पुत्रपौत्रीं राज्यलक्ष्मी अशीच अक्षई ठरो ॥ शत्रुपराजय करून प्रतापें राज्यनीति आचरो ॥ दानदक्षिणा धर्मी निरंतर चित्तवृत्ति अनुसरो ।। गंगु हैबती शीघ्र कवीची प्रपंचचिंता हरो।। (चाल) ॥ दहा चौकी काम उठवुन संगिन ॥ हरजिनसी यकवटउन, रंगिन ॥ गातात गुरू आठवुन, चंगिन ।। (चाल) ।। महादेवाचें कवन कमळवर भ्रमर गुणी झेपती ।। प्रभाकराची नजर हीच करी धन्यास विज्ञप्ति ॥ १०

मामा—‘ रघुनाथराव हे सयाजीराव महाराजांचे सख्खे मामा असल्यामुळें ते पुढे त्यांच्या वेळीं जगताप मामा या नांवानें प्रसिद्ध होते. त्यांनींच सयाजीरावांचें लहानपणीं पालनपोषण केलें (थो. स. च. म. च. भा. ४२-४३). भाऊ पुराणिक—हे सयाजीरावांचे एक मंत्री होते. भिमाशंकर—हें प्रसिद्ध गंगाधरशास्त्र्यांचे चिरंजीव. हे सयाजीरावांचे मुतालिक होते. हस्तमुखें—हसतमुखें. अर्जीचे—विनंतीचे. पतीचे—पालनकर्त्याचे, राजाचे. ठरो—टिको. चंगीन—चंगा–Sound pure शुद्ध. (चंग–एक तंतुवाद्य). कमळवर—उत्कृष्ट कमळ, श्रेष्ठ कमळ, ‘ एकपंकज ’. झेपती—झेपा घालती. प्रभाकरास नजर हीच करणी धन्यास विज्ञप्ति—प्रभाकराची कृति हीच महाराजांना केलेली नजर होय. या कवितेचा नजराणा देऊन कवि आपलें दारिद्र्यहरण करण्याविषयीं महाराजांना विज्ञप्ति करितो.

दुसरे सयाजीरावांचा दुसरा पोवाडा

२३

(शाहीर प्रभाकर)

दामाजीपंतांनीं जगविले ब्राम्हण कांही दुकळांत ॥ गायकवाड तर रक्षिति ब्राह्मण लाखों असल्या काळांत ॥ ध्रु० ॥

तनिशेंतिसांवर वर्सें लोटलीं दुर्गादेवीच्या काळाला ॥ फार दिवस पर्जन्यच गेला आन्न मिळेना बाळाला ॥ दामाजीपंताच्या लागले ब्राह्मण द्वारी लोळायला । रक्ष रक्ष महाराज समर्थ सर्वास आला निर्दाला ॥ त्या समई कोठार खोलुनि पंती जगविले सकळांला ॥ बेदरास कळतांच धुतोड शिपाई आले आंवळाला ॥ चल बे बम्मन म्हणून ओढितां अश्रु लागले गालाला ॥ कैद करून नेताक्षणीं पडलें संकट त्रिभुवनपाळाला ॥ चा० ॥ महाराचे सोंग विठोबांनी स्वतः घेउनी ॥ धान्याचे द्रव्य त्या बाच्छायास देउनी ॥ पंताच्या पोथिमध्ये ती रशिद ठेउनी ॥ राहिले विठोबा पंढरीस येउनी ॥ चा० ॥ दामाजी पंताच्या धावण्या असा धांवला विपळांत ॥ तसा म्हळसाकांत रक्षितो गायकवाड ह्या भूतळांत ॥ १

सतराशेंचोविसांत दंगा होळकरांनी अति केला ॥ पंचविसामध्यें दरोबस्त अगदिंच पहारे पाउस गेला ॥ दीड शेराचा दुकाळ पडला कहर

दुर्गादेवीचा काळ—दुर्गादेवीचा प्रसिद्ध दुष्काळ. हा दुष्काळ इ. स. १३९८ च्या सुमारास पडला होता (म. इ. सा. खं. ३ पा. १९९ टीप). **बाळाला**—(शास्त्री कोश बाळा–बाहला–बाहळा–जीववृत्ति) बाळाला–बाहळाला फार दिवस पाऊस नाहींसा झाल्यामुळें जीव जगण्यापुरतें–हि अन्न मिळेनासें झालें. (२) बाळाला म्हणजे लहान मुलाला तें किती अन्न लागावयाचें पण तेवढेंहि मुष्कील झालें. **निर्दाळा**—निःशेष नाश, सर्वनाश. **धुतोड**—मू. श. दुताड किंवा धुताड. दुताडा-सावकार किंवा राजा यांचा अत्यंत उग्र असा जो दूत तो (शास्त्री कोश) पेशवाईतील ढालाइताप्रमाणे. **धुताडा**—दांडगा मनुष्य (आपटे). **आवळाला**—कैद करावयास. **गाळाला**—गळायला. **रशिद**—पावती. **विपळांत**—पळाच्या $\frac{1}{60}$ हिस्शांत. भावार्थ-ताबडतोब,

वाटला दुनियेला ।। दिवसंदिवस बेबरकत जहाली सुखोत्पात्ति नाहीं रयतेला ।। ब्राह्मण गेले उठुन मजलोमजलीं खुब ठेला ।। बडोद्यांत पोंचला तो जगला न पोंचल्या वाटेस मेला ।। धर्मपुरुष गायकवाड प्रेमळ क्षमाशांतिनें भरलेला ।। तेव्हांपासुन प्रारंभ सिध्याला हजारों ब्राह्मण जपलेला ।। चा० ।। चाळीस वर्षें वांटितात खिचडी सदां ।। म्हणून न जाती ब्राह्मण देशीं कदां ।। दिवसांत प्रहरभर पडे मेहनत एकदां ।। मग सार्वकाळ आनंद हसती गदगदां ।। चा० ।। कुटुंबसुद्धां प्रपंच करिती गर्भिणी होति बाळंत ।। तिहीं महिन्यांच्या मुलांस खिचडी मिळत्ये असें आलें आढळांत ।। २

वेदशास्त्रसंपन्न पुराणिक योग्य ज्योतिषी हर्दास ।। टाळ-विणे-करताल-मृदंगी त्यांत एखादा सुरदास ।। सर्व काळ भजनांत घालती कदां न शिवती नंदास ।। घुंगर बांधुन पायीं नाचती ध्याति पुंडलिकवर्दास ।। चित्रें मूर्ती करण्यांत कुशल जे वैद्य जिंकति दर्दास ।। तऱ्हेतऱ्हेच्या करून नकला नकली रिझविती मर्दास ।। ब्रह्मचारि मांत्रीक तपस्वी घेउन सवें शागिर्दास ।। मोहरा–पुतळ्या–रुपये तयांना देति शालजोड्याफर्दास ।। चा. ।। ह्यापरी ब्राह्मणसमुदाय फार जगविला ।। पुरुषार्थ करुन संकटकाळीं दाविला ।। वैकुंठीं अचळ हा धर्मध्वज लाविला ।। वंशास वश मार्तंड करून ठेविला ।। चा. ।। येवढेच विश्रांतिला राहिलें स्थळ पश्चमच्या रहाळांत ।। कीर्तवान खावंद असले नाहीं मराठे मंडळांत ।। ३

त्वरित, लागोलाग. **बेबरकत**––तोटा, निकृष्ट दशा, विपत्ति, वाईट दिवस, अवनति, हलाखी. **मजलो मजली खुब ठेला**—(?) ठेल (विशेषण)—खूप, रगड. **जपलेला**—टपून बसलेला. **बाळांत**––बाळंत. **करताळ**—-पु. चिपळ्यासारखें एका काशाचें वाद्य(शास्त्री). **सुरदास**––सयाजी महाराजांच्या पदरीं देविदास नांवाचा एक मथुरावासी बैरागी गाण्यांत व सतार वाजविण्यांत मोठा कुशल होता. (थो. स. च ८३०). पण हा सुरदास कोण कळत नाही. **नर्द**—सोंगटी. **दर्द**—दुःख, रोग. **ब्रह्मचारी मांत्रिक तपस्वी इ.**—"जादू, मंत्र, तंत्र वगैरे बंगाली व बीरविद्येचाहि सयाजीरावांना बराच नाद होता. आधीं या विद्येसंबंधानें बडोद्याचा पूर्वीपासून लौकिक होता. त्यांत सयाजीरावांच्या

विश्वकुटुंबी श्रीमंत ते तर तूर्त प्रजेला अंतरेला। गायकवाड आहेत म्हणुन हे समस्त ब्राह्मण सांवरले ॥ तानसेनपंथाचे गवय्ये तेहि प्रभूंनीं आंवरले ॥ कडींतोडे हातांत दुपेटे लाल जरीचे पांघरले ॥ पहिलवान पंजाबी ज्यांचे दंड सदा पुढे फिरले ॥ हरहमेश कुस्त्याच विलोकुन इतर मल्ल जागींच विरले॥ नायकिणी आणि कसबिणी शाहिर नेहमीं बडोद्यामधें ठरले ॥ पावे पगाराशिवाय बक्षिस कसबी लोक ह्यानें तरले ॥ चा. ॥ कल्याण ईश्वरा असेंच यांचें असो ॥ आनंदभरित चिरकाळ गादीवर बसो ॥ कधीं अलोभ

कारकीर्दींत या विद्येस व अनुष्ठानहोमहवनादिक कर्मास बरेंच उत्तेजन आलें" (थो. स.च. ८३१.) फर्द—(आरबी पु.) एकेरी वस्त्र, विशेषतः शाल (आपटे). राहाळ—प्रांत, देश. पांघरलें—त्यांच्या अंगावर घातलें. अलोभ—अवकृपा, गैरमर्जी.

शाहिरांना बडोदा दरबाराकडून ज्या बिदाग्या मिळाल्या त्यांची माहिती—

संवत्	सन	तमासगीर		
			सगनभाऊ यांस	१४८७-४-०
१८७८	१८२१–२२	बिदागी	तपशील	
		६७५-०-०	नगद (यापैकीं रु. २५ पोषाकाचे)	
		२४६-४-०	सोन्याचीं कडीं	
		५६६-०-०	कापडाबद्दल (सलामीबद्दल १८५ धडोतीं मशारनिल्हे ४२–४–० बिदागी ३३८-१२-० फडासह)	
१८७९	१८२२–२३	सगनभाऊ पुणेकर		९८१-१०-०
		४७५-०-०	नगदी हस्तें खुद्द	
		१७०-८-०	कडी सोन्याची	

गंगुहैबतीवर नसो ॥ महादेव गुणीचें कवन मनामधें ठसो ॥ चा. ॥

		३३६-२-० सलामी बिदागीसह कापड (१७० पोषाक ३६-०-० रामा जोडीदारास पोषाक ९७-८-० कृष्णा नाच्यास ३२-१०-० फडकरी यास)	
१८८०	१८२-३-४	सगनभाऊ १९२-०-० कडीं सोन्याचीं ३-०-० फरासास ——— १९५-०-०	
१८८१	१८२४-२५	सगनभाऊ	१०३-०-०
१९०६	१८४९-५०	सगनभाऊ	२५-०-०
१८९७	१८४०-४१	परशराम वाईकर ९९-०-० रोख २६-०-० कापड ——— १२५-०-०	१२५-०-०
१८९५	१८३८-३९	श्रीपाति सवाई फंदी	१९९-०-०
१८९६	१८३९-४०	,,	१९९-१५-६
१८९७	१८४०-४१	,,	१९५-१३-६
१८९७	१८४०-४१	,, १०३-२-० कापड १९६-१४-० रोख ——— ३००-०-०	३००-०-०

ऐ....१७

प्रभाकर कवी भ्रमर गुंतला पहा कर्जाच्या कमळांत ।। द्रव्यकृपेचा प्रकाश पडल्या सुटून जाइल स्वकुळांत ।। ४

१९०२	१८४५–४६	श्रीपति सवाई फंदी	४००–०–०
१९०६	१८४९–५०	बाळाजी फंदी	२०–०–०
१९०५	१८४८–४९	सवाई फंदी	४००–०–०

संवत् १८९५–९७ मध्यें श्रीपति सवाई फंदीस जी रक्कम मिळाली तिचा हिशेब लिहतांना श्रीपति सवाई फंदी रु. ३०० पैकीं वजा पोषाक खानगी जामदारखान्यापैकीं रु. १०० चा बाकी सोन्याचे कड्याबद्दल रु. २०० कडें वजन तोळे १० मासे १।।। दर १९-१०-० प्रमाणें असें लिहिलें आहे. त्यावरून त्याला बिदागी व कापड मिळून सालिना तीनशें रुपये देत असत असें दिसतें.

प्रभाकरानें दुसरे सयाजीराव गायकवाड व बडोदें--वर्णनपर असे दोन पोवाडे रचले आहेत. त्यास रकमा दिल्याचे दाखले अद्याप सांपडले नाहीत.

यांपैकीं कोणास गांव वगैरे इनाम दिला होता काय, ही माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही.

मलकोजीबुवाचा पोवाडा

हा पोवाडा आम्हास यवतमाळ येथील शारदाश्रमाचे संस्थापक व वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक श्रीयुत यशवंतराव खुशालराव देशपांडे यांच्याकडून मिळाला. पोवाड्यांत वऱ्हाडी शब्द आहेत. त्यांचे अर्थ श्रीयुत देशपांडे यांनीच पोवाड्याच्या नकलेबरोबर लिहून पाठविले ते तसेच टीपांत दिले आहेत. पोवाड्यांत उल्लेखिलेल्या कान्होजी भोसले या ऐतिहासिक व्यक्तीसंबंधीं देशपांडे यांनी पुढीलप्रमाणे माहिती कळविली आहे.

"प्रस्तुत पोवाडा मलकोजीबुवा नांवांच्या महार साधूविषयीं आहे. यांत भाम येथील राजा कान्हुजी भोसले या व्यक्तीचा उल्लेख आला असल्यामुळे या पोवाड्याला ऐतिहासिक महत्त्व आलें आहे. शिवाय यावरून वऱ्हाडची तत्कालीन धार्मिक स्थितीहि स्पष्टपणें लक्षांत येते. कान्हुजी भोसले म्हणजे पहिल्या रघूजी भोसल्याचा चुलता. रघूजी लहानपणी कान्हुजीजवळ भाम येथे राहात असे. तसेंच कान्हुजीचा मुलगा रायाजी याचाहि रघुजीशीं बराच संबंध आला होता. रघुजी व रायाजी भोसले यांच्या आपसांत वाटण्या व तहनामा झाला हें नागपूरकर भोसल्यांच्या ऐतिहासिक कागदपत्रांतून छापून प्रसिद्ध झालें आहे. रायाजी हा पुढे निपुत्रिक वारला व त्यानंतर भाम हा गांव उजाड झाला. तो पुढे अव्वल इंग्रजीमध्ये स. १८५३ नंतर सरकारनें इजारा देऊन पुनः वसाविला. नागपूरकर भोसल्यांचे अवशेष हल्लींही भाम येथे आहेत. यासंबधीं वागीश्वरी (नागपूर) मासिकाच्या वर्ष ४ विलास २ (जून १९३३) या अंकांतील 'भामचे रायाजी भोसले' हा लेख पाहावा. प्रस्तुत पोवाडा आजंती येथील मलकया साधुच्या वंशजांकडून ऐकून लिहून घेतला आहे. तो अर्थात अशुद्ध आहे. पण ती वऱ्हाडमधल्या महार लोकांची वऱ्हाडी उपभाषा आहे. हा पोवाडा श. १७०४ म्हणजे इ. स. १७८२ मध्ये रचलेला आहे असें शेवटच्या कडव्या वरून दिसते."

ऐतिहासिक माहिती

परसोजी भोसल्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा कान्होजी याला शाहूनें १७१० सालीं सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें दिलीं. कान्होजीनें वऱ्हाडांत

जाऊन प्रथम दारव्हा आणि नंतर भाम येथें आपलें कायमचें ठाणें केलें. कान्होजी १७२० सालच्या बाळापूरच्या लढाईत हजर होता. बंगाल ओरिसावरील स्वारीचा श्रीगणेशा कान्होजीनेंच प्रथम केला. कान्होजीस मुलगा नव्हता म्हणून त्यानें रघूजीस मुलासारखें जवळ पाळलें. पण नंतर त्याला रायाजी नांवाचा मुलगा झाला व कान्होजीची रघुजीवरील मर्जी उडाली. १७२५ सालीं शाहूची कान्होजीवर गैरमर्जी होऊन त्यानें त्यास साताऱ्यास बोलावून कैद केलें. पण तो तेथून पळून निजामास जाऊन मिळाला तेव्हां शाहूनें मुद्दाम त्याला धरण्याकरिता रघूजीस पाठविलें. रघूजीनें कान्होजीचा पराभव करून पकडून कैद केलें व साताऱ्यास पाठवून दिलें. कान्होजी साताऱ्यासच पुढें कैदेंत मरण पावला.

कान्होजीचा मुलगा रायाजी याने पुढे नानासाहेब पेशव्याशीं सख्य करून घेतलें. तेव्हां शाहूनेही रघूजी व रायाजी यांचा सलोखा करून देऊन रायाजीस रघूजीकडून सरंजाम करून दिला. रायाजी हा भाम येथेंच मरेपर्यंत राहात असे. रायाजी निपुत्रिकच वारला.

कान्होजी भोसल्यासंबधीं अलीकडे पेशवे दप्तरांत बरींच नवी माहिती प्रसिद्ध झाली आहे. कान्होजीनें मलकप्याचा छळ केला याचें कारण कान्होजी हा अत्यंत कर्मठ मराठा होता. महारांच्या नादी लोक लागतात याचाहि त्याला तत्कालीन धर्मसमजुतीस अनुसरून संताप आला असणें स्वाभाविक आहे. कान्होजी हा "सोवळे" फार करणारा होता. इतका कीं, तो ब्राह्मणाशिवाय इतरांच्या हातचें अन्न ग्रहण करीत नसें! एकदां शाहूमहाराजांनीं त्याला अत्यंत आग्रहानें बोलावून 'मराठ्याची मेजवानी' घातली. कान्होजीला त्या वेळीं नकार देतां आला नाही, पण घरीं येतांच त्याने मीठमोहऱ्या गरम पाण्यांत घालून जेवण ओकून काढलें अशी आख्यायिका नागपूरकर भोसल्यांच्या बखरींत दिली आहे. "पोटीं संतती नाही ही चिंता करीत असतां कांही एक अनुष्ठानें, शतचंड्या, कित्येक होमहवनें ब्राह्मणद्वारां व आपण जातीनें सोंवळें फारच करावें. ब्राह्मणाच्या हातचें जेवावें असें चालले" असेंही वर्णन त्यांत आहे.

मलकोजीबुवाचा पोवाडा

२४

(शाहीर–महादु गोविंदा)

नांदगांव प्रगाणा जागा आजंती थोर ।। साक्षात खाकीबोआ झाले मलकया अवतार ।। धृ० ।। देवबा माळी बोवाला प्रसन्न झाले भगवान ।। थोरथोर सांगता होते पाण्यावर आसन ।। खाकीसाहेबाच प्रथम अडगांवीं ठाणं ।। मलकयानं गुरु केला आपुल्या खुषीनं ।। सद्गुरुची कृपा त्याहीवर झाली संपूर्ण ।। बागबगीचा जवळ छाया देवळावर ।। पाठीमागें विहिर पाणी पेतो जनसारा ।। १

देवमाळी बोवानं मलकयाला लाविलं पिसं ।। जना तोंडीं कन्न देइना बोलत भलतीसं ।। मलकयाबोआला उपास घडले बहुत ।। देवमाळी बोवाच्या कळलं होतं अंतरंगांत ।। तेव्हा मलकयाचे तीर्थरूप गेले अडगांवांत ।। म्हणे मी विनंती करतो देवा चला आजंतींत ।। तेव्हां देवमाळी बावाला घेऊन आले आजंतींत ।। मग बसविलं पुंजीत मलकया आले शुद्धींत ।। देवमाळी बावानें मलकयाशिरीं ठेविला हात ।। नांदगांव प्रगणा आजंती जागती ज्योत ।। अवतरले खाकीया मलकया थोर झाले भक्त ।। २

गौराईनं नवस केला पुत्रु दे मजला ।। आभरणाच्या सुद्धां काठीं वाहीन देवाला ।। गौराईचा भाव देवाच्या पायरीले जडला ।। गौराईच्या पोटीं लेक काशीराव जलमला ।। तिनं आभरणाच्या सुद्धां काठी वाहिली देवाला ।। तेव्हां देवमाळी बाबांन काठी देल्ली मलकयाला ।। काशीराव बावा तेव्हां देवासी

खाकीबोवा—खाकीबोआ हा एक हिंदु अवलिया होउन गेला, मुसलमानी पद्धतीप्रमाणे दर्गा असतो परंतु आंतील देवळांत कृष्णाची मूर्ती असते. मुसलमानी अमदानींत अशा पद्धतीचीं कृष्णाचीं देवळें बांधलेलीं; वऱ्हाडांत हल्लीहि बरींच आस्तित्वांत आंहेत. तीं हिंदुंच्याच ताब्यांत असून त्यांचीच पूजाअर्चा असते. **थोरथोर**—फार. **सांगता**—बोलण्याप्रमाणें. **पेतो**—पितात (वऱ्हाडी रूप). **आजंतींत**—आजंती हा गांव वऱ्हाडांत, ता. दारव्हा, जि. यवतमाळ येथे आहे. **पुंजीत**—पुजेंत. **पायरीले**—पायरीला (वऱ्हाडी रूप). **देल्ली**—दिली (वऱ्हाडी रूप).

बोलला ॥ दशमीची यात्रा भरव शोभे जाग्याला ॥ बारशीच्या दिवशीं काठी न्यावं अडगावाला ॥ काशीराव बावानं नेमं यात्रेचा केला ॥ ३

फाल्गुनी दशमीची यात्रा भरते गुलजार ॥ बहु याचेमध्यें थाट मौजा करे कारंजकर ॥ आणुन फुलाचे गजरे उदबत्याची बहार ॥ घेऊन टाळ वीणा भक्तजन करे जैजैकार ॥ करण शिंग नवबत वाजे वाद्यांचा गजर ॥ संध्याकाळची वेळ दाटी झाली आरत्याची ॥ वाजती नौबता आणखीन घाई नगाऱ्याची ॥ अठरा कुम न्याती करून आरती बराबर ॥ चढीवती मलीदे तेथ नाही जुदाकार ॥ काठ्या भेटती तेव्हा महोच्छाव होतो राव थोर ॥ काय महिमा सांगु देवा खाकीसाहेब पीर ॥ साक्षांतरीं दिसून आलं जसं पंढरपुर ॥ ४

महादजी बुवाला प्रसन्न मलकया झाले ॥ देव देऊनि शिरीं त्यास पुंजेसी बसवीले ॥ आंधळयाला डोळे पाय दिले लंगड्याला ॥ काशीमध्यें होता ब्राह्मण कोड आंगीं त्याला ॥ चिंता करे देवाची अन् काशी गेली स्वप्नाला ॥ म्हणे वऱ्हाडामधीं भक्त मलकया जातीचा महार ॥ त्याच उचीत खाशील ब्राह्मणा कोड होईल दूर ॥ ५

स्वप्नांत दृष्टांत ब्राह्मण चाले तेथून ॥ नांव मलकयाचा शोध मुलकाचा घेऊन ॥ उत्तम होता दिवस नगर दृष्टीनं पाहून ॥ दोन्ही कर जोडून साष्टांग घाले प्रीतीने ॥ म्हणे कोड करावा दूर अचरण करे कुलजन ॥ मी उचीताची आशा करून आलो ब्राह्मण ॥ तेव्हा मलकया ब्राह्मणासी बोले उत्तर ॥ कैसं उचीत देऊं ब्राह्मणा मी जातीचा महार ॥ ६

तेव्हां ब्राह्मण दिलगीर झाला आपले मनांत ॥ म्हणे येता जाता माझा संसार गेला वायार्थ ॥ दोन कर जोडून डोकस ठेवी चरणावरतं ॥ बस्तरवार दिवस यात्रा बसली समोर ॥ करुन मग विचार बतासे घालुन तबकांत ॥ लाऊन मलकया हात बतासा टाकी मुखांत ॥ उराला प्रसाद दिला ब्राह्मणाच्या हातांत ॥ तेच उचीत घेतां ब्राह्मण हरीखला फार ॥ भक्षीले बत्तासे त्याचा कोड झाला दूर ॥ कल्प ठेविला अंतरीं अन् कोड राहिला तिळभरी ॥ ७

कुम—अठरा कौम. मलीदे—नैवेद्य (मुसलमानी शब्द). पीर—खाकीसाहेब हें मुसलमानी पद्धतीचें नांव. मोंगल अमलापासून ही पद्धत सुरू झाली. उचीत—उच्छिष्ट. अचरण—आश्चर्य. कल्प—

बस्तरवारी गजर होतो मलकया भक्त ॥ दूरदूरची यात्रा येते उच्छाव मनांत ॥ वांझोटीला पुत्र देल्हा पुरविला हेत ॥ शावकाराचं जहाज बुडालं होतं दरयांत ॥ त्या शावकारानं धावा केला आपल्या मनांत ॥ म्हणे धाव पाव मलकया दवलत बुडाली येथं ॥ थोडी नाही राश्येत नवा लाखाची दौलत ॥ खातो म्हणे हिरकणी प्राण नाही ठेवत ॥ त्या शावकाराचा धावा ऐकून पुरविला हात ॥ लावून मलकयानं हात जहाज तारिवलं वरतं ॥ बसले पायरीवर अन् बाही भिजली सत्वर ॥ ८

गेला शावकार आपल्या घरीं ॥ केली नवसाची तयारी ॥ सत्रा कळस सोनेरी ॥ आला आजंतीं नगरीं ॥ कळस चढवले देवळावरी ॥ निंबाजीबोवा गंगाबयजी या दोहीच्या हात ॥ शिखरावरते कळस चढविले भली झाली मात ॥ ९

कोणाकोणाचे सांगू देवा आजंतीवर ॥ नाव मलक्याच बहु मुलकामधी नईसर ॥ वराडामधी फकीर निघाला मलंगाचा भार ॥ ढेसकाया मेसकाया त्यान फोडून केल्या चूर ॥ टाकले हो ते देव्हारे भक्तानं घेतले डोंगर ॥ तो फिरतां फिरतां आला होता आजंतीवर ॥ होता जैजेकार बुवाचा उतरला गांवाबाहीर ॥ त्यानं डेरे दांडे देल्हे होते नेर वाटेवर ॥ शामजी चोपड्या भेटिला गेला लवकर ॥ मागुन बुवा गेले होते आप करतार ॥ मुजरा करून उभे राहिले त्याहिच्या समोर ॥ १०

मग हात मलकयाचा धरला ॥ नेउनि बिछोन्यावर बसविला ॥ एक मुंडासा काहाडीला ॥ शिरीं मलकयाच्या बांधीला ॥ काच अवघ्याचा निघाला ॥ मग दाना घोड्याला वाटला ॥ सिदा आटा अवघ्याला देल्हा ॥ जेऊन खाऊन अवघे झाले तिरपत ॥ पुढें फकिर मागें बोवा आले दर्ग्यांत ॥ पायरीपशी येऊन फकीर नमाज पढला ॥ पढली नमाज देवान भेट दिली त्याला ॥ मुक्यानं गिळतो साखर तेथे जरा कळेना अंत ॥ देव दिनाचा दयाळु केलं विखाचं अमृत ॥ फकीर दर्ग्याबाहीर आला हुकुम मलंगाला केला ॥ आनंदानं नाचूं लागले फार दनाना उठला ॥ एक रात्र मुकाम करून फकीर जातो लवकर ॥ शेले मणी कंठा बोवाच्या टाकला हातावर ॥ ११

संशय. राश्येत—संपत्ति. नईसर—प्रसिद्ध. ढेसकाया—दगडाचे क्षुद्रदेव. करतार—कर्तृत्ववान. काच—संशय, धाक.

साक्ष पहाता प्रचीत अठरा कुम जोडे कर ॥ साक्ष पहाता प्रचीत अठरा कूम जोडे कर ॥ भक्तीला हाजर ब्राह्मण अणिक फकीर ॥ भांबीमधी कान्हुराज दुष्ट दुराचार ॥ कोण लाविती कळ जाऊन त्याच्या दरबारांत ॥ आजंतीमधिं महार मलकया देवाचा भक्त ॥ अन भरते मोठी यात्रा अजाब त्याची कीर्त ॥ भरून बिराची विद्या म्हणलेत आहे त्याच्या जवळ ॥ वऱ्हाड खाल्लं भोंदून हुजुर कोणी नाही करत ॥ मग झाली त्याची शायना म्हणे रावभक्त जादुखोर ॥ हुकूम केला त्यानं सवारी अजंतीवर ॥ धरून मलकया मनगटीं अपेष्टा मांडिली फार ॥ अन् दोन उपडले दात बांधे हत्तीच्या पायावर ॥ देव भक्ताचा कैवारी तारे वरच्यावर ॥ कल्पले अंतरीं श्राप दिला निरधार ॥ १२

श्राप दिला तेव्हां दोन्हीं आपटले कर ॥ राज्यावरून ढळला होता कान्हुजीकुवर ॥ तेव्हां मग खाया मिळेना अन्न म्हणतो नाहीं झालं बरं ॥ त्या कान्हुजीच्या पोटीं होता लेक रायाजी कुवर ॥ तो शहाणा होता रायाजी त्यानें सेवा केली फार ॥ दोन्ही कर जोडुनि विनंत्या करे वारंवार ॥ म्हणे अनाथाचा तारक देवा तूं मजला तार ॥ तेव्हां प्रसन्न झाले देव लक्ष्मी देल्ली महामूर ॥ म्हणे आइकरे रायाजी भाग तुझी होइल उजाड ॥ अन् होयाचं तें झालं तुझ्या कुळीमध्ये अंधार ॥ बोलला शबद परतुन नाही येणार ॥ १३

तेव्हां मलक्यानं हाक मारिली मोठ्या लेकाला ॥ म्हणे निंबाजी महादजी तुम्ही जा कारंज्याला ॥ निंबाजीच्या पोटामध्यें धडका उठीला ॥ घेऊन पित्याची आज्ञा निंबाजी गेले कारंज्याला ॥ घेतलं सोवळं निंबाजी मागें परतला ॥ तेव्हां मलकयानं हाक मारिली लहान्या लेकाला ॥ लहाना लेक चिंताजी त्याहच्याजवळ धाऊन गेला ॥ म्हणे मागरे चिंत्या प्रसन्न आहो या वेळेला ॥ तो लहाना लेक चिंताजी कांहींच नाहीं बोलला ॥ तेव्हां मलकया बोवा तेव्हां बोले चिंताजीला ॥ जा सातव्या पिढींत भेट देईन तुम्हाला ॥ नेकी धरम ठेव जा तुम्ही ओळखजा मजला ॥ पापबुद्धी धराल तर दगा बसल जीवाला ॥ ऐतवाऱ्या दिवशीं बोवान देह ठेऊन दिला । निंबाजी महादजी आले आपल्या गांवाला । खबर कळाली तेव्हां अंग टाके धरणीवर ॥ १४

तिरपत—तृप्त. हुजुर—उजर. शायना—शहानिशा. होयाचं—

प्राण गेला तेव्हां सज्जे ढळले दोन। झाला फार आकांत जैसं मोठं पडलं रण। हाय हाय करत जन म्हणत हारपला मोहन। एक पिटे लल्लाट देवा दाखव गा चरण। दर्शनाची आवड आमचे डगमगतील नयन। तेव्हां न्हाणलं देवाला कपाळी मोहर लाऊन। आंग पुसलं होत देवाच्या अंबाई लेकीनं ॥ मांडी देल्ली होती देवाला धाकट्या चिंताजिन ॥ आरती घेऊन आली बोवाची गंगाई सून ॥ पुंजा केली होती बोवाच्या मोठ्या लेकानं ॥ उचलून बोवाला ठिकान्यावर गेले घेऊन ॥ बसीवल बोवाला आतमधी पीठ भरून ॥ बसीवलं बोवाला आंतमधी बेल भरून ॥ होता एक अवलीया ऐसा नाही होणार ॥ १५

चौघे लेक बोवाला दोघी कन्या सत्वर ॥ अन् पोटीं पिकल्या सुना नातीनातांचा विस्तार ॥ फार लागला पैसा दर्गा देवाचा जोर ॥ ईटबंदी वाडा बोवाचा आहे चौफेर ॥ आहे तीन बुरुज वाड्याला आणिक वाड्यामध्यें विहीर ॥ दरवाज्यावर सज्जा बैठक दिसते हवाशीर ॥ सत्रा कळस हे सोनेरी आहेत चौफेर ॥ जे कोणी खोटं म्हणेल त्यानं पहावं सत्वर ॥ १६

शके सतराशे च्यार ख्याल केले तयार ॥ नांदगांव प्रगाणा काशीराम जुमेदार ॥ घरगत वस्ती आहे आजंती वस्ती गुलजार ॥ शामजी चोपड्या रयत नांदवतो जोर ॥ झाले तेरा चौक भजनी मुर्कीचं माहेर ॥ नथुभटबोवा मागें भक्ती करें फार ॥ काय प्राता सांगूं देवा तुझ्या पायाचा आधार ॥ मलकयाचा ख्याल ऐका बसून लहानथोर ॥ येडा वाकडा शबद माझा आयका उत्तर ॥ ज्यानं टाकिली पुंजा त्याचं नाही झालं बरं ॥ ज्यानं केली चेष्टा त्याचं नाही झालं बरं ॥ महादु गोविंदा ख्याल गातो वस्ती मोझर ॥ १७

व्हावयाचे. जुमेदार—जमीनदार (देशमुख). मोझर—हें गांव आंजतीच्या पश्चिमेस ३ मैल आहे.

पेशवे–भोसले भेटीचा पोवाडा

सदर पोवाडा नागपूरचे श्रीयुत शंकर गोविंदराव चट्टे यांचेकडून मिळाला. हा पोवाडा त्यांना नागपूरचे श्रमिंत त्र्यंबकराव ऊर्फ दादासाहेब काळू यांच्या दप्तरांत आढळला.

पोवाडा इतिहासदृष्टया महत्त्वाचा आहे. शिवाय तो अगदीं समकालीन, पेशवे–भोसले यांच्या भेटीनंतर लगेच लिहिलेला आहे, हें शेवटच्या चौकांतील " पुढें युद्ध होईल घनघोर हा भास पोटीं " या उद्गारावरून स्वच्छच दिसून येईल. पोवाड्यांत आलेली माहितीहि सर्व बिनचूक आहे, हें पुढें दिलेल्या साधनग्रंथादिकांतील माहितीवरून व टीपांवरून दिसून येईलच.

ऐतिहासिक माहिती

(१) कै. श्री. यादवराव काळे यांच्या नागपूर प्रांताच्या इतिहासांत खर्ड्याच्या लढाईसंबंधीं अवघे दोनच पॅरे मजकूर आहे. अर्थात् त्यांत भोसले कोठून निघाले, कशी व्यवस्था करून निघाले, भेटी कोठें झाल्या, कशा समारंभाने झाल्या इत्यादिकांसंबंधीं तपशील कांहींच नाही. पण तो श्री. काळे यांस उपलब्ध नसल्यामुळें त्यांनीं दिला नसावा. प्रस्तुत पोवाडा त्यांना मिळता तर त्यांनीं त्यांतील माहितीचा जरूर आवर्जून उपयोग केलाच असता हें त्या ग्रंथांत ठिकठिकाणीं त्यांनी पोवाड्यांचेहि आधार पादटीपांत दाखविले आहेत त्यांवरून स्पष्ट आहे.

श्री. काळे यांच्या पुस्तकांत इतकाच मुद्दयाचा मजकूर आहे 'महादजीच्या मृत्यूनंतर एकटा नाना फडणीसच एकमेव प्रबळ पुरुष राहिल्यामुळें रघुजीनें त्याच्याशीं चांगलें सख्य राखलें; व नानांचें बोलावणें येतांच अनमान न करतां तो फौज घेऊन निघाला व अहमदनगराजवळ पेशव्यांचे सैन्यास मिळाला. भोसल्यांच्या सैन्याचें आधिपत्य विठ्ठल बल्लाळ सुभेदाराकडे होतें. तो त्या वेळीं वऱ्हाड प्रांताचा सुभेदार होता व कसलेला योद्धा होता. त्यानें व त्याच्या सैन्यानें खर्ड्याच्या लढाईंत चांगली कामगिरी केली.'

(२) 'मशरीन मुल्क यांनीं पुण्यावर जाण्याची तयारी सन १२०३ चे सालीं केली. तेव्हा नाना फडणवीस यांनीं पंतप्रधानाचे स्वराज्यांतील बंदोबस्त राखून तमाम सरदार–मनसबदार यांना एकत्र करण्याविषयीं

पत्रें पाठविलीं. ते समयीं रघूजी भोसले सेनासाहेब सुभा यांच्याकडेही याच प्रकरणीं लिहिलें.

फौजेसहित सेनासाहेब व व्यंकोजी भोसले सेनाधुरंधर व चिरंजीव परसोजी भोसले ऊर्फ बाबासाहेब व मातोश्री चिमाबाईसाहेब सुद्धां वऱ्हाडांत पोचले. गाविलगडाचा आदिकरून बंदोबस्त राखून मातोश्री चिमाबाईसाहेब व सेनाधुरंधर व बाबासाहेब यांजपाशीं भवानी काळू यांना ठेवून नागपुरास रवाना केलें. आपण सेनासाहेब पुढे पुण्यास चालले. समागमें सरदार मंडळी, विठल बल्लाळ सुभेदार यांजला जरीपटका देऊन मानकरी मंडळी तमाम यांचे तैनातीस केले व कंपूसहित बेणीराम सुखराम सुभेदार व सखाराम अवधूत एकांडे मंडळीं रिसाला त्यांचे जिमेस, महमद अमीरखां छपारवाले व साबतखान यांचा जमाव वगैरे, रघुनाथरावबाजी घाटगे हेहि आपले पथकासहित, याशिवाय पाटणकर, निंबाळकर, राणे, यादव वगैरे जमावासुद्धा पांडुरंग गणेश बक्षी व गंगाधरराव माधव चिटणवीस व आपाजी सखाराम व नारायण यशवंत व बाळाजी नारायण जामदार व सिलेखानेवाले याप्रमाणें समागमें घेऊन सेनासाहेब गंगेपर्यंत गेले. तेथून आपण सडे होऊन आघाडीस जातेसमयीं लक्ष्मणराव काशी याजला भोपाळास रवाना करून नंतर दरकूच सडे जाऊन पंतप्रधानाजवळ दाखल झाले. फौजही मागाहून पांडुरंग गणेश बक्षी व विठ्ठलपंत सुभेदार आदी करून पोचले.

पंतप्रधानांच्या व सेनासाहेबांच्या भेटी होऊन प्रेमयुक्त भाषणें झालीं. नंतर नाना फडणीस यांनीं पंतप्रधानाच्या फौजेसहित कूच करण्याचा विचार केला.' (काशिराव गुप्ते यांची नागपूरकर भोसल्यांची बखर संपादक या. मा. काळे. आवृत्ति दुसरी १९३६ पृ. १७७ ते १७९.)

(३) खर्ड्याच्या मोहिमेंतील बातमीपत्र ६–२–१७९५ चें.

यादी गोटगस्ती छ १५ रजब शुक्रवार नागपूरकर भोसले याचे लष्करांतून सांडणीस्वार एक व सरकारचा सांडणीस्वार एक उभयतां बरोबर आज लष्करांत तिसरे प्रहरीं आलेत. वर्तमान सांगतात. लखोटपत्र सरकारांत आहेत. कलम १.

भोसले नागतळ्याचा घाट चढोन येतात. उदईक मौजे निंबगांव-

नजीक कडे आष्टी मशारनिल्हेचा पाटिलकीचा गांव तेथे मेजवानीस येणार म्हणून वर्तमान. मागाहून दुसरी बातमी येईल.

१०-२-१ ७९५ चें बातमीपत्र. "नागपूरकर रघोजी भोसले यांचे लष्करचा मुक्काम काल मौजे केळ–पिंपळगांव सीना नदीपासून १४ कोसावर होते. आज कूच करून साता कोसावर येतील. उदईक सीना नदीचे पाण्यावर येणार." "बाबूराव वैद्य वकील नि ॥ सरकार भोसले यांचें लष्करांतून येऊन मागील तळावर सरकारची भेट घेऊन काली मजलीस सीना नदीवर आले. त्याजकडील उंटे तट्टे मागाहून सायंकाळीं येऊन नदीपार सरकार डेऱ्याचे पिछाडीस रघुनाथराव बळवंत नायगांवकर यांचे शेजारी उतरले आहेत." (ऐतिहासिक पत्रव्यवहार काव्येतिहाससंग्रह व भारतवर्ष यांत पूर्वी प्रसिद्ध झालेल्या साधनांची पुनरावृत्ति व अवांतर नवीन भर. संपादक सरदेसाई कुळकर्णी व काळे पृ. २८५,२८६, लेखांक ३१०, ३११.)

(४) परशुरामभाऊंचें पत्र २१-१-१७९५." शिंद्याकडील जिउबाबक्षी कंपूसुद्धा पैठणावर आले. देवजी गौळी पुढे होता तो नगरच्या सुमारें वांबोरी-वर मुक्काम करून आहे. भोसले मात्र वाशिमावर आहेत. ... ... भोसल्यास पैठणच्या सुमारें येण्याविषयीं पत्रें गेलीं आहेत. येतील."

(खरे पान ४७२२,२३)

१९–२–९५ "जिउबाबक्षी शिंद्याकडील फौज घेऊन आले व भोसलेही आले."

(खरे पान ४७२३.)

(५) १९ नोव्हेंबर १७९४ तारखेचे बाळासाहेब मिरजकरांस विष्णुपंत यादवाडकर यांचें पत्र "बाबा फडके इंदुवारी काल डेरेदाखल झाले. भोसले अद्यापि नागपुरींच आहेत त्यांस लवकर निघण्याविषयी सरकारांतून पत्रें गेलीं आहेत." (खरे पत्र नं. ३५८७.)

(६) श्रीमंत महाराज राजश्री सवाई माधवरावसाहेब यांची स्वारी मोंगलावर खर्ड्यापर्यंत गेली त्यांचे मुक्कामाचा तपशील—

"तेथोन पुढें कूच होऊन फकराबाद धानोरे तेथें मु॥ झाला. श्रीमंतांची खाशी स्वारी रत्नपुरांत राहिली. मधी खडकत गांवावर जिउबादादा भेटले. त्याणीं आपली फौज व पलटणें वगैरे दाखविलीं. तो गांव मौजे

खडकत, तेथून पुढें दोन कोशावर फकराबाद धानोरे एकूण दोन गावें. दरम्यान मधीं विंचलना नदीवर मु॥ झाला. तेथें मौजे कऊडगांव (करडगांव असे पाहिजे) येथे भोसले येऊन मिळाले. त्यांची भेट होऊन नंतर फकराबाद धानोरेवर मु॥ झाला."

(काव्येतिहास संग्रहांत प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक लेख, पत्रें यादी वगैरे, संपादक सरदेसाई, काळे-वाकस्कर पृ. ४१०).

(७) " पुढें कोरेगांवाहून कूच होऊन काष्टी तांदळीच्या मुक्कामीं गेले तों तेथें तासगांवकर परशुरामभाऊ पटवर्धन सोळा हजारानिशीं आले. त्यांस सामोरे खासा स्वारी कोसभर जाऊन भेटले. आणि मोठ्या समारंभाने जाऊन आणिले. येऊन उतरले. पुढें तेथून कूच होऊन भिलवाडीच्या मुक्कामीं गेले तों नागपूरवाले रघोजी भोंसले तीस हजारानिशीं आले. त्याजबरोबर बाणांचा सरंजाम बहूत होता त्यास खासा स्वारी तीन कोसावर सामोरे जाऊन मोठ्या इतमामानें येऊन उतरले. "

(काव्येतिहास संग्रह, खर्ड्याच्या स्वारीची बखर.)

(८) २१ जानेवारी १७९५ परशुरामभाऊ पटवर्धन यांचे बाळासाहेब मिरजकर यांस पत्र—"भोंसल्यांस पैठणच्या सुमारें येण्याविशी पत्रें गेलीं आहेत. येतील. चिघळत चिघळत मसलत लांबणीवर पडेल असें वाटतें. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे. कसें घडतें पहावें. ग्रहणास गंगातीरास जावें असा बेत आहे. (३ फेब्रुवारी १७९५ रोजीं ग्रहण होतें.)

(खरे पत्र नं. ३६००)

(९) आम्हीं कांही वर्षांपूर्वी सातारा पारसनीस म्युझियमध्यें संशोधनार्थ गेलों होतों तेव्हा खर्ड्याच्या लढाईसंबंधीचा पांचसहाशें अत्यंत महत्वाच्या पत्रांचा एक रुमाल तेथे चाळला व त्यांतील कांही नोंदी तेव्हांच करून घेतल्या. पुढे दिलेले ऐतिहासिक पत्रांतील उल्लेख त्यापैकीं आहेत. अप्रसिद्ध म्हणूनहि त्याचें महत्व आहेच.

पत्र अंताजी नानाजी (सुळे) याचें ता. ६ रमजान

२८।३।१७९५

" सेवेसी अंताजी नानाजी विज्ञापना ता. छ ६ रमजान अडीच प्रहर पावेतों स्वामींचे कृपेंकरुन सुखरूप असो विशेष.

नवाब कडलाई घाटावर गेले म्हणोन विठ्ठलपंत याजपासी बातमी आली. नंतर बाबाकडे चिठी पाठविली. बाबांनी चिठींचें उत्तर पाठविलें कीं, येजमानास चिठी लिहिली आहे जेसे उत्तर येईल त्याप्रमाणें करूं. कलम १,

रघोजी भोसले याची चिठी विठलपंत यांस आली की श्रीमंतांची व नानाची स्वारी दोन प्रहरी दाखल जाहाली. कलम १

पत्र हरी त्रिंबक वर्तक याचें

१-४-१७९५

सेवेसी हरी त्रिंबक वर्तक शिर सां॥ नमस्कार विज्ञापना. आज प्रातःकालचे बारा घटका दिवस आला तेथपर्यंत डाकेच्या राऊताबरोबर पत्र रवाना केलें तें प्र॥ होऊन वर्तमान कळलेच असेल... ... स्वामीकडून प्यादे कागदाचें उत्तर घेऊन आले तें वाचून पलंगावर बसले आणि चक्रदेव यास बोलावून पत्र पा॥ आणि मुक्काम कोठे करावा ही आज्ञा आली म्हणून बोलले. पत्रांत आज्ञा की उदईक चिंचपुरीं तुम्ही जाणें आणि श्रीमंतांचा मुकाम करडगावांस सीनातिरी जाणू (न) या प्र॥ वाचून फारच खुशाल जाले .... दुसरे मुकामी जाणार छ ६ रमजान मार्गी नऊ घटका दिवस.

पेशवे भोसले भेटीचा पोवाडा

२५

(शाहीर निंबाजी)

श्रीमंत पंतप्रधान उभैता भेटी ।। होताची हर्षली धरा झाली सुखवृष्टी ।। मुक्काम फणींद्रपुराहून महाराज श्रीमंत ।। सुमुहुर्ते डेरे दिधले संगमावरत ।। आपण निघाले बाहेर सवे हुजरात ।। आणि भले सरदार लोक नामांकित ।। नानासाहेब मातुश्री कुटुंबासहित ।। बाबासाहेब आणि आबा भवानीपंत ।। (चाल) ।। दरकूच मग उमरावतीवर मुक्काम केला ।। चौ रोजामध्ये राजे मतलब उगविला ।। कुल रोजमुजरे झाडून दिधले लोकाला ।। गावीलची बंदोबस्ती किल्लेदाराला ।। राजारामपंतांचे स्वाधीन केला ।। कुल समुदाय सर्वांशीं निरोप दिला ।। कुल-दैवत मातुश्रीचे पदीं घाली मिठी ।। म्हणे विजयी होऊन यावें अखंड दृष्टी ।। १

बहु राजनीति सांगोन नानासाहेबा ।। सहकुटुंबा बिदा केले आत्मजे बाबा ।। सह मुख्य विचारुनि असे भवानि आबा ।। दर मजल निघाले सेना साहेब सुभा ।। मुक्काम जाऊनि वाशमीं केला मनसुबा ।। पलटण बेनी-सिंगाचे स्वाधीन अरबा ।। (चाल) ।। कूल मुखत्यारी महमदअली ।।

श्रीमंत—हें उपपद येथे भोसल्यासाठी वापरलें आहे. **धरा**—सृष्टि, जगत्. **फणींद्रपूर**—नागपूर **आपण**—स्वतः जातीने **भले**—एकांडे, मानकरी. **नानासाहेब**—व्यंकोजी भोसले. दुसऱ्या रघूजीचा भाऊ. **मातुःश्री**—दुसऱ्या रघूजीची आई चिमाबाई. **राजे मतलब उगविला**—(१) राजे भोसले यांनी मतलब म्हणजे कार्यभाग उरकला, (२) राजमतलब म्ह. मोठा कार्यभाग, मोठी मसलत. **रोजमजुरे**—रोजमुरे. शिपायांचे पगार बाक्या वगैरे. **राजारामपंत**—राजाराम मुकुंद (चट्टे). **म्हणे**—मातुःश्री म्हणे. **सहकुटुंबी**—सहकुटुंब, कुटुंबासहित. **आत्मजेबाबा**—आत्मजा बाबा. आपल्या आत्मजाला बाबाला बिदा केले म्हणजे पाठविले. **सहमुख्य**—मुख्यासह. **सेनासाहेबसुभा**—रघूजी भोसले. **अरबा**—अरबांचे पलटण. अरबा म्हणजे तोफा असाहि अर्थ आहे, तेव्हा तोफखान्याचा सरदार हाहि अर्थ होईल. **महमदअल्ली**—हा रघूजीच्या

मोहऱ्याची डावी बाजू त्यासी नेमिली ॥ विठ्ठल सुभ्यास जलद सांडणी गेली ॥ सैन्यास येऊन भेटला खुशाली झाली ॥ बहू गौरवून दिलभरीचीं वस्त्रें दिलीं ॥ आघाडीस दरकूचाची आज्ञा केली ॥ नाईकवडी गंगथडीस धाडी चिठी ॥ तुम्ही वसूल करावे सब कुल बारा हत्ती ॥ २

दररोज हजरी सुरु चालते स्वारी ॥ तेथे पांडुरंगदादाची खबरदारी ॥ कुल गणती फौज साठ सहस्र स्वारी ॥ तेथे कारखाने महाराजाबरोबरी ॥ सवे-नामी लोक सरदार मोठे अधिकारी ॥ त्याह्यांचीं नामें म्या सांगावी कोठवरी ॥ (चाल) ॥ बरें असो जी ऐकाजी महम्मद अमीरखान ॥ किती खानदान सय्यद मोगल पठाण ॥ यावरी रिसाले नामें कोण कोण ॥ तो गुजर कुशाजी सर्वा बहु सन्मान ॥ रघुपत बक्षी बापु संगीन ॥ साबत खानाचे लोक अति तीक्ष्ण ॥ जरीपटक्या संगे-जमाव झाली दाटी ॥ हुजरात लोक मोठे पागेचे हट्टी ॥ ३

हत्तीवर अंबारीमध्यें गुजाबादादा ॥ त्या मागें चालवी शाबुतीनें हौदा ॥ सवे गुजर महादजी आप्त लोकासुद्धां ॥ बाणाच्या कैचा पुढे धरुन मर्यादा ॥ मागे स्वारी श्रीमंत चालवी बिरुदा ॥ पुढे बारेदार जिलबेसी नेमिला हुद्दा ॥

दरबारांतील फारशी जाणणारा एक मुत्सद्दी. **मोहऱ्याची**—मोहरप्याची, आघाडीची. **विठ्ठल सुभा**—विठ्ठल बल्लाळ परांजपे सुभेदार. **सांडणी**—सांडणीस्वार निरोप घेऊन गेला. **खुशाली**—समाधान. **दिलभरीचीं वस्त्रें**—संतोष पाऊन वस्त्रें पोषाक दिले. **नाइकवाडी**—गांवच्या महारांचा पुढारी. निरोप पाठविण्याचें काम पूर्वी महारांकडून करवीत असत. **सबकुल**—झाडून सर्व. **बारा हत्ती**—'बारा बाबती' या शब्दांचा तर हा अपभ्रंश नसेल? The twelve shares (out of the revenue) which belong to the head Offices (Mols.) **दररोज हजरी सुरू**—रोज नवीन नवीन पथकें घेऊन पागे पथके सैन्यास येऊन मिळत होते. त्यांच्या गणत्या, हजेरीपट सुरू झाले. **महंमद अमीरखान**—शिवणी शपारा येथील सुभेदार (चट्टे) **यावरी**—यानंतर. **रिसाले**—रिसाल्याचे अधिकारी; रिसालदार. **साबतखान**—लष्करांतील एक अधिकारी. साबतखानाचा गोट ही जागा अद्याप नागपुरास आहे (चट्टे). **तीक्ष्ण**—पराक्रमी. **शाबुतीने**—(१) जपून ! (२) शहाबुद्दीन असें महाताचें नांव तर नसेल? **बिरुदा**—

(चाल) ॥ डाकेवर बातमी पंतप्रधानाची ॥ पत्रावर पत्रें येतीं आस भेटीची ॥ मग जलद निघाली स्वारी श्रीमंतांची ॥ गंगेवर योग साधिला संधि ग्रहणाची ॥ दर मजल कडेवर आलि नेमिली प्राची ॥ स्वांगे बंदोबस्ती केली फौजेची ॥ अरब जरब मोहऱ्यास फलटण मोठी ॥ शुभ तिथि विचारून दिले सुदिन शेवटीं ॥ ४

नाना फडणीस चालून दर्शना आला ॥ श्रीमंत करी हो सन्मान गौरवें त्याला ॥ दिलें वस्त्रभूषण मग बसूनि विचार केला ॥ शनिवारीं एकादशी नेम भेटीला ॥ सडी स्वारी तयार झाली भले हो लाला ॥ हत्तीवर अंबारी बसवी सर्वाला ॥ (चाल) ॥ सवे गुजर महाडीक आणि अहेरराव ॥ साळुंके पालकर शिर्के मुकुटराव ॥ घाडगे पाटणकर नामी उमराव ॥ पन्नी पठाण इकडे सिंदे खांडेराव ॥ विठ्ठलासी ताकीद केली तयार व्हावं ॥ कुल मराठ मंडळी स्वारी घेऊन यावं ॥ पऱ्ह्यांनी फौजा उभ्या दर्सनासाठी ॥ उभैता मिळालीं सैन्यें झाली दाटी ॥ ५

निशाणादिक राजचिन्हें **बारेदार**—बारदार. **आस**—इच्छा. **स्वांगे**—स्वतः जातीनें लक्ष घालून. **जरब**—तोफ, तोफखाना आणि अरबांची पलटण, मोहऱ्यास म्हणजे आघाडीस घातली. **कडेवर आली**—करड असें मूळ गांवाचें नांव आहे. **नेमिली प्राची**— ! **नानाफडणीस चालून दर्शना आला**—पेशवे भोसल्यास भेटण्याच्या आधीं नाना फडणीस भोसल्यांस भेटून आले व पेशव्यांची भेट केव्हा कोठे कशी व्हावी हें त्या बैठकींत ठरलें. **श्रीमंत**—रघूजी भोसले. **शनिवारी एकादशी नेम भेटिला**—२८ फेब्रुवारी १७९५ या दिवशीं फाल्गुन शु. १० येते. जंत्रीवरून ११ स रविवार येतो; परंतु वाराचा उल्लेख केला असतां तोच प्रधान धरावयाचा असतो अर्थात् २८ फेब्रुवारीस मुहूर्तानें भोसले यांची भेट झाली. **भले हो लाला**—भले लोकाला असें तर मुळांत नसेल ? सरदार लोकांच्या भेटी होतांना पांच-दहा जवळचे नामांकित लोक उभयपक्षीं आणण्यांत येतात व सीमांतपूजनाच्या वेळच्या व्याहीभेटीप्रमाणे त्यांच्या भेटी होतात याबाबत हरिवंश बखरींत नानासाहेब पेशव्यानें पुरुषोत्तम दाजी पटवर्धनाची दमाजी गायकवाडाशीं भेट करविली तें वर्णन वाचकांनी काढून पहावें. **पऱ्ह्यांनी**—रांगेनें. **औघ्यांत** ? **तऱ्हेदार**—

तऱ्हेदार पिवळ्या अंबारीमध्यें श्रीमंत ॥ तिकडे चमके औऱ्यांत प्रधानपंत ॥ गज उभे सैन्यामाजीं स्थिर मिरवत ॥ हौद्यासी हौदा भिडे पुढे हुजरात ॥ उतरले दोघे महाराज छबिन्यावरत कंठाकंठ मिळविती आनंदभरित ॥ (चाल) ॥ त्या हर्षे सुटल्या सरबत्ती धुंद गगना ॥ आनंदी मानकरी देती सन्माना ॥ दक्षिण देशीं मसलती एक फडणीस नाना ॥ तो सेनासाहेब नानास करी प्रार्थना ॥ आज मोगल करावा जेर अशी वासना ॥ उभैता सैन्यासह गेले स्वस्थाना ॥ पुढे युद्ध होईल घनघोर हा भास पोटीं ॥ निंबाजी विनंती करी कर जोडुनि पोटीं ॥ ६

सुंदर, विशेष प्रकारच्या. स्थिर मिरवत—उभे केलेले हत्ती जागच्या जागी झुलत होते. छबिन्यावरत—तळापुढील पाहऱ्याची चौकी. मसलती—मुत्सद्दी एक—अद्वितीय. स्वस्थाना—आपापल्या तळावर, मुक्कामास भास पोटीं—असा तर्क होतो. कर जोडुनि पोटीं—नम्रतेने वाकून नमस्कार करतांना जोडलेले हात पोटाशीं येतात. भावार्थ नम्रतेने वाकून विनंति करतो.

तिसऱ्या रघूजी भोसल्याचा पोवाडा

हाही पोवाडा नागपूरचे श्री. चट्टे यांच्याकडूनच मिळाला.

हा पोवाडा तिसऱ्या रघुजीविषयीं आहे. आप्पासाहेब भोसल्यास कैद करून पाठविल्यावर त्याच्या जागीं गादीवर कोणास बसवावें असा प्रश्न आला. वास्तविक त्याच वेळीं नागपूरचें राज्य खालसा होण्याचा प्रसंग होता; कारण पहिल्या रघुजी भोसल्याच्या वंशांतील कोणीच माणूस शिल्लक राहिलेला नव्हता. परंतु गव्हर्नर जनरल हेस्टिंग्ज् याने आप्पासाहेबास गादीवरून काढण्याचा पूर्वींच, एकदां प्रश्न निघाला होता तेव्हां, दुसऱ्या रघुजीची मुलगी बनुबाई इचा मुलगा बजाबा ऊर्फ बाजीराव यास दत्तक देऊन राज्य चालवावें असें सुचविलें होतें. तेव्हां तीच कल्पना पुन्हां पुढे येऊन २५ जून १८१८ रोजीं परसोजीची बायको दुर्गाबाई हिच्या मांडीवर बाजीबास दत्तक देण्यांत आलें व त्याचें नांव तिसरा रघूजी असें ठेविलें.

रघूजी गादीवर आला त्या वेळीं अवघा १० वर्षांचा होता. यामुळे राजवाड्यांतील घराऊ कारभार बांकाबाईने गुजाबादादा गुजर याच्या सल्ल्याने पहावा आणि मुख्य राज्याचा सर्व कारभार इंग्रज रेसिडेंटानें पहावा असें ठरलें. सारांश, बांकाबाई नाममात्र रीजंट राणी म्हणून कारभार पहात होती. ही रीजन्सी १८२६ सालापर्यंत चालली. त्या सालीं रघूजी १८ वर्षांचा सज्ञान झाल्यामुळें त्याच्याकडे राज्यव्यवस्था सोंपविण्यांत आली.

१ डिसेंबर १८२६ रोजीं रघूजीशीं इंग्रजांनी आणखी एक नवीन तह करून त्याला बांधून घेतलें व स्वतःचे सर्व मुद्दे उगवून घेतलें. १८१६ च्या तहान्वयें सबसीडिअरी सैन्य नागपूरकर भोसल्यांना पदरीं बाळगण्याची सक्ती होती. व त्यासाठीं दरसाल ७॥ लक्ष रुपये इंग्रजांना द्यावे लागत. या नवीन तहान्वये त्या वार्षिक साडेसात लक्ष रुपयांच्या बदला तितक्या उत्पन्नाचा मुलूखच इंग्रजांनी तोडून घेतला. या नवीन तहान्वयें रघूजीला राज्यकारभार मिळाला, पण अंमल सर्वस्वी इंग्रज रेसिडेन्टाच्या हातीं गेला. "राजा राज्य करीत नसून रेसिडेन्टच आपल्या अधिकाऱ्यांच्या ऐवजी राजाच्या हाताने राज्य करीत आहे" असें तत्कालीन एका इंग्रज अधिकाऱ्यानेच लिहून ठेवलें आहे.

रघूजीला लिहण्या वांचण्याचें व राज्यकारभाराचें शिक्षण देण्याची

व्यवस्था इंग्रजांनी केली; परंतु रघूजीचा शिकण्याकडे कल नाही अशाच तक्रारी रेसिडेंटच्या रिपोर्टांत सांपडतात.

१८२९ सालीं फिरून इंग्रजांनी एक नवा तह रघूजीशीं केला.

रघुजीचें लग्न २१ मे १८२७ रोजीं शिर्के यांची कन्या गंगाबाई इच्याशीं झालें. पुढे चार वर्षांनी त्याला मुलगा झाला. परंतु तो पांचसहा महिन्यांनीं वारला. यानंतर रघूजीनें चारपांच लग्नें केलीं परंतु मूल झालें नाही. शिवाय दिवसेंदिवस रघूजी व्यसनाधीन होत गेला. त्याच्या ३७ व्या वर्षींच "रघूजी हा बाहेरख्याली-पणामुळे व दारूबाजीमुळे इतका पोखरून गेलेला आहे कीं यापुढे त्याला संतती होण्याचा बिलकूल संभव नाहीं" असे १८४५ सालीं रेसिडेन्टानें ग. जनरलास लिहून कळविलें होतें.रघूजीच्या लग्नाच्या एकंदर आठ बायका व नाटकशाळा तर अनेक होत्या. त्यापैकी जानी नांवाची एक नाटकशाळ होती तिनेच त्यास दारूचें व्यसन लाविलें. रोज एका बाटलीपेक्षा जास्त ब्रॅन्डी तो पीत असे. १८५० सालच्या रेसिडेन्टाच्या एका आठवड्याच्या डायरींत राजाकरितां कांचेचीं भांडीं व व शांपेनच्या बाटल्या विलायतेहून खरेदी करण्याचे काम नोंदलेले होते! ती डायरी गव्हर्नर जनरलने वाचल्यावर त्यानें रेसिडेन्टास कळविलें कीं रेसिडेन्टानें राजाकरितां दारू खरेदीचीं कामें करणें गैरशिस्त आहे. एकदां व्यसनाधीन झाल्यानंतर नाच, गाणें, जुवेबाजी आणि पतंगबाजी आणि कुस्त्यांच्या शर्यती असल्या हलकट करमणुकींतच रघुजीचा सर्व काळ जाऊं लागला. अखेर तो वयाच्या ४७ व्या वर्षी ११ डिसेंबर १८५३ रोजीं मरण पावला.

तिसऱ्या रघूजी भोसल्याचा पोवाडा

२६

(शाहीर–शिवनाथराय)

आज रघुराज, भले रंगिले महाराज, केला वाघोज्याचा साज कोठे नाही असा ॥ भली रंगाची बहार बंगले केले हो तयार भवते खांब सरूदार पहा खूप तऱ्हा ॥ शोभे रंग पिवळा लाल, वर उडतो गुलाल, भाट गर्जंति हवाल, पहा झोक बरा ।। लोक उभे आसपास, म्हणती कारागीर शाबास, धन्य श्रीमंती विलास, नाही न्यून जरा ॥ किती वर्णावें तें धाम ॥ होतो पाहता आराम ॥ जसा अयोध्येचा राम रघुराज असा ॥(चाल) ॥ तरुण वयामध्ये अरुण जसे ।। दिव्य प्रभा फांकली असे ।। सरदार भोळे राव जसे ।। केला स्थळोस्थळीं थाट. उभा मुत्सद्यांचा दाट, केला लौकिकीं बोभाट पुण्यापावेतो ऐसा ।। १

आता ऐका सिल्लेखाना ॥ स्वाधीन गिरमाजीचे जाणा ॥ आणि जामदारखाना ॥ बापूजी जामदार ॥ आता हुजरात पागा खाशी ॥ त्यांत दाजीबा विलासी ॥ नाहीं उपमा तयासी ॥ पहा मोठे जामदार ॥ आता शिरा महालकोठी ॥ त्यांत तात्याची हातोटी ॥ लौकिकाची कीर्ति मोठी ॥ नाही असे कामदार ॥ दुसरा संगीखाना फार ॥ किती वर्णू वारंवार ॥ करी विठोबा विचार ॥ पहा पूर्व ग्रामदार ॥ (चाल) ॥ शिकारखाना पहा बरवा ॥ गाडीखान्याची तेजी हवा ॥ बापू दैवत्या मधे मिरवा ॥ आतां हवेलीचा जमाव ॥ त्यांत शोभे जगदेवराव ॥ काय सांगूं त्याचें नांव ॥ क्षण एक बसा ॥ २

ऐका मुत्सद्यांचा थाट ॥ मोठे मोठे जी आचाट ॥ नजिक सरदारांचा कोट ॥ हातीं ढाल पटा ॥ डावी समशेर कडक ॥ लाल पोषाख भडक ॥

रंगिले—रसिक. अरुण जसे—अरुणाप्रमाणे लालबुंद. लौकिकी—लौकिक असाच मूळ पाठ असावा. बोभाट—कीर्ति. सिलेखाना—हत्यारखाना. संगीखाना— ? पूर्व ग्रामदार—(?) दैवत्या—हैबत्या असें असावे. मिरवा—मिरधा असा मूळ पाठ असावा.

झाला पाहुन सडक ॥ अंग्रेज धीट ॥ तिरतीं पाण्यामध्ये नांव काय सांगू हाव-भाव ॥ ऐसा मुत्सद्यांचें नांव ॥ कटी जरीपटा ॥ केला पेटी आणि जाड नाही चहुं चहुं जोड ॥ केला लौकिकामध्ये जोड ॥ बैठकी ओटा ॥ (चाल) ॥ बसून हवा पाण्याची पहा ॥ शिवरावजी मुख्य महा जन म्हणती अहा अहा ॥ झाला कीर्तिचा पसर ॥ कांही नाही कसर ॥ साऱ्या शाहींत नेसर ॥ सांगू तरी कसा ॥ ३

आला मुत्सद्यांचा भार ॥ आता ऐका हो सरदार ॥ मुख्य श्रमिंतांचा प्यार ॥ बाबाजी गुजर ॥ शोभे समशेर आणि ढाल ॥ सदा रंगांत खुशाल ॥ शेला भरजरी दुशाल ॥ करी कवन हुजुर ॥ बावन पागा बारगीर त्यांत दादोबा गंभीर ॥ साऱ्या कामांत खंबीर ॥ चहूकडे नजर ॥ आता गुजर मोहिते जाण ॥ करी सर्वत्राचा मान ॥ त्याचे तर्क अनमान ॥ सदा गर्जे गजर ॥ (चाल) ॥ अहेरराव नाना पाहणें ॥ दानधर्म अनुदिन जाणे ॥ पाचपेच कांही न जाणे ॥ आता बागुल (बागल ?) पाटणकर ॥ लौकिक घाडग्याचा फार ॥ केली भली हो तलवार ॥ सामने तसा ॥ ४

ऐसे शिवरावजी दिवाण ॥ आतां कृष्णराव जाण ॥ ज्यांचा लौकिकांत मान ॥ तो जोरासी हिरा ॥ सर्व मुत्सद्यांत सार ॥ दावितसे सारासार ॥ करी बसून विचार ॥ बोले मधुरागिरा ॥ भला लोकावरते रबाब ॥ भला जनांत रबाब आणि शिपाई जबाब ॥ बोला धिरा धिरा ॥ ऐसी झालीसे आवाई ॥ आतां फडणीस सवाई ॥ नाना चिटणीस पाही ॥ शाईमध्यें शिरा ॥ (चाल) ॥

मिर्धा म्हणजे सचोंपदार. डावी—डाव्या बाजूस, कमरेस. तिरती—तरती तरंगते. केला पेटी आणि जाड इ.— ? हवा—शोभा. पसर—प्रसर, विस्तार. कसर—बाकी, शिल्लक, व्यंग. नेसर—'नईसर' म्ह. प्रसिद्ध. हा शब्द मलकोजीच्या पोवाड्यात आलाच आहे. भार—समुदाय, संभार. प्यार—प्रितीपात्र. श्रीमंताचा—श्रीमंत भोसल्याचा. त्याचे तर्क अनमान सदा गर्जे गजर ? सामने—समोरा समोर ? तो जोराशी हिरा—वास्तविक तेजोराशी हिरा असा मूळ पाठ असावा. भला—पूर्ण, चांगला. रबाब—रुबाब असें असावें. नाना चिटणीस—माधवराव चिटणीस. शाई—राज्य. शिरा—उत्कृष्ट.

कारखाने श्रमिंताचे ।। वर्जिले हो ऐका साचे ।। मुख्य मुख्य मधे लोभाचे ।। आधीं नारायण काशी ।। झाली माहिती सर्वत्राशीं ।। स्वाधीन कलेक्टरी त्यासी ।। दिसे धर्म जसा ।। ५

मखमलीचे तकिये लोड ।। पडदे किनखापाचे सोड ।। लागे हवायाची झोड ।। रोषणाई बरी ।। बत्त्या मोमबत्या हो फार ।। सुटे बारुदीचा मार ।। केला लंकेचा सुमार ।। असा परोपरी ।। अंग्रेजासी बोलावून ।। त्याशी रचना हे दावून ।। क्षण एक पाहून ।। मेजवानी करी ।। ठायी ठायी तक्तपोश ।। बैठका त्या गाव कोस ।। झाला अंग्रेज संतोष ।। म्हणे तऱ्हा बरी ।। (चाल) ।। असा झोक नाही नाही ।। म्हणुन सर्व देती गाही ।। कीर्ति ऐसी दुरवर पाही ।। कांही वर्णावे ते जनांत ।। जसा कुंजवनीं कृष्णनाथ ।। तैसे शोभे गोकुळांत ।। अनभाव तसा ।। ६

ऐका बंगल्याचा झोक ।। ठायी ठायीं तक्तपोस ।। काय सांगु नोक झोक ।। बैठका करून ।। वाजे सारंगी सतार ।। लागे पखवाजाचा ताल ।। भले गवई गाणार ।। सुरताल धरून ।। देतो छावुनीया रंग ।। सारी सभा होय दंग ।। दिले बंगल्यावरते रंग ।। कुल मिना भरुन ।। वरते शोभे काच पाच ।। चित्र विचित्र तैसाच ।। झाड झडुला सिराज ।। ऐसा रंग करून ।। (चाल) ।। लाल बिलोरी आयने खुले ।। सुवर्ण मोती वर डुले तऱ्हेतऱ्हेचे वर्ख खुले ।। केले रंगाचेहि मोर ।। तेहि पाहति समोर ।। पाहताति थोर-थोर । आलें काम सोडून ।। ७

वर्जिले—वर्णिले असें मुळांत असावें. **मोमबत्या**—मेणबत्या, मोम--मेण. **बारुदी**—बंदुकीची दारू, बंदुकीचा मार म्हणजे आतषबाजी. **लंकेचा सुमार**—लंकादहनाचा खेळ किंवा लंकादहनासारखी आतषबाजी. **अंग्रेजासी**—इंग्रेजासी. **तक्तपोश**—फळ्यांची भुई, कडिपाट, पटई. **गांवकोस**—कोसकोस लांबपर्यंत बैठका घातलेल्या. **गाही**—ग्वाही. साक्ष. **अनभाव**—प्रचीति. **रंग छावणें**—रंग भरणें. **मिना**—एक प्रकारचा हिरवा दगड;त्याचा पातळ रांधा करून चांदीच्या दागिन्यावर बसाविणें. **झाडझडुला**—झाडझाडोरा. **सिराज**--? **आयना**—

झाली भोसल्यांची कीर्ति ॥ किती वर्णावी, ते श्रुति ॥ नाही नाही ऐशी द्दाति ॥ धुंडियेलें त्रिभुवन ॥ कवि शिवनाथराव शिरि वंदुनिया पाय ॥ द्दढ झाली कृपा सांगु काय ॥ केले राव कवन ॥ आतां कवि घरोघर ॥ नाही कोणी बोजदार ॥ करु पाहातातिं जिकर ॥ नाहीं न्यून जरा ॥ ८

आरसा. श्रुति—वास्तविक स्तुति असा मूळपाठ पाहिजे. द्दति—द्दष्टी? भावार्थ त्रिभुवन धुंडिले तरी दुसरीकडे अशी शोभा द्दष्टीस पडणार नाही, किंवा अशी कीर्ति ऐकूं येणार नाही. बोजदार—बोज असलेला, अब्रू-दार, पोक्त, प्रौढ. जिकर—निकर असा: मूळपाठ असावा. निकर म्हणजे चढाओढ, निकर्ष, तेढ, द्वेष.

पुरवणी टीपा

पृ. ४५—किंकर दुमाटला—दुमाटणें असा शब्द कोशांत सांपडत नाही. मोडी वाचनांत दु गु उ यांचा घोटाळा होऊं शकेल. उमडणें असा हिंदी शब्द आहे त्याचा अर्थ आवेश चढणें. 'उमडना—आवेश चढणें.' येथे किंकर उमाडला असा पाठ कदाचित असूं शकेल. भावार्थ पोवाडा गाणाऱ्या कवीलाहि आवेश चढला.

पृ. ४७—जवळ शामह सुंदर डोबा वलयंधर पांचसात कुंदर—"जवळ शामसुंदर घोडा । वलयंधर पांचसात कुंदर" ॥ असा मूळ पाठ असावा. 'वलयंधर कुंदर' म्हणजे ज्यांच्या दांतांना वळीं किंवा कडीं चढविलीं आहेत असे हत्ती. लढाऊ हत्तींच्या दांतांना अधिक बळकटी आणण्यासाठीं अशा तऱ्हेनें वळीं चढविण्याची वहिवाट होती. १८९४ सालीं प्रसिद्ध झालेल्या सापकरकृत बडोदे वर्णनात पृष्ठ १६ वर हत्तीच्या दांतांस घालावयाची कडी' असा उल्लेख आहे.

पृ. ४८—दुजा उदाजी सपूत—उदाजी आंग्रयाचा उल्लेख फक्त एकच ठिकाणीं सांपडला. १७३३ सालीं जुलै महिन्यांत थळ-रेवसचे कोट किंवा चौबुर्ज्या आंग्रयांनी काबीज केल्या. त्या लढाईत उदाजी आंग्रे होता. सेखोजी आंग्रे त्याचा 'चिरंजीव उदाजी' असा उल्लेख करतो. "तिसरे दिवशीं सहा भांडियाची येक रंजक येकसमयाछेदे भडीमार करायाची आज्ञा केली. ते दिवशीं चौबुर्जीवरील गोळ्याने चिरंजीव उदाजी आंगरे व गोलंदाज व सिपाई भांडियासमीप होते त्यांस जखम झाली. तिघे ठार व्हावे, परंतु कांही तफावत जाहाला म्हणोन जखमी जाहाले." (पेशवे दप्तर भाग ३३ पत्र नं. ५८.)

पृ. ५२—चेउलाच्या चौबारा—"चेउलच्याच बारा" असेंही मुळांत असण्याचा संभव आहे. म्हणजे चेउलच्याच किनाऱ्यासमोर.

पृ. ७८—लालबाग—Jaffarkhan, during the first twelve days of the month Rebby-ul-Awual which include the birth of the holy prophet, he feasted people of all conditions, and on those nights, the road from Moheenagar to LOLL BA-

UGH, which was above three miles was illuminated with lamps. Page 111.

[A Narrative of the transactions in Bengal during the Soobhadaries; translated from original Persian by Francis Gladwin 1788.]

पृ. ७९—कवड्याची चाल—ओरिसा प्रांतांत कवड्यांच्या नाण्यांचा फारच प्रचार होता. त्या नाण्याला 'कवडीकहान,' अशी संज्ञा होती.

(स्टर्लिंग याचा लेख. नागपूर प्रांताचा इतिहास-काळे-पृ. ३५५.)

पृष्ठ ७९ बाराभाटी—In the reign of the Emperor अकबर, काळा पहाड an aumeer from the time of Baber, who was a brave Soldier and reputed to have the power of working miracles, invaded Orrisa, by the road of Jarkheud, at the head of twelve thousand cavalry. The reigning prince of the country at the time was Raja मुकुंददेव, whose custom it was to hold his Court for six months and spend the rest of the year in sleep. During the latter time, whoever presumed to disturb him when asleep was sure to be put to death. When the Raja heard of the approach of काळा पहाड he built the fort of Barabhati and there shut himself up and slept accordiug to custom. काळापहाड having defeated his armies, subdued all the country and took prisoner the: Ranee, his wife, with a great booty. He then beseiged Barabhaty, but no one yet dared to awaken the Rajah. Page 146. वरील पुस्तकाचाच आधार].

पृ. ८१—अवघा गोपाळकाला—During the Government of महमद तकी, the Raja of Pursotim (पुरुषोत्तम) had carried away the idol of Jaggaunath, across the river of Jelkeh beyond the boundary of Orrissa, and placed it on a mountain, which secession lessend the revenues near nine lacs of rupees, being the amount of the annual collections from the pilgrims. But Rajah Doond Deo, having made his peace through हबीबुल्लाखान by the payment of a considerable nazarana to the Government, brought back the idol to Pursotim where it was worshipped as before.

The following are some of the ceremonies observed by the Hindoos, during the Pilgrimage to Gagannath at Pursotim. They first shave their heads like the Mussalmans, at the outer gate of the temple, they offer food at the station of Kobeir who was a holy Mussalman dervish, and they eat and drink this offering, which they call terwanee. whilst the Hindoos are Pursotim, they make no scruple to eat with Mussalmans, and other casts, and various kinds of food, ready dressed, are sold in the markets, and eaten indifferently by the Hindoos and Muasalmans. Page 144—145. [वरील पुस्तकाचाच आधार].

पृ. १०८–दिकत—पूर्वी आम्ही 'हिंमत' असा पाठ सुचविला आहे पण कदाचित् दिकत असाच मूळ पाठ असणें शक्य आहे. दिकत करणें म्हणजे हिल्ला हरकत करणें, झगडणें असाही अर्थ होतो.

पृ. १२७—सोलापुरचा किल्ला—About two hundred miles north-east of Poonah, was at this time, one of the finest models of eastern architecture to be met with in the Mahrattha empire. Washed on one face by a large and picturesque lake, the fort rose in majestic beauty, with a number of finely formed stone bastions, joined by remarkably short curtains. and an equally well finished fossebray, with a wide and deep ditch, faced with stone. It had only one Gateway, covered by several bastions and cavaliers and when I saw it, was full of guns and armed men so jealous that they would not permit anyone to approach it. It had a large and well built Pettah, also walled round, with strong gates, embracing another face of the lake, and little did I then dream that this place would afterwards form a part of my own command, in this then distant country. [Military Reminiscences. By Colonel James Welsh. Page 207-08.]

पृ. १३९—रामचंद्र चौधरी—यानेंच पुरंदर व वज्रगड इंग्रजांच्या हवालीं करून दिले.

[८-५-१८१७]

"राजश्री बापू सावंत व गोवर्धनसिंग व महिमाजीराव शिंदे हवालदार किल्ले पुरंदर व वज्रगड व ठाणें माची गोसावी यांसी श्रे॥ रामचंद्र चौधरी रामराम विनंति. उपरि किले मा॥र तिन्ही ठिकाणे इंग्रज बहादर यांचे स्वाधीन करून देण्याविसी रूबरू श्रीमंत राजश्री महाराजांची आज्ञा जहाली. त्यावरून हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे. तरी सहस्र पत्रांचे जागा हें पत्र जानून हें पत्र पावतांच तिन्ही ठिकाणे स्वाधीन करून द्यावी. दुसरे पत्राचा

वा खुणेचा आक्षेप करूं नये. रवाना छ. २० जाखर सन सबा आशर बहुत काय लिहिणें हे विनंति.” [पेशवे दप्तर भाग ३१ पृ. १५३.]

पृष्ठ २४६–मांडवी आणि लहरीपुरा—बडोद्यांतील :मांडवी वेशीवर एक शिलालेख अलीकडे १९३४साली प्रथम संशोधकांच्या नजरेस आला. लेख संस्कृत भाषेंत नागरी लिपींत आहे. तो सन १७३६ सालांत कोरलेला आहे. दमाजीने १७३४ साली बडोदें परत जिंकून घेतले नंतर मालोजी ऊर्फ मल्हारजी नांवाचा त्याचा चुलता यास शहराचा बंदोबस्त सांगितला. त्याच मल्हारजी गायकवाडाने शहरांत एक अत्यंत उत्तुंग अशी मंडप नांवाची शिल्पाची इमारत होती (त्याचीच पुढें मांडवी झाली) ती दुरुस्त केली. इंदुदूत कर्त्यानेहि या ‘ मंडपाचा ’ उल्लेख केला आहे तो असा—

मध्येऽस्त्यत्र प्रचुरसुषमो मण्डपोऽत्यंत तुंग ।
स्तत्र स्थित्वा चतसृषु दिशास्वीक्षणीयं त्वयेन्दो ।
द्रष्टासि द्राक् श्रियमनुपमामस्य विष्वक्पुरस्य ।
रम्यं ह्येतच्छुचिरुचिचतुर्द्वारचैत्यानुकारी ।

या श्लोकांत उल्लेखिलेल्या चार वेशी म्हणजेच लहरीपुरा वेस, पानी वेस, चांपानेर वेस व गेंडी वेस या होत. अर्थात् लहरीपुरा वेस हा बडोद्यांतील एक फार जुना भाग होय. (Important Inscriptions from the Baroda State Vol I by A. S. Gadre).

पृ. २२५—‘ठकाबाई—ठमाबाई असा पाठ असावा असा आम्ही तेथे संशय प्रकट केला आहे. परंतु ठकाबाई असेंच मराठ्यांत नांव असते. दुसऱ्या रघोजी भोसल्याची एक ठकाबाई गुजर नांवाची बहीण होती. (‘नागपूर प्रांताचा इतिहास’ पृ. ३९४.)

पृ. २४५—मांडवींत घडामोडी—“ लहरीपूर दरवाजांतून आंत शिरल्याबरोबर मांडवी दृष्टीस पडते. मांडवी आणि लहरीपूर दरवाजा ह्यांचेमध्ये मोठी थोरली एक व्यापाराची पेठ आहे. तींत व्यापारी लोकांच्या पेढ्या आणि अमदाबादी व बऱ्हाणपुरी कापडमालांचीं दुकानें आहेत. ”

(सापकरकृत बडोद्याचें वर्णन.)

पृ. २४७—इकडे माती तिकडे रेती—"हा सर्व रेताड मुलूख असल्यामुळें तेथें शपथेला देखील खडा मिळावयाचा नाही. याकरितां बडोद्याच्या लोकांना धुळीपासून फारच त्रास सोसावा लागतो."

[बडोद्याचें वर्णन ले. वि. गं. सापकर १८९४ प्रसिद्धी काल.]

पृ. २५१—मांडवी—ह्या नांवाचा एक मोठा चौक बडोदे शहराच्या मध्यभागीं आहे. मोहोरमांतील सरकारी ताबूत या चौकाखालीच बसवितात.

[सापकरकृत बडोदा वर्णन]

पृ. २५२—मैराळ सावकार—"बडोद्यांतील नवकोट नारायण सावकार गोपाळराव मैराळ यांची जिंदगी बडोदे शहराच्या अगदी एकीकडे महंमदवाडीमंध्ये आहे." (सापकरकृत बडोदें वर्णन.)

निवडक शब्दसूचि

याच ग्रंथकर्त्याचीं इतर पुस्तकें

[१] **गीतद्विदल** (कवनसंग्रह) **किंमत ८ आणे.**

[२] **गीतगुंफा** (कवनसंग्रह) **किंमत १२ आणे.**

[३] **ऐतिहासिक पोवाडे अथवा मराठ्यांचा काव्यमय इतिहास**—भाग १ ला, पृष्ठसंख्या ६००, (आवृत्ति संपली) **किंमत ३ रु.**

[४] **विनोदलहरी** (विनोदी लेखसंग्रह, प्र. हनुमान प्रेस, पुणें शहर) **किंमत १। रु.**

[५] **भूतावर भ्रमण**—पृष्ठसंख्या ३००, **किंमत २॥ रु.**

[६] **वसईची मोहीम**—पृष्ठसंख्या ४००, **किंमत ३॥ रु.**

मरीपटा – i २८ – ii २०२ – iii २४२ – iv २३८ – v २०१ vi ९ – ५५
– vii ८९ viii [illegible]

भागें निशाणी :- i १८५
ii १८५
iii ८८
iv ८८- [illegible]